**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

**पृ. शी.** : भिवंडी तालुका व आजूबाजूच्या परिसरात अनाधिकृत गोदामांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होणे

**मु. शी.** : भिवंडी तालुका व आजूबाजूच्या परिसरात अनाधिकृत गोदामांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होणे
यासंबंधी सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, ॲड.आशिष शेलार, श्री. रामनाथ मोते,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. विनोद तावडे ( विरोधी पक्ष नेता ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"भिवंडी तालुका व आजूबाजूच्या परिसरात अनधिकृत गोदामांच्या संख्येत दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात होत असलेली वाढ, आजमितीस सुमारे २ हजार अनधिकृत गोदामे या ठिकाणी कार्यरत असणे, शासनाची कोणतीही परवानगी न घेता विविध प्रकारच्या वस्तूंची व घातक रसायनांची साठवणूक त्यात करण्यात येत असणे, यामुळे अनेकदा सदरहू गोदामांना आग लागून झालेली जीवित व वित्तहानी, कारवाई करण्यास एमएमआरडीए, पोलीस व महसूल विभागाचे अधिकारी स्वत:ची जबाबदारी नाकारुन एकमेकांवर आरोप करीत असणे, ही अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याबाबत अद्यापी कोणतीच कारवाई करण्यात आलेली नसणे, गोदाम मालक भाड्यापोटी लाखो रुपये मिळवत असताना शासनास मात्र कोणताही महसूल मिळत नसणे, या गोदाम मालकांकडून भाड्याच्या रकमेपैंकी ५० टक्के उत्पन्न शासनाने अनर्जित उत्पन्न म्हणून जमा केल्यास शासनाचे उत्पन्न दरवर्षी १२० कोटी रुपयांनी वाढण्याची शक्यता,शासनाची याबाबत तातडीने करावयाची कारवाई व प्रतिक्रीया "

श्री. भास्कर जाधव ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय नगरविकास राज्यमंत्र्यांना मला एकच प्रश्न विचारावयाचा आहे की, भिवंडी परिसरात जी काही गोदामे आहेत ती अधिकृत आहेत की, अनाधिकृत आहेत ? जर ही गोदामे अनाधिकृत असतील तर आपल्या ठाण्यामध्ये सामान्य माणसांनी बायकांचे दागिने विकून जी काही घरे घेतलेली आहेत ती सुध्दा बेकायदेशीर घेतलेली आहेत. ठाण्यामध्ये बेकायदेशीर घरे पाडण्याचा सपाटा लावला आहे. सामान्य माणसाला बेघर करण्याचा सपाटाच लावला आहे. ही घरे अनाधिकृत असल्यामुळे त्या ठिकाणच्या अधिकाऱ्यांनी घरे पाडण्याचा सपाटा लावला आहे. 74 लोकांचे बळी गेल्यानंतर अशा प्रकारची ॲक्शन होणे येथपर्यंत आम्ही समजू शकतो. भिवंडीच्या परिसरातील गोदामे अनाधिकृत असतांना सुध्दा ती का पाडली जात नाहीत, या ठिकाणच्या गोदामांना आपण भेट दिलेली आहे काय, त्या ठिकाणी गाठी भेटी झ ाल्या आहेत काय ? या गोदामांना आग लागली तर ती आग विझवण्यासाठी फायर ब्रिगेडच्या गाडया सुध्दा त्या ठिकाणी जाऊ शकणार नाही अशी परिस्थिती आहे.

सभापती महोदय, हृदय प्रताप त्रिपाठी- इंडियन कॉर्पोरेशन, विनोद माळवे-अरहान वेअर हाऊस, किशोर शहा-राज लक्ष्मी, हसमुख्य डेअरी-अर्यन, विकास जैन-पृथ्वी, महावीर जैन-एजंल या लोकांचे या ठिकाणी जवळपास 80 टक्के गोदामे असून ती बेकायदेशीर आहेत. या विषयाच्या संदर्भात महसूल विभागाला विचारणा केली तर ते सांगतात ती आमची नाहीत, एमएमआरडीएला विचारले तर ते सांगतात ती गोदामे आमची नाहीत. अशा प्रकारची टोलवाटोलवी केली जात आहे. 8-9 महिने पत्र व्यवहार करुनही ही गोदामे कोणाची आहेत याची आम्हाला माहिती मिळू शकत नाही. त्यामुळे मला एवढेच विचारावयाचे आहे की, ही गोदामे अनाधिकृत आहेत काय, ही गोदामे जर अनाधिकृत असतील तर ती ताबडतोब जमीनदोस्त केली जाणार आहे काय, या लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने मी जी काही नावे घेतलेली आहेत त्यांच्यावर ताबडतोब फौजदारी गुन्हे दाखल केले जाणार आहेत काय ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या गंभीर प्रश्नाच्या निमित्ताने शासनाचे लक्ष वेधलेले आहे. या भागात मोठया प्रमाणात गोदामे बांधली गेली आहेत ही वस्तुस्थिती आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या ठिकाणची गोदामे बेकायदेशीर रित्या बांधलेली आहेत काय असा प्रश्न विचारला आहे. यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, या ठिकाणची बहुतांशी बांधकामे बेकायदेशीरच आहेत.

यानंतर श्री. मंगेश.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आता मला खरेच लाज वाटते. ही बांधकामे बेकायदेशीर आहेत हे माहीत असताना सुद्धा शासनातर्फे कारवाई करण्यात येत नाही. शासनाचे असे म्हणणे आहे की, सदर बांधकामासंबंधी नोटीसा पाठविण्यात आल्या होत्या. मात्र, शासन संबंधितांविरूद्ध पोलिसी कारवाई करत नाही, फौजदारी गुन्हा दाखल करत नाही. शासन ज्या प्रमाणे सामान्य माणसांची घरे तोडत आहे त्याप्रमाणे भिवंडी येथील अनधिकृत गोदामे ताबडतोब तोडण्यात येणार आहेत काय, सदर गोदामे तोडण्याचे आदेश शासन देणार आहे काय व संबंधितांविरूद्ध फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, येथे सन 2007 पर्यंत स्पेशल प्लानिंग ऑथॉरिटी नव्हती. तेथे आता स्पेशल प्लानिंग ऑथॉरिटी म्हणून एमएमआरडीएला नेमण्यात आले आहे. या विभागाने डेव्हलपमेंट प्लॅन तयार करण्याचे काम हाती घेतले आहे. यासंबंधी सन 2011 मध्ये सूचना व हरकती मागविण्यात आल्या होत्या. सदर डेव्हलपमेंट प्लॅन अंतिम टप्प्यामध्ये आलेला आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी येथे पाच-सहा जणांची नावे घेतली आहेत. ती माझ्याकडे नाहीत. ती नावे आपल्या मार्फत माझ्याकडे आली तर नियमानुसार चौकशी करण्यात येईल व एमआरटीपी ॲक्टनुसार फौजदारी गुन्हा दाखल करणे शक्य असेल तर तो देखील करण्यात येईल.

श्री.निरंजन डावखरे : सभापती महोदय, दिनांक 26 जुलै 2005 रोजी पूर आला होता. या पुरामुळे येथे भीषण परिस्थिती निर्माण झाली होती. या पुरामध्ये अनेक लोक मृत पावले होते. त्यामुळे येथील बांधकामे तोडण्यात येणार आहेत अशी ओरड झाली. सदर बांधकामे तोडण्याचे शासनाने आश्वासन देखील दिले होते. ग्री झोन, मॅनग्रोव्हज यांची कत्तल करून गोदामे उभारण्यात आलेली आहेत. बरेच ठिकाणी एन.ए.करून अनधिकृत बांधकामे करण्यात आली आहेत. अनेक ठिकाणी एन.ए.नसून देखील बांधकाम करण्यात आले आहे. फायर प्रोव्हीजन नसताना मोठ्या प्रमाणावर गोदामांचे बांधकाम सुरू आहे. आज देखील मॅनग्रोव्हजची कत्तल करण्यात येत आहे. आताच माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, एमएमआरडीए आराखडा तयार करीत आहे. असे जरी असले तरी यावर कारवाई करणारी यंत्रणा नेमकी कोणती आहे व त्यांच्याकडून कधी कारवाई होणार आहे ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, एमआरटीपी ॲक्ट नुसार कलम 53 अन्वये नोटीस दिली जाते. एफएसआयचे व्हॉयलेशन केले आहे काय, परवानगी न घेता बांधकाम केले आहे काय, सदर बांधकाम करताना डायरेक्टर, फायर सर्व्हीस यांचा दाखला घ्यावा लागतो तो घेतला आहे की नाही, चीफ सेंट्रल एक्सप्लोझीव्ह विभागाचा दाखला घेतला आहे की नाही, पर्यावरण विभागाचा दाखला घेतला आहे की नाही, या संबंधातील सर्व चौकशी करावी लागते. तसेच तेथील नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने काळजी घेतली आहे की, नाही हे पाहिले जाते. तेथे वरच्या वर आगी लागलेल्या आहेत. या सगळ्या गोष्टी विचारात घेऊन कठोरात कठोर कारवाई केली जाईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, 25-30 वर्षांनी मुंबईचा विस्तार होईल हे गृहीत धरून एमएमआरडीए निर्माण करण्याचा दृष्टीकोन स्वीकारला होता. येथे नवीन बांधकाम करताना परवानगी देण्यासंबंधीचा अधिकार देण्याचा निर्णय घेण्यासंबंधीचा धोरणात्मक निर्णय शासन घेणार आहे काय ? या क्षेत्राचे संपूर्ण नियोजन एमएमआरडीने केले आहे. नवीन बांधकाम करताना त्याची परवानगी देण्याचा अधिकार ग्रामपंचायत, नगरपंचायत यांना न ठेवता तो एमएमआरडीएकडेच असला पाहिजे. एमएमआरडीएचे कार्यालय जिल्हा पातळीवर स्थापन करावे लागेल. ठराविक क्षेत्रातील बांधकामाची परवानगी खालच्या स्तरावरच दिली पाहिजे, असा धोरणात्मक निर्णय घेण्याचे शासनाने ठरविले होते. त्याची अंमलबजावणी राज्य शासन करणार आहे काय ?

यानंतर श्रीमती रणदिवे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय,सन्माननीय सदस्यांचा प्रश्न असा आहे की, शासनाने कोणतेही धोरण ठरविताना किंवा पॉलिसी ठरविताना किंवा एखादी एजन्सी नेमताना ती एजन्सी सेंट्रलाईज न होता, ग्रास रुटपर्यंत आणि सर्वसामान्य माणसांना सहज उपलब्ध व्हावे अशा प्रकारची यंत्रणा असावी. आपला प्रश्न रास्त आणि पॉलिसी मॅटर बाबत विचार करण्यासारखा असल्यामुळे आपल्या प्रस्तावाचा शासन निश्चितपणे तपासून विचार करील .

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, हा अतिशय गंभीर विषय आहे. मी माननीय मंत्री महोदयांना फक्त तीन स्पेसिफीक प्रश्न विचारु इच्छितो की, या सदनामध्ये माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, नार्कोली पोलीस स्टेशनमध्ये आय.पी.सी.खाली गुन्हे रजिस्टर झाले, पर्यावरण संरक्षण अंतर्गत गुन्हे इललीगल झाले. पेट्रोलिअम ॲक्टखाली गुन्हे ईललीगल झाले. अशा प्रकारे तीन-तीन ॲक्टखाली गुन्हे रजिस्टर झाले. तसेच चौथे एम.आर.टी.पी.ॲक्ट खाली गुन्हे रजिस्टर झाले. एकंदर चार-चार कायद्याखाली गुन्हे रजिस्टर झाल्यानंतर सुध्दा ईललिगल कन्स्ट्रक्शन आणि ईललिगल ॲक्टीव्हीटी काही थांबल्या नाहीत. एमआरटीपी ॲक्टच्या सेक्शन-55,56,57,58,59 अंतर्गत जर अशा ॲक्टीव्हीटी सतत सुरु राहिल्या तर दररोज प्रॉसीक्युशन केले पाहिजे अशी कायद्यामध्ये प्रोव्हीजन आहे. अशा प्रकारे सरकार एम.आर.टी.पी. ॲक्ट खाली दररोज प्रॉसीक्युशन करणार आहे काय? हा माझा पहिला प्रश्न आहे.

सभापती महोदय, माझा दुसरा प्रश्न असा आहे की, आय.पी.सी.पेट्रोलिअम ॲक्ट आणि सी.आर.पी.सी.खाली गुन्हे दाखल केल्यानंतर सुध्दा जर गुन्हेगार कंट्रोल मध्ये येत नसेल तर त्याला तडीपार सुध्दा करता येते असे गृह विभाग ठरवू शकते. त्यामुळे या गोदाम मालकांना तडीपार करण्याच्या प्रक्रियेविषयी आपण गृह विभागाला सांगणार आहात काय? माननीय मंत्री महोदयांनी या दोन प्रश्नांची उत्तरे द्यावीत.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली गोष्ट खरी आहे की, अशा प्रकारे वेगवेगळ्या विभागाकडून कार्यवाही झाल्यानंतर, त्याची तत्काळ दखल घेतली जात नसेल तर दररोज अशा प्रकारे कारवाई व्हावी अशी कायद्यामध्ये तरतूद आहे. मी मघाशी सांगितले की, 2007 मध्ये स्पेशल प्लॅनिंग ॲथॉरिटी कोणी नव्हती. पण आता एम.एम.आर.डी.ए.आहे. डिसेंबर मध्ये त्यांनी आपला जो प्लॅन तयार केलेला आहे, तो आर.पी.मध्ये आहे, डी.पी.मध्ये नाही. त्यामुळे आर.पी.चा प्लॅन हा सजेशन आणि ऑब्जेक्शनसाठी शासनाकडे आलेला आहे. शासनाने ...

. . . .सी-2



असुधारीत प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव . . . .

नियमा प्रमाणे तो आता डायरेक्टर ऑफ टाऊन प्लॅनिंग यांच्याकडे पाठविला आहे आणि तो लवकरच शासनाकडे येईल आणि त्यामध्ये हा लॉजेस्टीक हब म्हणून प्रस्तावित केलेला आहे. कारण त्याची त्या परिसरामध्ये गरज आहे. लॉजिस्टीक हबमध्ये गोडाऊन्स् येणार आहेत. सध्या एप्रिल महिना सुरु आहे. मात्र आम्ही या बाबतीत मे महिन्यापर्यंत सदरहू प्लॅनला अंतिम स्वरुप देऊ. त्यानंतर मघाशी माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले त्यानसार आणि आता सुध्दा या लॉजिस्टीक हबच्या बाहेर जे-जे कोणी येतील, त्यांच्याबाबत आपण सांगत आहात. त्यांच्यावर 56, 57 च्या नियमानुसार कारवाई केली जाईल आणि नियमानुसार सातत्याने कारवाई करुन देखील जे कोणी अशाच पध्दतीने नियमांचे उल्लंघन करतील त्यांच्यावर तडीपारीची कारवाई सुध्दा केली जाईल.

**उप सभापती** : यानंतर मी आपल्याला शेवटचा प्रश्न विचारतो. हे ठाणे जिल्ह्यात आहे आणि ही गोडाऊन्स ज्या भागामध्ये झालेली आहेत, तो संपूर्ण भाग भिवंडीलगत येतो. भिवंडी महानगरपालिकेने रिझर्व्हेशन करुन हा सगळा विभाग भिवंडी महापालिकेच्या परीक्षेत्रामध्ये समाविष्ट करावा अशा प्रकारचा ठराव करुन राज्य शासनाकडे पाठविला होता.परंतु या गोडाऊन्सनां संरक्षण देत असताना राज्य शासनाने सदरहू रिझर्व्हेशनच्या अंमलबजावणीचा प्रयत्न केलेला नाही. भिवंडी महानगरपालिका ही आर्थिकदृष्ट्या अत्यंत दुर्बल आहे. वास्तविक पाहता या ठिकाणी इतकी प्रचंड प्रमाणात गोडाऊन बांधल्यानंतर ती तोडण्याच्या बाबतीत कोणताही प्रयत्न केलेला नाही. त्याठिकाणी एम.एम.आर.डी.ए.चा डेव्हलपमेंट प्लॅन जाहीर करण्यात आला. या गोडाऊन्सच्या बाजूला जो झोन आहे, त्याचे नाव मला आता माहिती नाही. पण या सगळया परिस्थितीमध्ये शासन ही गोडाऊन्स भिवंडी महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये समाविष्ट करणार आहे काय? असा माझा प्रश्न आहे.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, आपण परवा देखील हा प्रश्न विचारला होता. खरे म्हणजे महानगरपालिकेमध्ये हद्दवाढीचा प्रस्ताव येतो. महानगरपालिकेने हद्दवाढीचा प्रस्ताव केल्यानंतर त्या संदर्भात अंतिम निर्णय शासन घेत असते. परंतु त्या संदर्भात शासनाने अंतिम निर्णय घेतलेला नाही. अशाप्रकारचा निर्णय शासनाने घ्यावा असा आपला आग्रह आहे. कारण आपला त्या संदर्भात मोठा अभ्यास आहे. या संदर्भात आर.पी.चा रिपोर्ट तयार होईल किंवा या संदर्भात शासनाकडे अंतिम बैठक होईल त्यावेळी निर्णय होईल. ही गोडाऊन्स फक्त मे महिन्यापर्यंत राहणार आहेत. मे महिन्यानंतर काहीही निर्णय झाला म्हणजे आर.पी.मध्ये राहिले किंवा महानगरपालिकेमध्ये राहिले तरी कारवाई होईल. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी विचारले होते की, मी त्या ठिकाणी भेट दिली का ? त्याबाबत सांगू इच्छितो की, मी पूर्वी ट्रकवर क्लिनर होतो. ट्रकचा ड्रायव्हर होतो त्यावेळी त्या गोडावूनमध्ये माल भरण्यासाठी जात होतो. मागील दहा-पंधरा वर्षात मी तेथे गेलो नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय मंत्री जेव्हा ड्रायव्हर होते त्यावेळी ही गोडावून्स तेथे नव्हती. मी ज्या गोडावून्सच्या उल्लेख करीत आहे ती हाय-वेला लागून आहेत व ती गोडावून्स वातानुकुलित आहेत. ती गोडाऊन्स गरिबांची असती तर आम्ही काही बोललो नसतो. एमएमआरडीए गोडावून झोन लीगलाईज करील. पण जे इल-लीगल केलेले आहे त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे. डी.पी.वगैरे झाल्यानंतर सुध्दा ज्यांनी चुकीचे काम केलेले आहे त्यांच्यावर कारवाई करणार आहात काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी अगोदर सांगितले की, आपण मे महिन्यापर्यंत थांबले पाहिजे. लॉजिस्टिक हबमध्ये सुध्दा जे नियमात बसत असतील त्या व्यतिरिक्त जी काही गोडाऊन्स असतील त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल. अगदी रासुका पासून हद्दपारीपर्यंत ज्या गोष्टी सांगितल्या त्या कारवाया केल्या जातील.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सुरुवातीला सांगितले की,संबंधितांवर कारवाई करण्यात येईल. आता मंत्री महोदय सांगत आहेत की, ते नियमात बसत असतील तर कारवाई करणार नाही. ते नियमात कसे बसतील ? त्यांनी एक्प्लोझीव्ह लायसेन्स

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

काढलेले नाही. त्यांनी पर्यावरण विभागाची परवानगी घेतलेली नाही. असे असताना त्यांनी केलेले बांधकाम रेग्युलराईज करणार असाल तर त्याला काही अर्थ राहणार नाही. तेव्हा याबाबत मंत्री महोदय खुलासा करतील काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी मघाशी सांगितले की, नियमबाह्य काम रेग्युलराईज केले जाणार नाही. लॉजिस्टिक हबमधील आपले जे काही नियम आहेत त्या नियमामध्ये ते बसत असतील तर ती गोडाऊन तोडून काय करणार आहे आणि त्याठिकाणी गोडाऊन्सची गरज देखील आहे. तेव्हा त्या ठिकाणी जे काही चुकीचे काम केले असेल त्याबाबत कोणत्याही प्रकारची कुचराई केली जाणार नाही. कोणतीही तडजोड केली जाणार नाही. ही बांधकाम जाणीवपूर्वक रेग्युलराईज करण्यासाठी त्यांना सहकार्य देखील केले जाणार नाही.

-----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ ST/ D/ पूर्वी श्रीमती रणदिवे.. 11:15

**पृ. शी.** : औरंगाबाद शहरातील ऐतिहासिक वारसा असलेल्या "नहरे अंबर " या पाणी पुरवठा व्यवस्थेकडे महापालिका व प्रशासनाचे झालेले दुर्लक्ष

**मु. शी.** : औरंगाबाद शहरातील ऐतिहासिक वारसा असलेल्या "नहरे अंबर" या पाणी पुरवठा व्यवस्थेकडे महापालिका व प्रशासनाचे झालेले दुर्लक्ष या संबंधी प्रा.सुरेश नवले, सर्वश्री संजय दत्त, भाई जगताप, चरणसिंग सप्रा, सुभाष चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

प्रा.सुरेश नवले ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"औरंगाबाद शहराच्या स्थापनेपासून चारशे वर्षापूर्वीचा ऐतिहासिक वारसा असलेल्या "नहरे अंबरी" या पाणीपुरवठा व्यवस्थेकडे महापालिका व प्रशासनाचे दुर्लक्ष झाल्याने सदरहू ऐतिहासिक पाणी ठेवा नष्ट होण्याच्या मार्गावर असल्याचे नुकतेच निदर्शनास येणे, सद्य:स्थितीत पैठणच्या जायकवाडी जलाशयातून शहराला पाणीपुरवठा होत असला तरी, धरणातील अपुरा पाणीसाठा व दुष्काळी स्थितीमुळे तीन दिवसाआड पाणीपुरवठा होत असणे, काही वीटभट्टी मालक "नहरे अंबरी" पाणीपुरवठा व्यवस्था फोडून त्यातील पाण्याचा वापर करीत असणे, संबंधित प्रशासन या गैरवापरास अटकाव करीत नसल्याने नागरिकांमध्ये निर्माण झालेली चिडीची व असंतोषाची भावना, शासनाने या प्रकरणी त्वरित करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

श्री. भास्कर जाधव ( नगर विकास राज्य मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, ही 400 वर्षापूर्वीची पाणी पुरवठा योजना आहे. मलिक अंबर यांनी त्या काळामध्ये तीन-चार लोकवस्तीला पाणी पुरेल या शास्त्रीय दृष्टीकोनातून ही योजना घेतली होती. ही उपयुक्त अशी योजना आहे. या योजनेकडे औरंगाबाद महानगरपालिकेचे पूर्ण दुर्लक्ष झालेले आहे. माननीय उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने सूचना दिलेल्या आहेत की, या योजनेचा सर्वंकष अभ्यास करुन त्या योजनेचे पुनरुज्जीवन कसे करता येईल हे पहावे. माननीय न्यायालयाने दिलेल्या निदेशानुसार एक समिती गठीत करण्यात आलेली आहे. ही समिती आपला अहवाल माननीय उच्च न्यायालयाला देणार आहे. त्यानंतर माननीय उच्च न्यायालयाच्या आदेशा प्रमाणे आपण कार्यवाही करणार. आपण एवढी वाट पाहण्याची आवश्यकता नाही. या योजनेवर हातभट्टीवाले व वीट भट्टीवाले यांनी अनेक ठिकाणी छिद्र पाडून पाणी घेण्यास सुरुवात केलेली आहे. अनेक ठिकाणी घरे बांधलेली आहेत. तेव्हा ही ऐतिहासिक पाणी पुरवठा योजना सुरु करण्याच्या प्रयत्न शासन करणार आहे काय ? ही योजना सुरु केल्यामुळे नाथसागर मधून मराठवाड्याला जो पाणी पुरवठा होतो त्यावरील ताण कमी होणार आहे. तेव्हा माझा प्रश्न आहे की, ही योजना तत्काळ सुरु करण्याच्या दृष्टीने राज्य शासन काय प्रयत्न करणार आहे ?

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांनी आम्हा सर्वांच्या अभ्यासासाठी एक महत्त्वाचा प्रश्न सभागृहात लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून मांडला आहे. आपले पूर्वज किती दूरदृष्टीचे होते, ते किती उत्तम प्रकारचे इंजिनियर आणि नियोजक होते याचे उत्तम उदाहरण म्हणजे 'नहरे अंबरी' ही योजना होय. 400 वर्षांपूर्वी ग्रॅव्हीटी प्रेशरच्या माध्यमातून कोणतेही पाईप न टाकता पाणी जमिनीतून झिरपून ते औरंगाबाद शहराला मिळावे अशा प्रकारची ही योजना आहे. आताच्या युगात आपण तंत्रज्ञानाचा बोलबाला करतो आणि त्याचा आदर्शही बाळगतो. किंबहुना त्या बद्दल चांगले बोलले पाहिजे. हे तंत्रज्ञान अभ्यास करण्यासारखे आणि उत्तम आहे. नहरे अंबरी या योजनेतून अनधिकृत झोपड्या, वीटभट्टया यांच्या माध्यमातून जागोजागी छिद्र करुन पाणी घेण्याचे काम सुरु आहे. त्या ठिकाणी 100 चेंबर्स असल्यामुळे या संदर्भात काय करणार असे सन्माननीय सदस्यांनी विचारले आहे.

महोदय, मी आज सकाळी ब्रिफींग घेत असताना एक निर्णय घेतला आहे. आपल्यासारख्या लोकप्रतिनिधींना, स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी आणि उच्चपदस्थ इंजिनियर्स यांना बोलावून, या बाबत न्यायालय काय म्हणेल हा विषय अलाहिदा ठेवून, ही योजना औरंगाबाद महानगरपालिकेवर अवलंबून न ठेवता ती हेरिटेज योजना मानून, स्वतंत्रपणे नगर विकास विभागाकडून या योजनेला पैसे देऊन ही योजना कार्यान्वित करण्याचा निर्णय घेतला आहे. सन्माननीय सदस्यांना मान्य असेल तर या संदर्भात एक बैठक घेण्यात येईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, जालना येथील घाणेवाडी धरणाच्या बाबतीत सुध्दा ग्रॅव्हीटी प्रेशरच्या बाबतीत असाच प्रश्न निर्माण झालेला आहे. 10 कोटी रुपये खर्च करुन त्या धरणातील गाळ काढला तर त्या ठिकाणी नैसर्गिकरित्या पाणी साठू शकते. या बाबत सुध्दा बैठकीमध्ये विचार व्हावा.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितल्यानुसार एकाच वेळी दोन्ही बाबींचा अभ्यास करण्यास हरकत नाही. त्या दृष्टीने अभ्यास करता येईल.

---------

**<u>लक्षवेधी सूचना क्रमांक 3 व 4 बाबत</u>**

**उप सभापती** : ठीक आहे. सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांची लक्षवेधी सूचना क्रमांक-3 आहे. ते सभागृहात उपस्थित नाहीत. तसेच आजच्या कामकाजपत्रिकेवर दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक-4 पुढे ढकलण्यात येत आहे.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, लक्षेवधी सूचना क्रमांक-4 ही उद्या घेण्यात यावी.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : कोकणातील विकासाची गती वाढविण्यासाठी नवीन योजना कोकण विकास कार्यक्रम अंतर्गत मार्च-2012 अखेर मंजूर केलेली कामे पूर्ण न होणे

**मु. शी.** : कोकणातील विकासाची गती वाढविण्यासाठी नवीन योजना कोकण विकास कार्यक्रम अंतर्गत मार्च-2012 अखेर मंजूर केलेली कामे पूर्ण न होणे, या संबंधी ॲड.आशिष शेलार, सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

ॲड.आशिष शेलार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"कोकणातील विकासाची गती वाढविण्यासाठी त्या विभागात पायाभूत सुविधा निर्माण करणे, शैक्षणिक व आरोग्य विषयक सुविधा निर्माण करणे, पर्यटनाला चालना देणे यासाठी नवीन योजनांचा कोकण विकास कार्यक्रम सन २००९-१०, सन २०१०-११, सन २०११-१२ या तीन वर्षासाठी निर्णय घेतलेला असणे, कोकण विकास कार्यक्रमाअंतर्गत पर्यटन विभाग, पर्यावरण विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग इत्यादी विभागांमार्फत उपक्रम राबविण्यात येत असून, सदर कार्यक्रमाची एकूण किंमत रुपये ५३११.०७ कोटी असणे, सदर कार्यक्रमानुसार दिनांक ३१ मार्च, २०१२ पर्यंत उद्दीष्ट पूर्ण करण्याचे ठरविले असूनही मार्च २०१२ अखेर मंजूर असलेली कामे पूर्ण झ ाली नसल्याचे निदर्शनास येणे, एकूण तरतुदींपैकी मार्च २०१२ अखेर रुपये ४३२८.४७ कोटी इतका खर्च झाला असणे, सदर कार्यक्रम हा एक पॅकेज म्हणून घोषित केलेला असल्यामुळे यासाठी वेगळी विशेष तरतूद करण्याची आवश्यकता असताना या तीनही वर्षांच्या विभागनिहाय अर्थसंकल्पात तरतूद करणे, मंजूर निधी वेळेत न मिळणे, तसेच, सदर योजनेचा कालावधी संपल्यामुळे मंजूर निधीही वितरित न होणे, रुपये ४३२८.४७ कोटी खर्च केला असला तरी कोकणामध्ये कोणताही विकास अथवा मोठे प्रकल्प आढळून येत नसणे, यामुळे कोकणवासीयांच्या मनात शासनाप्रती निर्माण झालेला असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

..3..



SJB/ D/ ST/ पूर्वी श्री.अजित.... 11:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक ( वित्त राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदनानंतर

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, कोकणाच्या दृष्टीने हा विषय अतिशय गंभीर आहे. सरकारने 25 ऑगस्ट, 2009 रोजी आदेश निर्गमित करुन कोकण विकास कार्यक्रम घोषित केला होता. 2009-2010, 2010-2011 व 2011-2012 या तीन वर्षांत 5311 कोटी रुपये कोकणातील मूलभूत विकासासाठी साधन संपत्तीनुसार खर्च करण्यासाठी कार्यक्रम ठरविला. या सर्व कार्यक्रमाची भौतिकदृष्ट्या उद्दिष्टपूर्ती मार्च-2012 पर्यंत करावयाची होती. दि.31 मार्च, 2012 पर्यंत 1981 कोटी रुपये खर्च झालेले नाहीत. 3 वर्षात हे काम पूर्ण करावयाचे होते. 5311 कोटी रुपयांतील 1981 कोटी रुपये अजून खर्च झालेले नाहीत. विभागवार सांगावयाचे झाल्यास, पर्यटन विभागाचे 100 कोटी रुपये, बंधारे आणि जिल्हास्तरीयचे 92 कोटी रुपये, सार्वजनिक बांधकाम (रस्ते) विभागाचे 197 कोटी रुपये, जलसंपदा व जलसंधारण विभागाचे 448 कोटी 50 लाख रुपये, पाणी पुरवठा विभागाचे 171 कोटी रुपये, नगरविकास विभागाचे 313 कोटी रुपये, उच्च शिक्षण विभागाचे 117 कोटी रुपये खर्च झालेले नाहीत. मुळात या कार्यक्रमांतर्गत त्या त्या विभागाने स्वत:हून खर्च करावयाचा होता. केंद्र सरकारकडून आलेला पैसा, राज्य सरकारकडून वित्तनिहाय मिळालेला पैसा खर्च करावयाचा होता. 1981 कोटी रुपये खर्च न केल्यामुळे कोकणातील लोकांना पुरेशा सुविधा मिळाल्या नाहीत. ही रक्कम दि.31 मार्च, 2012 पर्यंत खर्च करण्याबाबत आदेश निर्गमित करुन सुध्दा ज्या अधिकाऱ्यांच्या दिरंगाईमुळे पैसे खर्च झाले नाहीत त्यांच्यावर कारवाई करण्यात येणार आहे काय ? तसेच दि.31 मार्च, 2012 पर्यंत 1981 कोटी रुपये खर्च झाले नसल्यामुळे तो पैसा कधीपर्यंत खर्च करुन कोकणातील नागरिकांना सुविधा देणार आहात ?

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, कोकण विकास कार्यक्रम 2009 मध्ये जाहीर झाला. जाहीर झालेल्या कार्यक्रमासाठी राज्य शासनाने जे परिपत्रक काढले त्यामध्ये हा सर्व जो खर्च करावयाचा आहे तो उपलब्ध प्लॅन, नॉन प्लॅन आणि जिल्हा प्लॅनमधील उपलब्ध निधीतून करावयाचा आहे. हे करीत असताना साधारणत: 3 वर्षामध्ये जो खर्च झाला त्या संदर्भात सुध्दा मी सांगेन. परंतु मंत्रिमंडळाचा जो निर्णय झाला त्या निर्णयानुसार या कार्यक्रमामध्ये रकमेची जी तरतूद होती ती प्रशासकीय विभागांनी त्यांच्याकडे असलेल्या विविध स्त्रोतातून उपलब्ध होणाऱ्या नियतव्ययातील निधीमधून प्राधान्य ठरवून भौतिक उद्दिष्ट मार्च 2012 पर्यंत पूर्ण करावयाचे होते. शासन निर्णयानुसार एकूण तीन वर्षात 5311 कोटी रुपये इतका निधी उपलब्ध करुन द्यावयाचा होता. विभागाकडून प्राप्त माहितीनुसार त्यापैकी मार्च, 2012 पर्यंत 4328 कोटी रुपये इतका खर्च झालेला आहे. जो खर्च झालेला नाही त्यामध्ये कोठे भूसंपादनाचा प्रश्न असेल किंवा इतर भौगोलिक परिस्थितीनुसार काही प्रश्न होते त्यामुळे खर्च झालेला नाही.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, भूसंपादनाचा प्रश्न असेल तर कोकणाविषयी मोघम सांगू नये. तसा प्रश्न कोठे आला असेल तर स्पेसिफिक सांगावे. रिलायन्सच्या बाबतीत भूसंपादनाचा प्रश्न येत नाही. जैतापूरला भूसंपादनाचा प्रश्न येत नाही. एन्रॉन प्रकल्पाच्या ठिकाणी भूसंपादनाचा प्रश्न आला नाही. आमच्या विकास कामामध्ये भूसंपादनाचा प्रश्न येतो. म्हणजे हे शासन कोकणाला बदनाम करीत आहे. कोणत्या ठिकाणी भूसंपादनाचा प्रश्न आहे ते स्पेसिफिक सांगितले तर आम्हाला ते बघता येईल.

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, 4328 कोटी रुपये खर्च झालेला आहे. एकूण कार्यक्रम 5311 कोटी रुपयांचा होता. त्यातील मेजर रक्कम खर्च झालेली आहे. जो खर्च झालेला नाही त्या संदर्भामध्ये मी सांगितले. जी कामे हाती घेण्यात आली होती त्यात बंदरांची जी कामे होती त्यामध्ये जेटी शेड बांधण्याची 109 कामे मंजूर होती. त्यापैकी 2011-2012 पर्यंत 82 कामे पूर्ण झाली आणि 27 कामे प्रगतिपथावर आहेत. त्या कार्यक्रमामध्ये ड्रेझर खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यासाठी 9.32 कोटी रुपये एवढा खर्च झालेला आहे. धूपप्रतिबंधक बंधारे बांधण्याचा निर्णय होता. त्यामध्ये ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील 39 मंजूर कामांपैकी 29 कामे पूर्ण झालेली असून 7 कामे प्रगतिपथावर आहेत.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ ST/

श्री. राजेंद्र मुळक .....

सभापती महोदय, फिशिंग जेटी बांधकाम व सार्वजनिक बांधकाम विभागाचा कर्मचारीवर्ग मेरीटाईम बोर्डाकडे वर्ग करण्याचा निर्णय घेण्यात आला. जलसंपदा विभागाची काही कामे होती. त्यामध्ये 2 मोठे, 8 मध्यम आणि 29 लघुपाटबंधारे अशा 39 योजना अंतर्भूत होत्या. त्यापैकी पन्हाळगड व घोलवळ या दोन लघुपाटबंधारे योजना पूर्ण करण्यात आल्या. उर्वरित 37 योजनांपैकी 4 योजनांची कामे वेगवर्धित सिंचन लाभ योजनेमध्ये म्हणजे एआयबीपीमध्ये घेण्यात आली. 9 योजनांची कामे नाबार्ड योजनेतून घेण्यात आली. उर्वरित कामांवर शासनाकडून उपलब्ध होणाऱ्या निधीतून खर्च करण्यात आला. विशेष दुरुस्तीमध्येही साधारणतः 27 योजना पूर्ण करण्यात आल्या.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी कोणकोणती कामे पूर्ण करण्यात आली असा जो प्रश्न विचारला त्यासंदर्भात मी उत्तर देत आहे. उर्वरित जी कामे झाली नाहीत त्याही संदर्भात मी सांगतो.

श्री. निरंजन डावखरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी विचारलेल्या प्रश्नाला मंत्री महोदयांनी अतिशय सविस्तर उत्तर दिलेले आहे पण त्या सविस्तर उत्तरामधूनच आणखी काही प्रश्न निर्माण होत आहेत. मघाशी मंत्री महोदयांनी सांगितले की, ड्रेझर घेण्यासाठी काही रक्कम खर्च झाली. जे ड्रेझर खरेदी करण्यात आले आहेत त्यातील किती ड्रेझर वापरले जात आहेत ? माझ्या माहितीप्रमाणे 2 ड्रेझर आहेत त्यातील एक ड्रेझर सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यामध्ये संयुक्तरित्या वापरला जात आहे, हे खरे आहे का ?

यानंतर श्री. ख्‌दारे ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.निरंजन डावखरे........

कोकण औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना केव्हा केली जाणार आहे, शासन कोकणासाठी दुग्धविकासाचा व सहकाराचा कार्यक्रम हाती घेणार आहे काय ? रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात दुग्धविकासासाठी कोणतीही संकल्पना किंवा नियोजन करण्यात आलेले नाही. रत्नागिरी हा एकमेव जिल्हा आहे की, तेथील लोक रोजगारासाठी बाहेर जातात. बाहेरच्या देशात जाणाऱ्या लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्याची कारणे वेगवेगळी असू शकतील. परंतु आज रत्नागिरी जिल्ह्यात रोजगाराच्या संधी उपलब्ध होत नाहीत. जोपर्यंत तेथे प्रॉपर रोड इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलप होत नाही तोपर्यंत तेथे पर्यटनाला चालना मिळणार नाही. कोकण पॅकेजचा खरा फायदा कोकणाला किती व कधी फायदा होणार आहे ?

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी मघाशी ड्रेझर्सबाबत सांगितलेले आहे. सदर योजनेमध्ये दोन कटर सेक्शन ड्रेझर खरेदी व उपसण्यात आलेला गाळ वाहून नेण्यासाठी 500 मीटर लांब पाईप लाईनची खरेदी करण्यात आली. हे ड्रेझर्स नेमके कोणत्या भागात चालू आहेत त्याची माहिती घेऊन सन्माननीय सदस्यांना सांगितली जाईल. त्यांनी इतरही प्रश्न या निमित्ताने विचारलेले आहेत. मी जलसंपदा विभागातील कामांची माहिती दिलेली आहे. कोकण विकास कार्यक्रमांतर्गत शिक्षणाचा कार्यक्रम राबविला जात आहे. त्यामध्ये रत्नागिरी येथे औषध निर्माण महाविद्यालयाच्या बांधकामावर मार्च, 2012 अखेर 2.65 कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. त्या महाविद्यालयाच्या 6 पैकी 4 इमारतींचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे. 2 इमारतींचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. पूर्ण बांधकाम झालेल्या नवीन इमारतींमध्ये नवीन यंत्रसामग्री व साधनसामग्री बसविली आहे. बांधकाम चालू असलेल्या इमारतीमधील यंत्रसामग्री खरेदी करण्यात येत आहे. तसेच सी-वर्ल्डचा 285 कोटी रुपये किंमतीचा महत्वाकांक्षी प्रकल्प उभा करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. त्यासाठी यंदाच्या बजेटमध्ये 100 कोटी रुपये उपलबध करुन दिलेले आहेत. त्यामुळे पर्यटनाच्या दृष्टीने मोठा सहभाग मिळणार आहे. कृषी विभागासाठी पुन्हा या वर्षाच्या बजेटमध्ये 50 कोटी रुपयांचा नियतव्यय उपलब्ध करुन देण्यात आला आहे. कोकणातील उर्वरित कामांसाठी 1900 कोटी रुपये लागणार आहेत. या आर्थिक वर्षात योजनांतर्गत व योजनेतर तसेच डीपीडीसीच्या माध्यमातून पूर्ण करण्यात येतील.

2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, केंद्र सरकारने कोकणाच्या पॅकेजसाठी दिलेला हा निधी आहे. मंत्री महोदयांनी ड्रेझर्सचा, जेट्टीचा उल्लेख केला आहे. हे सर्व समुद्रावर आहे. परंतु शिक्षणाच्या कामासाठी, पर्यटनासाठी जमीन संपादित करण्याचा प्रश्न येत नाही. मंत्री महोदय आम्हाला शिक्षकांप्रमाणे समजावून सांगत आहेत. कोकणाच्या विकासाचे उर्वरित 2000 कोटी रुपये कधी देणार आहेत ? या कामांसाठी अगोदरच 1 वर्ष विलंब झालेला आहे. कोकणातील रस्ते नागमोडी आहेत ते सर्वांना माहीत आहे. मंत्री महोदय, उत्तरही तसेच देत आहेत. जमीन संपादित करण्याचा प्रश्न असलाच तर तो थोडासा असावा. परंतु मंत्री महोदयांना जणू काही समुद्रच विकत घ्यावयाचा आहे अशा अर्थाने आम्हाला ते माहिती देत आहेत. कोकण पॅकेजसाठी जाहीर केलेल्या रकमेपैकी उर्वरित 2000 कोटी रुपये शासन कधी देणार आहे व ही अपूर्ण कामे केव्हा मार्गी लागणार आहेत ?

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 11:35

श्री. राजेंद्र मुळक : यामध्ये सर्व विभाग होते. जलसंपदा आणि जलसंधारण विभागातील काही कामे भूसंपादनामुळे राहिली होती. मी पर्यटनाचा उल्लेख केला नव्हता. उरलेला निधी खर्च करावयाचा आहे. सव्वाचार हजार कोटी रु. आतापर्यंत खर्च झाले. उर्वरित 1900 कोटी रुपये खर्च करावयाचे आहेत. या आर्थिक वर्षाच्या आत प्लॅन, नॉन प्लॅन आणि जिल्हा नियोजन विभागाच्या अंतर्गत खर्च करण्यासंबंधीचा जी.आर 2009मध्ये काढण्यात आला होता. त्या उपलब्ध निधीतून उर्वरित कामे केली जातील.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, मी ही लक्षवेधी सूचना वाचली, चर्चेची रुपरेषा माझ्या लक्षात आली. मी माननीय मंत्री महोदयांचे उत्तर देखील ऐकले. परंतु त्यांच्या उत्तराने माझे समाधान झालेले नाही. रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये आपण फिरलात तर एक गोष्ट आपणास निश्चितपणे दिसून येईल की या भागाकडे सरकारचे ज्या त-हेने लक्ष असायला पाहिजे तसे ते नाही. धूपप्रतिबंधक बंधारे बांधण्याची मागणी मी गेली 4 वर्षे करीत आहे. त्याबाबतीत पाठपुरावा देखील करीत आहे. नदीकाठची गावे वाहून जायला लागली आहेत. तळाशीळ, बाणकोट, हडी, देवबाग, तळवडे, सर्जेकोट या ठिकाणी धूपप्रतिबंधक बंधारे व्हावेत यासाठी सरकारने अद्यापर्यन्त एक रुपया देखील खर्च केलेला नाही. नदीची पात्रे मोठी होत आहेत आणि गावे लहान होत आहेत. तेव्हा या ठिकाणी धूपप्रतिबंधक बंधारे केव्हा बांधण्यात येतील ? गडनदीचे पाणी समुद्राला जाऊन मिळते. या गड नदीचे पाणी अडवून तेथील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवावा, तसेच ते पाणी तेथील बागायतदारांना देखील द्यावे अशी माझी अनेक वर्षापासूनची मागणी आहे. पण मला त्याबाबतीत यश आलेले नाही. सीवर्ल्डचा उल्लेख मी केला नाही. कारण तो प्रकल्प होईल याची मला खात्री आहे. पण सीवर्ल्डकडे जाणारे रस्ते अद्याप झालेले नाहीत. ते रस्ते कधी करण्यात येणार आहेत ?

श्री. राजेंद्र मुळक : सन्माननीय ज्येष्ठ सदस्यांनी अत्यंत महत्वाचे मुद्दे कोकण विकास कार्यक्रमाअंतर्गत करण्यास सांगितलेले आहे. त्यांनी रस्त्याच्या संदर्भात विनंती केलेली आहे. सन्माननीय सदस्य जी कामे सांगतील ती त्या विभागाच्या माध्यमातून या आर्थिक वर्षात करण्यासंबंधी निश्चितपणे सूचना देण्यात येतील. त्यांनी सांगितलेल्या कामांचा व्यवस्थित उल्लेख केला तर त्याबाबतीत विभागाना सूचना देण्यात येतील.

..2..

श्रीमती अलका देसाई : एमटीडीसीने काही नवीन बसेस खरेदी केलेल्या आहेत. या बसेस पर्यटकांसाठी केव्हा उपलब्ध होणार आहेत ? या बसेस रस्त्यावर कधी धावणार आहेत ?

श्री. राजेंद्र मुळक : एमटीडीसीच्या बसेस संबंधी सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला. त्या बसेस लवकरात लवकर सुरु व्हाव्यात याबाबतीत विभाग कार्यवाही करीत आहे. टेंडर काढलेले असून ते निश्चित झाल्यानंतर त्या बसेस सुरु होतील.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-5....

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, कोकणाकरिता दरवर्षी जो निधी दिला जातो त्यात एआयबीपी आणि नाबार्डचा निधी गृहीत धरला होता का? 1900 कोटी रुपये अद्याप खर्च होणे बाकी आहेत. या वर्षीच्या नियतव्ययामध्ये हा निधी अंतर्भूत आहे का? ज्या अधिकाऱ्यांनी कोकण पॅकेजच्या अंमलबजावणीमध्ये दिरंगाई केली त्यांच्यावर कोणती कारवाई करणार आहात? ज्या राजकीय नेत्यांनी मंत्र्यांच्या जेवणावळीत मासे खाऊन पोकळ घोषणा केल्या त्यांच्यावर कारवाई केली जाईल काय?

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, प्लॅन, नॉन प्लॅन, केंद्रीय निधी आणि जिल्हा प्लॅन यामधून कार्यक्रम राबविण्यासाठी 2009 मध्ये शासनाने जी.आर.काढला होता. त्यानुसार दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या निधीतून हा खर्च करण्यात आला. साधारणत: 4250 कोटी रुपये आतापर्यंत खर्च करण्यात आले आहेत. एकूण पॅकेज 5600 कोटी रुपयांचे होते. उर्वरित 1800 ते 1900 कोटी रुपये खर्च करावयाचे आहेत.

सभापती महोदय, या आर्थिक वर्षात प्लॅन, नॉन प्लॅन, डीपीडीसी अन्वये निधी मंजूर करण्यात आला असून एआयबीपी आणि नाबार्डचा निधी येणार आहे त्यामधून पॅकेज पूर्ण करावयाचे आहे. राज्य शासन कोकण विकासासाठी कटिबध्द आहे. ती कटिबध्दता मागील 3 वर्षात शासनाने 4250 कोटी रुपये खर्चून दाखविली आहे. त्या भागात अनेक चांगली कामे पूर्ण झालेली आहेत. उर्वरित कामे पूर्ण करावयाची असून त्यासाठी शासन कटिबध्द आहे. या आर्थिक वर्षात तो कार्यक्रम पूर्ण करण्याचा शासनाचा मानस आहे.

--------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : इन्सुली (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) येथील मे.रत्नागिरी पॉवरलूम व्हिव्हर्स को.ऑ.स्पिनिंग मिलच्या कर्ज वसुलीबाबत राज्य सहकारी बँकेने बेकायदेशीररित्या केलेला लिलाव

**मु. शी.** : इन्सुली (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) येथील मे.रत्नागिरी पॉवरलूम व्हिव्हर्स को.ऑ.स्पिनिंग मिलच्या कर्ज वसुलीबाबत राज्य सहकारी बँकेने बेकायदेशीररित्या केलेला लिलाव यासंबंधी श्री.विनायक राऊत,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.विनायक राऊत (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सावंतवाडी तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) इन्सुली-क्षेत्रफळ येथील मे.रत्नागिरी पॉवरलूम व्हिव्हर्स को.ऑप.स्पिनिंग मिलला १९७६-७७ मध्ये कवडीमोल दराने दिलेली १२८ एकर जमीन, सदर सूतगिरणी जास्त काळ न चालता बंद पडल्याने व राज्य बँकेचे पैसे थकल्यामुळे बँकेने बेकायदेशीर केलेला लिलाव, कायदाभंग करुन सहकारी संस्थेच्या नावे १२६ एकर जमीन करण्यात येणे, त्यामुळे सूत गिरणीसाठी दिलेल्या जमिनी मूळ जमीनधारक शेतकऱ्यांना परत मिळाव्यात अशी ग्रामस्थांनी महसूल खात्याकडे केलेली मागणी, परंतु आतापर्यंत कोणतीच कार्यवाही होत नसल्याने जमीनधारक शेतकऱ्यांनी व ग्रामस्थांनी सुरु केलेले आंदोलन, शासनाने या प्रकरणी तातडीने केलेली वा करावयाची कारवाई."

श्री.प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-6....

श्री.विनायक राऊत : सभापती महोदय, काही वेळापूर्वी कोकणाच्या विकासासंबंधी एक लक्षवेधी सूचना सभागृहात चर्चेला आली होती. ही आणखी एक लक्षवेधी सूचना कोकणातील आर्थिक घोटाळ्यासंबंधी चर्चेला आली आहे. कोकणातील गरीब शेतकऱ्यांना कसे लुबाडले जात आहे याचे ज्वलंत उदाहरण या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून सभागृहापुढे आले आहे.

सभापती महोदय, शासनाने निवेदनामध्ये म्हटले आहे की, कर्जाची परतफेड न झाल्याने संबंधित बँकेने सिक्युरिटायझेशन ॲक्ट, 2002 मधील तरतुदीनुसार कायदेशीर लिलाव प्रक्रिया पार पाडली आहे. रत्नागिरी पॉवरलूम व्हिव्हर्स को.ऑ.स्पिनिंग मिलकडून बँकेला नेमके किती कर्ज देणे होते? ते कर्ज वसूल करीत असताना जी लिलाव प्रक्रिया अंमलात आणली ती रुरल सिलिंग ॲक्ट अन्वये योग्य होती का? रुरल सिलिंग ॲक्ट अन्वये एखाद्या व्यक्तीला नेमकी किती जमीन विकत घेता येते? या प्रकरणामध्ये रुरल सिलिंग ॲक्टची अंमलबजावणी झाली आहे का? ही लिलाव प्रक्रिया पार पाडताना त्या मिलकडून आर्थिक देणी शिल्लक असल्याबाबत सर्च रिपोर्ट काढण्यात आला होता का?

नंतर जे.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक राऊत ....

माझ्याकडे जी माहिती उपलब्ध आहे त्यानुसार शासनाचे केवळ 11 कोटी रुपये बाकी होते. कामगारांच्या वेतनाचे केवळ 10 लाख रुपये बाकी होते. या ठिकाणचा लिलाव 2.5 कोटी रुपयांचा झ ाला असून लिलाव करीत असतांना सर्च रिपोर्ट न घेतल्यामुळे शासनाचे महसूल देखील बुडालेला आहे. त्यामुळे या संपूर्ण बेकायदेशीर व्यवहाराबाबत शासनाची नेमकी भूमिका काय राहणार आहे ? दिनांक 12 मार्च, 2013 रोजी संबंधित मंत्री महोदयांच्या उपस्थितीत यासंदर्भात बैठक झाली होती व त्यावेळी त्यांना जी काही निवेदने प्राप्त झाली होती त्याला अनुलक्षून तेथील अधिकाऱ्यांना 8 दिवसाच्या आत रिपोर्ट सादर करण्याचे आदेश दिले होते. त्यामुळे यासंदर्भात शासनाकडे रिपोर्ट आलेले आहेत काय ? चौकशीअंती या लिलावाचा व्यवहार बेकायदेशीर आहे हे सिध्द झाल्यास शासन त्याला स्थगिती देणार आहे काय ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री. विनायक राऊन यांनी रत्नागिरी पॉवरलूम व्हिव्हर्स को. ऑप.स्पिनिंग मिल, इन्सुली या संदर्भात प्रश्न उपस्थित केले आहेत. या संस्थेने 1976-77 च्या दरम्यान शेतकऱ्यांकडून खरेदी खताच्या माध्यमातून जमिनी विकत घेतल्या होत्या. या जमिनी विकत घेत असतांना कूळ कायदा कलम 43 व 63 च्या परवानग्या घेतल्या होत्या. या ठिकाणी जो व्यवहार झालेला आहे तो पूर्णत: कायदेशीर झालेला आहे. या जमिनी खरेदी खताच्या आहेत. या जमिनी गेल्या अनेक वर्षापासून रत्नागिरी पॉवरलूम व्हिव्हर्स को. ऑप.स्पिनिंग मिल, इन्सुली य संस्थेच्या नावावर होत्या. थकबाकी झाल्यानंतर बँकेने सिक्युरीटी ॲक्ट खाली प्रॉपर्टी जप्त करुन त्या प्रॉपर्टीचा लिलाव केलेला आहे. या व्यवहारात काहीही गैरकायदेशीर घडलेले नाही असे शासनाचे मत आहे. या विषयाच्या संदर्भात मी जी काही बैठक घेतली होती त्यामध्ये अर्जदारांचे कागदपत्र तपासून त्यांचा अहवाल शासनाला देण्यात यावा असे जिल्हाधिकाऱ्यांना सांगितले होते व त्या प्रमाणे जिल्हाधिकाऱ्यांनी शासनाला अहवाल दिला असून त्या अहवालात बेकायदेशीर व्यवहार झालेला नाही असे स्पष्टपणे म्हटले आहे. कलम 43 व 63 ची परवानगी घेतलेली असून या जमीन एनए सुध्दा झालेल्या असून याला रुरल सिलींग ॲक्ट लागू होत नाही एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, राज्य बँकेचा संचालक म्हणून मी या व्यवहारात होतो. या कंपनीला या ठिकाणची जागा विकण्यात आली होती. परंतु या कंपनीने त्यांची सर्व प्रॉपर्टी विकलेली आहे. आता या ठिकाणच्या शेतकऱ्यांचे असे म्हणणे आहे की, आम्ही सहकारी सूत गिरणीसाठी जागा विकली होती. सूत गिरणी झाली तर आम्हाला रोजगार मिळेल या कारणासाठी आम्ही आमच्या जमिनी या कंपनीला विकल्या होत्या. या ठिकाणचा पर्पज आता संपलेला आहे. आता या जमिनीचा उपयोग निवासी बांधकामासाठी केला जात आहे. या ठिकाणचे शेतकऱ्यांचे असे म्हणणे आहे की, तुम्ही या जागेवर सूत गिरणी केली तर आमचे काही म्हणणे राहणार नाही. त्यामुळे राज्य शासन सदर कंपनीला सूत गिरणी सुरु करण्याबाबत आदेश देणार आहे काय ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील हे त्यावेळेस महाराष्ट्र राज्य को.ऑप.बँकेचे संचालक होते. त्यांच्या कार्यकाळत या विषयाचा निर्णय बँकेने घेतला होता. सिक्युरिटायझेशन ॲक्ट नुसार जी काही प्रॉपटी विकली जाते त्या प्रॉपर्टीचा उपयोग कसा करावयाचा आहे हा भाग प्रॉपटी विकत घेणाऱ्याच्या मतावर अवलंबून असते. त्या काळात या ठिकाणच्या शेतकऱ्यांने अगोदरच्या कंपनीला अतिशय कमी भावाने जमिनी दिल्या होत्या. शेतकऱ्यांनी त्या जमिनींचे खरेदी खतही कंपनीला करुन दिल्यामुळे ती सर्व प्रॉपर्टी त्या कंपनीची झाली होती. या जमिनी शेतकऱ्यांना परत करण्याची कायदेशीर तरतूद नाही. या ठिकाणी सूत गिरणी सुरु करावी असे त्या ठिकाणच्या शेतकऱ्यांचे म्हणणे असल्यामुळे यासंदर्भात बैठक घेऊन त्यांना तसे सुचविण्यात येईल व शासनातर्फे यासंदर्भात पूर्ण सहकार्य करण्यात येईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

---------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**:. :महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने सक्तीचा केलेला आयसीटी विषय अनुदान तत्वावर राज्यात सर्वत्र सुरु करणे

**मु. शी**. :महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने सक्तीचा केलेला आयसीटी विषय अनुदान तत्वावर राज्यात सर्वत्र सुरु करणे यासंबंधी श्री. कपिल पाटील, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. कपिल पाटील ( मुंबई विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण राज्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"माहिती तंत्रज्ञान या विषयाची एचएससी बोर्डाची परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येत असणे, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने इयत्ता ९ वी व इयत्ता १० वी साठी आयसीटी विषय अभ्यासक्रमात सक्तीचा केला असणे, मात्र हा विषय विनाअनुदानित ठेवला असल्यामुळे ग्रामीण आणि शहरी भागातील गरीब, शेतकरी, दलित, आदिवासी, मागासवर्गीय आणि अल्प उत्पन्न गटातील सर्वसामान्य त्यापासून मुलांना वंचित राहवे लागणे, हा विषय अनुदान तत्वावर राज्यात सर्वत्र सुरु करण्याची आवश्यकता, या विषयाच्या शिक्षकांना वैयक्तिक मान्यता देण्याची आणि वेतन अनुदान सुरु करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने दखल घेऊन तातडीने करावयाची उपाययोजना, केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

प्रा.फौजिया खान (शालेय शिक्षण राज्य मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय,आयसीटी आणि आयटीच्या संदर्भात ग्रामीण आणि शहरी भागातील गरीब विद्यार्थ्यांना प्रामुख्याने फायदा होत नाही. यासंदर्भात 1200 रु. फी ठेवल्यामुळे ज्या विद्यार्थ्यांना याचा फायदा व्हावयास पाहिजे तो होत नाही. ग्रामीण आणि शहरी भागातील गरीब विद्यार्थ्यांच्या संदर्भातील उत्तर लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये आलेले नसल्यामुळे माननीय मंत्री महोदयांनी यासंदर्भात अधिक माहिती देण्याची आवश्यकता आहे. माननीय संचालकांनी यासंदर्भात जो प्रस्ताव पाठविलेला आहे तो नेमका काय आहे ? अनुदानाच्या संदर्भात कॅबिनेटच्या मिटींगमध्ये आपण कशा प्रकारे यासंदर्भात आग्रह धरणार आहात ?

यानंतर श्री. भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, अत्यंत महत्त्वाचा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केला आहे. माहिती तंत्रज्ञान आजच्या युगाची महत्त्वाची बाब झाली आहे. आज आपले सर्व आयुष्य त्यावर अवलंबून आहे म्हणूनच आपण हा विषय कनिष्ठ महाविद्यालयामध्ये सुरू केला आहे. त्याशिवाय आपण नववी व दहावीमध्ये आयसीटी हा विषय सुरू केला आहे. यासंबंधी शासनाचा विचार सकारात्मक आहे. तसेच अनुदान देण्यासंबंधी आपण विचार करीत आहोत. आदरणीय वित्त मंत्र्यांनी देखील सकारात्मक मत मांडले आहे. हा प्रस्ताव शासनाला प्राप्त झालेला आहे. तसेच जे काही आवश्यक असेल ते करण्यात येईल. त्याच्या पुढे जाऊन मी सांगू इच्छिते की, आयसीटी आणि आयटीचे महत्व आहेच. ज्या तालुक्यात सायन्स स्ट्रीमचे कॉलेज अनुदानावर नाही ते देखील देण्याचा शासनाचा विचार आहे. यासंबंधी शासन सकारात्मक पाऊल उचलत आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी अत्यंत सकारात्मक उत्तर दिलेले आहे. आयसीटीचा अभ्यासक्रम हा नववी व दहावीसाठी अनिवार्य विषय केला आहे. शासनाने जो विषय विद्यार्थ्यांसाठी अनिवार्य केला आहे त्यासाठी विद्यार्थ्यांकडून शुल्क घेऊन शिकविणे हे बरोबर नाही. तेव्हा या सर्व विषयासाठी अध्यापन करणाऱ्या शिक्षकांना अनुदान देण्यासंबंधीचा सकारात्मक विचार शासन करणार आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, या संबंधी मी उत्तर दिले आहे. सदर बाब शासनाच्या विचाराधीन आहे असे सांगितले आहे.

....................



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : तळोजा औद्योगिक वसाहतीतील (ता.पनवेल,जि.रायगड) मे.दीपक फर्टिलायझर्स ॲन्ड पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन लि.या कंपनीमधील कामगारांनी पुकारलेला संप

**मु.शी.** : तळोजा औद्योगिक वसाहतीतील (ता.पनवेल,जि.रायगड) मे.दीपक फर्टिलायझर्स ॲन्ड पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन लि.या कंपनीमधील कामगारांनी पुकारलेला संप यासंबंधी सर्वश्री सुभाष चव्हाण,संजय दत्त,भाई जगताप,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"तळोजा औद्योगिक वसाहतीतील (ता.पनवेल, जि.रायगड) मे.दीपक फर्टीलायझर्स ॲन्ड पेट्रोकेमिकल्स कार्पोरेशन लि. या कंपनीमध्ये दिनांक ३ जानेवारी, २०१३ पासून कामगारांचा सुरु असलेला संप, कामगार संघटनेने कपंनीतील विविध समस्यांबाबत मा.मुख्यमंत्री यांना दिनांक २१ जानेवारी, २०१३ रोजी वा त्यासुमारास निवेदनही दिलेले असणे, सदर निवेदनास एक महिना उलटूनही व्यवस्थापन याबाबत कोणतीही चर्चा करण्यास तयार नसणे, तसेच मा.कामगार मंत्री यांनी याप्रकरणात मध्यस्थी केली असता कंपनीचे वरिष्ठ अधिकारी गैरहजर राहणे, त्यामुळे कामगारांना न्याय न मिळणे, होत असलेल्या दिरंगाईमुळे कामगारांवर उपासमारीची वेळ येणे, यामुळे कामगारांमध्ये व जनतेमध्ये पसरलेले तीव्र चिंतेचे व असंतोषाचे वातावरण, परिणामी दिनांक २ मार्च, २०१३ रोजी संप मोठ्या प्रमाणात चिघळला असणे, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया"

श्री.हसन मुश्रीफ (कामगार मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, लक्षवेधी सूचने संबंधी फार सविस्तर उत्तर देण्यात आले आहे. तळोजा औद्योगिक वसाहतीतील कामगारांच्या समस्यां संबंधातील ही लक्षवेधी सूचना आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंतराव पाटील यांच्या विभागातील ही लक्षवेधी सूचना आहे. मे.दीपक फर्टिलायझर्स हा रासायनिक खतांची निर्मिती करणारा कारखाना आहे. कामगारांच्या समस्यांसाठी 6 बैठका झाल्याचे आपण निवेदनात नमूद केले आहे. दिनांक 9.1.2013, 15.1.2013, 17.1.2013, 8.2.2013, 15.2.2013 व 13.3.2013 रोजी बैठका झालेल्या आहेत. सहा बैठका झाल्या तरी रिझल्ट शून्य आहे. याबाबत निर्णय घेण्याची क्षमता असणारा व्यवस्थापनाचा प्रतिनिधी त्यावेळी हजर होता काय ? कंत्राटी कामगार कायमस्वरूपी म्हणजे साडेतीन महिने काम करीत आहेत हे खरे आहे काय ? असल्यास, कंत्राटी कामगार निर्मूलन कायद्यान्वये या कंपनीचे कंत्राटी कामगारांचे अधिकार काढून घेण्यासंबंधी काय निर्णय घेतले आहेत, शासन कायमस्वरूपी कामगारांना बाजूला ठेवून त्यांच्यावर अन्याय करीत आहे. त्यांना न्याय देण्यासाठी शासन धोरणात्मक निर्णय घेणार आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मे.दीपक फर्टिलायझर्स ॲन्ड पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन लि.ही कंपनी तळोजा, तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथे सन 1979 पासून कार्यरत आहे. व्यवस्थापनाला मान्यताप्राप्त कामगार संघटनेने संपाची नोटीस बजावली होती. दिनांक 3 जानेवारी 2013 पासून संघटनेच्या सुमारे 632 कामगारांनी संप सुरू केला आहे. त्यात अजून मार्ग निघालेला नाही. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे अप्पर आयुक्त यांच्या स्तरावर दिनांक 31-12-2012., 7-1-2013, 8-2-2013, आणि 15-2-2013 रोजी अशा चार बैठका झालेल्या आहेत. सहायक कामगार आयुक्तांच्या स्तरावर 26-12-2012, 9-1-2013, 15-1-2013, 13-3-2013, 21-3-2013 रोजी बैठका झाल्या. कामगार आयुक्तांच्या पातळीवर 25-3-2013, 10-4-2013, रोजी बैठका झाल्या. माझ्या पातळीवर दिनांक 1-1-2013 आणि 5-3-2013 रोजी बैठका
झाल्या. माझ्याकडे बैठका झाल्या त्यावेळी कार्यकारी व्यवस्थापकीय संचालक उपस्थित होते. बाकीच्या बैठकीच्या वेळी एच.आर.चे प्रमुख उपस्थित होते. तळोजा पोलीस ठाण्यामध्ये देखील जवळ जवळ 14 बैठका झाल्या आहेत. युनियनच्या तीन कायम कामगारांना काढून टाकले आहे एवढाच विषय आहे. या कामगारांनी गैरशिस्त केली असे व्यवस्थापनाचे म्हणणे आहे. जो पर्यंत आमची चौकशी पूर्ण होणार नाही तो पर्यंत आम्ही त्यांना घेणार नाही असे व्यवस्थापनाचे म्हणणे आहे.

यानंतर श्रीमती रणदिवे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ . . . .

त्या कामगारांना घेतल्याशिवाय आम्ही कामावर जाणार नाही असा मान्यताप्राप्त श्री.दादा सामंत यांची जी युनियन आहे, त्यांनी निर्णय घेतलेला आहे. सदरहू फॅक्टरीच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, आता आम्ही आमच्याकडे ॲटोमायझेशन आणलेले आहे. याठिकाणी जे 153 कामगार आहेत, ते तुम्ही टप्प्याटप्प्याने कमी करावेत किंवा आम्ही त्यांना व्ही.आर.एस.देतो. मात्र काहीजण असे म्हणतात की, 153 कामगार कमी करा. पूर्वी जो करार केला होता त्यानुसार आम्ही जास्त कामगार घेऊ असे म्हटले होते आणि हा कळीचा मुद्दा असून या दोन मुद्यांबाबत चर्चा सुरु आहे. पण आता फार विचित्र परिस्थिती निर्माण झालेली आहे. एका बाजूला 635 कामगार संपावर असून केंद्र आता कंत्राटी कामगारांच्या मार्फत हा कारखाना सुरु आहे. आता कंत्राटी कामगार पध्दत बंद करण्यात यावी याबाबतीत सल्लागार समितीमध्ये दोन वेळा चर्चा झाली आहे आणि शासन आता त्याबाबतीत निर्णय घेणार आहे. अशा वेळी दीपक फर्टीलायझर्सवर जेवढ्या-जेवढ्या केसेस घालता येतील तेवढ्या घालण्याचा आपण प्रयत्न केला आहे आणि तेवढ्या केसेस घातलेल्या आहेत. त्या नंतर पुन्हा एकदा अधिवेशन संपल्याबरोबर या व्यवस्थापनाबरोबर एक शेवटची बैठक घेऊन, शेवटचा प्रयत्न करुन तेथील संप मिटविण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहोत.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, मला स्पेसिफीक प्रश्न विचारण्यापूर्वी दोन-तीन महत्वाचे मुद्दे आपल्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहेत. तसेच मला हे सिध्द करावयाचे आहे की, येथील कामगारांचा जो वाटा आहे, तो नाकारला जात आहे. दीपक फर्टीलायझर मधील कामगारांच्या मेहनतीमुळे कंपनीचे उत्पन्न सन 1983 मध्ये 34 कोटी इतके होते आणि आता तो 2400 कोटी रुपये इतका झालेला आहे. त्यांचे एकूण 19 प्लान्ट झालेले आहेत. तेथील संप काळामध्ये अनुभवी नसलेल्या मनुष्यबळाचा वापर करुन प्लान्ट चालविण्याचा प्रयत्न केल्यामुळे कंपनीमध्ये 10 ते 12 छोटे-मोठे अपघात झाले आहेत.तसेच अशीही माहिती उपलब्ध झाली आहे की, कामगार संघटनांना औद्योगिक न्यायालयाने नव्याने लोकांची भरती करण्यास मनाई आदेश दिले असतानाही पोलिसांच्या गाड्यांमधून कंत्राटी कामगारांना कंपनीमध्ये नेले जाते, सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देताना सांगितले की, याबाबत बैठका झाल्या आहेत. पण माझी अशी माहिती आहे की, त्या बैठकीमध्ये मुद्दाम हेतूपुरस्सर कंपनीचे जबाबदार, सिनिअर पदाधिकारी येत नाहीत तर त्यापेक्षा कमी दर्जाचे पदाधिकारी पाठविले जातात आणि सदरहू अधिकारी आपली असमर्थता व्यक्त करतात

. . . .एल-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त . . . .

की, आम्हाला याबाबत काही बोलण्याचा अधिकार नाही. अशा प्रकारे त्यांचा वेळकाढूपणा सुरु आहे.

सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय तडफदार आहेत आणि त्यांनी सांगितले की, ते याबाबत कारवाई करणार आहेत. पण माझा एक स्पेसिफीक प्रश्न असा आहे की, आता साडेतीन महिने झाले आहेत आणि त्याठिकाणी कंत्राटी कामगारांच्या मदतीने काम सुरु आहे. तेथे अनियमित अशा प्रकारांमुळे धोका निर्माण झालेला आहे. त्यामुळे याबाबत शासनाने वेळेची मर्यादा ठरवून काही ठोस कडक अशी कारवाई करणार आहे काय?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हा पेट्रोकेमिकल प्रोजेक्ट आहे. जर तेथे कंत्राटी पध्दतीचे ट्रेण्ड नसलेले कर्मचारी हाताळणार असतील तर धोका होण्याचा सुध्दा संभव आहे आणि सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, तेथे अनेक अपघातही झालेले आहेत. मी आजच औद्योगिक सुरक्षा विभागाच्या अधिकाऱ्यांना तेथे भेट देण्यास सांगेन आणि पेट्रोल, केमिकल्स् हाताळणारी माणसे जर अनुभवी नसतील तर मग हा कारखाना बंद का करु नये अशा प्रकारची नोटीस सुध्दा देण्याचा आम्ही प्रयत्न करु. दुसरा विषय असा आहे की, जे इंडस्ट्रीअल कोर्ट आहे. त्या कोर्टातील श्री.कुरतडकर, माजी न्यायाधीश यांची मिडिएटर म्हणून नियुक्ती केली असून, त्यांच्याही बैठका सुरु आहेत. त्यामुळे एका बाजूला पोलीस प्रयत्न करीत आहेत, एका बाजूला कामगार विभाग प्रयत्न करीत आहे आणि एका बाजूला न्यायालय सुध्दा प्रयत्न करीत आहे. त्यामुळे मला असा विश्वास आहे की, काही दिवसामध्ये हा प्रश्न मिटू शकेल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, हा प्रश्न केवळ कामगार विभागापुरता मर्यादित नाही. त्या भागातील ग्राम पंचायतीने इन्व्हायरमेंट विभागाला आणि तेथील सेफ्टी ऑफीसरनां लेखी स्वरुपामध्ये पत्रे दिलेली आहेत. दिनांक 4-1-2013 रोजी त्याठिकाणी पहाटे अमोनियाची गळती होऊन याठिकाणी स्फोट झाला. म्हणून या बाबतीत माझे असे म्हणणे आहे की, तुम्ही कामगारांच्या न्यायाकरता लढत आहात.मी स्वत: आणि सन्माननीय सदस्य श्री.विवेक पाटील असे आम्ही दोघेजण आपल्याला दोन-तीन वेळा भेटलो. त्याबद्दल काही म्हणणे नाही. पण याठिकाणी जो सेफ्टी ऑफीसर आहे, त्याला आरसीएफ ने काढून टाकलेले आहे. अलिबाग येथील श्री.लेले नावाचा जो अधिकारी आहे, जो कॉन्ट्रॅक्ट लेबर घेऊन तेथे काम करीत होता. त्याला आर.सी.एफ.ने काढले आहे. पण माननीय मंत्री महोदय, मूळ मुद्दा असा आहे की, तो कारखाना सुरु राहिला तर तेथील अजूबाजूच्या सर्व परिसरासाठी मोठा धोका आहे.

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

कारण त्या ठिकाणी प्रशिक्षित कामगार नाहीत. तेव्हा पर्यावरण विभागाला सांगून तेथील प्रोडक्शन थांबविण्यात येईल काय ? त्या ठिक्राणी जी बेकायदेशीर कामगार भरती केलेली आहे त्याबाबत काय कारवाई करणार आहात, तसेच तेथे बेकायदेशीर कार्यरत असलेल्या सेफ्टी ऑफीसरला ताबडतोब निलंबित करण्यात येईल काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी अगोदर सांगितले की, आमच्या विभागाचे सेफ्टी अधिकारी आजच तेथे जाऊन पाहणी करतील. त्या ठिक्राणी अनुभव नसलेले कर्मचारी केमिकल्सची हाताळणी करीत असल्याचे आढळून आल्यास ताबडतोब व्यवस्थापनला नोटीस देण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी लेले नावाच्या अधिकाऱ्याचा उल्लेख केला. त्याबाबत सांगू इच्छितो की, तो कंपनीचा खाजगी प्रश्न आहे. त्यांना सेवेत ठेवावे किंवा कसे हा त्यांचा प्रश्न आहे. जर तो कारखाना धोकादायक स्थितीत असेल तर तो बंद करणे. त्या ठिक्राणी सुरु असलेला संप ताबडतोब मिटण्यासाठी एक समन्वय मार्ग काढावा लागेल आणि तो मार्ग शासन निश्चितपणे काढेल.

-----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी क्रमांक 3 बाबत**

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर या ठिकाणी उपस्थित आहेत. त्यांच्या लक्षवेधी सूचनेवर उत्तर देण्यासाठी मी माननीय मंत्री महोदयांना निरोप पाठविलेला आहे. आपण तो पर्यंत नियम 93 अन्वये सूचनांवरील निवेदन घेऊ या. मी सभागृहाची वेळ दुपारी 12.30 पर्यंत वाढविली आहे.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./ मु.शी.** : अमरावती येथे कठोरा व वाळकी या गावांजवळ बोर नदीच्या प्रकल्पातील पाणी कृषक भागात पर्यायी शेतीला व इतरत्र गावांकडे वळते करण्याची शेतकऱ्यांकडून होत असलेली मागणी याबाबत श्री. प्रवीण पोटे-पाटील व डॉ.रणजित पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.राजेंद्र मुळक ( जलसंपदा राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक एक सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रवीण पोटे-पाटील : सभापती महोदय, अमरावती येथील कठोरा व वाळकी येथे बोर नदी प्रकल्प आहे. तो प्रकल्प मंजूर झालेला आहे. निवेदनात नमूद केलेले आहे की, "सर्व जमीन शेती वापरायोग्य आहे". रेवसा, कठोरा, हिरापूर, सुलतानपूर या गावांतील जवळपास एक हजार हेक्टर जमीन एन.ए.झालेली आहे आणि त्यासंबंधीचे पुरावे माझ्याकडे आहेत. पाटसऱ्या, कालवे व भूसंपादनाची कामे किती कालावधीत पूर्ण होणार आहेत ? या प्रकल्पासाठी निधी उपलब्ध आहे काय ? रेवसा, कठोरा, ही गावे अमरावती महानगरपालिकेच्या 200 मीटरच्या आतमध्ये येतात. महानगरपालिकेचे क्षेत्र वाढवावयाचे असेल तर या गावांव्यतिरिक्त दुसरी जागा नाही. डी.पी. प्लॅननुसार ही गावे महानगरपालिकेला पूरक आहेत. 13 ची अधिसूचना जाहीर झालेली आहे असे निवेदनात नमूद केलेले आहे. सन 2008 पासून जवळपास एक हजार हेक्टर जमीन एन.ए.झालेली आहे आणि त्यासंबंधीची कागदपत्रे माझ्याकडे आहेत. ती कागदपत्रे मी आपणाकडे देतो. कठोरा येथे 400 हेक्टर जमीन अकृषक झालेली आहे. टाकळीमध्ये 78 हेक्टर , सुलतानपूरमध्ये 67 हेक्टर, रेवसामध्ये 437 हेक्टर व हिरपूर येथे 27 हेक्टर जमीन अकृषक झालेली आहे. सध्या दुष्काळी परिस्थिती आहे. तेव्हा पिण्यासाठी हे पाणी वापरता येईल काय किंवा हे पाणी पाटसऱ्यामध्ये न टाकता ते पाणी शेतकऱ्यांना सिंचनासाठी देण्यात येईल काय ?

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, कठोरा येथे 161 हेक्टर लाभक्षेत्र आहे. कलम 11 ची सूचना देण्यापूर्वी तेथे 9.16 हेक्टर जमीन अकृषक होती. कलम 11 नंतर ती 11.18 झाली. रेवासा येथे 383 हेक्टर लाभक्षेत्र होते. त्याठिकाणी कलम 11 पूर्वी तेथे अकृषक जमीन निरंक होती आणि कलम 11 नंतर 1.01 हेक्टर इतकी होती.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे अमरावती शहराच्या लगत असणारा हा ग्रामीण भाग आहे. या धरणाची संकल्पना झाली त्यावेळी हा भाग कृषक भाग म्हणून ओळखला जात होता म्हणून तेथे मागणी नुसार सिंचनाची व्यवस्था करुन तेथे कॅनॉल आणि आणि पाटसऱ्या करण्याचे नियोजित होते. कालांतराने अमरावती शहराची वाढ झाली. हा भाग अमरावती शहराला लागून असल्यामुळे त्या भागाचे शहरीकरण होऊ लागले.

सन्माननीय सदस्यांनी विचारले त्यानुसार हे लाभक्षेत्र इतरत्र वळविता येते काय, लाभक्षेत्राला जे पाणी उपलब्ध होणार होते, ते पिण्याच्या पाण्यासाठी उपयोगात आणता येते काय

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ पूर्वी श्री.अजित.... 12:05

श्री.राजेंद्र मुळक....

या संदर्भात खातरजमा करुन घेण्यात येईल. आमच्या विभागाला आदेश देण्यात येतील की, या संदर्भात नवीन सर्व्हे करुन अशा प्रकारची परिस्थिती निर्माण झाल्यास ते पाणी इतरत्र वळविण्याबाबत पूर्ण माहिती घ्यावी. त्या नंतर या बाबत निर्णय घेण्यात येईल.

-------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: समर्थ इंजिनिअरींग कंपनीमध्ये झालेल्या वायुबाधेमुळे चार कामगार अस्वस्थ होणे, या बाबत श्री.विनायक राऊत, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.हसन मुश्रीफ (कामगार मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक-3 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदनानंतर

श्री.विनायक राऊत : सभापती महोदय, लोटे औद्योगिक वसाहतीमध्ये समर्थ इंजिनिअरींग कंपनीमध्ये घडलेली घटना मी नमूद केली होती. शासनाने निवेदनात मान्य केले आहे की, समर्थ इंजिनिअरींग कंपनीमध्ये अशा प्रकारची घटना घडली नसली तरी ओम केमिकल्स या व्यवस्थापनाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून टोल्वीन व इतर रसायने साठवणुकीसाठी संमतीपत्र घेतलेले नव्हते. ओम केमिकल्स कंपनीने विना परवानगीने रसायनाचे ड्रम त्या ठिकाणी ठेवले होते. महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय यांनी वारंवार अशा प्रकारच्या केमिकल्स झोनची पाहणी करण्याची आवश्यकता होती. ओम केमिकल्स कंपनीने टोल्विन व इतर रसायने साठवून तेथे ठेवले होते. औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाच्या अधिकाऱ्यांच्या वेळीच ही बाब निदर्शनास का आली नाही ? याचा अर्थ असा होतो की, या संचालनालयाचे अधिकारी त्या ठिकाणी वारंवार भेट देत नसावेत किंवा फॅक्टरी इन्स्पेक्टर भेट देत नसावेत. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, ही वायू गळती कोणाच्या निष्काळजीपणामुळे झाली, भविष्यात अशा प्रकारची वायू गळती होऊ नये म्हणून काय कार्यवाही करण्यात येणार आहे, तसेच ओम केमिकल्स कंपनीच्या संचालकाविरुध्द कोणती ठोस कारवाई करण्यात येणार आहे ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, समर्थ इंजिनिअरींगच्या आस्थापनेमध्ये जे उत्पादन होते त्या रसायानाचे ड्रम्स आस्थापनेच्या शेजारी असलेल्या ओम केमिकल्स, प्लॉट नं.ई-9 या मोकळ्या भूखंडावर ठेवण्यात आले होते. एकत्रित ड्रम्समधून वायू गळती होऊ लागल्यानंतर तीन-चार कामगारांना अस्वस्थ वाटल्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. एक दिवसानंतर त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. रुग्णालयातील उपचाराचा खर्च ओम केमिकल्स कंपनीच्या मालकाने केला. वास्तविक पाहता त्या कंपनीने साठवणुकीची परवानगी घेतली नव्हती. उप संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय यांनी सदरहू कंपनीने विना परवानगीने रसायन ठेवल्यामुळे त्यांना दि.3 एप्रिल, 2013 रोजी नोटीस बजावली आहे. वर्षामध्ये फॅक्टरी इन्स्पेक्टर आणि औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाच्या अधिकाऱ्यांनी अशा ठिकाणी भेटी द्याव्यात असे आदेश आहेत. या बाबत मी निश्चितपणे चौकशी करेन. असे प्रकार घडू नयेत आणि अशा प्रकारे रसायने ठेवू नयेत म्हणून या पुढे कठोर काळजी घेण्यात येईल.

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./ मु.शी.** : विक्रीकर कार्यालयातील शिपाई पदाच्या भरतीत झ
ालेला भ्रष्टाचार, या बाबत श्री.पांडुरंग फुंडकर,
वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.भास्कर जाधव ( विधी व न्याय राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक-4 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदनानंतर

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, विक्रीकर कार्यालयामध्ये शिपाई पदाच्या भरतीमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाला आहे. त्यामुळे त्यातील एका उमेदवाराने पोलिसांकडे तक्रार केली होती. दि.8/2/2011 रोजी ठाणे पोलीस स्टेशनमध्ये भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. त्या अंतर्गत विक्रीकर आयुक्त, संजय भाटीया, निवृत्त अप्पर विक्रीकर आयुक्त शामल भट्टाचारजी, निवृत्त सहाय्यक आयुक्त, अनिल गुजे, उपायुक्त दिनकर पाटील व सुनिल सांगळे, सहायक आयुक्त विश्वास दहेकर, विक्रीकर अधिकारी दादासाहेब मांढरे, विशेष समाजकल्याण अधिकारी नामदेव पाटील तसेच इतर अनेक अधिकारी व निवड झालेल्या काही उमेदवारांवर गुन्हा नोंदविण्यात आला. या सर्व प्रकरणामध्ये दि.13 जून, 2010 रोजी ठाणे मुख्य न्याय दंडाधिकारी यांच्या न्यायालयात सर्व आरोपींवर भारतीय दंड विधान कलम 420, 465, 467, 468, 471, 120 (बी), 34 व 109 व भ्रष्टाचार प्रतिबंधक कलम 13 (1)(ड) सह 13 (2) अन्वये आरोपपत्र दाखल करण्यात आले.

नंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

सभापती महोदय, हे फार गंभीर प्रकरण आहे. भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याखाली हे सर्व गुन्हे दाखल झालेले असताना विक्रीकर कार्यालयातील आयुक्तासह सर्वांनी एक प्रस्ताव तयार केला. एक सरकारी वकील नेमलेला होता परंतु हे सर्व प्रकरण दाबण्यासाठी पुन्हा एक विशेष वकील नियुक्त व्हावा असा प्रस्ताव सर्वांच्या संगनमताने तयार केला. त्यांनी तो प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविला. वित्त विभागाची त्या प्रस्तावाला मान्यता घेतली पण वित्त विभागाने या अटीवर मान्यता दिली की, विक्रीकर आयुक्ताच्या कार्यालयातून त्याची फी दिली गेली पाहिजे. भ्रष्टाचार करणाऱ्या अधिकाऱ्यांना अशा पध्दतीने संरक्षण देऊन ज्या कार्यालयात भ्रष्टाचार झाला त्याच कार्यालयातील अपर आयुक्त किंवा श्री. संजय भाटिया यांच्या सारख्या सचिवाने त्यांना सहकार्य करुन अशा प्रकारे हे प्रकरण दाबण्याचा जो प्रयत्न केला त्याची चौकशी केली पाहिजे. त्या ठिकाणी एक सरकारी वकील असताना हेतुपुरस्सर पुन्हा दुसरा सरकारी वकील नेमण्याची शिफारस करुन जास्तीचे पैसे वित्त विभागाकडून खर्च करण्यासाठी ज्यांनी प्रस्ताव केला, ते कसे झाले याची शासन चौकशी करणार का ? चौकशीमध्ये जे दोषी आढळून येतील, लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याखाली, भ्रष्टाचाराच्या कायद्याखाली ज्यांच्यावर केसेस दाखल झाल्या, त्या केसेस सहीसलामत बाजूला व्हाव्यात किंवा सहीसलामत ते निर्दोष सुटावेत म्हणून ज्यांनी पुन्हा एक स्पेशल वकील नेमण्याची शिफारस केली, त्यांची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करणार का ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, नियम 93 च्या सूचनेवरील हे निवेदन अत्यंत मर्यादित आहे. सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी या ठिकाणी पार्श्वभूमी सांगितली. हे प्रकरण जसे दिसते तसे नाही. या प्रकरणात खूप निराळी पार्श्वभूमी आहे. 23 छोट्या म्हणजे शिपायांसारख्या कर्मचाऱ्यांवर भ्रष्टाचाराची तक्रार दाखल झाली. ते प्रकरण आयुक्तांच्या अखत्यारित येत नाही. दुसरी बाब अशी की, ते सेल्स टॅक्स आयुक्त असताना राज्याचा महसूल खूप मोठ्या प्रमाणात वाढविण्याची अत्यंत कौतुकास्पद कामगिरी त्यावेळी केली. त्या प्रकरणामध्ये भल्याभल्या लोकांना, मोठमोठ्या लोकांना तसेच काही कर्मचाऱ्यांना सुध्दा फटका बसला आणि त्यामध्ये चांगले 15 उच्चपदस्थ अधिकारी सुध्दा निलंबित झाले होते. या सर्वांनी मिळून हा एक छोटा विषय खूप

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव .....

मोठा करण्याचा प्रयत्न केला आणि त्यामध्ये आयुक्तांना गुंतविण्याचा प्रयत्न केला. ही जी सर्व भरती झाली ती फार नियमबाह्य झाली अशातील भाग नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, नियमबाह्य भरती झाल्यामुळेच गुन्हे दाखल झाले. नियमबाह्य भरती झाली नसती तर गुन्हेच दाखल झाले नसते. पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल झाले. एफआयआर दाखल झाला. ते जर झालेच नसते तर गुन्हे दाखल होण्याचे काही कारणच नव्हते. पुराव्यासह सर्व पुढे आलेले आहे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जी माहिती दिली त्याला मी कोठे तरी छेद देतो किंवा त्याला आव्हान देतो अशातील भाग नाही. जी माहिती वेगवेगळ्या माध्यमातून पुढे आलेली आहे ती सुध्दा सांगितली पाहिजे. यामध्ये पाच कर्मचाऱ्यांनी जातीचे व्हॅलिडिटी सर्टिफिकेट द्यावयास पाहिजे होते. त्यांनी जातीचे बनावट दाखले दिले म्हणून त्यांना तत्काळ निलंबित करण्यात आलेले आहे. त्यानंतर सन्माननीय सदस्य म्हणतात त्याप्रमाणे या प्रकरणामध्ये गुन्हा दाखल झाला. त्यानंतर हे प्रकरण न्यायालयामध्ये गेले. न्यायालयाने त्यांना निर्दोष सोडले. त्यानंतर जे तक्रारकर्ते आहेत त्यांनी मुंबई उच्च न्यायालयामध्ये रिट याचिका क्रमांक 691/2013 दाखल केलेली असून सदर प्रकरण आता न्यायप्रविष्ट आहे. त्यामुळे त्या बाबतीत मी अधिक खुलासेवार बोलणे उचित होणार नाही.

सन्माननीय सदस्यांचा मुद्दा त्यांना जो सरकारी वकील दिला त्या संदर्भात आहे. आपण जर नियमातील तरतूद पाहिली तर महाराष्ट्र विधिविषयक कामकाजाचे नियम, 1984 यामधील नियम 109 अनुसार कायद्याने त्यांना शासनाकडून वकील देता येतो कारण...

श्री. पांडुरंग फुंडकर : कोणालाही वकील देता येतो का ? भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याखाली ज्यांच्यावर गुन्हे नोंदविले गेले अशा लोकांनाही वकील देता येतो का ? आपण भ्रष्टाचाराचे समर्थन करणार आहात का ?

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, वकील देता येतो असा नियम आहे परंतु आता सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे आपण वकील कोणाला देणार ? आजच्या घडीला त्या वकिलांना विथ्ड्रॉ करण्यात आलेले आहे. आता त्यांना शासनाच्या वतीने वकील देण्यात आलेला नाही. त्या वकिलांनी राजीनामा दिलेला आहे, ते वकील स्वत: त्यातून मागे झालेले आहेत. त्यामुळे आता त्या ठिकाणी वकील नेमलेला नाही.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव....

सभापती महोदय, ज्या कर्णबधिर मुलीवर बलात्कार झाला त्या मुलीला वकील देण्यात आला नाही असा मुद्दा सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केला होता. त्यांच्या मागणीप्रमाणे शासनाच्यावतीने ॲड.श्रीमती संगमित्रा वाघमारे यांची विशेष सरकारी वकील म्हणून नेमणूक केलेली आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : ज्या मुलीवर बलात्कार झाला त्या मुलीने सरकारी वकील नेमण्याची मागणी कधी केली होती आणि वकिलांची नेमणूक कधी करण्यात आली, ही 93 ची सूचना उपस्थित केल्यानंतर त्या वकिलांची नेमणूक केली आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, अशा प्रकरणात सरकारी वकील नेमण्यासाठी काही निकष ठरलेले आहेत. या प्रकरणी त्या वकिलांची दिनांक 5.4.2013 रोजी नियुक्ती करण्यात आलेली आहे.

---

**लक्षवेधी सूचनांबाबत**

**उप सभापती** : आजच्या कामकाज पत्रिकेवर दर्शविण्यात आलेल्या क्र.3 व 4 वरील लक्षवेधी सूचनांशी संबंधित असलेल्या मंत्री महोदयांना सभागृहात येण्यासाठी मी 3 वेळा निरोप पाठविला होता. परंतु दोन्ही मंत्री महोदय विधानसभेच्या कामकाजात व्यस्त असल्यामुळे ते सभागृहात येऊ शकलेले नाहीत. त्यामुळे क्र.3 व 4 वरील लक्षवेधी सूचना उद्या चर्चेसाठी घेण्यात येतील.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.30 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 12.17 ते 12.30 पर्यंत स्थगित झाली. )

---------

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**आदित्य डेंटल कॉलेज (जि.बीड) येथील विद्यार्थ्यांची होणारी मानसिक छळवणूक व मुलभूत सुविधांची वंचनेबाबत**

**(१) * ३७९१७ डॉ.नीलम गोऱ्हे, डॉ.दीपक सावंत, ॲड.आशिष शेलार, श्री.विनोद तावडे, श्री.चंद्रकांत पाटील, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.हेमंत टकले, श्री.रमेश शेंडगे, श्री.दिपकराव साळुंखे, श्री.किरण पावसकर, श्री.विक्रम काळे, श्री.सतीश चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.विनायकराव मेटे, श्री.धनंजय मुंडे, श्री.एम.एम.शेख, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नागो पुंडलिक गाणार, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.सुभाष चव्हाण, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.विनायक राऊत, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.राणा जगजितसिंह पद्मसिंह पाटील :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

१) बीड येथील आदित्य डेंटल महाविद्यालयामध्ये मुलभुत सुविधा व अनेक विषयांसाठी शिक्षक नसणे, तसेच या महाविद्यालयात गेल्या काही महिन्यांमध्ये बायोकेमेस्ट्री, फिजिओलॉजी यांचे एकही तास व ॲनॉटॉमी, फिजिओलॉजी, बायोकेम आणि डेंटल हिस्ट्री यांचे एकही प्रात्यक्षिक झालेले नाही अशी तक्रार करणाऱ्या विद्यार्थीनींना स्टाफ क्वार्टर मध्ये कोंडून ठेवण्याची घटना घडल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

२) तसेच ६ वर्षापासून मनुष्यदेहाचे विच्छेदन करण्यासाठी एकच मृतदेह वापरण्यात येत असून त्याची दूरवस्था झाली आहे याबाबत विद्यार्थ्यांनी संबंधितांना विनंत्या करुनही त्याबाबत आवश्यक ती कार्यवाही केली गेली नाही, हे ही खरे आहे काय,

३) असल्यास, आरोग्य वैद्यकीय शिक्षण विभागाकडे तक्रारी केल्यामुळे व्यवस्थापनाकडून विद्यार्थ्यांची छळवणूक होत असल्याने दि. १ जानेवारी, २०१३ रोजी वा त्यासुमारास मुंबईतील आझाद मैदान येथे पालकांसहित धरणे आंदोलन सुरु केले आहे हे खरे आहे काय,

४) असल्यास, मानसिक छळ आणि घडणाऱ्या बेकायदेशीर गोष्टींना कंटाळून तेथील विद्यार्थी न्याय मागण्यासाठी मुंबईमध्ये आले असल्याचे दिनांक १४ जानेवारी, २०१३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

५) असल्यास, उपरोक्त विद्यार्थ्यांचे दुसरीकडे स्थलांतर करावे, अशी मागणी जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे विद्यार्थीनींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

६) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधिताविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?

**डॉ.विजयकुमार गावित** : (१) विद्यार्थीनींना कोंडून ठेवण्यात आल्याबद्दल स्थानिक पोलिस ठाण्यात फिर्याद देण्यात आली आहे.

(२) शासनाने गठीत केलेली चौकशी समिती उक्त महाविद्यालयात गेली असता तेथील शरीररचनाशास्त्र विभागातील प्रयोगशाळेत एक कुजलेला मृतदेह आढळला.

(३) हे खरे आहे.

(४) हे खरे आहे.

(५) हे खरे आहे.

..२..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(६) सदर महाविद्यालयातील बी.डी.एस. अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थीनींनी उक्त महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाविरुध्द शासनाकडे केलेल्या तक्रारींची चौकशी करण्यासाठी अधिष्ठातांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समित्या गठीत करण्यात आल्या असून सदर समित्यांचे अहवाल प्राप्त झाले आहेत. उक्त अहवालाच्या अनुषंगाने दिनांक ११.०३.२०१३ च्या पत्रान्वये सदर महाविद्यालयाची मान्यता रद्द करण्याची शिफारस भारत सरकारला करण्यात आली असून वरील महाविद्यालयास शासनाने दिलेली आवश्यक ती प्रमाणपत्रे रद्द करण्यात आली आहेत.

डॉ. नीलम गो-हे : विद्यार्थ्यांनी अनेक तक्रारी केल्या. त्यांनी आंदोलन देखील केले. काही विद्यार्थीनींना कोंडून ठेवल्याबाबतच्या तक्रारी पोलीस स्टेशनला दिलेल्या आहेत. सदर तक्रारीमध्ये तथ्य असल्याचे मान्य केलेले आहे. दिनांक 11 मार्च 2013ला या महाविद्यालयाची मान्यता रद्द करण्याची शिफारस भारत सरकारला करण्यात आलेली आहे. या महाविद्यालयाची मान्यता प्रत्यक्षात रद्द झाल्यानंतर त्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये म्हणून त्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र शासनाच्या विद्यमान डेंटल कॉलेजमध्ये सामावून घेण्यात येण्यासाठी शासनाने कोणती पावले उचललेली आहेत ? डेंटल कॉलेजच्या विद्यार्थीनींची छळवणूक होत असल्याचे सिध्द झालेले असल्यामुळे संचालकांवर कोणती फौजदारी स्वरुपाची कारवाई केलेली आहे ?

डॉ. विजयकुमार गावित : आदित्य डेंटल महाविद्यालयामध्ये शिकणा-या मुलामुलींनी तक्रारी केल्यानंतर त्या तक्रारींच्या अनुषंगाने दोन समित्या नेमण्यात आल्या. समितीने चौकशी केली. चौकशीमध्ये शैक्षणिकदृष्टया गंभीर अशा त्रुटी आढळून आल्या. त्या ठिकाणी मुलींचा छळ होतो अशी तक्रार होती. त्यासंदर्भात दुसरी समिती नेमण्यात आली. त्या समितीने, "विद्यार्थीनीला डांबून ठेवलेले असून कॉलेजची मान्यता रद्द करावी "अशी शिफारस राज्य शासनाला केलेली आहे.कॉलेजला एमसीआय मान्यता देत असल्यामुळे ते कॉलेज चालू आहे. परंतु त्या ठिकाणी निर्णय होईपर्यंत त्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना दुसरीकडे शिफ्ट करता येणार नाही. त्या शिक्षण संस्थेतील प्राचार्य विद्यार्थ्यांना इण्टर्नल असेसमेंटचे मार्क्स देत नाहीत किंवा फॉर्म भरण्यास परवानगी देत नाही. म्हणून या बाबतीत विद्यापीठाला सांगून सर्वांचे अर्ज भरुन घेतलेले आहेत. या विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्यासाठी दुसरे सेंटर देण्यास सांगितले आहे. तसेच एक्झामिनर देखील त्या कॉलेजमधील देऊ नये असे निर्देश विद्यापीठाला दिलेले आहेत. इण्टर्नल असेसमेण्टचे मार्क्स देण्याच्या संदर्भात जी शासकीय डेंटल महाविद्यालये आहेत त्यामध्ये या विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्यासाठी विद्यापीठाला निर्देश देण्यात आलेले आहेत.

...3..



असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

ज्या विद्यार्थीनीने पोलीस स्टेशनला तक्रार केली होती त्याबाबतीत संचालकाविरुध्द गुन्हा दाखल केलेला होता. त्या बाबतीत चौकशी होऊन चार्जशीट दाखल झालेली आहे. प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

श्री. निरंजन डावखरे : विद्यार्थीनीने केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने समितीने ज्यांच्या विरुध्द अहवाल दिलेला आहे त्यांच्यावर काय कारवाई करण्यात आलेली आहे ?

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

SGB/ D/ KTG/श्री.शिगमनंतर 12:25

ता.प्र.क्र.37917....

डॉ.विजयकुमार गावीत : सभापती महोदय, मी यापूर्वीच सांगितले की, पोलीस ठाण्यामध्ये तक्रार दाखल झाली, त्यांना अटक झाली होती. नंतर जामिनावर सुटका झालेली आहे. त्यांच्यावर चार्जशीट दाखल करण्यात आली असून प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आदित्य डेंटल कॉलेज आणि आदित्य एज्युकेशन सोसायटी या दोन्ही संस्था एकाच शैक्षणिक संस्थेशी संबंधित आहेत. मंत्री महोदयांनी सांगितले की, ही बाब विधि व न्याय विभागाकडे पाठविणार आहेत. या डेंटल कॉलेजचे जे विद्यार्थी आहेत त्यांना काही प्राचार्य शिकवित आहेत किंवा त्यांची तयारी करुन घेत आहेत. त्या विद्यार्थ्यांचे फार्म भरण्यास परवानगी दिलेली आहे असेही सांगण्यात आले आहे.

सभापती महोदय, प्रॅक्टिकल आणि थिअरी असे दोन भाग असतात. प्रॅक्टिकल ट्रेनिंग संदर्भात काय व्यवस्था केली आहे? केवळ इंटर्नल मार्क देऊन प्रश्न सुटणार नाही. प्रॅक्टिकल परीक्षेला बसतील त्यावेळी एमएचएएसला या विद्यार्थ्यांबाबत सहानुभूतीचा दृष्टीकोन बाळगण्यास राज्य शासनाकडून सांगितले जाईल काय? खाजगी वैद्यकीय महाविद्यालयात असे प्रकार सर्रास घडतात. ही बाब राज्य शासनाच्या अखत्यारित येत नाही असे न सांगता विशेष बाब म्हणून अशा खाजगी महाविद्यालयांवर मॉनिटरिंग करण्यासाठी समिती असावी, ज्यायोगे विद्यार्थ्यांचे प्रवेश, त्यांना मिळणारे ट्रेनिंग, एज्युकेशन याची पुरेपूर व्यवस्था होईल.

डॉ.विजयकुमार गावीत : सभापती महोदय, या दंत महाविद्यालयात जे विद्यार्थी आहेत त्यांच्यावर अन्याय होऊ नये. त्या महाविद्यालयातील प्राध्यापक परीक्षेच्या वेळी आपल्यावर अन्याय करतील असे विद्यार्थ्यांना वाटत असेल म्हणून त्यांची प्रॅक्टिकल परीक्षा आणि थिअरी परीक्षा बाहेरील शासकीय दंत महाविद्यालयात घेण्याबाबत विद्यापीठाला निर्देश दिले आहेत. या शिवाय इंटर्नल ॲसेसमेंटचे मार्क देत असताना अन्याय होईल असे विद्यार्थ्यांना वाटत असेल तर ती परीक्षा सुध्दा शासकीय दंत महाविद्यालयामध्ये घेऊन त्यांना इंटर्नल मार्क देण्याची व्यवस्था करण्यात येईल. हे खरे आहे की, ब-याच ठिकाणी मोठया प्रमाणात असा त्रास देणे, अधिक डोनेशन घेणे हे प्रकार घडतात. यासाठी राज्य शासन लवकरच या गोष्टी नियंत्रणात आणण्यासाठी या सभागृहात कायदा आणणार आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ KTG/श्री.शिगमनंतर 12:25

ता.प्र.क्र.37917....

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदय, विद्यार्थ्यांनी आंदोलन केल्यानंतर शासकीय अधिकाऱ्यांना जाग आली. इतके दिवस हे अधिकारी झोपी गेले होते का? दरवर्षी महाविद्यालयाची तपासणी करण्यासाठी आरोग्य विद्यापीठाची आणि शासनाची समिती जात असते. त्यांच्या ही बाब निदर्शनास आली नाही का? प्रॅक्टिकल परीक्षा दुस-या महाविद्यालयात घेण्यात येईल असे सांगितले आहे. आतापर्यंत एकही प्रॅक्टिकल परीक्षा झालेली नाही. अशा परिस्थितीत हे विद्यार्थी कसे उत्तीर्ण होणार आहेत? या विद्यार्थ्यांना या वर्षी सरसकट उत्तीर्ण केले जाईल काय? या दुरवस्थेला संस्था चालकांसह शासकीय अधिकारी देखील जबाबदार आहेत. अशाच प्रकारच्या तक्रारी आयुर्वेद महाविद्यालयांबाबत आलेल्या आहेत. जिल्हाधिकाऱ्यांनी कालच अहवाल दिला असून त्यात आयुर्वेद महाविद्यालयामध्ये स्टाफ नसल्याचे नमूद केले आहे. आयुर्वेद महाविद्यालयाबाबत शासनाची भूमिका काय आहे?

डॉ.विजयकुमार गावीत : सभापती महोदय, या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे बरेच क्लासेस झालेले आहेत अशा पध्दतीचा अहवाल आलेला आहे. खाजगी महाविद्यालये असल्यामुळे इन्स्पेक्शनबाबत राज्य शासनाचे डायरेक्ट नियंत्रण नसते. याचे नियंत्रण डीसीआय करीत असल्याने अडचण निर्माण झाली. विद्यापीठाकडून सुध्दा दरवर्षी इन्स्पेक्शन केले जात नाही. या वर्षापासून अचानकपणे जाऊन तपासणी करायची असे ठरविले आहे. अचानकपणे तपासणी केल्यानंतर निश्चितपणे आयुर्वेद महाविद्यालयांप्रमाणे उणिवा आढळतील. तसे आढळले तर कारवाई केली जाईल.

नंतर एस.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.** : 37917......

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, या कॉलेजमध्ये बऱ्याच चुका आढळल्यामुळे महाराष्ट्र शासनाने दि. 11 मार्च रोजी केंद्र सरकारला पत्र पाठवून मान्यता रद्द करण्यास सांगितले आहे. समजा हे कॉलेज बंद झाले तर त्या कॉलेजमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची आपण कोणती पर्यायी व्यवस्था करणार आहात ?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सतीश चव्हाण यांनी अगोदर प्रश्न विचारला होता त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, जिल्हाधिकाऱ्यांनी या कॉलेजच्या संदर्भात शैक्षणिक त्रुटीच्या संदर्भात रिपोर्ट पाठविला असून जिल्हाधिकाऱ्यांनीही या कॉलेजची मान्यता रद्द करण्याची सूचना केलेली आहे. या कॉलेजची मान्यता रद्द करण्यासंदर्भात महाराष्ट्र शासनाने अगोदरच डीसीआयला कळविलेले आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाच्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, डीसीआयने कॉलेजची मान्यता रद्द केली तर तेथील विद्यार्थ्यांचाा दुसऱ्या कॉलेजमध्ये समावेश केला जात असतो. विद्यार्थ्यांना दुसऱ्या कॉलेजमध्ये शिफ्ट करण्याचा निर्णय डीसीआयने दिल्यानंतरच या विद्यार्थ्यांना दुसऱ्या कॉलेजेस मध्ये शिफ्ट केले जात असते.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, महाविद्यालयांना देण्यात आलेली आवश्यक प्रमाणपत्र रद्द करण्यात आलेली आहे. रद्द करण्यात आलेली प्रमाणपत्र किती होती, या प्रमाणपत्रांचे स्वरुप काय होते, कॉलेज सुरु करीत असतांना किंवा रनिंग असतांना राज्य शासनाकडून प्रमाणपत्र घ्यावी लागत असतात ती कागदपत्र वेळोवेळी घेण्यात आली होती काय ?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, ज्यावेळेस कॉलेज सुरु करावयाचे असते त्यावेळेस आपण इसी देत असतो. राज्य शासनाने शिफारस केल्यानंतर केंद्रातील कौन्सील तपासणी करुन केंद्र सरकाला शिफारस करीत असते व केंद्र शासनाकडून मान्यता आल्यानंतर राज्य शासन फायनल आदेश काढत असते. इसी तीन वर्षासाठी दिली जात असते. तीन वर्षामध्ये कॉलेज सुरु केले नाही किंवा त्यांना केंद्राची मान्यता मिळाली नाही तर ती इसी आपोआप लॅप्स होत असते. एकदा इसी दिल्यानंतर त्या ठिकाणी दुसरा नवीन कोर्स सुरु करावयाचा असेल तर त्यासाठी इसी द्यावी लागते. परंतु सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या कारणासाठी इसी द्यावी लागत नाही.

---------------------- ..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सुपर स्पेशालिटी रुग्णालय (जि.अमरावती) येथील सरकारी अनुदानाचा गैरफायदा घेणाऱ्या डॉक्टरांवर कारवाई करण्याबाबत**

**(२) * ३८४१५ श्री.संजय दत्त, श्री.सुभाष चव्हाण, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील सुपर स्पेशालीटी रुग्णालयामध्ये कार्यरत काही डॉक्टर सर्रास सरकारी अनुदान घेत असून छोटया छोटया ऑपरेशनासाठी लाखो रुपयांची बिले काढत असल्याचे माहे जानेवारी, २०१३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचा निष्कर्ष काय आहे व त्यानुसार सरकारी अनुदान घेत असलेल्या डॉक्टरांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, याबाबत कोणतीच कारवाई झाली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा. फौजिया खान,सुरेश शेट्टी यांच्या करिता** : (१) नाही.

विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयामध्ये अतिविशिष्ट वैद्यकीय सेवा देण्याकरीता नियमित वैद्यकीय अधिकारी उपलब्ध न झाल्यास कंत्राटी पध्दतीने या सेवा उपलब्ध करुन घेतल्या जातात. या सेवांसाठी दिनांक १८.९.२०१० च्या शासन निर्णयानुसार दर निश्चित करण्यात आले आहेत. या दरांनुसार विशेषज्ञांना मानधन दिले जाते.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. भाई जगताप :सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात जे उत्तर देण्यात आलेले आहे त्या उत्तरालाच माझी हरकत आहे. सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी अतिशय गंभीर प्रश्न विचारला होता परंतु या प्रश्नाचे उत्तर अतिशय उथळ दिले आहे. सन्माननीय सदस्यांनी असा प्रश्न विचारला होता की, अमरावती जिल्हयातील सुपर स्पेशालिटी रुग्णालयातील कार्यरत काही डॉक्टर्स सर्रास सरकारी अनुदान घेत असून छोटया छोटया ऑपरेशनसाठी लाखो रुपयांची बिले काढत आहेत. या प्रश्नाचे उत्तर केवळ "नाही" असे देण्यात आलेले आहे. यासंदर्भातील आरोप तेथील रुग्णांनीच नाही तर तेथील अधीक्षकांनी सुध्दा केलेला आहे. डॉ.अनिल वानखेडे यांनी यासंदर्भात आरोप केलेला आहे. खरे म्हणजे तेथील प्रशासकाने हा आरोप केलेला आहे. डॉ. अनिल वानखेडे यांनी या अगोदरही इतर रुग्णालयातील भ्रष्टाचार बाहेर काढलेले आहेत. अशा माणसाने आरोप केल्यानंतर त्यातील सत्यता न पडताळता असा प्रकार झालेलाच नाही असे सांगणे योग्य नाही. अमरावती जिल्हयातील सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये या अगोदर सुध्दा बराच भ्रष्टाचार झालेला आहे. यासंदर्भात अनेक तक्रारी झालेल्या आहेत. या प्रश्नाच्या संदर्भात जे उत्तर देण्यात आलेले आहे त्या उत्तराला माझी हरकत आहे तसेच या सुपर

..3..

अग्रिम प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. :38415** ......

श्री. भाई जगताप .....

स्पोशालिटी हॉस्पिटलची सद्य:स्थिती काय आहे याची माहिती माननीय मंत्री महोदया देतील काय ?

डॉ.दीपक सावंत :सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी उत्तराला जी हरकत घेतलेली आहे त्या हरकतीवर मला थोडक्यात विचार मांडावयाचे आहेत. या सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलला मी गेल्या महिन्यामध्ये भेट दिली होती. या ठिकाणी जे प्रश्न विचारण्यात आले व या प्रश्नांना जी उत्तरे देण्यात आली आहे ती अतिशय उथळ देण्यात आली आहेत. शासनाकडून यासंदर्भात करोडो रुपये उकळले जात आहेत. या ठिकाणी निगेटीव्ह उत्तर देण्यात आलेले आहे.

यानंतर श्री. भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38415...

डॉ.दीपक सावंत...

त्यामुळे हा प्रश्न राखून ठेवावा अशी माझी विनंती आहे.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, जे आरोप करण्यात आले आहेत त्यासंबंधी माहिती घेतली असता त्यात कोणतेही तथ्य आढळून आलेले नाही. त्यामुळे "नाही" असे उत्तर देण्यात आले आहे.

**सभापती** : हा प्रश्न मी राखून ठेवतो. सदर प्रश्न दिनांक 18 एप्रिल 2013 रोजी प्रश्नोत्तराच्या तासाच्या वेळी घेण्यात येईल.

....

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**गुंजाळ (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथील दारिद्र्य रेषेखालील लाभार्थींची विद्युत बिलासाठी होणारी फसवणूक**

(3) * 38587 **श्री.सुभाष चव्हाण, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप** : सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) गुंजाळ (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथील दारिद्र्य रेषेखालील लाभार्थींना 15 रुपयात वीज मीटर बसवून दिले परंतु बऱ्याच ग्राहकांच्या बिलावर रिडींग उपलब्ध नसल्याच्या नावाखाली अव्वाच्या सव्वा बिले दिले जात असल्याचे माहे डिसेंबर, 2012 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदरहू बिलाचे रिडिंग हे घरोघरी जावून न घेता त्या रिडिंगमध्ये अंदाजित जादा बिले टाकीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, सदरहू गोरगरिबांची विद्युत बिलासाठी फसवणूक करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची शासनाने चौकशी करुन त्यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेंद्र मुळक, श्री. अजित पवार यांच्याकरिता** : (1) हे खरे नाही.

(2) हे खरे नाही.

(3) व (4) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, बुलढाणा जिल्ह्यातील विद्युत बिलामध्ये होणाऱ्या फसवणुकीसंबंधातील हा प्रश्न आहे. हा प्रश्न बुलढाणा जिल्ह्याशी संबंधित असला तरी संपूर्ण महाराष्ट्रामध्ये आज अशीच परिस्थिती आहे. दारिद्र्य रेषेखालील लाभार्थींना सवलतीच्या दरामध्ये मीटर बसवून दिलेले आहेत. परंतु, बऱ्याच ग्राहकांचे मीटर रिडींग उपलब्ध नसल्यामुळे अव्वाच्यासव्वा बिले लावली आहेत हे खरे आहे काय, सदरची बिले घरोघरी न जाता ऑफिसमध्ये बसूनच तयार केली जात आहेत हे खरे आहे काय ? आपण गोरगरिबांची फसवणूक करीत आहात. तेव्हा याबाबतची संपूर्ण चौकशी अधिकाऱ्यां मार्फत करून कारवाई करण्यात येणार आहे काय ? तसेच दारिद्र्य रेषेखालील लोकांना योग्य रिडींगची बिले देण्यात येणार आहे काय ?

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, राजीव गांधी विद्युतीकरण योजने अंतर्गत बुलढाणा जिल्ह्यात विद्युतीकरण करण्यात आले आहे. चुकीचे विद्युत रिडींग देण्यात आले या संदर्भातील हा प्रश्न आहे. अव्वाच्यासव्वा बिले देण्यात येतात असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. तसा कुठलाही प्रकार नाही. मी यासंबंधी अगदी स्पेसिफिक माहिती सभागृहाला देऊ इच्छितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38587 ....

श्री.राजेंद्र मुळक...

ही माहिती या प्रश्नाशी संबंधितच अशी आहे. श्री.बळीराम यशवंत मोरे यांना माहे डिसेंबर मध्ये अस्पष्ट फोटो रिडिंगमुळे 373 युनिटचे रूपये 2790/5 इतके चुकीचे बिल देण्यात आले. त्यामुळे त्यांनी तक्रार केली. त्याची स्थळ तपासणी केल्यानंतर रिडींग 18 युनिट आले व 130 रूपयांचे बिल रेक्टीफाय करून देण्यात आले. अशा प्रकारे चुकीचे बिल आले असेल व संबंधित ग्राहकाने तक्रार केली असेल तर तपासणी करण्यात येते. त्यामध्ये चूक आढळली तर ती रेक्टीफाय करून सुधारित बिल सादर केले जाते. दुसरा एक प्रकार असा असतो की ग्राहकाचे रिडींगच उपलब्ध होत नाही. श्री.नरहरि रंगा या ग्राहकाचे रिडींग उपलब्ध न झाल्याने सरासरी 7 युनिट या प्रमाणे दोन महिन्याचे 36 रूपयांचे बिल देण्यात आले. तक्रार झाल्यानंतर चौकशी करण्यात आली. स्थळ तपासणी केल्यानंतर त्या ग्राहकाला तीन महिन्याचे 139 रूपयांचे बिल देण्यात आले असे दिसून आले. जेव्हा जेव्हा अशा प्रकारच्या तक्रारी येतात तेव्हा तेथील माहिती घेतली जाते व ती रेक्टीफाय करून सुधारित बिल देण्यात येते.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी दारिद्र्य रेषे खालील दोन नागरिकांची उदाहरणे दिलेली आहेत. मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, मी बुलढाणा जिल्ह्यातील आहे. बुलढाणा जिल्ह्यात सदर योजना राबविण्यात येत असून 15 रूपयामध्ये मीटर बसवून देण्यात येतो लेखी उत्तरामध्ये हे "खरे नाही, प्रश्न उद्‌भवत नाही" असे नमूद केले आहे. मी त्या जिल्ह्याचा रहिवाशी आहे. माझ्याकडे या संदर्भातील रोज 4 तक्रारी येतात. दारिद्र्य रेषे खालील लोक तक्रार करायला गेले तर ती नोंदवून घेतली जाते नाही. त्यांची पहिली तक्रार अशी असते की, रिडींग घेण्यासाठी आमच्याकडे कोणीही येत नाही. 4 ते 5 महिने रिडींग घेण्यात येत नाही. 4-5 महिन्यांनी बिल आल्यानंतर अव्वाच्यासव्वा बिल आकारण्यात आलेले असते.

यानंतर श्रीमती रणदिवे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>ता.प्र.क्र. 38587</u>**

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

अशा प्रकारे खामगाव आणि बुलढाणा डिव्हीजनमध्ये तक्रारी आलेल्या आहेत. या तक्रारींच्या बाबतीत संपूर्ण जिल्ह्याची चौकशी केली पाहिजे. तसेच चिखली तालुक्यातील गुंजाळ हे एकच गाव नाही तर बुलढाणा जिल्ह्यातून जेवढ्या तक्रारी आलेल्या आहेत, त्याची चौकशी करुन ज्यांनी दर महिन्याला मीटर रिडींग केले नाही अशा लोकांवर आपण कारवाई करणार आहात काय?

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, जोपर्यंत रिडींग होत नाही, तोपर्यंत बिल दिलेच जात नाही. यदाकदाचित अशा प्रकारची अत्यंत सुस्पष्ट तक्रार जर मला देण्यात आली तर त्या संबंधात चौकशी केली जाईल आणि त्या अनुषंगाने कारवाई केली जाईल.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे. याठिकाणी प्रश्नाच्या बाबतीत उदासीनता असल्याचे दिसून येते. याठिकाणी "प्रश्न उद्‌भवत नाही, प्रश्न उद्‌भवत नाही" असे लेखी उत्तर देण्यात आलेले आहे. माननीय मंत्री महोदय, आपण चांगले उत्तर देत आहात कारण तुम्ही त्याबाबत माहिती घेतलेली आहे आणि आता खूप चांगल्या प्रकारे सगळे हॅण्डल करीत आहात. परंतु तसे करीत असताना मूळ प्रश्न बाजूला राहीला आहे. सन्माननीय सदस्यांनी दोनच उदाहरणे दिली.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य त्या जिल्ह्याचे नेते आहेत आणि त्यांच्याकडे तशा प्रकारच्या तक्रारी येत असणार. आमदार म्हणून आमच्याकडेही तक्रारी येतात. परंतु लेखी उत्तरामध्ये स्पष्टपणे दिलेले आहे की, हा प्रश्न उद्‌भवत नाही. तसेच यापेक्षा वाईट असे आहे की, जेव्हा-केव्हा चार,पाच महिन्यांनी बिल दिले जाते, त्यावेळी असे सांगण्यात येते की, प्रथम बील भरावे आणि मग आम्ही विचार करु. सभापती महोदय, आपण हे लक्षात ध्यावे की, दारिद्र्यरेषेखालील एखाद्या नागरिकाला दोन-तीन हजार रुपये भरावयाचे असतील तर ते कुठून भरणार हा प्रश्न आहे. कारण त्यांची खरी बिले 132 रुपये, 136 रुपये असतात. अशा वेळी जर प्रथम बिल भरण्यास सांगत असाल तर वेळेला त्या माणसाने काय करावयाचे हा प्रश्न आहे. म्हणून माझी विनंती आहे की, दर दोन महिन्यांनी रिडींग केले पाहिजे आणि ते तसे करण्यात येणार आहे काय ? तसेच ज्यांनी कोणी वेळच्यावेळी मीटर रीडींग घेतले नसेल आणि ते एवढ्या जोरात सा्ंगत असतील की, बिलच दिले जात नाही, तितक्याच जोरात त्यांनी हेही सांगावे की,जे बिल देत नाहीत

. . .. -2



असुधारीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यांच्यावर कारवाई होईल.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, जर अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त झाल्या तर निश्चित स्वरुपात कारवाई करु. परंतु . . . .

श्री.पांडुरंग फुंडकर :सभापती महोदय, . . ..

श्री.राजेंद्र मुळक :सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नाचे उत्तर देत आहे.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांना सांगू इच्छितो की, माननीय मंत्री महोदयांचे उत्तर पूर्ण होऊ द्यावे.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, अशा प्रकारच्या तक्रारी वारंवार येत असतात आणि याबाबतीत सर्व सन्माननीय सदस्य सूचना करीत असतात. पण मी आपल्याला सांगू इच्छितो की, बिल आकारणी करीत असताना चुकीचे बिल आकारले असेल तर पहिल्यांदा जे बिल आहे ते भरावे आणि त्यानंतर रेक्टीफाईड झालेले पैसे भरा असे त्यांना सांगितले जाते. अशा प्रकारच्या तक्रारी आमच्याकडे आलेल्या असून सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेता, त्याबाबत आम्ही निश्चित स्वरुपामध्ये चौकशी करु आणि ही चौकशी करीत असताना जर कोणी दोषी असल्याचे आढळले तर त्यांच्यावर कारवाई करु.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, तोपर्यंत संबंधितांची बिले घेऊ नयेत.

**सभापती** : मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप आणि श्री.पांडुरंग फुंडकरसाहेबांचे मत आहे की, अशा प्रकारे रेकॉर्ड न तपासता बिल देणे आणि त्याचे पैसे अगोदरच भरावे, मग आम्ही चेक करु असे सांगितले जाते. अशी जी पध्दत आहे, त्याला त्यांचा आक्षेप आहे आणि मला असे वाटते की, हा आक्षेप बरोबर असावा. तेव्हा यादृष्टीने आपण काय करणार आहात ?

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी याबाबतीत सांगितले की, या संदर्भात असे प्रकार होता कामा नयेत. आम्ही या बाबतीत संबंधित विभागांना कडक आदेश देऊ. जोपर्यंत मीटर रीडींग मिळत नाही, ते एस्टॅब्लीश होत नाही. तोपर्यंत त्याने किती युनिट वापरले आहे ते समजत नाही. अशा वेळी ग्राहकाने युनिट वापरले असेल तर त्याचा जो काही रेट असेल त्याप्रमाणेच सदरहू बिल

. . . .यु-3



असुधारीत प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

आकारण्यात येईल. मात्र रिडींग न करता बिल देऊन त्याच्याकडून सदरहू रक्कम घेण्याच्या बाबतीत कोणतीच कारवाई होणार नाही.

----

एल-4 . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

16-4-2013 (असुधारीत प्रत/प्रसिध्दीसाठी नाही) यु-4

APR पूर्वी श्री.भारवि .. .. 12.50

**नाशिक जिल्ह्यामध्ये अत्यंत कमी आरोग्य संस्था मंजूर केल्याबाबत**

**(४) * ३९२७९ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्र, लोकसंख्या इत्यादींचा विचार करता कमी भौगोलिक क्षेत्र व कमी लोकसंख्या असलेल्या जिल्ह्यांपेक्षा नाशिक जिल्ह्यामध्ये अत्यंत कमी आरोग्य संस्था मंजूर केल्याबाबत नाशिक जिल्ह्यातील लोकप्रतिनिधीनी दिनांक २७ जानेवारी, २०१३ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे तक्रार केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नाशिक जिल्ह्यावरील अन्याय दूर करण्यासाठी जिल्ह्याची सन २००१ ची लोकसंख्या, आरोग्य संस्थामधील अंतर, भौगोलिक स्थिती व स्थानिक लोकप्रतिनिधींची मागणी या निकषाप्रमाणे नाशिक जिल्ह्यातील प्रलंबित नवीन आरोग्य संस्था मंजूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.फौजिया खान, श्री.सुरेश शेट्टी यांच्याकरिता** : (१) होय.
(२) राज्यात आरोग्य संस्था स्थापन करण्याबाबतचा बृहत आराखडा दिनांक १७.१.२०१३ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आला असून, त्यामध्ये नाशिक जिल्ह्यासाठी सन १९९७ साली स्थाननिश्चिती केलेल्या परंतु अद्याप स्थापन न झालेली ४ प्राथमिक आरोग्य केंद्र, नव्याने ४ प्राथमिक आरोग्य केंद्रे, १९ उपकेंद्रे, २ ग्रामीण रुग्णालये व २ ट्रामा केअर सेंटर स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच १८२ उपकेंद्रे व ५० प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये अतिरिक्त मनुष्यबळ मंजूर करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, याबाबतीत माझे असे स्पेसिफीक प्रश्न आहेत की, दि.17 जानेवारी 2000 रोजी मंजूर केलेल्या बृहत आराखड्यासाठी निकष काय होते? जर ते निकष 2001 ची लोकसंख्या, अस्तित्वात असलेल्या आरोग्य संस्थांमधील अंतर, भौगोलिक स्थिती, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केलेल्या मागण्या असतील तर मग प्रचलित निकषानुसार डी.पी.सी.ची मंजुरी घेऊन नाशिक जिल्ह्यातून लोकप्रतिनिधींनी किंवा इतर लोकांनी ज्या आरोग्य संस्थांची मागणी केली होती.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.39279.....

श्री.जयवंतराव जाधव...

त्यापैकी किती उपलब्ध करुन दिल्या ? लोकसंख्येचा निकष पाहता इतर जिल्हे आणि नाशिक जिल्हा असा भेदभाव का केलेला आहे ? इतर जिल्ह्यांमध्ये अधिक आरोग्य संस्था दिलेल्या आहेत. नाशिक जिल्ह्यामध्ये आदिवासी बहुल भाग असताना नाशिक जिल्ह्यावर अन्याय का केला, हा अन्याय आपण या निमित्ताने दूर करणार आहात काय ? नाशिक येथे मंजूर असलेले नवजात शिशु रुग्णालय लवकरात लवकर सुरु करण्यात येईल असे माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले होते. हा लवकरातील लवकर दिवस केव्हा येणार आहे ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सन 2001 च्या लोकसंख्येनुसार म्हणजे पाच हजार लोकसंख्येकरिता एक उप केंद्र, जर आदिवासी भाग असेल तर 20 हजार लोकसंख्येकरिता एक प्राथमिक आरोग्य केंद्र आणि नॉन आदिवासी भाग असेल तर 30हजार लोकसंख्येकरिता एक प्राथमिक आरोग्य केंद्र असते. रुग्णालय गावापासून 25 कि.मी.अंतरापेक्षा जास्त अंतरावर राहू नये अशा पध्दतीचे मॅपिंग करुन बृहत आराखडा निश्चित करण्यात आलेला आहे.

सभापती महोदय, बृहत आराखड्यामध्ये 1309 संस्थांना मान्यता देण्यात आली आहे आणि ती पब्लिश सुध्दा झालेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी नाशिक जिल्ह्याबद्दल सांगितले. त्याबाबत सांगू इच्छिते की, कोणत्याही प्रकारचा गॅप राहू नये अशाप्रकारचे नियोजन बृहत आराखड्यामध्ये करण्यात आलेले आहे. लोकप्रतिनिधींना असे वाटत असेल की, 2011 च्या लोकसंख्येप्रमाणे कार्यवाही करावी, आता लोकसंख्या जास्त वाढलेली आहे किंवा भौगोलिक परिस्थितीमुळे एखादे उप केंद्र गावापासून जास्त अंतरावर आहे असे वाटत असेल, त्या बाबत मी सांगू इच्छिते की, दिनांक 19 जानेवारी, 2013 रोजी संचालक आरोग्य यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आलेली आहे. आपले जे काही आक्षेप असतील ते त्या समितीकडे मांडावेत. उप केद्र जास्त दूर असेल किंवा तेथे जाण्यासाठी जास्त वेळ लागत असेल किंवा एखाद्या जिल्हा रुग्णालयामध्ये रुग्णांची संख्या खूप वाढली आहे अशा प्रकारच्या बाबी या समितीसमोर मांडता येतील. त्यानंतर त्या बाबी शासनाकडून तपासून त्या बाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. .

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.39279.....

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आपण लेखी उत्तर वाचले तर त्यातील भयानकता दिसून येईल. लेखी उत्तरात नमूद केलेले आहे की, नाशिक जिल्ह्यासाठी सन 1997 साली स्थाननिश्चिती केलेल्या परंतु अद्याप स्थापन न झालेली 4 प्राथमिक आरोग्य केंद्रे, नव्याने 4 प्राथमिक आरोग्य केंद्रे, 19 उपकेंद्रे, 2 ग्रामीण रुग्णालये व 2 ट्रामा केअर सेंटर स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे." माझा साधा प्रश्न आहे की, सन 1997 पासून हे काम का रखडलेले आहे ? माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, संचालक, आरोग्य सेवा यांच्या अध्यक्षतेखाली बृहत आराखड्यासंबधी एक समिती नेमलेली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्याला बृहत आराखड्यामध्ये कोणतेही स्थान मिळालेले नाही अशी माझी माहिती आहे. या संदर्भात विभागाचे सचिव श्री.बेंजामीन यांच्याशी देखील मी चर्चा केलेली आहे. या बृहत आराखड्यानुसार सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये एकही उपकेंद्र व प्राथमिक आरोग्य केंद्र दिलेले नाही. तेव्हा त्या ठिकाणी उप केंद्र आणि प्राथमिक आरोग्य केंद्र देणार काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले की, जेथे गॅप असतील ते भाग बृहत आराखड्यामध्ये आणलेले आहेत. लोकसंख्या प्रमाणे, डिस्टन्सप्रमाणे आणि भौगोलिक परिस्थितीप्रमाणे गॅप नसतील तर ते बृहत आराखड्यामध्ये आलेले नाही. आपण जी समिती स्थापन केलेली आहे त्या समितीसमोर या या ठिकाणी गरज आहे अशी मागणी केल्यास ती बाब तपासून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/ KTG/ D/ ST/ पूर्वी श्री.अजित.... 13:00

ता.प्र.क्र.39279....

प्रा.फौजिया खान....

1997 मध्ये जो आराखडा तयार करण्यात आलेला आहे त्यातील काही कामे ऑन गोईंग वर्क्स म्हणून राहिली आहेत. ती कामे होतील. 1997 मध्ये 252 प्राथमिक आरोग्य केंद्र निर्माण करण्याचे नियोजन होते. त्यातील 120 पूर्ण झालेली आहेत. तसेच 128....

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी मागणी केल्यानुसार प्राधान्याने चार कामे घेण्यात येतील. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना सांगू इच्छिते की, स्थान निश्चितीमध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्यात रुग्णालयाची गरज असल्याचे निदर्शनास आले तर ती बाब समितीच्या निदर्शनास आणून देऊन ते करता येईल. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छिते की, अजूनही त्यास स्कोप आहे.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, मी विचारलेल्या महिला व शिशु रुग्णालयाच्या बाबतीत उत्तर देण्यात आलेले नाही. महोदय, लोकप्रतिनिधींनी मागणी करावयाची आणि प्रशासन त्या बाबत काहीच कार्यवाही करणार नसेल तर ते योग्य होणार नाही. मुळात डीपीसीची मंजुरी मिळाल्यानंतर सुध्दा बृहत आराखड्यामध्ये ते काम येत नसेल तर त्याची जबाबदारी कोणाची आहे ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी विचारले की, ही कामे त्या वेळी का घेण्यात आली होती. मी त्यांना सांगू इच्छिते की, त्या वेळी असे आदेश होते की, ज्या ठिकाणी विभागनिहाय असमतोल असेल त्या ठिकाणी ही कामे प्राधान्याने घ्यावीत. त्यानुसार ती कामे अगोदर घेण्यात आली. तसेच सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांना मी सांगू इच्छिते की, नाशिक येथील महिला रुग्णालयाची जागा निश्चित झालेली आहे. या संदर्भात पुढील कार्यवाही सुरु करण्यात येईल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय,...

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय,.....

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, एकाच वेळी दोन्ही सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारणे योग्य होणार नाही. मला वाटते माननीय राज्यमंत्र्यांनी सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी विचारलेल्या प्रश्नाला अगोदर उत्तर द्यावे व त्या नंतर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर द्यावे. ..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.39279....

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांना मी सांगू इच्छिते की, नाशिक येथील महिला रुग्णालयाचे काम प्राधान्याने घेण्यात येणार आहे. त्या रुग्णालयाची जागा निश्चित झालेली आहे. ते काम होणार आहे. या बाबतची प्रक्रिया सुरु आहे. तसेच बृहत आराखड्यात सिंधुदुर्ग येथे 1 नवीन उपकेंद्र, 3 ट्रॉमा केअर सेंटर, 1 ग्रामीण रुग्णालय, 4 जिल्हा उप रुग्णालय व 1 महिला रुग्णालय घेण्यात आले आहे. त्यामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यावर अन्याय झाला असे अजिबात नाही. ज्या ज्या ठिकाणी रुग्णालयांची गरज आहे ते बृहत आराखड्यामध्ये समाविष्ट केले आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय,....

**सभापती** : मी माननीय राज्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना त्यांचे समाधान कसे होईल या दृष्टिकोनातून प्रयत्न करावयास पाहिजे. सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांना आपण मनापासून उत्तर दिले आणि तरीही सन्माननीय सदस्यांचे समाधान होत नसेल तर त्याला उपाय नाही. माझी इच्छा आहे की, या विषयी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत व श्री.जयवंतराव जाधव यांना माननीय राज्यमंत्र्यांनी आपल्या दालनात बोलावून त्यांच्याशी या बाबत चर्चा करावी. जर आताच्या उत्तरामध्ये काही कमतरतता असेल तर ती त्यांनी पूर्ण करावी.

प्रा.फौजिया खान : होय.

श्री.दिवाकर रावते : महोदय, हा प्रश्न राखून ठेवावा.

**सभापती** : हा प्रश्न राखून ठेवला जाणार नाही.

श्री.दिवाकर रावते : महोदय, आम्हाला समाधानकारक उत्तर न मिळाल्यामुळे आम्ही सभात्याग करतो.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य सभात्याग करतात.)

------

**सभापती** : आता तारांकित प्रश्न क्रमांक-39391 चर्चेला घेण्यात येईल.

नंतर श्री.बरवड....

अशुध्दप्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**वाशिम येथे माता-बाल रुग्णालय सुरु करण्याबाबत**

**(५) * ३९३९१ श्रीमती शोभा फडणवीस** : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम येथे १०० खाटांचे माता-बाल रुग्णालय सुरु करण्यासाठी केंद्र शासनाने २० कोटी रुपयांचा निधी दिल्याचे केंद्रीय आरोग्य मंत्री यांनी दिनांक २५ डिसेंबर, २०१२ रोजी वा त्या सुमारास वाशिम येथे एका कार्यक्रमादरम्यान सांगितले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू रुग्णालयाकरिता जागेची निवड करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, सदरहू रुग्णालय लवकरात लवकर सुरु करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा. फौजिया खान, श्री.सुरेश शेट्टी यांच्याकरिता** : (१) होय.
(२) होय.
(३) रुग्णालय बांधकामाच्या अंदाज व आराखड्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, तांत्रिक मान्यताही देण्यात आली आहे. बांधकामासाठी आवश्यक कार्यवाही चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, 100 खाटांचे माता-बाल रुग्णालय सुरु करणार आहोत असे उत्तरात नमूद केले आहे. महाराष्ट्र राज्यात आपण 100 खाटांचे, 50 खाटांचे खूप दवाखाने सुरु करतो परंतु बहुतांश दवाखान्यांमध्ये वैद्यकीय अधिकारी नाहीत, तज्ज्ञ नाहीत. जिल्हा रुग्णालयामध्ये सुध्दा पदे आहेत, मशिनरी आहे पण तज्ज्ञ नाहीत. मागच्या वेळी आम्हाला असे सांगण्यात आले होते की, 21 डॉक्टर्सची नियुक्ती केली, 42 डॉक्टर्सची नियुक्ती केली परंतु एकही डॉक्टर रुजू होत नाही. हे डॉक्टर्स का रुजू होत नाहीत ? त्यामध्ये ज्या काही अडचणी आहेत त्या सोडवून डॉक्टर्सची पदे भरणार का ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, वाशिम येथील माता-बाल रुग्णालयाच्या बांधकामाच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला तो या प्रश्नाशी संबंधित नाही तरी सुध्दा मी उत्तर देते. या राज्यामध्ये डॉक्टर्सच्या नियुक्त्या करण्यासाठी अनेक प्रकारचे प्रयत्न करण्यात येत आहेत. स्पेशालिस्टची नवीन केडर पहिल्यांदाच नियुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : डॉक्टर्स रुजू होत नाहीत.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ D/

ता. प्र. क्र. 39391 .....

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, ज्या-ज्या ठिकाणी आपल्याला एखादा तज्ज्ञ मिळेल त्याला 6 इन्क्रिमेंट देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. जर डिप्लोमा होल्डर मिळाला तर त्यांना 3 इन्क्रिमेंट देण्याचा निर्णय घेतलेला आहे. एनआरएचएम अंतर्गत कॉन्ट्रॅक्चुअल पध्दतीने डॉक्टर नेमण्याचा प्रयत्न करीत आहोत. अशा पध्दतीने प्रत्येक ठिकाणी डॉक्टर्सची पदे भरण्याचा प्रयत्न करीत आहोत. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, डॉक्टर्स रुजू होत नाहीत. डॉक्टर्स रुजू होत नाहीत त्यासाठीच हे इन्सेन्टीव्ह देण्यात आलेले आहेत. तरीही ते रुजू होत नसतील तर कॉन्ट्रॅक्चुअल पध्दतीची सुध्दा मुभा ठेवलेली आहे. जर डॉक्टर रुजू होत नसेल किंवा आपल्याला एखादा स्पेशालिस्ट मिळाला नाही तर आपण कॉन्ट्रॅक्चुअल पध्दतीने त्या ठिकाणी डॉक्टर घेतो.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ D/

**केंद्र शासनाप्रमाणे राज्यातील वाहनचालक संवर्गाची पदोन्नतीनुसार वेतन निश्चिती व वेतनातील त्रुटीबाबत**

**(६) * ३९५२४ श्री.जयंत प्र. पाटील :** सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध विभागामध्ये कार्यरत असलेल्या वाहन चालकांनी वाहन चालक संवर्गाची पदोन्नतीनुसार वेतन निश्चिती व वेतनातील त्रुटीबाबत राज्याचे मुख्य सचिव यांच्याकडे दि. ८ नोव्हेंबर २०१२ रोजी वा त्यासुमारास निवेदन सादर केले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार कोणतीच कार्यवाही न झाल्याने संघटनेने नागपूर हिवाळी अधिवेशन २०१२ चे कालावधीत दिनांक १५ डिसेंबर, २०१२ रोजी नागपूर येथे लाक्षणिक उपोषण केले हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने महाराष्ट्र राज्य शासकीय व जिल्हा परिषद वाहन चालक (वर्ग ३) कर्मचारी संघटनेच्या मागण्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे?

**श्री. राजेंद्र मुळक, श्री.अजित पवार यांच्याकरिता** : (१), (२) व (३) निवेदन प्राप्त झाले आहे.

वाहन चालकाच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्याचा प्रस्ताव वेतन त्रुटी निवारण समितीच्या विचारार्थ होता. वेतनत्रुटी निवारण समितीने वाहन चालक संवर्गाबाबत कोणतीही सुधारणा सुचविलेली नाही. दि.१६.१.२०१३ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत वेतनत्रुटी निवारण समितीच्या शिफारशी लागू करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. सदर निर्णयाच्या अनुषंगाने शासन निर्णय क्र.वेपुर-१२१२/प्र.क्र.३१ /सेवा-९, दि.११ फेब्रुवारी, २०१३ निर्गमित करण्यात आला आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, 11 फेब्रुवारी, 2013 ला आदेश निर्गमित केले आहेत. वाहन चालकांच्या त्यांच्या मागणीनुसार वेतनश्रेणीतील त्रुटी दूर झाल्या पाहिजेत. या संदर्भात 11 फेब्रुवारी, 2013 रोजी आदेश निर्गमित करण्यात आले. त्यानुसार कार्यवाही करण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करण्यात आलेला आहे का ?

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, सहाव्या वेतन आयोगानुसार राज्यात सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याच्या संदर्भात बक्षी समिती नेमण्यात आली. त्या वेतन त्रुटी निवारण समितीने देखील त्यांचा अहवालात वाहन चालक संवर्गाच्या वेतन संरचनेमध्ये त्रुटी नसल्याचे नमूद केले. ते नमूद केल्यामुळे समितीच्या अहवालातील शिफारशी मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आल्या. मंत्रिमंडळाने 11 फेब्रुवारी, 2013 रोजी त्याला मान्यता दिली. त्यानुसार त्यामध्ये कोणतीही त्रुटी नाही. जी वेतनश्रेणी हकीम समितीच्या माध्यमातून लागू करण्यात आली होती त्यानुसारच त्यांचे पे स्ट्रक्चर राहील असे बक्षी समितीने निराकरण केलेले आहे. म्हणून त्यांच्या संदर्भात वेतन त्रुटी नाही अशा प्रकारचे उत्तर दिलेले नाही.

---

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ D/

**बीपीएड व बीएसडब्ल्यु महाविद्यालय (अमरावती) येथील**
**प्राध्यापकांना सहावा वेतन लागू करणेबाबत**

**(७) * ४०१२६ डॉ.रणजित पाटील, श्री.चंद्रकांत पाटील, श्री.प्रवीण पोटे पाटील :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती विभागातील बीपीएड व बीएस डब्ल्यु महाविद्यालयातील प्राध्यापकांना मागील चार ते पाच महिन्यांपासून वेतनच मिळाले नसल्याची बाब दिनांक ३० जानेवारी, २०१३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापही या महाविद्यालयातील प्राध्यापकांना सहावा वेतन आयोग दिनांक १ जानेवारी, २००६ पासून लागू झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्राध्यापकांना वेतन व सहावे आयोग लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.पद्‌माकर वळवी** : (१),(२),(३) व (४) राज्यातील शारीरिक शिक्षण महाविद्यालये शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली येतात, यापैकी अनुदानित शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात सहाव्या वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम अदा करण्यात आल्यामुळे वेतनासाठी उपलब्ध झालेली तरतूद कमी पडली. त्यानंतर पुरवणी मागणीद्वारे अतिरिक्त तरतूद उपलब्ध झाल्यानंतर या महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना माहे जानेवारी, २०१३ चे वेतन दिनांक १५.२.२०१३ रोजी व माहे फेब्रुवारी, २०१३ चे वेतन दिनांक १.३.२०१३ रोजी मंजूर करण्यात आले आहे. राज्यातील अनुदानित शारीरिक शिक्षण महाविद्यालयील शिक्षक कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी दिनांक २४.११.२०११ च्या शासन निर्णयान्वये लागू करण्यात आलेल्या आहेत.

राज्यातील बीएसडब्ल्यू महाविद्यालये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखली येत असून, या महाविद्यालयील प्राध्यापकांना नियमितपणे वेतन देण्यात येते. तसेच त्यांना दिनांक २२.९.२०११ च्या शासन निर्णयान्वये सहावा वेतन आयोग लागू करण्यात आला आहे.

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, या सभागृहामध्ये हा प्रश्न अनेक आयुधांच्या माध्यमातून या अधिवेशनामध्ये आलेला आहे. बी.पी.एड महाविद्यालय आणि बी.एस.डब्ल्यू महाविद्यालय यातील एक महाविद्यालय शालेय शिक्षण मंत्रालय चालविते आणि ते महाविद्यालय त्या विभागाच्या अखत्यारित आहे आणि दुसरे महाविद्यालय सामाजिक न्याय विभागाकडे आहे. ही महाविद्यालये विद्यापीठांशी संलग्न आहेत. विद्यापीठ अनुदान आयोगाप्रमाणे आणि शिफारशीप्रमाणे ही सर्व कॉलेजेस चालतात.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.40126.... डॉ.रणजित पाटील.....

केवळ आपल्या राज्यामध्ये बीपीएड व बीएसडब्ल्यू कॉलेज त्या त्या खात्याशी संलग्न आहेत. त्या कॉलेजच्या प्राध्यापकांना विद्यापीठाचे जे काही फायदे आहेत ते 6-6 महिने उशिराने मिळतात. मग वेतन आयोगाची सुधारित रक्कम असेल, ग्रेड-पे असेल, कालबध्द पदोन्नतीचा फायदा असेल, बाकीच्या सवलती असतील त्या एकेक वर्षांनी त्यांच्यापर्यंत पोहोचतात. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनीही त्यांच्या भाषणात उल्लेख केलेला आहे. शासनाने ही महाविद्यालये उच्च व तंत्र शिक्षण विद्यापीठांशी जोडल्यास शासनाचे 15 ते 20 कोटी रुपये वाचतील. ही महाविद्यालये उच्च व तंत्र शिक्षण विभागाला जोडण्यासाठी किती वेळ लागणार आहे ?

श्री.पद्माकर वळवी : बीपीएड व बीएसडब्ल्यू महाविद्यालये उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडे वर्ग करण्याचा हा प्रश्न आहे. या संदर्भात मी कालावधी सांगू शकणार नाही. परंतु शासन याबाबत सकारात्मक निर्णय घेत आहे. ही मागणी बऱ्याच वर्षापासून केली जात आहे. ही मागणी शासनाने आता मान्य केलेली आहे. या संदर्भातील फाईल माझ्याकडून 15 दिवसांपूर्वी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री महोदयांकडे गेलेली आहे. याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करण्याबाबत दोन्ही विभागाचे एकमत झालेले आहे. शक्यतो जूनपर्यंत सुरु करण्याचा आमचा प्रयत्न आहे. मंत्रिमंडळासमोर याबाबतचा प्रस्ताव केव्हा येईल याबाबत कालावधी सांगता येत नाही. परंतु दोन महिन्यामध्ये हा प्रश्न सॉर्ट आऊट करण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री.सतीश चव्हाण : मंत्री महोदयांनी याच अधिवेशनामध्ये जून पासून ही महाविद्यालये उच्च व तंत्रशिक्षण विभागाला जोडण्यात येतील असे मला आश्वासन दिले होते. परंतु आता ते याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करावा लागेल असे सांगत आहेत. यातील खरे उत्तर काय आहे त्यांनी सांगावे.

श्री.पद्माकर वळवी : हा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करावाच लागेल. हा प्रस्ताव शक्यतो जून महिन्यापर्यंत मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्य करण्याचा प्रयत्न करीत आहोत. ही महाविद्यालये शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या कार्य सूचीमध्ये बऱ्याच वर्षापासून होती. ही महाविद्यालये वर्ग करीत असताना सर्व गोष्टी तपासून पाहणे आवश्यक आहे. शासनाने ही मागणी

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/

ता.प्र.क्र.40126....                                    श्री.पद्माकर वळवी....

तत्वत: मान्य केलेली आहे. हा विषय मंत्रिमंडळाच्या अधिकाराचा असल्यामुळे शालेय शिक्षण व क्रीडा विभाग तसेच उच्च व तंत्रशिक्षण विभागामार्फत हा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर लवकरात लवकर आणला जाईल. बीएसडब्ल्यू महाविद्यालयांसंबंधी सामाजिक न्याय विभागाच्या मंत्री महोदयांना याबाबत माहिती दिली जाईल.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, कु.राही सरनोबत हिने गोल्ड मेडल मिळविल्याबद्दल देशाने, शासनाने व सर्वांनीच तिचे अभिनंदन केलेले आहे. बीपीएड महाविद्यालयांची गुणवत्ता व दर्जा सुधारण्यासाठी शासन काही प्रयत्न करणार आहे काय, त्यासाठी शासनाने काय नियोजन केलेले आहे, या बीपीएड मंडळाच्या विद्यार्थ्यांनी नैपुण्य मिळविलेले आहे असे आमच्या निदर्शनास आलेले नाही. म्हणून त्यांची गुणवत्ता व अर्हता वाढविण्याचा शासनाने कार्यक्रम राबविला आहे काय, नसल्यास हा कार्यक्रम केव्हा व कसा राबविला जाणार आहे ?

श्री.पद्माकर वळवी : बीपीएड महाविद्यालयातून क्रीडा क्षेत्रातील खेळाडू तयार व्हावेत ही अपेक्षा रास्त आहे. क्रीडा विभागाकडे ही महाविद्यालये आहेत. या विभागाच्या माध्यमातून त्या महाविद्यालयांमार्फत चांगले खेळाडू व कोच तयार होण्यासाठी निश्चितपणे प्रयत्न केला जाईल. राज्यात 2012 मध्ये क्रीडा धोरण जाहीर केलेले आहे. त्या अनुषंगाने सुधारणा केल्या जात आहेत. या धोरणाची अंमलबजावणी सन 2013-14 पासून सुरु होईल.

श्री.एम.एम.शेख : महाराष्ट्रामध्ये 100 बीपीएड महाविद्यालये कायम विना अनुदानित तत्वावर चालविली जातात. तेथील प्राध्यापकांना पगारही मिळत नाही. कायम विना अनुदानित महाविद्यालयांना शासन अनुदान देणार आहे काय ?

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 13:15

ता.प्र.क्र. 40126...

श्री. पद्माकर वळवी : कायम विनाअनुदानित बीपीएड महाविद्यालयांना अनुदान देण्याचे शासनाच्या विचाराधीन नाही. जी अनुदानित महाविद्यालये आहेत ती उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे वर्ग करीत आहोत. त्यांना कायदेशीर स्टेटस मिळणार आहे. जी कायम विनाअनुदानित बीपीएड महाविद्यालये आहेत त्यांना देखील न्याय मिळू शकेल अशी मला खात्री आहे.

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**आदित्य एज्युकेशन सोसायटी (जि.बीड) येथील ५० विद्यार्थ्यांच्या नोंदणींचे नूतनीकरण झाले नसल्याने त्यांचे शैक्षणिक वर्ष वाया गेल्याबाबत**

**(८) * ४०६०५ श्री.मुझफ्फर हुसेन सय्यद, श्री.सुभाष चव्हाण, श्री.संजय दत्त, श्री.एम.एम.शेख, श्री.चरणसिंग सप्रा :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यात सुरु करण्यात आलेल्या आदित्य एज्युकेशन सोसायटी तर्फे मागील सहा महीन्यापासून सुरु करण्यात आलेल्या आयुर्वेद महाविद्यालयात प्रत्येकी दीड लाख रूपये शैक्षणिक शुल्क भरण्यात येवून प्रवेश घेण्यात आलेल्या ५० विद्यार्थ्यांच्या नोंदणीचे नूतनीकरण आरोग्य विद्यापीठात करण्यात आले नसल्यामुळे त्यांचे शैक्षणिक वर्ष वाया गेले असल्याचे माहे डिसेंबर, २०१२ मध्ये वा त्या दरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणी दोषी व्यक्तींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.विजयकुमार गावित** : (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. सुभाष चव्हाण : बीड जिल्हयातील आदित्य एज्युकेशन सोसायटीने आयुर्वेदे महाविद्यालयामध्ये ४८ विद्यार्थ्यांना प्रवेश दिलेला आहे. त्या विद्यार्थ्यांकडून दीड लाख रु. शुल्क घेतलेले आहे. या आयुर्वेद महाविद्यालयाने नूतनीकरण केलेले नाही हे खरे आहे काय ? या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी ७ ऑगस्ट २०१३ पर्यंत परीक्षा शुल्क भरण्याच्या नोटीसा महाविद्यालयामध्ये लावण्यात आलेल्या आहेत हे खरे आहे काय ? या महाविद्यालयाने विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क घेतले असेल तर त्याबाबतीत शासन कोणती कारवाई करणार आहे ?

डॉ. विजयकुमार गावित : आदित्य एज्युकेशन सोसायटीचे आयुर्वेद महाविद्यालय आहे. या महाविद्यालयाला सन २०११-१२ साठी आयुशने मान्यता दिलेली आहे. सन २०१२-१३ साठी मान्यता दिलेली नाही. ही मान्यता नसताना त्यांनी २०११-२०१२ मध्ये या महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना प्रवेश दिलेला आहे. मान्यता नसल्यामुळे हे विद्यार्थी आयुर्वेदीक विद्यार्थी म्हणून गणले जात नाहीत. राज्यातील बहुतांश महाविद्यालयांचा हा प्रश्न आहे. आयुशने ब-याचशा महाविद्यालयांना मान्यता दिलेली नाही. या बाबतीत माननीय केन्द्रीय आरोग्य मंत्र्यांना आदरणीय मुख्यमंत्र्याचे पत्र पाठवून विनंती करण्यात येणार आहे. संपूर्ण राज्यामधील २१ ते २४ महाविद्यालयातील १२०० ते १४०० विद्यार्थ्यांचा हा प्रश्न आहे. या विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून विधी व न्याय विभागाला देखील आम्ही विचारणा केलेली आहे.

..३..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.४०६०५...

डॉ. रणजित पाटील : राज्यातील २१ ते २४ आयुर्वेद महाविद्यालयातील १२०० ते १४०० विद्यार्थ्यांचा हा प्रश्न असल्याचे मंत्री महोदयांनी सांगितले. न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून या संस्थेला ॲडमिशन देण्याची परवानगी देण्यात आली. दोन वर्षे झाली तरी हे महाविद्यालय आवश्यक असलेल्या अटी व शर्तींची पूर्तता करीत नव्हते. अशा प्रकारे राज्यातील २४ महाविद्यालये अटी व शर्तींची पूर्तता करीत नसतील तर त्या बाबतीत शासनाने काय कारवाई केलेली आहे ? आता सर्वोच्च न्यायालयाने स्टे दिलेला आहे. राज्याचे माननीय मुख्यमंत्री केन्द्रीय आरोग्य मंत्र्यांना पत्र पाठविणार आहेत. भविष्यात अशा प्रकारच्या घटना घडू नयेत यासाठी शासन कोणती पावले उचलणार आहे ?

डॉ. विजयकुमार गावित : ही खाजगी महाविद्यालये असल्यामुळे प्रवेशाच्या आणि फीच्या बाबतीत नियंत्रण करण्यासाठी २ समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहे. त्या समित्यांचे नियंत्रण या महाविद्यालयावर आहे. दुसरे असे की, सन २०११-१२ या वर्षासाठी परवानगी नसल्यामुळे ही महाविद्यालय हायकोर्टामध्ये गेली. हायकोर्टाने इंटेरिम रिलिफ देऊन विद्यार्थ्यांना ॲडमिशन द्या, असे सांगितले.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावीत.....

त्यानंतर हायकोर्टाने पुन्हा सांगितले की, आयुषने परवानगी दिलेली नाही म्हणून तुम्ही दिलेले प्रवेश रद्द करण्यात येत आहेत. त्यानंतर प्रकरण सुप्रीम कोर्टात गेले. सुप्रीम कोर्टाने हायकोर्टाचा निर्णय कायम केला. राज्य सरकारच्या अधिकारात काही करता येते का यासाठी आपण प्रयत्न करीत आहोत. मोठया प्रमाणात असे प्रकार घडत आहेत हे मी यापूर्वी सांगितले आहे. म्हणूनच या गोष्टींवर नियंत्रण आणण्यासाठी शासन या सभागृहात कायदा आणणार आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या महाविद्यालयाने गुन्हा केला आहे. विद्यार्थ्यांचे दोन वर्षाचे नुकसान झाले आहे. धोरणात्मकरित्या या विद्यार्थ्यांची फी संचालकांकडून परत मिळण्यासाठी सरकार प्रयत्न करणार आहे काय आणि या संचालक मंडळावर गुन्हा केल्याबाबत कारवाई करणार आहे काय?

डॉ.विजयकुमार गावीत : सर्व प्रयत्न करुन त्या विद्यार्थ्यांचे रेग्युलेशन झाले नाही तर ती सर्व फी विद्यार्थ्यांना परत दिली जाईल याची काळजी शासन घेईल.

--------

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**जिल्हा परिषद रुग्णालय व महाविद्यालय, अंबाजोगाई (जि.बीड) येथे**
**सीटी स्कॅन मशीन खरेदीमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(९) * ४०६२१ प्रा.सुरेश नवले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) जिल्हा परिषदेमध्ये स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय व महाविद्यालयातील एक्स रे विभागाला विभागप्रमुख कार्यरत नसताना शेजारच्या विभागप्रमुखाने तब्बल साडे ६ कोटी रुपये किंमतीची सीटी स्कॅन मशीन खरेदी करताना डीन कार्यालयाने गैरव्यवहार केले असल्याचे माहे जानेवारी, २०१३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकारणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, शासनाने दोषींवर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ.विजयकुमार गावित** : (१) नाही, हे खरे नाही.
सी.टी.स्कॅन मशीन खरेदी प्रक्रिया संचालनालय स्तरावर करण्यात आली होती व त्यास शासनाची अंतिम मान्यता प्राप्त झाली आहे, त्यामुळे अधिष्ठाता स्तरावर गैरव्यवहार होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, सीटी स्कॅन मशीन खरेदी करण्यास शासनाने मंजुरी दिली असून हे मशीन केव्हापर्यंत कार्यरत होईल?

डॉ.विजयकुमार गावीत : सभापती महोदय, मशीन सुरु झालेले असून आतापर्यंत 325 सीटी स्कॅन केलेले आहेत.

डॉ.दीपक सावंत : सीटी स्कॅन मशीन कोणत्या प्रकारचे घ्यावे, त्यात कोणकोणत्या स्पेसिफिकेशन्स असाव्यात याबाबत केंद्र सरकारने मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. त्या मार्गदर्शक सूचनांचे पालन न करता विभाग प्रमुखांच्या स्थानिक समितीमार्फत खरेदी केली जाते. आपल्याला पाहिजे असलेल्या स्पेसिफिकेशन्सप्रमाणे मशीन खरेदी केली जाते आणि त्याचे टेंडर ज्यांना द्यायचे आहे त्यांनाच दिले जाते. यापुढे अशा प्रकारची खरेदी करताना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन केले जाईल काय? वैद्यकीय शिक्षण विभागातील 100 कोटी रुपयांचा खरेदी घोटाळा मंत्री महोदयांच्या नावावर पुढे येत आहे त्याबद्दल सभागृहाला माहिती दिली जाईल काय?

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.40621......

डॉ.विजयकुमार गावीत : सभापती महोदय, एमसीआयच्या रुल्स आणि रेग्युलेशन्स प्रमाणे सीटी स्कॅन मशीन आणि त्याला लागणारे ॲक्सेसरीज खरेदी केले जातात. सर्व प्रकारची खरेदी एमसीआयच्या नॉर्मप्रमाणे होते. 100 कोटी रुपयांच्या कथित घोटाळ्याबद्दल मी सभागृहाला सांगू इच्छितो की, शासनाने त्या वर्षात जी काही खरेदी केली त्यात 64 स्लाईसचे सीटी स्कॅन मशीन होते. याच प्रकारचे मशीन मुंबई महापालिकेने 6.5 कोटी रुपयांना खरेदी केले असून शासनाने फक्त 5 कोटी रुपयांना खरेदी केले आहे.......(अडथळा)....नियमाप्रमाणे खरेदी केलेली असताना एखादी खरेदी चालू वर्षात केली आणि त्याची तुलना मागील कोणत्या तरी वर्षीच्या खरेदीशी केली तर त्यात तफावत दिसून येणे स्वाभाविक आहे. मागील कोणत्या तरी वर्षाचा संदर्भ घेऊन तुलना करणे चुकीचे आहे.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी स्पष्ट शब्दात मुंबई महापालिकेने जे मशीन खरेदी केले त्याची किंमत सांगितली आहे. याच प्रकारचे मशीन राज्य शासनाने किती किंमतीला खरेदी केले हेही सांगितले आहे.

नंतर बीबी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर ...

सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी दोघांची तुलना करुन जो फरक सांगितला आहे त्याबाबत राज्य सरकार महानगरपालिकेला तातडीने चौकशी करुन कारवाई करण्यास सांगणार आहे काय ?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, यासंदर्भात नगरविकास विभागाला माहिती घेऊन योग्य ती कारवाई करण्याबाबत सांगितले जाईल. सन्माननीय सदस्य डॉ दीपक सावंत यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या संदर्भात सांगू इच्छितो की, महानगरपालिका मेन्टेनन्स कॉन्ट्रक्ट ३ वर्षाचा करते तर राज्य सरकार 5 वर्षाचा करीत असते.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, प्रश्न वेगळा व त्याला वेगळीच उत्तरे दिली जात आहेत. सभागृहाच्या प्रथा, परंपरा खऱ्या अर्थाने पाळण्याची आवश्यकता आहे. आपल्याला काही तरी रेकॉर्डवर आणावयाचे आहे म्हणून एका प्रश्नात नाक खुपसून दुसरेच काही तरी बोलायचे हे तितकेसे योग्य नाही. त्यामुळे यासंदर्भात माझा प्रश्न आहे की, सीटीस्कॅन मशिन चालविण्यासाठी ज्या प्रकारच्या टेक्नीशियनची गरज असते त्या प्रकारचे टेक्नीशियन्स आपल्याला मिळालेले आहेत काय ? या हॉस्पिटलमध्ये आता अधिष्ठाताच नाही. काही दिवसापूर्वी या ठिकाणच्या अधिष्ठाताने व्हीआरएस घेतलेली आहे. त्यामुळे या हॉस्पिटलला अधिष्ठाता दिला जाणार आहे काय ?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, या हॉस्पिटलमध्ये दोन टेक्नीशियन्स असून एक मेडीकल ऑफिसर सुध्दा आहे. सदर मेडीकल ऑफिसर बीएमआरडी झालेले आहेत. या ठिकाणी रेडीऑलॉजीस्टची पदे रिक्त आहेत. या ठिकाणी रेडीऑलॉजीस्ट यांना पोस्टींग देण्यात आली होती. या ठिकाणी अधिष्ठाताचे पद जून महिन्यापर्यंत भरले जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अमरावती जिल्ह्यातील शेतकरी सिंचन सुविधेपासून वंचित असल्याबाबत**

**(१०) * ४१०६३ श्री. शरद रणपिसे, श्री.सुभाष चव्हाण, श्री.एम.एम.शेख** : सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयात सन २००९ मध्ये मंजूर करण्यात आलेल्या पाटचरीचे काम अद्याप संबंधित ठेकेदाराने केले नसल्यामुळे अनेक शेतकरी सिंचन सुविधेपासून वंचीत असल्याचे ठेकेदारावर कारवाई करण्याबाबत तसेच सिंचन सुविधा त्वरित सुरु होण्याकरिता मा.स्थानिक लोकप्रतिनिधी कालवे विभाग ३, धामनगांव रेल्वे अमरावती यांना दिनांक ४ जून, २०१२ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेंद्र मुळक, श्री. सुनील तटकरे यांच्या करिता** : (१) होय.

(२) शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ मिळावा याकरिता कंत्राटदारास वारंवार काम करण्याबाबत कळविण्यात आले आहे व सदर काम त्वरित पूर्ण करावे अन्यथा करारनाम्यातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्याबाबत कंत्राटदारास कळविण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, उत्तरामध्ये म्हटले आहे की, शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ मिळावा या करिता ठेकेदारांना वारंवार काम करण्याचे कळवलेले आहे. वारंवार म्हणजे ठेकेदारांना किती वेळा कळवले आहे ? लेखी कळवले आहे की, तोंडी कळवले आहे ? लेखी व तोंडी किती वेळा कळवले आहे ? करारनामा केल्यानंतरही सदर ठेकेदार काम करीत नसेल तर त्या ठिकाणी दुसऱ्या ठेकेदाराची नेमणूक करुन सदर काम पूर्ण करुन घेतले जाणार आहे काय ?

श्री. राजेंद्र मुळक : सदर काम उर्ध्व वर्धा प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील आहे. पाटचारीच्या दुरुस्तीच्या कामाचे क्षेत्र २३ हेक्टर आहे.

**सभापती :** आजच्या प्रश्नोत्तराच्या तासातील हा शेवटचा दहावा प्रश्न आहे. या प्रश्नामध्ये कोणालाही भाग घेण्याची इच्छा दिसत नसल्यामुळे हा प्रश्न मी संपवत आहे.

सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी मघाशी एका प्रश्नाच्या संदर्भात भाष्य केले असून ते बरोबरही आहे. अनेक वेळेला असे होते की, प्रश्न गावाचा असतो व जिल्हयावर डोळा ठेवून प्रश्न विचारला जातो.

यानंतर श्री. भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.41063...

**सभापती**...

तेव्हा आपण रिजनचा प्रश्न विचारतो. जेव्हा जिल्ह्याचा प्रश्न असतो तेव्हा राज्याचा प्रश्न विचारला जातो. ही पद्धत आपण कुठे तरी थांबवायला पाहिजे. त्यादृष्टीने मी जरूर प्रयत्न करणार आहे. पण कधी कधी माननीय मंत्री महोदयांनी देखील स्पष्ट सांगणे गरजेचे आहे की, हा प्रश्न एका गावाशी संबंधित आहे.

श्री.दिवाकर रावते (बसून) : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयच गडबडलेले असतात. त्यामुळे सर्व परिस्थिती निर्माण होते.

**सभापती** : आपण त्यांच्यावर अन डू प्रेशर आणतो म्हणून त्यांना इच्छा असताना नसताना उत्तर द्यावे लागते. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांचा प्रश्न योग्य होता. मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, एखाद्या गावाचा प्रश्न असेल तर तेवढ्या पुरतेच उत्तर दिले पाहिजे. संपूर्ण राज्याचा तारांकित प्रश्न कधीच येत नाही. तो जर आला तर ती आमची चूक म्हणावी लागेल. प्रत्येकी 20 मिनिटा नंतर एका भागाला 3 मिनिटे खुलेआम बोलण्याकरिता मी उद्या वेळ देणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप बोलत असतील किंवा सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे बोलत असतील व त्याच वेळी अन्य सन्माननीय सदस्य बोलत असतील तर त्यांचे देखील काही ऐकू येत नाही. त्यामुळे त्या सन्माननीय सदस्यांचे देखील समाधान होत नाही. माननीय मंत्र्यांना देखील उत्तर देता येत नाही. मी खुलेआम तीन मिनिटांकरिता बोलण्यास अनुमती दिली तर सभागृहाची एक बाजू तरी शाबूत राहील असे मला वाटते. दुसऱ्या वेळी मी तीन मिनिटे विरोधी पक्षाला देईन. माझी आपणास गांभीर्यपूर्वक विनंती आहे. आपल्या पुढे अनेक प्रश्न आहेत. त्यास अचूक उत्तरे मिळाली तर त्यातून अनेक मोठे प्रश्न सुटू शकतील. त्याची आपणा सर्वांना जाणीव आहे. समजा सन्माननीय सदस्य श्री.दिवाकरजी रावते यांनी प्रश्न विचारला तर सत्ताधारी बाजूकडील एका कोपऱ्यातील माननीय सदस्य बोलतात आणि सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे यांनी प्रश्न विचारला तर विरोधी बाजूकडील कोपऱ्यातील माननीय सदस्य बोलतात. असे असेल तर यात दोन मार्ग काढता येतील. मी सर्व गट नेत्यांना माझ्या दालनात बोलावून प्रश्नोत्तराचा तासच संपवला तर काय होईल यासंबंधी चर्चा करतो. शेवटी, सभागृहातील सभ्यतेच्या मर्यादा सर्वांनी पाळल्या पाहिजेत. तसे जर होत नसेल तर मग सभागृहातील ग्रुप फोडावेत. सगळेच ग्रुप फोडावेत. मी कोणावरही अन्याय करणार नाही.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.41063...

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, आताच आपण निदेश दिलेले आहेत ते आम्हा सर्वांना मान्य आहेतच. सभागृहाचा आब आम्हा सर्वांना मान्य आहे. तो सर्वांनीच पाळला पाहिजे. माझ्या प्रश्नासंबंधी आपण वक्तव्य केले आहे. ते रेकॉर्डवर ठेवू नये अशी मी आपणास विनंती करीत आहे. आपण असे म्हणालात की, कोणालाही प्रश्न विचारावयाचा नसल्यामुळे मी हा प्रश्न संपवित आहे. दोन प्रश्न विचारले होते. त्या उत्तराने समाधान झाले असते तर तिसरा प्रश्न उद्भवला नसता. त्यामुळे प्रश्न विचारले नाहीत असे रेकॉर्डवर राहता कामा नये.

**सभापती** : मी तिसरा प्रश्न आपणास विचारतो.....

ॲड्.अनिल परब : सभापती महोदय, दहाव्या प्रश्नासंबंधी आपण असे निदेश दिले की, प्रश्न विचारण्यास कोणालाही रस नसल्यामुळे मी हा प्रश्न संपवितो. प्रश्नोत्तराच्या तासामध्ये सभागृहातील सन्माननीय सदस्यांचे लक्ष नसेल तर त्यांनी कृपया बाहेर बसावे. जे सन्माननीय सदस्य प्रश्नोत्तराच्या तासामध्ये भाग घेऊ इच्छितात त्यांना तरी व्यवस्थित काम करू द्यावे.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी दहाव्या तारांकित प्रश्नासंबंधी आक्षेपार्ह मुद्दा मांडला आहे. मी घड्याळाकडे लक्ष देत होतो. त्यावेळी 3 मिनिटे कमी होती. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी जो प्रश्न विचारला होता तो मूळ प्रश्ना पेक्षा वेगळा होता. माझा अकरावा प्रश्न परळी थर्मल संबंधातील होता. तो अतिशय महत्वाचा होता.

**सभापती** : मी आपणास या प्रश्नासंबंधी अन्य मार्गाने जरूर मदत करण्याचा प्रयत्न करेन. पण आताच्या प्रश्नोत्तराच्या तासामध्ये मी अकरावा प्रश्न घेणार नाही.

यानंतर श्रीमती रणदिवे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.41063 . . . .

श्री.अमरसिंह पंडीत : सभापती महोदय, मला आपला निर्णय मान्य आहे. प्रश्न विचारण्याच्या बाबतीत मर्यादा असावयास पाहिजे. जर एखाद्या प्रश्नावर 15-15 मिनिटे उपप्रश्न होणार असतील तर मग बाकीचे प्रश्न चर्चेला येणार नाहीत एवढेच माझे म्हणणे होते.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांना सांगू इच्छितो की, आपण काल प्रश्नोत्तराच्या तासात 12 व्या क्रमांकाचा प्रश्न चर्चेसाठी घेतला आणि आज आपण फक्त 10 प्रश्न घेतले. मी मध्येच 7 व्या मिनिटांनंतर पुढे जाण्याचा प्रयत्न केला. 19 व्या मिनिटांनंतर सुध्दा आपण पहिल्याच प्रश्नावर चर्चा करीत होतो. मात्र आता आपण काळजी घेतली आहे की, 7 ते 8 मिनिटांनंतर पुढील प्रश्नाकडे जावे जेणेकरुन 9 ते 10 प्रश्नांबाबत प्रश्नोत्तराच्या तासात चर्चा होईल.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी 10 व्या प्रश्नाचे उत्तर देत होतो आणि ते अर्धवट असल्याने पुढे सांगू इच्छितो की, या कामाची सुरुवात झालेली आहे आणि जवळजवळ 60 टक्के काम पूर्ण झालेले आहे आणि याबाबतीत जो प्लॅन केलेला आहे, त्यानुसार जून 2013 पर्यंत काम पूर्ण होईल. त्या भागातील स्थानिक आमदार सन्माननीय सदस्य श्री.विरेंद्र जगताप यांनी यासंदर्भात तक्रार केली होती. त्यानंतर विभागाने यासंदर्भात पूर्ण माहिती घेतली. तसेच कंत्राटदारास काम करण्याच्या बाबत ताकीद दिली होती.त्या नुसार त्याने काम सुरु केलेले आहे आणि जवळजवळ 60 टक्के काम पूर्ण झालेले असून साधारणत: जून महिन्यामध्ये काम पूर्ण होईल.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

----

. . .. 2 डी-2

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

सभागृहाच्या कामकाजाबाबत

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आम्ही कामकाज सल्लागार समितीचे सदस्य नाही. तसेच आता अधिवेशनाचा शेवटचा आठवडा सुरु आहे. माझे असे म्हणणे आहे की, नेहमी अधिवेशनाच्या शेवटच्या आठवड्यामध्येच विधेयकांवर चर्चा होत असते. मी याबाबतीत सन्माननीय संसदीय कार्यमंत्र्यांना देखील भेटलो होतो.त्यावेळी त्यांनी असे सांगितले होते की, या अधिवेशनाचा कालावधी जवळजवळ दीड महिन्याचा असून आपल्याला दोन महत्वाची विधेयके पारित करावयाची आहेत.त्यातील एक सहकाराच्या संबंधातील असून दुसरी दोन विधेयकेही पारीत करावयाची आहेत. काल सहकाराच्या संबंधातील बिलावरील चर्चा रात्री 10.30 वाजेपर्यंत सुरु होती. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब या विधेयकाच्या बाबतीत जवळजवळ सात तास बोलले. तेव्हा मी सदनामध्ये उपस्थित होतो.सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते या विधेयकाच्या संबंधात कालपर्यंत जवळजवळ 156 मिनिटे बोलले आहेत. त्यांनी काल दुपारी पावणे चार वाजता भाषण करण्यास सुरुवात केली आणि त्यांचे भाषण रात्री पावणेआठ वाजेपर्यंत सुरु होते.

सभापती महोदय, संपूर्ण राज्याच्या दृष्टीने हे विधेयक महत्वाचे असल्याने आम्हाला देखील याबाबत बोलावयाचे होते. सभापती महोदय, विधेयकावरील चर्चा किती वेळ चालवावयाची किंवा सदरहू चर्चा कधी थांबवावयाची हा आपला अधिकार आहे. हे सभागृह काल रात्री 10.30 वाजेपर्यंत सुरु होते. मागील दोन्ही अधिवेशनाच्या काळात आपण असा निर्णय घेतला आहे की, सभागृहाचे कामकाज संध्याकाळी 6.00 नंतर कटाक्षाने करावयाचे नाही. त्यामुळे आम्हाला वाटले होते की, विधेयकावरील चर्चा एक तास चालेल, दोन तास चालेल. आम्ही सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेबांना विचारले की, आपण किती वेळ बोलणार आहात? त्यावर ते असे म्हणाले की, मी अजून तीन तास बोलणार आहे. खरे म्हणजे माझी तब्येत बरोबर नव्हती आणि आजही नाही. पण आता ती गोष्ट होऊन गेली आहे.समजा जर अधिवेशनामध्ये 8 बिले असतील तर कामकाज सल्लागार समितीमध्ये प्रत्येक आठवड्याला एक विधेयक घेण्याबाबत विचार करावा. कारण हे कायदे मंडळ आहे आणि कायदे करीत असताना त्याबाबत याठिकाणी चर्चा झाली पाहिजे आणि ती चर्चा करताना सर्वांना त्यामध्ये समाविष्ट करुन घेतले पाहिजे.

सभापती महोदय, मला आज दु:ख होत आहे की, सहकार सारख्या एका चांगल्या बिलावर चर्चा होत असताना मी स्वत:किंवा सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकरसाहेब, सन्माननीय सदस्य

3.....



श्री.जयंत प्र.पाटील . . . .

श्री.रामदास कदमसाहेब तसेच इतरही माननीय सदस्यांना यावर बोलावयाचे होते.आम्ही प्रॅक्टीकली सहकारामध्ये काम करीत असतो. या विधेयकामध्ये काही चांगल्या गोष्टी आहेत. त्यामुळे आम्ही याठिकाणी चर्चेच्या माध्यमातून आमचे अनुभव सांगू शकतो. अन्य सन्माननीय सदस्यही सभागृहात उपस्थित होते. सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, पुढील कालावधी मध्ये जी बिले चर्चेला येतील, ती सन्माननीय सदस्यांना चर्चेसाठी सम प्रमाणात वाटून द्यावी. पण याठिकाणी एक प्रथा पडलेली आहे की, विधेयके ही शेवटच्या आठवड्यामध्ये चर्चेसाठी घ्यावयाची, त्यावर चर्चा करावयाची नाही किंवा गोंधळामध्ये मंजूर करावयाची. ही प्रथा निदान आपल्या वरिष्ठ सभागृहामध्ये तरी थांबली पाहिजे.कारण आपल्या सभागृहाकडून राज्यातील जनतेच्या वेगळ्या अपेक्षा आहेत आणि या दृष्टीकोनातून मी आपल्याला विनंती करीत आहे.

यानंतर श्री.अ.शिगम .. . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ D/ ST/ पूर्वी श्रीमती रणदिवे.. 13:40

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी या ठिकाणी पॉईन्ट ऑफ प्रोसिजरच्या माध्यमातून जे विचार मांडले त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. मागील चार-पाच दिवसांपासून सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे या विधेयकावर बोलत आहेत. या विधेयकावर मला देखील बोलायचे आहे असे मी त्यांना सातत्याने सांगत होतो. आम्ही रात्रभर जागून विधेयकाचा अभ्यास करतो. सन्माननीय सदस्य विधेयकावर कितीही वेळ बोलू शकतात. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे आमच्या पक्षाचे गट नेते आहेत. ते गटनेते असल्यामुळे आम्ही त्यांना एखादी गोष्ट सांगणे म्हणजे आम्हाला त्यांच्याकडून न्याय मिळणे हे अपेक्षित आहे असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. आम्ही एखाद्या महत्वाच्या विधेयकावर रात्रभर अभ्यास करतो. परंतु सकाळी सभागृहात आल्यावर आम्हाला कळले की,विधेयक रात्री 10.30 वाजता मंजूर करण्यात आले तेव्हा आम्हाला वाईट वाटले.

सभापती महोदय, काल सभागृहाची बैठक सकाळी 10.00 वाजता सुरु झाली. आपण सकाळी 11.00 वाजता सभागृहाची बैठक सुरु केल्यानंतर ती सायंकाळी 6.00 वाजता पर्यंत चालवितो. काल सकाळी 10.00 वाजता सभागृह सुरु झाल्यानंतर ते रात्री 10.30 पर्यंत चालेल अशी आम्हाला अपेक्षा नव्हती. तालिका सभापतींनी सांगितले होते की, रात्री 8.00 वाजेपर्यंत सभागृहाचे कामकाज सुरु राहील. रात्री 8.00 वाजता सभागृहाचे कामकाज स्थगित होणार आहे म्हणून मी सायंकाळी 7.45 वाजता निघून गेलो. मला वाटले की पुढे कामकाज होणार नाही. मी सकाळी येथे आलो तेव्हा मला समजले की, विधेयक काल रात्री मंजूर करण्यात आले. आमच्यावर हा अन्याय आहे. विधेयकावर अनेक सन्माननीय सदस्यांनी भाग घेऊन त्यावर आपले विचार मांडले पाहिजेत. विधेयकावर कितीही वेळ बोलता येते. परंतु कोण जास्त वेळ बोलत असेल तर त्यावर आपण आक्षेप घेऊ शकता असा देखील नियम आहे, याची देखील मला कल्पना आहे.

सभापती महोदय, विधानसभेमध्ये तत्कालीन अध्यक्ष श्री.दत्ताजी नलावडे यांनी रात्री 2.00 वाजता एका सन्माननीय सदस्यांना नियम दाखवून खाली बसविले होते. मी त्या सदस्यांचे नाव सांगणार नाही. आपण एकट्याने पाच-सहा तास बोलायचे आणि अन्य सदस्यांना एकही मिनिट बोलू द्यायचे नाही असे भविष्यात होऊ नये अशी विनंती आहे. आम्ही या ठिकाणी कायदे बनविण्यासाठी येतो. आपण विधिमंडळास कायदेमंडळ म्हणतो. विधिमंडळाचा मुख्य गाभा कायदा बनविणे हा आहे.

..2..

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी या ठिकाणी अतिशय महत्वाचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. हे सभागृह म्हणजे कायदेमंडळ आहे. तेव्हा या ठिकाणी विधेयकावर जास्तीत जास्त चर्चा झाली पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम हे ज्येष्ठ सदस्य आहेत. मी त्यांचा आदर करतो. या सभागृहातील सर्व सदस्य हे आपले सहकारी सदस्य आहेत. सभागृहाचा निर्णय झाला तर सन्माननीय सदस्यांना विधेयकावर कितीही वेळ बोलता येते त्यांना रोखता येत नाही. आपल्या सभागृहामध्ये गोंधळामध्ये विधेयक मंजूर करण्याची प्रथा नाही आणि ती प्रथा या सभागृहामध्ये सुरु झालेली आहे.

सभापती महोदय, मी अत्यंत विनम्रपणे आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, मागे खाजगी विद्यापीठाच्या संदर्भातील विधेयक चर्चेला आले होते. त्यावेळी मी लेखी सूचना दिली होती. त्यानंतर सभागृहात गोंधळ झाला. गोंधळ कशामुळे झाला हा भाग अलाहिदा. परंतु त्या गोंधळामध्ये ते विधेयक मंजूर करण्यात आले. त्यावेळी मी ऑन लेग होतो. ऑन लेग असलेल्या सदस्याला खाली बसविले पाहिजे, परंतु मला तसे बसविलेले नाही आणि ते विधेयक मंजूर करण्यात आले. कायदे मंडळामध्ये अशा पध्दतीने विधेयके मंजूर करण्यात येत असतील तर ते योग्य नाही. हे सभागृह सार्वभौम जनतेला बांधील आहे. जनतेच्या लोकप्रतिनिधींकडून अपेक्षा असतात की, कायदे मंडळात विधेयकावर चर्चा करताना त्यावर सविस्तर चर्चा झाली पाहिजे. त्या चर्चेचे स्वातंत्र्य सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना मिळाले पाहिजे. एखादा सन्माननीय सदस्य तोच मुद्दा रिपीट करीत नाही तोपर्यंत त्या सदस्याला बोलता येते. सन्माननीय सदस्य श्री.डांगे यांनी सभागृहात दहा-बारा तास भाषणे केलेली आहेत. त्या मानाने सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे भाषण कमी झाले. त्यांचे सहकार क्षेत्रातील योगदान आपण पाहिलेले आहे. आपण एखाद्या सदस्याला थांबविणे आणि त्याचा दोष सदस्यावर टाकणे हे अतिशय चुकीचे रेकॉर्डवर जाईल. तेव्हा माझी सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांना विनंती आहे की, अशाप्रकारचा अधीक्षेप होऊ नये..

श्री.रामदास कदम : सभापती महोदय,माझा हरकतीचा मुद्दा आहे. मी तो नियम एवढ्याकरिता सांगितला की, एखादा मुद्दा पुन्हा पुन्हा रिपीट झाला किंवा विधेयकाच्या बाहेर जाऊन सदस्य बोलू लागले तर माननीय सभापतींना त्या सदस्यांना खाली बसविण्याचा निश्चितपणे अधिकार आहे. मी याच नियमाकडे बोट दाखविले आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

अशुध्दीत प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, हे कायदे मंडळ आहे. त्यामुळे या ठिकाणी कायदा बनविण्याच्या प्रक्रियेवर जास्तीत जास्त वेळ खर्च केला पाहिजे. परंतु या कायदे मंडळात विधेयकांवर चर्चा करण्यासाठी पुरेसा वेळ दिला जात नाही. वास्तविक पाहता जास्तीत जास्त वेळ विधेयकावर चर्चा व्हावी, ही दोन्ही बाजूंची संयुक्त जबाबदारी आहे. सरकारची जशी ती जबाबदारी आहे तशीच आमची सुध्दा जबाबदारी आहे. महोदय, या पुढील काळात अधिवेशनाच्या पहिल्या आठवड्यापासून विधेयके चर्चेला आली तर विधेयकांवर सविस्तर चर्चा करण्यासाठी जास्तीत जास्त वेळ देता येईल, एवढेच या निमित्ताने सांगतो व थांबतो.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र. पाटील यांनी मांडलेल्या पॉईंट ऑफ प्रोसिजरला समर्थन देण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, अधिवेशनापूर्वी अधिवेशनातील कामकाज ठरविण्यासाठी कामकाज सल्लागार समितीची बैठक आयोजित केली जाते. त्या बैठकीमध्ये अधिवेशनात किती विधेयके घेण्यात येणार आहेत ते सूचीत केले जाते. परंतु अधिवेशन कालावधीत विधेयकांचे टाईम टेबल व्यवस्थितरित्या केले जात नाही. विधेयके केवळ कामकाजपत्रिकेवर दाखविली जातात. संपूर्ण अधिवेशन कालावधीत त्यावर चर्चा होत नाही आणि अधिवेशनाच्या शेवटच्या आठवड्यात विधेयके संमत करण्याची घाई केली जाते.

महोदय, काल सहकार विभागाशी संबंधित असलेले महत्त्वपूर्ण विधेयक घाईघाईने मंजूर करण्यात आले. राज्यातील 2.5 लाख सहकारी संस्थांवर परिणाम करणारे ते विधेयक होते. मुळात या सहकारी संस्थांच्या माध्यमातून महाराष्ट्राला उभे करण्याचा प्रयत्न झाला. 97 वी घटना दुरुस्ती झाली असताना या विधेयकामध्ये सहकारी संस्थांच्या फायद्या-तोट्याचे अनेक पैलू होते. त्या पैलूंवर प्रकाश पाडून सभागृहात सविस्तर चर्चेच्या माध्यमातून चांगल्या सूचना झाल्या असत्या. या विधेयकावर सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील आणि मला सुध्दा बोलायचे होते. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे या विधेयकावरील भाषण मी लक्षपूर्वक ऐकले. त्यांनी एकाही मुद्याचा पुनरुच्चार न करता भाषण केले. त्यांनी केलेल्या सूचना या राज्याला आणि सहकारी संस्थांना पोषक होत्या.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

महोदय, मुळात नियमावलीमध्ये एखाद्या विधेयकावर सन्माननीय सदस्यांनी किती वेळ बोलावे याला बंधन नाही. काल मंजूर झालेले विधेयक राज्यातील 2.5 लाख सहकारी संस्थांशी निगडित होते. परंतु त्यावर सखोल चर्चा झाली नाही. हे अर्थसंकल्पीय अधिवेशन दीड महिन्याचे होते. हे विधेयक अतिशय महत्त्वाचे असल्यामुळे ते अधिवेशनाच्या सुरुवातीलाच सभागृहात मांडले असते तर त्यावर प्रत्येक सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी मिळाली असती.

सभापती महोदय, आपण सर्वोच्च स्थानावर आहात. आपण विनंती केल्यामुळे आम्हाला काही बोलता येत नाही. काल सन्मानीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना तीन तास बोलायचे होते. परंतु आपण विनंती केली की, हे विधेयक आज रात्रीपर्यंत संमत करावयाचे आहे. शिवाय विधानसभेत सुध्दा ते संमत व्हायचे आहे. आपण विनंती केली की, अधिवेशन संपण्यापूर्वी दोन्ही सभागृहात हे विधेयक संमत झाले पाहिजे.

महोदय, हे कायदे मंडळ आहे. त्यामुळे एखादा कायदा करीत असताना कायदे मंडळाकडून चूक होता कामा नये. सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी काल भाषणात सांगितले की, हे विधेयक घाईघाईने मंजूर केले तर ते उद्या न्यायालयात चॅलेंज होऊ शकते आणि त्याचा परिणाम राज्यातील सहकारी संस्थांवर होऊ शकतो. महोदय, कोणत्याही विधेयकाचे कायद्यात रुपांतर होत असताना त्या विधेयकावर बारीकसारीक चर्चा होऊन ते न्यायालयात चॅलेंज होणार नाही इतपत सावधगिरी घेऊन ते विधेयक संमत केले तर ते एकप्रकारे न्याय दिल्यासारखे होईल. या सभागृहातील अनेक सन्माननीय सदस्य निरनिराळ्या सहकारी संस्थांमध्ये काम करतात. त्यांना सहकार क्षेत्राचा दांडगा अनुभव आहे. हे विधेयक मंजूर करताना त्यांच्या अनुभवाचा लाभ घेता आला असता. महोदय, या निमित्ताने माझी एवढीच विनंती आहे की, जे झाले ते भविष्यात होता कामा नये.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, प्रत्येक पक्षाच्या माध्यमातून सन्माननीय सदस्य सभागृहात येत असतात. अनेक जण जनतेमध्ये जाऊन जाहीर कार्यक्रमात भाषणे करीत असतात. एखाद्या कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच वरिष्ठ नेत्याला बोलण्याची संधी दिली तर व्यासपीठावर नाराजी पसरल्याचे दिसून येते.

नंतर श्री.बरवड....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर ....

मी एवढा सिनिअर असताना मला आधीच ताबडतोब बोलण्याची संधी कशी दिली, सर्वांची भाषणे झाल्यानंतर मी भाषण करणार अशी त्यांची भावना असते. परंतु या सभागृहामध्ये नेमकी उलट परिस्थिती आहे. या ठिकाणी सर्व सिनिअर सदस्य अगोदर बोलतात आणि नंतर वेळ मिळाला तर ज्युनिअर सदस्यांना पाच दहा मिनिटे बोलता येते. मी सर्वच पक्षांच्या बाबतीत बोलत आहे. आताही तोच विषय उपस्थित झाला. सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी त्याच संदर्भात विषय मांडला. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी सुस्पष्ट नाही पण चांगल्या सुसंस्कृत भाषेमध्ये सांगण्याचा प्रयत्न केला. आपल्याला जे काही म्हणावयाचे होते तो मुद्दा आमच्या लक्षात आलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांना सांगू इच्छितो की, आपण या सभागृहाचे सन्माननीय सदस्य आहात. सन्माननीय सदस्य जे बोलले त्यामध्ये उगाच वाद लावण्याचा मुद्दा नव्हता. आपली आयडिया चांगली होती पण इंटेन्शन वाईट होते. Your idea was good but intention was very bad.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना असा हेत्वारोप करता येणार नाही.

श्री. किरण पावसकर : His idea was very good but intention was very bad.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर, सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांचा आक्षेप आहे एवढीच आठवण मी आपल्याला करुन देत आहे.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, विधेयकावर बोलताना कितीही वेळ बोलता येते असा नियम असला तरी अभ्यास करुन आम्हालाही विधेयकावर काही सूचना करता येतील. जे ज्युनिअर सदस्य आहेत ते सुध्दा चांगल्या सूचना करु शकतील. काल सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी विधेयकावर बोलत असताना कमी वेळेत ज्या सूचना केल्या त्या मौलिक आणि महत्वाच्या होत्या. या विधेयकावर बोलत असताना ज्यांनी अभ्यास केलेला आहे, ज्यांना या विधेयकावर बोलावयाचे आहे, ज्यांनी त्या क्षेत्रामध्ये काम केले आहे ते आणखी प्रभावीपणे आपले विचार मांडू शकतात. शब्दांचे रिपिटेशन किंवा वाक्यांचे रिपिटेशन न करता आपण चांगले प्रभावी मुद्दे उपस्थित करु शकतो जेणेकरुन हे विधेयक मंजूर झाल्यानंतर जनतेचे नुकसान होऊ नये,

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर .....

जनतेला त्याचा जास्तीत जास्त फायदा व्हावा. सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी जे सांगितले त्याच्याशी मी सहमत आहे. एकदा हे विधेयक मंजूर झाले की, अधिकारी बरोबर त्यावरच बोट ठेवतात आणि त्यामुळे बाहेर जनतेचे नुकसान होते. मी आपल्याला सूचना करु इच्छितो की, बाहेरच्या व्यासपीठांवरील भाषणांमध्ये जसे आपण बोलतो त्याच पध्दतीचे या सभागृहामध्ये ज्युनिअर सदस्यांना आधी बोलण्याची संधी द्यावी आणि सिनिअर सदस्यांना नंतर बोलण्याची संधी द्यावी. असा जर नवीन पायंडा पाडला तर त्याचा फायदा सर्वांनाच होऊ शकेल. जर चुकूनमाकून ज्युनिअर सदस्यांकडून काही कमीजास्त शब्द बोलण्यात आले तर सिनियअर सदस्य ते सुधारु शकतील. अशा पध्दतीने आपल्याला चर्चा करता येईल.

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, आज जरा सभागृहातील वातावरण वेगळे वाटते.

**सभापती** : सभागृहातील वातावरण मोकळे आहे.

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, आज आपण पहिल्यांदाच इतक्या प्रफुल्लित वातावरणामध्ये दिसत आहात. मी जेव्हापासून सभागृहात आलेलो आहे तेव्हापासून पाहात आहे. आज आपण फार आनंदी दिसत आहात. त्यामुळे आज संपूर्ण सभागृहाचे वातावरण आनंदी आहे. त्यामुळे मला जास्त कॉमेंटस् करावयाच्या नाहीत. कोणाला जर असे वाटत असेल की, आपल्याला रेकॉर्ड ब्रेक करण्यासाठी बोलावयाचे आहे तर ते ठीक आहे पण त्यामध्ये मुद्दे आले पाहिजेत. सदस्यांच्या वक्तव्यामध्ये, त्यांच्या भाषणामध्ये मुद्दे असतील तर आम्हालाही ऐकण्यास आनंद वाटतो. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे सिनिअर नेते आहेत. ते जरी शिवसेना पक्षाचे गट नेते असले तरी आम्ही देखील त्यांच्याकडे चांगल्या भावनेने पाहतो. ते सिनिअर नेते आहेत. त्यांनी चांगले मुद्दे मांडले होते.

सभापती महोदय, आपण मघाशी प्रश्नोत्तराच्या तासामध्ये बोलता बोलता असे म्हणालात की, इकडचा गट फोडला पाहिजे. ते बरोबर आहे. पण इकडे फोडण्यासारखे काही राहिलेच नाही म्हणून आपण बोललात. कारण तिकडचे जवळजवळ सर्व इकडेच आलेले आहेत. त्यामुळे कदाचित

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ ST/

श्री. राम पंडागळे .....

या ठिकाणी कोणी आक्षेप घेतला नाही. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांना मी सांगू इच्छितो की, आता फोडण्यासारखे काही राहिलेले नाही. सर्व इकडे आलेले आहेत. माननीय सभापती महोदयांच्याही लक्षात आले की, बोलायचे असेल तर इकडेच बोलावे कारण तिकडे काही राहिलेले नाही.

**सभापती** : ते अशासकीय आहे.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी सहकार विभागाच्या विधेयकासंबंधी एक मुद्दा उपस्थित केलेला आहे. या सभागृहाच्या कामकाजाच्या पध्दतीप्रमाणे एखादे विधेयक महत्वाचे, अधिक महत्वाचे की कमी महत्वाचे आणि त्याच्यावर सदस्यांनी किती बोलावे आणि ते बोलण्यावर काही मर्यादा असावी काय अशा प्रकारची चर्चा हे अधिवेशन सुरु झाल्यापासून सुरु झालेली आहे. कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीतही याबाबत चर्चा झालेली आहे. सहकाराचे विधेयक महत्वाचे आहे असे माननीय संसदीय कार्य मंत्री वारंवार सांगत होते. या अधिवेशनामध्ये हे विधेयक मंजूर झाल्यानंतर त्याची पुढील प्रक्रिया अधिक चांगली होईल असेही त्यांनी सांगितले होते.

या विधेयकावर झालेली चर्चा महत्वपूर्ण होती. कारण राज्याच्या सहकाराच्या दृष्टीने या विधेयकामुळे आमुलाग्र बदल होण्याची शक्यता आहे. त्या शक्यतेचा विचार करुन त्याचे विवेचन सन्माननीय सदस्य करीत होते. या विधेयकावरील चर्चा सुरु होणार आहे हे सर्व सन्माननीय सदस्यांना माहिती होते. त्यानुसार काल संध्याकाळी चर्चा पुढे सुरु झाली होती. ते विधेयक संमतीच्या स्टेजला आले त्यावेळी समोरच्या बाजूला 4 आणि इकडच्या बाजूला 6 सदस्य उपस्थित होते. म्हणजे 78 सदस्यांपैकी 68 सदस्यांना बाहेर जास्त कामे होती. सन्माननीय सदस्यांना हे विधेयक महत्वाचे वाटत नव्हते काय ? एखाद्या विषयाचा प्राधान्यक्रम ठरवून आम्ही दुसरे कोणतेही काम करणार नाही, आम्हाला हा विषय महत्वाचा वाटतो म्हणून आम्ही सभागृहातच उपस्थित राहू. एवढेच नाही तर रात्री 12 किंवा 1 वाजेपर्यंत ही चर्चा चालू राहिली असती तरीही त्याबाबतची शासनातर्फे तयारी ठेवण्यात आली होती. ही व्यवस्था करुन दिलेली असताना आणि इतका महत्वाचा विषय चर्चेला घेतलेला असताना थोडेसे बाहेरच्या कामांचे प्राधान्य वेगळे करुन सदस्यांनी सभागृहात उपस्थित राहणे आवश्यक होते.

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात.)

आपल्या अनुपस्थितीची कारणे येथे देता येणार नाहीत. सन्माननीय सदस्य असे म्हणाले की, आम्ही सकाळी 10 वाजल्यापासून सभागृहात आलो होतो. परंतु मी त्यांना सांगू इच्छितो की, काल रात्री सभागृहात उपस्थित असलेले सदस्यही सकाळी 10 वाजल्यापासून आलेले होते. सर्वांनी सकाळी 10 वाजता उपस्थित राहणे हे अपेक्षितच आहे.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सभागृहाच्या कामकाजाबाबत सभागृहाने काही संकेत पाळण्याचे गट नेत्यांच्या बैठकीत निश्चित करण्यात आले होते. त्यानुसार दोन्ही सभागृहांचे कामकाज सकाळी 11 ते संध्याकाळी 6 वाजेपर्यंत करण्याचे ठरविलेले होते. हा महत्वाचा निर्णय त्या बैठकीत घेण्यात आला होता. या अधिवेशनाच्या कालावधीत जवळजवळ 9 दिवस सभागृहासमोरील संपूर्ण कामकाज काही कारणास्तव पूर्ण होऊ शकले नाही. अशा परिस्थितीतही आपण शासकीय विधेयकांचे कामकाज पूर्ण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यासाठी सकाळी विशेष बैठका घेतलेल्या आहेत. तसेच संध्याकाळी 6 किंवा 6.30 वाजेपर्यंत सभागृहाचे कामकाज चालू ठेवलेले आहे. सहकार विधेयकावर चार दिवस किमान 7 तास चर्चा झाली होती. तरीही या विधेयकाला वेळ कमी पडला आहे. त्यामुळे आपल्याला त्या संदर्भात काही निर्णय घ्यावा लागला. मी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी या संदर्भात जरुर 5-10 मिनिटे बोलणार आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, सहकार क्षेत्राचे महत्वाचे विधेयक आहे याची सर्व सन्माननीय सदस्यांना कल्पना होती. इतके जाड विधेयक मी पहिल्यांदाच बघितलेले आहे. त्यामध्ये अनेक संदर्भ आहेत. अनेक विषय त्यात अंतर्भूत आहेत. राज्यातील निम्मी लोकसंख्या त्या विषयाशी संबंधित आहे. त्यामुळे राज्याच्या दृष्टीने तो महत्वाचा विषय होता. त्यावर चर्चा होणे आवश्यक होते. अपेक्षित चर्चा येथे झालेली आहे. काल अनुपस्थित असलेले सन्माननीय सदस्य उपस्थित राहिले असते तर त्यांच्या माध्यमातून कॉन्ट्रिब्यूशन मिळाले असते.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ KTG/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 14:00

श्री. हेमंत टकले...

कदाचित तेव्हाही आपण थांबलो नसतो आणि आज सकाळी आपण चर्चा सुरु केली असती. आम्हाला विधेयकावर बोलायची संधी मिळाली नाही अशा प्रकारे सन्माननीय सदस्यांनी आक्षेप घेतला असला तरी तसे काही झालेले नव्हते. आपणा सर्वांना विधेयकावर बोलण्याची संधी होती, सर्व सन्माननीय सदस्य विधेयकावर बोलू शकले असते. या सभागृहामध्ये जे सन्माननीय सदस्य उपस्थित होते त्यांच्या उपस्थितीत या विधेयकाला मंजुरी देण्यात आली ही वस्तुस्थिती आहे.

श्री. सुभाष चव्हाण : सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी कामकाजाच्या पध्दतीसंबंधीचा मुद्दा या ठिकाणी उपस्थित केला. त्यावर भाष्य करण्यासाठी मी उभा आहे. आम्हाला सकाळी 10.00 वाजता दिवसाच्या कामकाजाची कार्यक्रमपत्रिका मिळते. सभापती महोदय, आपण नेहमी सकाळी 10.30 ते 11.00 या वेळेत आपल्या दालनामध्ये सभागृहाच्या कामकाजाच्या संदर्भात गटनेत्यांशी चर्चा करता. त्या चर्चेमध्ये प्रत्येक पक्षाचा गटनेता सहभागी असतो. सभागृहाच्या कामकाजासंबंधी जर काही बदल झालेला असेल तर तो गट नेत्यांनी त्यांच्या पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना कळविला पाहिजे. काल देखील कामकाज कधी संपेल हे देखील एक-दोन तासांनी ठरत होते. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आणि सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांचा समज असा होता की या विधेयकावर खूप वेळ चर्चा होईल. रात्री 10.15 पर्यंत कामकाज चालेल याची मला देखील कल्पना नव्हती. सभागृहाचे कामकाज रात्री 7.30 वाजेपर्यंत संपेल असे मला वाटत होते. माननीय सभापतींनी निर्देश दिले होते की रात्रभर बसावे लागले तरी कोणत्याही परिस्थितीमध्ये हे विधेयक संमत करावयाचे आहे. कामकाजाच्या संदर्भातील हा निर्णय गट नेत्यांनी त्यांच्या पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना कळवायला पाहिजे होता. गट नेत्यांनी त्यांच्या पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना सभागृहामध्ये हजर राहाण्यासंबंधी सांगितले पाहिजे.

श्री. दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी कामकाजाच्या पध्दती विषयी या ठिकाणी मुद्दा उपस्थित केला त्याबद्दल मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो. माझ्या हातामध्ये कार्यक्रमपत्रिका आहे. सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी मांडलेला मुद्दा शंभर टक्के बरोबर आह. आपण येथे कायदे करण्यासाठी येतो. या ठिकाणी लक्षवेधी सूचना किंवा नियम 93च्या सूचनाद्वारे जे प्रश्न उपस्थित करण्यात येतात त्यामुळे खात्याला ते कळतात आणि यंत्रणा

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ KTG/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 14:00

श्री. दिवाकर रावते...

जागरुक होते. खरे म्हणजे विधेयके पारित करणे हा या विधिमंडळाचा मूळ गाभा आहे. मी या सदनामध्ये आल्यापासून माझे सर्वात जास्त लक्ष हे विधेयकावर असते. ज्या विषयाचे मला ज्ञान नाही अशा विषयाचे विधेयक सभागृहासमोर आले तर मी त्यावर बोलत नाही.

सभापती महोदय, या विधेयकावर कोणाला बोलण्याची संधी मिळते ? जे सन्माननीय सदस्य विधेयकाला सुधारणा सुचवितात त्यांना सुधारणेच्या वेळी बोलण्याची संधी मिळते. काही वेळा विधेयक दोन्ही सभागृहाच्या संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव सन्माननीय सदस्यांकडून दिला जातो. या विधान परिषदेमध्ये अशा प्रकारचे प्रस्ताव देण्याची पध्दत नव्हती. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याचा प्रस्ताव देण्यास सुरुवात केली. हा प्रस्ताव देण्यामागील उद्देश महत्वाचा असतो. जो सन्माननीय सदस्य विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याचा प्रस्ताव देतो त्या सन्माननीय सदस्यांना विधेयकावर बोलण्याची प्रथम संधी मिळते. ही पध्दत मला नंतर समजली. जे सदस्य पहिल्यांदा प्रस्ताव देतात त्यांना प्रथम बोलण्याची संधी मिळते. अन्य सदस्यांची विधेयकावर बोलण्याची इच्छा असली तरी तो नंतरच भाग आहे. विधेयकावर बोलण्यासाठी संधी मिळण्याकरिता जे कायदेशीर मार्गाचा अवलंब करतात ते सन्माननीय सदस्य प्रथम बोलतात. सहकारासंबंधीचे विधेयक दोन्ही सभागृहाच्या संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचे तीन प्रस्ताव आले होते. पहिला प्रस्ताव सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांचा होता म्हणून त्या प्रथम बोलल्या, दुसरा प्रस्ताव डॉ. नीलम गो-हे यांचा होता म्हणून त्या दुस-या बोलल्या. तिसरा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांचा होता. पण ते सभागृहामध्ये उपस्थित नव्हते. त्यांना विधेयकावर बोलण्याची संधी मिळाली असती पण ती राहिली.

...नंतर श्री.भोगले...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KTG/ पूर्वी श्री.शिगम... 14:05

श्री.दिवाकर रावते.....

ती संधी मिळाल्यानंतर त्यांनी रात्रंदिवस जो अभ्यास केला होता त्या माध्यमातून आम्हाला मार्गदर्शन लाभले असते. त्यांची ती संधी हुकली. ती मागाहून मिळावयास हवी होती. विधेयकावर आपल्याला बोलण्याची संधी मिळावी म्हणून जी वेगवेगळी आयुधे आहेत त्यांचा अवलंब केला तर बोलण्याची संधी मिळू शकते. माझ्या अनुभवानुसार आतापर्यंत या सदनामध्ये आलेल्या प्रत्येक शासकीय विधेयकाला अशा प्रकारच्या उपसूचना दिल्या जातात, त्याच्यामुळे बोलण्याची संधी मिळते. मी कोणाची संधी हिरावून घेतली असे जर कोणाला वाटत असेल तर ते अयोग्य आहे.

सभापती महोदय, या सदनामध्ये आम्ही येतो ते विधेयके मंजूर करण्यासाठीच येतो. या सदनामध्ये विधेयकांवर भरपूर चर्चा झाली पाहिजे. पहाटेपर्यंत सदनाचे कामकाज चालले तरी चालेल. पहाटेपर्यंत सभागृह विधेयकावर चर्चा करीत असते, सदस्य रात्री घरी जात नाहीत असा या सदनाचा लौकिक आहे असा संदेश बाहेर गेला पाहिजे.

सभापती महोदय, काल सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत सभागृहाचे कामकाज आटोपते घेण्याचा प्रयत्न होता. त्यावेळी मी हा विषय मांडला होता. तालिका सभापती आसनस्थ होते. मी उभे राहून त्यांना विनंती केली होती की, आज सकाळी 10.00 वाजता सभागृहाचे कामकाज सुरु झाले आहे. त्यामुळे उद्या सकाळी 10.00 वाजल्यापासून इतर कोणतेही कामकाज न घेता केवळ याच विधेयकावर सायंकाळपर्यंत चर्चा करावी. त्यावेळी माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील सभागृहात उपस्थित होते. हे विधेयक आज चर्चा होऊन मंजूर होऊ शकत नसल्यामुळे उद्या घेण्यात यावे अशी मी विनंती केली होती. सत्तारुढ पक्षाकडून अशा प्रकारचा आग्रह होता की, अधिवेशनाचे दोन दिवस शिल्लक राहिले आहेत, त्यामुळे हे विधेयक आजच मंजूर झाले पाहिजे, जेणेकरुन उद्या ते विधानसभेत मंजुरीसाठी मांडता येईल. हा आमचा दोष नाही. आम्ही आपल्यापुढे हाही प्रस्ताव मांडला होता की, अधिवेशनाचा कालावधी एक आठवडा वाढविण्यात यावा. या प्रस्तावाबाबत सरकारने विचार केला नाही. सत्ताधारी पक्षामुळेच सभागृहाचा वेळ वाया गेला आहे. तो वेळ त्यांनीच भरुन काढला पाहिजे.

सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये मी विनंती केली होती. यापूर्वी प्रा.बी.टी.देशमुख हे कामकाज सल्लागार समितीमध्ये सदस्य असायचे. त्यांच्याऐवजी श्री.जयंत प्र.पाटील यांना कामकाज सल्लागार समितीवर सदस्य म्हणून नामनियुक्त करावे अशी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

सूचना मांडली होती. त्याबाबत आजपर्यंत निर्णय का झाला नाही हे मला कळलेले नाही.

सभापती महोदय, मी आणखी एक आग्रह धरला होता की, प्रत्येक वेळेला खालच्या सभागृहात विधेयक मंजूर झाल्यानंतर ते या सभागृहात मंजुरीसाठी येते. खालच्या सभागृहाच्या कामकाजाच्या मूडवर आम्ही अवलंबून रहायचे आणि या सभागृहात विधेयके मंजुरीसाठी आल्यानंतर घाईघाईने ती मंजूर करायची असे होऊ नये म्हणून मी प्रस्ताव दिला होता की, 50 टक्के विधेयके विधानपरिषदेत मांडावीत आणि 50 टक्के विधेयके विधानसभेत मांडायची. म्हणजे विधानपरिषदेत पहिल्या आठवड्यापासून विधेयके चर्चेला येऊ शकतात. संसदीय कार्यमंत्री ऐकत नाहीत, याबद्दल चर्चा झाली. या संदर्भात सदनाच्या सदस्यांवर अन्याय होत असेल तर ती संपूर्ण जबाबदारी संसदीय कार्यमंत्र्यांची आहे.

सभापती महोदय, मी विधेयकावर किती तास बोललो यापेक्षा विधेयकावर भरपूर चर्चा झाली पाहिजे या मताचा मी आहे. प्रत्येकाच्या ज्ञानाचा एकमेकाला उपयोग होतो. जे मी मांडू शकलो नाही ते दुसरे माननीय सदस्य मांडतात. ॲड.आशिष शेलार यांनी घटनात्मक बाजू सभागृहात मांडली, त्याबद्दल मला अभिमान वाटतो.

नंतर 2के.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ......

सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी सहकार विधेयकाच्या संदर्भात घटनात्मक बाजू मांडलेली आहे. त्यांनी जी घटनात्मक बाजू मांडली तशी घटनात्मक बाजू आम्ही मांडू शकत नाही. या सदनामध्ये सर्व पैलूंचा अभ्यास होत असतो. त्यामुळे या पुढे कामकाज सल्लागार समितीच्या माध्यमातून विधेयकावर अन्याय होणार नाही याची काळजी घेतली जावी अशी आपल्याला विनंती करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या ठिकाणी जी माहिती दिली आहे ती वस्तुस्थिती आहे. मला एक गोष्ट आपल्या माध्यमातून सभागृहाच्या लक्षात आणून द्यावयाची आहे की, ज्यावेळेस दिवसाचे कामकाज आपल्या दालनात नक्की केले जाते त्यावेळेला गटनेते उपस्थित असतात. आपल्याला कल्पना असेल की, या अधिवेशनामध्ये मी आपल्या दालनात आलोच नाही. खरे म्हणजे गटनेत्यांच्या कामकाजामध्ये हस्तक्षेप करावयाचा नाही अशी माझी भूमिका असते. आमचे गटनेते आपल्याकडे येतात आणि उद्याच्या संपूर्ण दिवसाचा कार्यक्रम कसा असेल याची माहिती त्यांना असते. त्यामुळे उद्या सकाळी 10.00 वाजता कोणता विषय चर्चेला जाणार आहे याची माहिती आम्हाला देण्याचे काम गटनेत्यांचे असते. सकाळी 10.00 वाजता कोणता कार्यक्रम आहे याची माहिती मला नसेल आणि सकाळी 10.00 वाजता कामकाज पत्रिका हातामध्ये आल्यानंतर मला काय कामकाज होणार आहे हे कळणार असेल व मी जी सूचना केलेली असते त्यासंदर्भात सकाळी चर्चा आहे हे मला अगोदर समजत नसेल तर मी सकाळी सभागृहात कसा काय येऊ शकणार ?

आम्ही एखादी सूचना मांडतो आणि त्या सूचनेवर विचार व्यक्त करण्यासाठी मी उपस्थित राहणार नसेल तर ते योग्य नाही. मी एकदा सूचना मांडल्यानंतर त्या संदर्भात भाग घेतला नाही असे माझ्याकडून कधीही झाले नाही. त्यामुळे दुसऱ्या दिवशी कोणते कामकाज होणार आहे याची माहिती आपल्या सदस्यांना देण्याची जबाबदारी गटनेत्यांची आहे. आम्ही सूचना मांडतो आणि त्यासाठी हजर होत नाही असे होता कामा नये म्हणून गटनेत्यांनी कामकाजाची माहिती सदस्यांना देणे गरजेचे आहे.

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : विधिमंडळामध्ये जी विविध शासकीय बिले येतात व त्या अनुषंगाने जे कामकाज होते त्याला अनन्यसाधारण महत्व असते. या व्यतिरिक्त समाजामध्ये जे अनेक प्रश्न असतात त्यांना वाचा फोडण्यासाठी वेगवेगळया आयुधांच्या माध्यमातून सभागृहात प्रश्न उपस्थित केले जातात. तारांकित प्रश्न, लक्षवेधी सूचना किंवा इतर माध्यमांच्या अंतर्गत सभागृहात प्रश्न उपस्थित केले जात असतात. सहकार विभागाच्या विधेयकावर जवळ जवळ 12 तास चर्चा झालेली आहे. संसदीय कामकाज मंत्र्यांनी सहकार विधेयक विधान परिषदेमध्ये पहिल्यांदा आणले. अनेक विधेयके विधानसभेतून विधान परिषदेकडे येत असतात. काल सकाळी माझ्या दालनात माननीय विरोधी पक्ष नेते, सर्व गटनेते तसेच सभागृहाच्या नेत्यांबरोबर बैठक झाली होती. त्यामध्ये मी सांगितले होते की, आज सहकार विधेयकाला कितीही वेळ लागला तरी ते पूर्ण करायचेच आहे. सभागृहातील दैनंदिन कामकाज पत्रिका आपल्या हातामध्ये येते असते परंतु एखाद्या कामाचे प्राधान्यक्रम बदलावे लागले तर त्यासंदर्भातील चर्चा सभागृहाचे नेते, विरोधी पक्ष नेते तसेच गटनेत्यांबरोबरही केली जाते व त्यानुसारच बदल केला जात असतो. गटनेत्यांना सातत्याने कल्पना दिली जात असते की, सभागृहाच्या कामाकाजामध्ये जो प्राधान्यक्रम बदलला जातो त्याची माहिती आपापल्या पक्षाच्या सदस्यांना दिली जावी. खरे म्हणजे यासाठीच त्यासंदर्भात आखणी केली जात असते.

सभागृहाच्या कामकाजाच्या संदर्भात मी काल गटनेत्यांबरोबर चर्चा केली होती त्यावेळेला सहकार विधेयकाच्या संदर्भात माझ्या भावना व्यक्त केल्या होत्या.

यानंतर श्री. भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**....

सभापती म्हणून मी माझ्या भावना व्यक्त केल्या होत्या की, सहकाराचे बिल काहीही झाले तरी आज प्रयत्न करून मंजूर करावयाचे असून त्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे. त्यावेळी माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोदजी तावडे, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकरजी रावते यांनीही आपापली मते मांडली होती. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकरजी रावते यांनी मला सांगितले होते की, आज बिल मंजूर करण्याचा प्रयत्न करू या. परंतु,शक्य तो आपण उद्या पर्यंत यावर चचा घेतली तर ते मंजूर करणे सोपे होईल. हे बिल अत्यंत महत्त्वाचे होते. या सर्व संघर्षावर माननीय सभापती आपले मत देखील निश्चित करत असतात. शेवटी, उठताना ते आपले मत सर्व गट नेत्यांना सांगत असतात.

सभागृहामध्ये शासकीय विधेयकावर चर्चा करत असताना कोणत्याही सन्माननीय सदस्यांना मी 14 मिनिटे बोलावे असे वेळेचे बंधन घालू शकत नाही, याची जाण आपणा सर्वांना आहे तशी मला देखील आहे. सभागृहाचे कामकाज चालवत असताना बिलावर किती वेळ बोलावे, सन्माननीय सदस्यांना किती संधी मिळाली पाहिजे हे त्या त्या पक्षाच्या गट नेत्यांनी ठरवायचे असते. चर्चेवर बंधन आणण्यासाठी एक-दोन तरतुदी नियमामध्ये देखील आहेत. त्या अपवाद म्हणून आहेत. मी त्या निकोप तरतुदी आहेत असे म्हटलेले नाही. राज्यसभा व लोकसभेमध्ये नियमामध्ये तशी तरतूद आहे. पण विधी मंडळामध्ये तशा प्रकारच्या स्पष्ट तरतुदी नाहीत. आपल्याकडे फक्त एक-दोन तरतुदी आहेत. एखादे सन्माननीय सदस्य उठले आणि त्यांनी सांगितले की, सभागृहाचा वेळ मोठ्या प्रमाणावर वाया जात आहे, त्यासाठी काही तरी बंधन घातले पाहिजे.व सभापतींना ते योग्य वाटले तर त्यावर विचार करून बंधन घालता येऊ शकते.

एक चांगले विधेयक सभागृहापुढे मंजुरीसाठी आणले असेल व त्याच वेळी सभापतींनी हातामध्ये छडी घेतली आहे असे चित्र दिसणे देखील चुकीचे आहे. काल देखील ते आयुध मला वापरता आले असते. पण ते आयुध मी वापरले नाही. मी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकरजी रावते यांना विनंती केली होती. मी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील, सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम साहेबांना विनंती करत असतो. एवढेच नव्हे तर सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्यांना देखील विनंती करीत असतो. पण विधेयकाच्या चर्चेच्या वेळी चर्चा लवकर संपविण्यासाठी विनंती

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**....

करणे मला योग्य वाटत नाही. मी पुढच्या काळात देखील विधेयकावरील चर्चा किंवा भाषण लवकर संपविण्यासाठी विनंती करणार नाही. माझी सन्माननीय सभासदांना एवढीच विनंती आहे की, सहकाराचे बिल अत्यंत महत्त्वाचे होते. सर्व राजकीय पक्षांना अचूक वेळ वाटून दिला व त्या वेळत आपणा सर्वांना चर्चा करता आली तर ते सर्वाना सोयीचे होईल. विधान मंडळामध्ये बिलावर चर्चा होते तेव्हा शक्य तो आपण वेळेचे बंधन घालत नाही. काल संध्याकाळी अचानक निर्णय घेतल्यामुळे काही सन्माननीय सदस्यांना सदनामध्ये विधेयकावरील चर्चेला उपस्थित राहता आले नाही. गेल्या 2 वर्षापासून आपण एसएमएसद्वारे, बेवसाईटद्वारे सन्माननीय सदस्यांना माहिती पुरवित आहोत. त्याद्वारे सभागृहाचे कामकाज कधी सुरू होणार व कोणते कामकाज घेण्यात येणार आहे हे लक्षात येते.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, आम्हाला एसएमएस येत नाही.

**सभापती** : आपणास एसएमएस येत नसतील तर ती बाब मी तपासून घेतो. एमएमएस येत नसतील अशी सन्माननीय सदस्यांची तक्रार असेल तर....

(दोन्ही बाजूकडील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या नीलम गोऱ्हे ग्रेट आहेत. मला एसएमएस करता येत नाही.

.....

यानंतर श्रीमती रणदिवे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : मला असे वाटते की, आपण आता ही चर्चा थांबवावी. सदनातील सन्माननीय सदस्यांना सभागृहाच्या कामकाजाची अचूक माहिती मिळण्याकरता जे काही मार्ग आहेत, ते सर्व आमच्या विधी मंडळाच्या मार्फत आपल्यापर्यंत पोहोचतील.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, धन्यवाद. केवळ विधेयकांच्या बाबतीतच नाही. पण अनेक तक्रारी असतात. उद्या आमचा कोणता प्रश्न चर्चेसाठी सदनामध्ये येणार आहे ते आदल्या दिवशी समजले तर ते चांगले होईल. जसे प्रश्नावलीच्या बाबतीत समजते. पण नियम 93 च्या सूचना आणि लक्षवेधी सूचना यांच्या बाबतीत समजत नाही. ते दुसऱ्या दिवशी आल्यानंतर समजते. जर यासंबंधातील माहिती सन्माननीय सदस्यांना आदल्या दिवशी दिली तर मग सन्माननीय सदस्यांना त्यादृष्टीने आखणी करणे सोपे जाईल आणि याविषयी एक दिवस अगोदर कळविण्यामध्ये काही अडचण नाही.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सर्वसाधारणपणे प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर नियम 93 अन्वयेच्या सूचना लगेच घेतल्या जातात आणि सन्माननीय सदस्यांकडे कामकाज पत्रिका देण्यात आलेली आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, होय. दुसऱ्या दिवशी लक्षवेधी सूचना कोणत्या आहेत याची माहिती त्या दिवशी कळते आणि आदल्या दिवशी प्रश्नावली देतो,

**सभापती** : आपल्या कार्यक्रम पत्रिकेवर नियम 93 च्या सूचनांचा विषय आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, होय. त्यासंबंधातील माहिती आदल्या दिवशी मिळाली तर माननीय मंत्री महोदय अणि सदस्यांच्या दृष्टीने ते सोपे होईल. सदरहू माहिती एक दिवस अगोदर कळविण्यात यावी.

**सभापती** : ठीक आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मला असे सांगावयाचे आहे की, आपण ही बाब गट नेत्यांच्या बैठकीमध्ये ठरवावी.

**सभापती** : मला असे वाटते की, आता ही चर्चा थांबविण्यात यावी.

----

2 एम-2

असुधारीत प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : आज माझ्याकडे 289 अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. सर्वश्री.दिवाकर रावते, रामदास कदम, डॉ.नीलम गोऱ्हे, दीपक सावंत, ॲड.अनिल परब, विनायक राऊत इ.सन्माननीय सदस्यांनी प्रस्ताव दिलेला आहे.

"भूगर्भातील पाण्याची पातळी वाढवून पिण्याच्या पाण्याची कायम स्वरुपी व्यवस्था करणे, जमिनीची धूप थांबवून सिंचनाची सोय करणे" बाबत नियम 289 अन्वये प्रस्ताव आहे आणि तो प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी दिलेला आहे आणि तो कसा योग्य आहे ते त्यांनी मला दोन मिनिटांमध्ये सांगावे.

श्री.दिवाकर रावते (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, आपण दुष्काळाच्या संबंधात सदनामध्ये चर्चा करतो. मराठवाड्यामध्ये सर्वात तीव्र दुष्काळ आहे हे सदनातील चर्चेतून स्पष्ट झाले आहे. पण याचा अर्थ इतर भागांमध्ये दुष्काळ कमी आहे असे मला म्हणावयाचे नाही. याठिकाणी प्रत्येक वेळी अशा प्रकारचे भाष्य केले जाते की, मराठवाड्याला दुजाभाव दिला जात आहे आणि पश्चिम महाराष्ट्रामध्ये सगळा निधी वळविला जातो. काल माननीय श्री.पांडुरंग फुंडकर यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाबाबत सुध्दा अशीच चर्चा झाली. आपण तो अतारांकित प्रश्न असला पाहिजे असे सांगितले. मी 14 एप्रिल रोजी महाराष्ट्र टाईम्स् मध्ये जाहीरात पाहिली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन करुन शासनाने जाहीरात दिली आहे. "साखळी पध्दतीचे सिमेंट नाला आणि बांध बांधून दुष्काळावर कायम स्वरुपी उपाययोजना करण्याचा शासनाचा महत्वाकांक्षी कार्यक्रम" ते वाचून मला बरे वाटले की, शासनाने वेळीच जागे होऊन त्यादृष्टीने काम करण्यास सुरुवात केली आहे. त्या जाहिरातीमध्ये देण्यात आलेले सर्वच्या सर्व तालुके हे पश्चिम महाराष्ट्रातील आहेत आणि पहिला टप्पा फक्त पश्चिम महाराष्ट्रामध्ये राबविला जात आहे अशा प्रकारची भूमिका जाहिरातीच्या माध्यमातून माझ्यापुढे आली. याबाबतीत सांगावयाचे तर मराठवाड्यामध्ये तीव्र दुष्काळ असताना .....

श्री.जयंत प्र.पाटील (खाली बसून) : ही जाहिरात कोणाची आहे ?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, ही जाहिरात महाराष्ट्र शासनाची आहे. त्यामुळे मराठवाड्याच्या बाबतीत दुजाभाव केला जातो काय हे मला जाणुन घेण्याची प्रामाणिक इच्छा आहे. शासनाने या दुष्काळाच्या परिस्थितीमध्ये जर जाहिरात करुन अमुक तालुक्यामध्ये पहिला टप्पा म्हणून धडक कार्यक्रम घेतला असेल तर ते मराठवाड्याला कधी न्याय मिळणार आहे हे जाणून ...

. . . .2 एम-3



असुधारीत प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

घेण्याची इच्छा असल्यामुळे, याबाबत अडीच तासाची नाही पण किमान सदनाचे कामकाज थांबवून याबाबत तातडीने चर्चा करण्यात यावी अशी माझी आग्रहाची भूमिका आहे. जेव्हा या विषयाबाबत चर्चा होईल तेव्हा आम्ही आमची भूमिका मांडण्याचा प्रयत्न करु. परंतु याबाबत शासनाने उत्तर दिले पाहिजे. अन्यथा आम्हाला मराठवाडा कोरडा ठेवण्याचे शासनाचे धोरण आहे काय अशा प्रकारचा आम्हाला येथे आक्रोश करावा लागेल. त्यामुळे या विषयाच्या संबंधात चर्चा होणे आवश्यक आहे अशी आमची आग्रही भूमिका आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी नियम 289 च्या प्रस्तावाबाबत कामकाजाच्या दृष्टीने पाहिले तर आजच्या कामकाज पत्रिकेवर अशा प्रकारचा कोणताही विषय नाही. मात्र हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. तत्पूर्वी नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावरील माननीय मंत्री महोदयांचे उत्तर संपल्यानंतर, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी उपस्थित केलेला विषय देखील अत्यंत महत्वाचा असल्याने त्या अनुषंगाने चर्चा करण्यासाठी मी माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरासह 45 मिनिटांचा वेळ देणार आहे आणि सदरहू वेळेमध्ये सन्माननीय सदस्यांनी जरुर चर्चा करावी.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी** : बीड जिल्ह्यामध्ये रहात्या घरामध्ये शौचालयाची
सुविधा उपलब्ध करणे.

**मु.शी.**: बीड जिल्ह्यामध्ये रहात्या घरामध्ये शौचालयाची
सुविधा उपलब्ध करणे याबाबत श्री.धनंजय मुंडे
वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.धनंजय मुंडे (विधानसभेव्दारा निवार्चित) : सभापती महोदय, मी आपल्या परवानगीने सार्वजनिक खालील महत्वाच्या बाबीवर सदनामध्ये विशेष उल्लेख उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, बीड जिल्ह्यामध्ये रहात्या घरामध्ये शौचालयाची सुविधा असल्याचे सर्वात कमी प्रमाण असून 22.9 टक्के असल्याचे 2012-2013 च्या आथिर्क पहाणी अहवालातून समोर येते. महाराष्ट्रामध्ये एका आजूला संपूर्ण शहरे, गावे 100 टक्के हागणदारी मुक्त होत असताना, बीड जिल्हा मात्र सर्वांत पिछाडीवर असल्याने याबाबतीत विरोधाभासाचे चित्र निर्माण झालेले आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यामध्ये घर तेथे शौचालय अशी विशेष मोहीम हाती घेण्याची आवश्यकता आणि याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. धन्यवाद.

-----

**पृ.शी.** : उल्हासनगर शहरातील अवैध बांधकामे नियमित करण्यासाठी अधिनियम मंजूर करुनही अंमलबजावणी न होणे.

**मु.शी.** : उल्हासनगर शहरातील अवैध बांधकामे नियमित करण्यासाठी अधिनियम मंजूर करुनही अंमलबजावणी न होणे याबाबत श्री.रामनाथ मोते, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी )** : सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती सूचना मांडावी.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

उल्हासनगर शहरातील अवैध बांधकामे नियमित करण्यासाठी 2006 मध्ये अधिनियम मंजूर करुनही त्यांची अंमलबजावणी न होणे, मा.प्रधान सचिव तसेच शासनाने वेगवेगळ्या आदेशान्वये मोडकळीस आलेल्या इमारतीचे पुर्नबांधकाम करताना 4 पर्यंतचा बांधकामासाठी वापरलेला चटईक्षेत्र निर्देशांक वापरण्याचे निर्देश देणे, तथापि त्याची अंमलबजावणी न होणे, मोडकळीस आलेल्या इमारती कोसळल्याने व या इमारतींच्या पुर्नबांधकामासाठी किमान 4 चा चटईक्षेत्र निर्देशांक मिळत नसल्याने शेकडो कुटुंब आज घरापासून वंचित असणे, उल्हासनगर शहरात 100 पेक्षा अधिक इमारती मोडकळीस आलेल्या असून कोणत्याही क्षणी कोसळण्याची भीती निर्माण होणे, अनेक वेळा

असुधारीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आदरणीय मुख्यमंत्री महोदय, लोकप्रतिनिधी व नगरविकास विभागाचे अधिकारी यांच्याबरोबर चर्चा होउुनही नागरिकांना दिलासा न मिळणे, या गंभीर व सार्वजनिक महत्वाच्या विषयाकडे शासनाने लक्ष घालावे व कार्यवाही करावी अशी मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून विनंती करीत आहे. धन्यवाद.

----

. . . .2 एम-3



**पृ.शी.** : राज्यातील सर्व शिक्षकांची सेवा नियमित करणे

**मु.शी.**: राज्यातील सर्व शिक्षकांची सेवा नियमित करण्याबाबत श्री.भगवान साळुंखे,वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.भगवान साळुंखे यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाच्या संबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, मी एका महत्वाच्या विषयाकडे सर्वांचे लक्ष वेधत आहे. दिनांक 3 ते 5 ऑक्टोबर 2011 मध्ये राज्य शासनाने व्यापक प्रमाणावर शाळांची पटपडताळणी केली. त्यामध्ये 50 टक्क्यापेक्षा जास्त गैरहजेरी असलेल्या सुमारे 2600 शाळा आढळून आल्या. या 2600 शाळांची मान्यता करण्याची प्रक्रिया गेल्या आठ ते दहा दिवसापासून सुरु आहे. या 2600 शाळांमध्ये काम करीत असलेले शिक्षक व शिक्षकेतर कमर्चाऱ्यांची संख्या जवळजवळ 40 हजाराच्या घरात आहे आणि त्यांना सेवा मुक्तीच्या नोटीसेस देखील देण्यात आल्या आहेत. त्याचबरोबर संस्था चालक व मुख्याध्यापक यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्याच्या बाबतीत प्रक्रिया सुरु आहे. आदरणीय आमदार श्री.गाणार सरांनी नागपूर येथील अधिवेशनाच्या वेळी आंदोलन केले आणि बेमुदत उपोषणही केले. त्यावेळी माननीय शिक्षण मंत्री श्री.राजेंद्र दर्डासाहेब यांनी याबाबत बोलणी करण्याचे मान्य केले. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.नागो गाणार यांनी आपले आंदोलन सोडले. पण अजूनही या विषयाच्या बाबतीत बोलणी झालेली नाहीत. याकडे शासनाने पूर्णपणे पाठ फिरविली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यामुळे 40 हजार शिक्षक मोठ्या प्रमाणात रस्त्यावर उतरत आहेत. येत्या 1 मे रोजी सोलापूरला सामुदायिक आत्मदहनाचा इशारा देखील देण्यात आलेला आहे. तसेच उद्यापासून नागपूर येथे अन्न त्यागाचा कार्यक्रमही सुरु होणार आहे. अशा या गंभीर प्रश्नाकडे सदरहू विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी शासनाचे लक्ष वेधत आहे. शासनाने या सर्व शाळांना आपली गुणवत्ता वाढविण्यासाठी 1-2 वर्षाची संधी देणे आणि या सर्व शिक्षकांची सेवा सुरक्षित करण्याची नितांत आवश्यकता आहे एवढेच मला सांगावयाचे आहे.

------

2 एम-4



**पृ.शी.** : मुंबईतील अंधेरी येथील आर.टी.ओ.कार्यालयाची झालेली दुरावस्था

**मु.शी.** : मुंबईतील अंधेरी येथील आर.टी.ओ.कार्यालयाची झालेली दुरावस्था याबाबत श्री.रमेश शेंडगे वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील मी सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर विशेष उल्लेखाची सूचना मांडत आहे.

मुंबईतील अंधेरी येथील आर.टी.ओ.कार्यालयाकडून जवळपास वर्षाला 300 कोटी रुपयांचे उत्पन्न महाराष्ट्र शासनाच्या तिजोरीमध्ये जमा होत असते. पण सदर कार्यालयाचे कामकाज हे जुन्या आणि अडगळीच्या बॅरॅक्समध्ये चालणे. सदर बॅरॅक्स कार्यालयात कधी लाईट नसतो तर कधी पाणी नसते. अशा या जुन्या-पुराण्या कार्यालयात घाणीचे साम्राज्य आहे. तथापि 2006 मध्ये सदर कार्यालयासाठी सुरु करण्यात आलेल्या इमारतीचे केवळ 3 मजल्याचे बांधकाम करण्यात आले. मात्र ते देखील अपूर्ण अवस्थेमध्ये असणे. तेथे लाईट व पाणी याच्या सुविधा नसणे. परिणामी तेथील कर्मचाऱ्यांना सोयी-सुविधांच्या अभावी तेथील अडगळीमध्येच काम करावे लागणे आणि त्यामुळे नागरिकांची गैरसोय होणे. याबाबत सदर कार्यालयासाठी सुरु करण्यात आलेल्या इमारतीचे काम पूर्ण करुन नवीन कार्यालय सुरु करण्याबाबत होत असलेली मागणी आणि त्याकडे शासनाचे होत

असुधारीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असलेले दुर्लक्ष व याबाबतच्या करावयाच्या कार्यवाहीसाठी मी या विशेष उल्लेखाव्दारे सूचना देत आहे.

-----

एम-5

16-4-2013 (असुधारीत प्रत/प्रसिध्दीसाठी नाही) 2 एम-5

APR पूर्वी श्री.भारवि . . . . 2.20

**पृ.शी.** : राज्यातील वृत्तपत्र विक्रेत्यांना असंघटित कामगारांचा दर्जा देणे.

**मु.शी.**: राज्यातील वृत्तपत्र विक्रेत्यांना असंघटित कामगारांचा दर्जा देणे याबाबत श्री.जयवंतराव जाधव, यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** (श्री.मोहन जोशी) : सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी विशेष उल्लेखा संबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"राज्यातील वृत्तपत्र विक्रेते उुन, वारा, पाउुस तसेच वैयक्तिक किंवा नैसर्गिक समस्यांचा विचार करता अव्याहतपणे जनतेच्या घरी वृत्तपत्र पोहोचविण्याचे काम करत असतात. त्यांना कोणत्याही किमानही किमान मुलभूत सेवा उपलब्ध होत नसल्याने प्रतिकूल परिस्थितीमध्ये सुध्दा ते आपले काम अखंडपणे करत असतात."

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

असुधारीत प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या चर्चेसाठी किमान दीड तास तरी द्यावा कारण त्या प्रस्तावाच्या सूचनेमध्ये विदर्भाचा देखील उल्लेख आलेला आहे.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, अधिवेशनाचे शेवटचे तीन दिवस शिल्लक आहेत आणि आपल्याकडे इतके विषय आहेत की आपण त्यांना न्याय देऊ शकलो नाही. हा विषय महत्वाचा असल्यामुळे मी त्यासाठी 45 मिनिटे दिलेली आहेत. त्या वेळेतच आपणास ही चर्चा पूर्ण करायची आहे.

हा विषय निकषामध्ये कसा बसू शकतो एवढया मर्यादे पर्यंतच ही बाब आहे. मी एखाद्या विषयावर पूर्ण चर्चा दिली तर ती 2 तास 30 मिनिटांची असते आणि जर छोटी चर्चा झाली तर ती आपण एक तासाची घेतो.

-------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: अर्धातास चर्चेच्यावेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे

प्रा.फौजिया खान ( सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "सार्वजनिक आरोग्य खात्यामार्फत औषधांची परराज्यातून करण्यात आलेली खरेदी" या विषयावरील डॉ.दीपक सावंत, वि.प.स.यांनी सन 2008 च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात उपस्थित केलेल्या अर्धातास चर्चेच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती पटलावर ठेवते.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : सोबत येथे अधिकची माहिती छापावी. )

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे

प्रा.फौजिया खान (सामान्य प्रशासन विभाग राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचा सन 2011-2012 या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

-----

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स महामंडळ मर्यादित यांचा सन 2011-2012 या वर्षाचा चौतिसावा वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

------

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र पेट्रोकेमिकल्स महामंडळ मर्यादित यांचा सन 2010-2011 या वर्षाचा तिसावा वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

-----

प्रा.फौजिया खान : मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र सिंचन विकास महामंडळ मर्यादित पुणे यांचा सन 2010-2011 या वर्षाचा वार्षिक अहवाल व परिसमापकांचा अंतिम अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**सभापती** : वार्षिक अहवाल व परिसमापकांचा अंतिम अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

-------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र भूविकास महामंडळ मर्यादित यांचा सन 2008-2009, 2009-2010 व 2010-2011 या वर्षांचे वार्षिक अहवाल व ताळेबंद नफा तोटा पत्रक सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहेत.

------

श्री.डी.पी.सावंत (उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ यांचे सन 2010-2011 या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक लेखे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

----

प्रा.फौजिया खान (महिला व बालविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य महिला आयोगाचा सन 2009-2010 या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

-----

यानंतर श्री.बोर्डे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ KTG/ पूर्वी श्री.अजित.... 14:30

**पृ.शी./मु.शी.**: अंदाज समितीचे अहवाल सादर करणे

श्री.अनिल भोसले (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अंदाज समितीचा एकोणतिसावा व तिसावा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**सभापती** : अंदाज समितीचे अहवाल सभागृहाला सादर झाले आहेत.

----------

**पृ.शी./मु.शी.**: विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचे अहवाल सादर करणे

श्री.राम पंडागळे (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा पाचवा व सहावा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**सभापती** : विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचे अहवाल सभागृहाला सादर झाले आहेत.

----------

**पृ.शी./मु.शी.**: पंचायत राज समितीचे अहवाल सादर करणे

श्री.रामनाथ मोते (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पंचायती राज समितीचा तेरावा व चौदावा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**सभापती** : पंचायती राज समितीचे अहवाल सभागृहाला सादर झाले आहेत.

----------

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: विधानपरिषद आश्वासन समितीचे अहवाल सादर करणे

श्री.मोहन जोशी (समिती प्रमुख) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने आश्वासन समितीचा एकशे बाहत्तर, एकशे त्र्याहत्तर, एकशे चौऱ्याहत्तर, एकशे पंचाहत्तर, एकशे शाहत्तर व एकशे सत्त्याहत्तरावा अहवाल सभागृहाला सादर करतो.

सभापती महोदय, विधानपरिषद आश्वासन समितीचा सन 2010 च्या पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या सत्रातील आश्वासनांबाबतचा अनुक्रमे 172, 173 व 174 वा कार्यवाहीदर्शक अहवाल आणि सन 2011 च्या पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या सत्रातील आश्वासनांबाबतचा अनुक्रमे 175, 176 व 177 वा कार्यवाहीदर्शक अहवाल असे एकूण 6 अहवाल आपल्या अनुमतीने मी सभागृहास सादर करीत आहे.

आश्वासन समितीचा समिती प्रमुख म्हणून मला या ठिकाणी नमूद करण्यास आनंद वाटतो की, आश्वासन समितीच्या मागील 10-12 वर्षांतील प्रलंबित आश्वासनांचा पाठपुरावा करुन आश्वासनांचा मागील अनुशेष भरुन काढण्यात आमच्या समितीला यश आले आहे. आश्वासनांची मागील प्रलंबित विवरणपत्रे विभागनिहाय करुन त्या त्या विभागाच्या प्रधान सचिव/सचिवांना प्रलंबित आश्वासनांची विवरणपत्रे उपलब्ध करुन व त्याबाबत केलेल्या कार्यवाहीबाबतच्या माहितीसह समितीपुढे समक्ष बोलावून आश्वासनांवरील कार्यवाहीच्या विलंबाबाबतची कारणमिमांसा समितीने जाणून घेण्याची पध्दत नव्यानेच सुरु करण्यात आली असून त्यामुळे मागील प्रलंबित आश्वासनांचा निपटारा झपाट्याने करण्यास तसेच आश्वासनांचे महत्त्व ओळखून त्यांचा वेळेत निपटारा करणे आवश्यक असल्याची बाब मंत्रालयीन स्तरावरील अधिकाऱ्यांना पटवून देण्यात आमच्या समितीला यश आले आहे. यामुळे प्रलंबित आश्वासनांचा पाठपुरावा तर झालाच तथा मंत्रालयीन विभागांच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये सभागृहातील आश्वासनांबाबत अधिक जागृती निर्माण झाली. तसेच, सभागृहात शासनाकडून देण्यात आलेली आश्वासने जनतेच्या प्रश्नांशी निगडित असल्याने त्यांना वेळीच न्याय देणे कसे आवश्यक आहे, याची विभागांना जाणीव झाली.

सभागृहात सांगण्यास मला आणखी आनंद वाटतो की, शासकीय कामकाज पेपरलेस करण्याच्या शासनाच्या धोरणास अनुलक्षून माहिती व तंत्रज्ञानातील आधुनिक पध्दतीचा वापर

..3..



SJB/ KTG/ पूर्वी श्री.अजित.... 14:30

श्री.मोहन जोशी....

करण्याचा निर्णय समितीने पहिल्यांदा घेतला असून त्या नुसार सहाही अहवाल सी.डी.च्या स्वरुपात मी सभागृहास सादर केले आहेत. विधानपरिषदेच्या समित्यांचे अहवाल सी.डी.च्या स्वरुपात सभागृहात सादर करण्याची ही पहिलीच वेळ आहे. अशा प्रकारे अहवाल सी.डी.च्या स्वरुपात सदस्यांना वितरित करण्यात आले तरी ज्या सदस्यांना पुस्तक रुपाने अहवालाची आवश्यकता भासेल त्यांना हार्ड कॉपीज विधानपरिषद आश्वासन समिती कक्षात तसेच, ग्रंथालयात उपलब्ध करुन ठेवण्यात आल्या आहेत.

समितीच्या एकूण कामकाजात समितीवरील माझ्या सहकारी सदस्यांनी बैठकींना उपस्थित राहून व कामकाजात अभ्यासपूर्ण योगदान देऊन समितीच्या कामकाजाला न्याय दिल्यानेच प्रलंबित आश्वासनांचा निपटारा करणे समितीला शक्य झाले. तसेच, शासनाचे मुख्य सचिव, अप्पर मुख्य सचिव, प्रधान सचिव व सचिव स्तरावरील अधिकाऱ्यांनी तसेच, या समितीशी संबंधित विधानमंडळ सचिवालयातील विशेष कार्य अधिकारी व अवर सचिव स्तरावरील अधिकाऱ्यांनी समितीने केलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करुन आणि समितीच्या हाकेला प्रतिसाद देऊन तथा स्वत: लक्ष घालून प्रलंबित आश्वासनांचा झपाट्याने निपटारा करण्यास समितीला प्रत्यक्ष सहभागाने सहकार्य दिले त्याचा उल्लेख करणे मला आवश्यक वाटते. अशा प्रकारे प्रशासन व कार्यकारी संस्थेच्या सहकार्यातून खऱ्या अर्थाने लोकाभिमुख शासन प्रणाली नांदू शकेल असा मला विश्वास आहे.

धन्यवाद.

**सभापती** : आश्वासन समितीचे अहवाल सभागृहाला सादर झाले आहेत.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, विधान परिषद आश्वासन समितीच्या समिती प्रमुखांनी पध्दतीप्रमाणे समितीचे अहवाल सभागृहासमोर ठेवले आहेत हे बरोबर आहे पण आपण जी पेपरलेस पध्दत अवलंबित आहोत किंवा जी सी.डी. वगैरे देत आहोत यामध्ये महत्वाचे प्रयत्न किंवा महत्वाची भूमिका जर कोणाची असेल तर ती विधान परिषदेचे माननीय सभापती आणि विधानसभेच्या माननीय अध्यक्ष यांची आहे. मी अनेक वर्षे समितीमध्ये काम केले असल्यामुळे समितीच्या अहवालामध्ये समिती सदस्यांची नावे येणार हे मला माहीत आहे. परंतु मला असे वाटते की, ही पहिली घटना आहे त्यामुळे यामध्ये विशेषकरुन माननीय सभापती, माननीय अध्यक्ष, माननीय उप सभापती, माननीय उपाध्यक्ष यांचे नाव आले तर ऐतिहासिकदृष्ट्या त्याची नोंद राहील. तशा प्रकारची सुधारणा जर त्यामध्ये करता आली तर खूप चांगले होईल असे मला वाटते.

**सभापती** : संबंधित समिती प्रमुख यांनी याची नोंद घ्यावी.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : माझ्याकडे दिनांक 8 एप्रिल, 2013, 9 एप्रिल, 2013 आणि 10 एप्रिल, 2013 रोजी नियम 93 अन्वये ज्या सूचना प्राप्त झाल्या होत्या त्या संदर्भातील माझे निर्णय सहसचिव वाचून दाखवतील.

सह सचिव : **दिनांक 8 एप्रिल, 2013 रोजीच्या सूचना :-**

सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी "राज्यातील महापालिकांनी व नगरपालिकांनी बी.पी.एड. किंवा बी.एड. (शारीरिक शिक्षण) यांच्या प्रवेश नियमावलीत शिक्षक या पदावरील शाळेत शिकविण्याचा अध्यापन अनुभव सात वर्षे व क्रीडा पर्यवेक्षक पदाचा अनुभव पाच वर्षे न केल्यामुळे राज्यातील शिक्षक व क्रीडा अधिकारी वर्ग-2 या पदापासून वंचित राहणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार, सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, विजय गिरकर यांनी " दिनांक 4 जानेवारी, 2008 ते 18 डिसेंबर, 2009 या कालावधीत कार्यरत असलेल्या मुंबईच्या नगरपाल डॉ. इंदू सहानी यांची मुदत संपल्यानंतरही पदाच्या अधिकाराचा व सवलतीचा वापर करीत असल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी "चिखली बेराळ ते जालना कन्हैय्यानगर या रस्त्याच्या चौपदरीकरणाचे बंद पडलेले काम लवकरात लवकर पूर्ण करण्याची होत असलेली मागणी " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/

सह सचिव .....

**दिनांक 9 एप्रिल, 2013 रोजीच्या सूचना :-**

सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी " जिल्हा परिषद, बुलढाणाच्या जलस्वराज्य योजनेअंतर्गत मन प्रकल्पाच्या बाजूला असलेल्या पिंप्री धनगर गावासाठी मंजूर करण्यात आलेल्या पाणीपुरवठा योजनेमध्ये झालेला भ्रष्टाचार " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, भगवान साळुंखे यांनी "शिक्षक सेवक योजने अंतर्गत तीन वर्षाच्या मानधनावरील सेवेनंतर नियमित वेतनश्रेणी अनुज्ञेय असूनही मागासवर्गीय शिक्षण सेवकांना मात्र केवळ अप्रशिक्षित आहे या कारणास्तव वेतनश्रेणीपासून वंचित ठेवणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी "चेंबूर (मुंबई) घाटले परिसरातील आनंदनगर येथील संजीवनी हाऊसिंग सोसायटीच्या सात मजली इमारतीखालील जुनी पाईपलाईन दिनांक 8 एप्रिल, 2013 रोजी अचानक फुटल्याने एका वृध्दाचा जागीच मृत्यू होऊन अन्य 12 जखमी होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य ॲड. अनिल परब यांनी "मुंबई उपनगरात रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चरने प्रस्तावित करण्यात आलेल्या वीज वहन आकार आणि क्रॉस सबसिडी या दोन्ही शुल्कात भरमसाठ वाढ केल्याने सर्वसामान्य ग्राहकांमध्ये पसरलेला असंतोष" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/

सह सचिव ....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. किशनचंद तनवाणी यांनी "औरंगाबाद येथील घाटी रुग्णालयातील 80 टक्के डॉक्टर खाजगी प्रॅक्टीसव्दारे पैसे कमवत असल्याचे निदर्शनास येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार, सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, भाई गिरकर यांनी "मौजे पोईसूर एमजी क्रॉस रोड नं.1 कादिवली येथील ज्योती पार्क को-ऑप.हाऊसिंग सोसायटीचे बहुतांश बांधकाम अनधिकृत असल्याची महानगरपालिकेने नोटीस देणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवान साळुंखे यांनी "राज्यातील किल्ल्यांच्या ठिकाणी गड किल्ले संवर्धन प्राधिकरणाची स्थापना करुन स्थानिक कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत कायमस्वरुपी करण्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी "राज्यात आदिवासी भागातील कुपोषित बालकांचे संगोपन योग्य रीतीने होण्यासाठी आदिवासींसाठी पाळणाघर (डे केअर) आखणार असल्याचा निर्णय घेतला असून ही योजना तातडीने सुरु करण्याची आवश्यकता" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री रामनाथ मोते, चंद्रकांत पाटील यांनी "अन्न व नागरी पुरवठा तसेच ग्राहक संरक्षण विभागाने संपूर्ण राज्यभरात स्वयंसेवी संस्थेमार्फत ग्राहक जनजागृती योजनेची अंमलबजावणी होत नसल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/

सह सचिव .....

**दिनांक 10 एप्रिल, 2013 रोजीच्या सूचना :-**

सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी "ग्रूपग्रामपंचायत खानाव (ता. अलिबाग, जि.रायगड) येथील खानाव तलाव ते चामुंडादेवी मंदिरापर्यंत पाण्याची पाईपलाईन टाकल्याचे दाखवून खानाव ग्रामपंचायत सरपंच यांनी बोगस बिल काढून केलेला गैरकारभार " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, भगवान साळुंखे यांनी "सहसंचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय, बांद्रा व जिल्हा व्यवसाय शिक्षण अधिकारी ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग यांनी शासनाने मान्य केलेल्या वेतनश्रेणीत वेतन निश्चिती न करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार, सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, भाई गिरकर यांनी "राज्यामध्ये हजारो महिलांना रोजगार उपलब्ध करुन देण्याचे धोरण अंमलात असताना इतर महिला संस्थांचे प्रस्ताव रद्द ठरवून त्यांच्यावर होत असलेला अन्याय" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "मुंबईतील धारावी पुनर्वसन प्रकल्पाला विरोध म्हणून धारावी पुनर्विकास समितीची घटक संघटना असलेल्या धारावी बचत समितीने दिनांक 9 एप्रिल, 2013 रोजी पुकारलेला बंद" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

----

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचे मुद्दे

**सभापती** : आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

श्री.प्रवीण पोटे-पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

श्री साईबाबा विश्वस्त व्यवस्था, शिर्डी अधिनियम, 2004 अंतर्गत श्री साईबाबा विश्वस्त व्यवस्था संस्थान (व्यवस्थापन समितीच्या सदस्यांची नियुक्ती व प्रतिज्ञा पत्राचे नमुने) नियम 2013 शासनाने 24 जानेवारी, 2013 रोजी अधिसूचित करुन विधिमंडळाच्या पटलावर ठेवणे, हे नियम श्री साईबाबा विश्वस्त व्यवस्था संस्थान, शिर्डी येथे व्यवस्थापन समितीच्या सदस्यांच्या अर्हतेबाबत असणे, हे नियम शासनाने मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या निर्देशामुळे नियम अधिसूचित करणे, यापूर्वी नियम नसताना व्यवस्थापन समितीची केलेली नेमणूक मा.उच्च न्यायालयाने रद्द करणे, या नियमाबाबत समाजाच्या विविध घटकांची व्यापक चर्चा न करता केवळ अधिकारी स्तरावर नियम तयार होणे, शिर्डी संस्थानचे उत्पन्न सुमारे 500 कोटी रुपये असणे व अडीच ते तीन कोटी भक्त दर्शन घेतात असे असताना शासनाने केवळ सत्ताधारी पक्षामधील निवडणुकीमध्ये पराभूत उमेदवारांचे पुनर्वसन करण्यासाठी संस्थानचे नियम तयार करणे, नियमामध्ये लोकप्रतिनिधी व पत्रकारांच्या समितीवरील नेमणुकीची तरतूद नसणे यास्तव विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या सदस्यांना विश्वासात न घेता शासनाने नियम तयार करणे याबाबत मी हा विषय औचित्याच्या मुद्याद्वारे सभागृहापुढे मांडत आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.प्रवीण पोटे-पाटील यांनी आता जो औचित्याचा मुद्दा मांडलेला आहे त्याबाबत मंत्री महोदयांनी स्वत: लक्ष घालावे.

श्री.संजय देवतळे : सभापती महोदय, होय.

-----

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी )**



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, विधानसभा व विधानपरिषदेच्या सन्माननीय सदस्यांचे जास्त वास्तव्य मुंबईत असते. अर्थसंकल्पीय अधिवेशन, पावसाळी अधिवेशन, विधान भवन, मुंबई येथे घेण्यात येते. त्या अधिवेशनासाठी सन्माननीय सदस्यांना मुंबईतच थांबावे लागते. विधिमंडळाच्या विविध समित्या आहेत या समित्यांच्या बैठका नि:सत्र कालावधीत मंगळवार, बुधवार व गुरुवार या दिवशी विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात येतात. त्या बैठकांना उपस्थित राहण्यासाठी सुध्दा सन्माननीय सदस्यांना मुंबईत थांबावे लागते. म्हणजेच सन्माननीय सदस्यांचा जास्तीत जास्त कालावधी मुंबईत जातो. मुंबईत शासकीय जागेवर बरेच जिमखाना व क्लब उभारण्यात आले आहेत त्या जिमखाना व क्लबमध्ये सन्माननीय सदस्यांना सदस्यत्व देण्यात येत नाही. शासकीय सेवेतील भारतीय प्रशासन सेवेतील व भारतीय पोलीस सेवेतील अधिकाऱ्यांना त्यांच्या मुंबईतील वास्तव्यास मुंबईतील शासकीय जागेवरील जिमखाना व क्लबमध्ये सदस्यत्व देण्यात येते. परंतु विधानसभा व विधानपरिषदेच्या सन्माननीय सदस्यांना सदस्यत्व देण्यात येत नाही. सन्माननीय सदस्यांचा जास्तीत जास्त कालावधी मुंबईत व्यतित होत असल्यामुळे त्यांना जिमखाना व क्लबमध्ये सदस्यत्व देण्याबाबत शासनाने कार्यवाही करावी अशी विनंती मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाकडे करीत आहे.

सभापती महोदय, आयएएस व आयपीएस अधिकाऱ्यांना मुंबईत ट्रान्झिट उपलब्ध होते.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अमरसिंह पंडित...

मी माननीय सभापती महोदयांना विनंती केल्यानंतर जिमखान्यामध्ये मला बॅडमिंटन खेळण्यासाठी गेस्ट मेंबरशीप मिळालेली आहे. मला रोज 50 रुपये गेस्ट मेंबरशीप फी भरुन तेथे खेळण्याची परवानगी मिळते. विधानसभा आणि विधानपरिषदेतील जास्तीत जास्त 5 ते 10 टक्के सन्माननीय सदस्यांनी बॅडमिंटन, लॉनटेनिस आणि स्विमिंगसाठी विविध क्लबमध्ये मेंबरशीपसाठी अर्ज केलेला आहे. त्यांना मेंबरशीप दिली जात नाही. परंतु या आयएएस आणि आयपीएस अधिका-यांना मात्र सहजासहजी ट्रान्झिट मेंबरशीप उपलब्ध होते. विधानसभा आणि विधानपरिषदेच्या सन्माननीय सदस्यांना ट्रान्झिट मेंबरशीप उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी वारंवार या सभागृहामध्ये मुद्दा उपस्थित केलेला आहे. मी या विषयाच्या संदर्भात अशी विनंती करतो की, क्रीडा विभागाचे माननीय मंत्री महोदय, क्रीडा विभागाचे प्रधान सचिव यांनी हे अधिवेशन संपण्यापूर्वी माननीय सभापती महोदयांच्या दालनामध्ये बैठक घेऊन या संदर्भात निर्णय घ्यावा आणि तत्संबंधीचे निवेदन या सभागृहामध्ये करावे.

**तालिका सभापती** : या विषयाच्या संदर्भात कालच माननीय उप सभापतींनी निर्देश दिलेले आहेत. सभागृहामध्ये चर्चा देखील झालेली आहे. त्यानुषंगाने शासनाकडून पावले उचलली जातील.

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विशेष उल्लेख**

**पृ. शी./मु. शी.** : अमरावती विभागातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेने केन्द्र शासनाने दिलेला सर्व निधी खर्च केल्याचे उघडकीस येणे याबाबत श्री. दिवाकर रावते,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूच मांडतो.

"सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालयांतर्गत राज्यातील नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर या कार्यालयांना सन 2007-08मध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये पब्लिक प्रायव्हेट पार्टनर्शिप अंतर्गत औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा दर्जा वाढ करण्याकरिता केंद्र शासनाकडून प्रत्येकी रु. 2.5 कोटी व्याजमुक्त कर्ज दिलेले आहे. केंद्र शसनाकडून प्राप्त झालेला सदर निधी हा 10 वर्षानंतर परत करावयाचा असल्याने राज्यातील प्रत्येक संस्थेने 50 टक्के रक्कम सिडमनी म्हणून फिक्स डिपॉझिटमध्ये ठेवणे बंधनकारक आहे. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दिनांक 16.1.2010 रोजी आदेश निर्गमित करुन राज्यातील सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना कळविण्यात येणे, तथापि अमरावती विभागातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेने वरील आदेशाचे पालन न करता त्यांच्या वाट्याला आलेला सर्व निधी खर्च केल्याचे उघडकीस येणे, तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्था धारणी, जि. अमरावती व अंजनगावसुर्जी व इतरांनी वरील पब्लिक प्रायव्हेट पार्टनर्शिप अंतर्गत प्राप्त झालेला निधी पूर्ण खर्च केला आहे. या संदर्भात तक्रारी केल्या तरीही सहसंचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, अमरावती यांनी कोणतीही चौकशी न करता त्यांना पाठीशी घातले आहे. त्यामुळे या प्रकरणात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झालेला आहे. त्यामुळे या प्रकरणाची सविस्तर चर्चा करुन सहसंचालक व संबंधितावर योग्य कारवाई करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे मी या प्रकरणाकडे विशेष उल्लेखाद्वारे शासनाचे लक्ष वेधित आहे. कृपया चौकशी करावी. या चौकशीचा जो अहवाल मला एका महिन्यात देण्यात येईल त्यामध्ये केलेल्या कारवाईची माहिती देण्यात यावी.

-

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : 14 दीपगृहांमध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्रयातील वेंगुर्ला रॉक ओल्ड वेंगुर्ला रॉक न्यू आणि वेंगुर्ला पॉईण्ट या दीपगृहाचा समावेश करण्याबाबत श्री. सुभाष चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूच[illegible] मांडतो.

"देशात केंद्रीय नौकावहन विभागामार्फत 14 दीपगृहांची ठिकाणे ही पर्यटन स्थळे म्हणून विकसित करण्याचा उपक्रम हाती घेण्यात येऊन य 14 दीपगृहात सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अतिशय महत्वाच्या वेंगुर्ला रॉक ओल्ड, वेंगुर्ला रॉक न्यू आणि वेंगुर्ला पॉईण्ट लाईट हाऊसेस या तीन दीपगृहांचा समावेश करण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाच्या संबंधित विभागाकडे वारंवार विनंती करण्यात येऊनही अद्याप या तीन दीपगृहांचा समावेश करण्यात आलेला नाही. यामुळे या तीन दीपगृहांचा विकास खुंटला आहे. कोकणाला 720 कि.मी. समुद्रकिनारा लाभलेला असल्यामुळे येथे पर्यटकांची सतत व मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असते. त्यामुळे या तीन दीपगृहांची ठिकाणे पर्यटन स्थळे म्हणून विकसित होण्यासाठी देशातील 14 दीपगृहांमध्ये त्यांचा समावेश करण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाच्या संबंधित विभागाकडे पाठपुरावा करण्यासाठी तातडीची कार्यवाही करण्याची अत्यंत गरज आहे. अशा या अतिशय महत्वाच्या विषयावर मी विशेष उल्लेखाची सूचना मांडत आहे."

---

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : कोकण प्रदेशातील माध्यमिक शाळा स्थापन करण्याचे निकष शिथिल करणे याबाबत श्री.निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागांतर्गत माध्यमिक माध्यमाच्या शाळा स्थापन करण्यासाठी शासनाने मंजूर केलेल्या बृहत आराखड्यानुसार निश्चित करण्यात आलेल्या निकषाप्रमाणे महसुली गावाची लोकसंख्या 2000 व लगतच्या गावामध्ये 5 कि.मी.चे अंतर बंधनकारक आहे. कोकण प्रदेशातील भौगोलिक स्थिती लक्षात घेता सर्वसाधारणपणे कोकणातील महसुली गावांची लोकसंख्या 2000 इतकी असणे शक्य नसणे, परिणामी जवळपासच्या माध्यमिक शाळेअभावी विद्यार्थ्यांना दूर अंतरावरील शाळेच्या ठिकाणी पायी चालत जाणे येणे करुन शिक्षण घ्यावे लागते.

वास्तविकत: दोन गावातील अंतराचा विचार करता 5 कि.मी.अंतराच्या निकषात कोकणातील गावे बसू शकतात, परंतु लोकसंख्येचा निकष मात्र ही गावे पूर्ण करु शकत नसल्याने त्या परिसरातील विद्यार्थ्यांना अनेक शैक्षणिक गैरसोयींना तोंड द्यावे लागते. परिणामी कोकणातील भौगोलिक स्थितीचा विचार करुन सध्याच्या निकषातील महसुली गावांच्या लोकसंख्येबाबत अट शिथिल करण्यात यावी व त्याऐवजी कोकणातील 2 किंवा 3 महसुली गावांची लोकसंख्या एकत्र धरुन त्या परिसरात माध्यमिक शाळा स्थापन करण्याबाबत शासनाने कार्यवाही करुन बृहत आराखडयात त्याप्रमाणे बदल करण्यात येऊन कोकणवासियांना दिलासा द्यावा अशी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून विनंती करतो.

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : बीड जिल्हा परिषदेमध्ये विविध समित्यांचे सभापती व समित्यांचे सदस्य यांची निवडीचे फॉर्म न भरता निवड केली जाणे याबाबत प्रा.सुरेश नवले, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

प्रा.सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, बीड जिल्हा परिषदेची निवडणूक सन 2012 मध्ये पार पडली असता सदर जिल्हा परिषदेमध्ये निवडून आलेल्या सदस्यांमधून विविध समित्यांच्या सदस्यांची व सभापतींची निवड मतदानाद्वारे केली जाते. परंतु सदर जिल्हा परिषदेमध्ये विविध सभापती व सदस्यांच्या निवडीचे कोणतेही फॉर्म न भरता सदरच्या समित्या बिनविरोध केलेल्या आहेत. सदरच्या समित्या स्थापन करताना विविध समित्यांच्या सदस्यांचे फॉर्म भरणे अत्यंत गरजेचे आहे. याबाबतची सर्व ती माहिती सामान्य प्रशासन विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी देणे अत्यंत आवश्यक होते. परंतु त्यांनी जाणीवपूर्वक सदरची माहिती न दिल्यामुळे सदरच्या समित्या या बेकायदेशीर झालेल्या आहेत.

तेव्हा सदर जिल्हा परिषदेमधील अनेक सदस्यांनी याबाबत विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे तक्रारी दाखल केलेल्या आहेत. त्यानुसार विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी सदरच्या समित्या बरखास्त केलेल्या आहेत. तेव्हा शासनाने सदर प्रकरणाची तातडीने चौकशी करुन या प्रकरणात ज्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी चुकीची माहिती देऊन जो प्रकार घडलेला आहे, त्यामुळे बीड जिल्हा परिषदेची नाहक बदनामी झालेली आहे. त्यांच्यावर शासनाने कारवाई करावी अशी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी विनंती करतो.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : सहकारी दूध संघ व सहकारी दूध उत्पादक संस्थांच्या कमिशनमध्ये केलेली घट याबाबत श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

सभापती महोदय, राज्य शासनाने दिनांक 17.11.2012 पासून दूध संघाचे 10 पैसे तर दूध उत्पादक सहकारी संस्थांचे 30 पैसे प्रती लीटर कमिशन कमी करण्याचा निर्णय करणे, राज्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या दुधाच्या दरात वाढ करण्याची मागणी करणे, दुभत्या जनावरांना ओला चारा व पाणी विकत घेण्याची वेळ शेतकऱ्यांवर येणे, अशा परिस्थितीत शासनाने सहकारी दूध संघ व सहकारी दूध उत्पादक संस्थांच्या कमिशनमध्ये घट केल्यामुळे त्यांच्याकडून दूध उत्पादक शेतकऱ्यांना मिळणारी आर्थिक मदत ऐन दुष्काळात कमी होणे, यामुळे दूध उत्पादक शेतकरी अडचणीत सापडणे, दूध उत्पादक शेतकरी व दुग्ध व्यवसायाला प्रोत्साहन देण्यासाठी शासनाने संघ आणि संस्था यांच्या कमिशनमध्ये वाढ करण्यासाठी तत्पर कार्यवाही करावी, अशी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी मागणी करतो.

-----

नंतर 2टी.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** :ता.खेड जि. रत्नागिरी येथील रस्त्याच्या दुरुस्तीसाठी त्वरित निधी उपलब्ध करुन देण्याबाबत श्री. रामदास कदम ,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. रामदास कदम ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

रत्नागिरी जिल्हयातील खेड तालुक्यातील रस्त्यांची मोठया प्रमाणात नादुरुस्ती झालेली आहे. खराब रस्त्याच्या संदर्भात एसटी महामंडळाने प्रत्येक ग्रामपंचायतीला पत्र पाठवून कळविले आहे की, तातडीने रस्ते दुरुस्त झाले नाही तर आपल्या गावाची एसटी आम्हाला बंद करावी लागेल. खेड नांदिवली रस्ता पूर्णपणे नादुरुस्त झाला आहे, खेड-वडगाव, खेड-वाडी जैतापूर, खेड-फोफळवणे, खेड पोयनार, खेड-शिरगाव, खेड-तुळशी, खेड-आष्टी,खेड-भेलसई, खेड-दहीवली धोगरे, खेड-मौजे जैतापूर, खेड-शेरवली, खेड-अपेडे, खेड-खोपी मार्गे सापिर्ली, खेड-कोंदिवली शिव, खेड-शेल्ट. या खराब रस्त्याच्या संदर्भात मी अनेक वेळेला वित्तमंत्री,पालक मंत्री, जिल्हाधिकारी यांना पत्र दिलेले आहे. परंतु कोकणातील रत्नागिरी जिल्हयातील खेड तालुक्यांच्या रस्त्याच्या कामासाठी निधीच दिला जात नाही. जिल्हा परिषदेने 3.5 कोटीचा प्रस्ताव दिला होता परंतु त्यापैकी केवळ एक कोटी रुपये दिले गेले. या ठिकाणच्या लोकांना 10-10 कि.मी.अंतर पायी जावे लागत आहे, काही ठिकाणी तर रस्ते खराब असल्यामुळे एसटी बंद झालेल्या आहे.

या विषयाच्या संदर्भात मी नियम 93 अन्वयेची सूचना सुध्दा दिली होती. सन्माननीय मंत्री महोदय श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील यांनी यासंदर्भात मला सभागृहात उत्तर दिले होते की, आपण जर एसटी महामंडळाचे पत्र दिले तर मी रस्त्यासाठी ताबडतोब निधी देईन. माननीय मंत्री महोदयांना मी एसटी महामंडळाचे पत्रही दिले परंतु तरी सुध्दा रस्त्याच्या दुरुस्तीसाठी निधी मिळालेला नाही. मला जर रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी निधी मिळाला नाही तर मला नाइलाजास्तव सन्मानिनी मंत्री महोदय श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील यांच्यावर हक्कभंग दाखल करावा लागेल. रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत मी विशेष उल्लेख मांडीत असून शासनाने रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी तत्काळ निधी निर्गमित करावा अशी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती करतो आहे.

-----------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : रायगड जिल्हयातील रोहा तालुक्यातील धोंडखार येथील खारभूमी बंधाऱ्याचे काम अपूर्ण अवस्थेत असल्याबाबत श्री.जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. जयंत प्र.पाटील ( महाराष्ट्र विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

रायगड जिल्हयातील रोहा तालुक्यातील धोंडखार येथील खारभूमी बंधाऱ्याचे काम दि. 7 जुलै, 2012 रोजी मंजूर झाले होते. संजय चव्हाण, राहणार पोलादपूर यांना या कामासाठी वर्कऑर्डर सुध्दा दिली गेली होती. परंतु राजकीय दबावाखाली सदर ठेकेदार काम करु शकत नाही. हे काम 19.77 लक्ष रुपयांचे आहे. हे काम न झाल्यामुळे समुद्राचे पाणी जमिनीत शिरल्यामुळे संपूर्ण जमीन नापीक होते. सदर काम ग्रामपंचायत करण्यास तयार आहे. सदर ठेकेदार जर खारभूमी बंधाऱ्याचे काम करीत नसेल तर ते काम तेथील ग्रामपंचायतीला देऊन तातडीने काम पूर्ण करण्याची मी विशेष उल्लेखाद्वारे विनंती करतो.

सभापती महोदय, धोंडखार परिसरातील सर्व शेतकऱ्यांनी रोहा तहसील कार्यालयावर मोर्चा नेलेला आहे. कामाची रक्कम मंजूर आहे, कामाची वर्कऑर्डर सुध्दा निघालेली आहे. समुद्राचे खारे पाणी जमिनीत शिरले तर जमिनीत 3 वर्ष पीक निघत नाही. त्यामुळे यासंदर्भात तातडीने दखल घ्यावी अशी मी विशेष उल्लेखाद्वारे मागणी करीत आहे.

----------

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** :ठाणे जिल्हयातील दिवा परिसरात स्थानिक विकासक नगरपालिका व इतर अधिकाऱ्यांच्या संगनमताने बेकायदा इमारती बांधणे याबाबत श्री. किरण पावसकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. किरण पावसकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

"ठाणे जिल्हयातील दिवा परिसरात स्थानिक विकासक संबंधित महानगरपालिका व इतर अधिकाऱ्यांच्या संगनमताने शेकडो बेकायदा इमारती उभ्या राहत असणे, दिवा, ठाणे महानगरपालिकेच्या अखत्यारीतील हया गावाची लोकसंख्या सुरुवातीला काही हजारांच्या घरात असणारी अवध्या काही वर्षात लाखोच्या पटीने वाढलेली असणे, खाडी किनारी तिवरांच्या झाडांची कत्तल करुन अनाधिकृत चाळी इमारती बांधून मिळेल त्या किंमतीला विकून किंवा भाडयाने देण्याचे उद्योग मोठया प्रमाणात होत असणे, अशारितीने बेकायदेशीर शेकडो इमारती उभारल्या असून मात्र महापालिका प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असणे, हायकोर्टाच्या आदेशानुसार तिवरांच्या जंगलापासून 200 मीटरच्या परिसरात बांधकाम होवू नये असा नियम असतांनाही संबंधित यंत्रणा याकडे दुर्लक्ष करीत असल्याने या ठिकाणीही मुंब्रा इमारत दुर्घटनेसारखी घटना घडण्याचे नाकारता येत नाही, याकरिता तातडीने कार्यवाही करण्यासाठी मी विशेष उल्लेखाद्वारे शासनास शिफारस करीत आहे".

-------

यानंतर श्रीमती रणदिवे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ KTG पूर्वी श्री.भारवि . . . . 15:00

**विशेष उल्लेख**

पृ.शी./मु.शी.: बीड जिल्ह्यात घर तेथे शौचालय अशी मोहीम घेण्याची आवश्यकता याबाबत श्री.धनंजय मुंडे वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.धनंजय मुंडे (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, बीड राहत्या घरामध्ये शौचालयाची सुविधा असल्याचे सर्वात कमी प्रमाण बीड जिल्ह्यामध्ये 22.9 टक्के असल्याचे 2012-2013 च्या आर्थिक पाहणी अहवालावरुन समोर येत आहे.महाराष्ट्रामध्ये एका बाजूला संपूर्ण शहरे, गावे 100 टक्के हागणदारीमुक्त होत असताना बीड जिल्हा मात्र सर्वांत पिछाडीवर असल्याने विरोधाभासाचे चित्र निर्माण झालेले आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यात घर तेथे शौचालय अशी मोहीम हाती घेण्याची आवश्यकता, त्यावर शासनाने करावयाची कार्यवाही उपाययोजना. धन्यवाद.

------

2 यु-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: उल्हासनगर शहरातील अवैध बांधकामे
नियमित करणे याबाबत श्री.रामनाथ मोते
वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"उल्हासनगर शहरातील अवैध बांधकामे नियमित करण्यासाठी 2006 मध्ये अधिनियम मंजूर करुनही त्याची अंमलबजावणी न होणे, मा.प्रधान सचिव तसेच शासनाने वेगवेगळया आदेशान्वये मोडकळीस आलेल्या इमारतीचे पुर्नबांधकाम करताना 4 पर्यंतचा बांधकामासाठी वापरलेला चटईक्षेत्र निर्देशांक वापरण्याचे निर्देश देणे, तथापि त्याची अंमलबजावणी न होणे, मोडकळीस आलेल्या इमारती कोसळल्याने व या इमारतींच्या पुर्नबांधकामासाठी किमान 4 चा चटईक्षेत्र निर्देशांक मिळत नसल्याने शेकडो कुटुंब आज घरापासून वंचित असणे, उल्हासनगर शहरात 100 पेक्षा अधिक इमारती मोडकळीस आलेल्या असून कोणत्याही क्षणी कोसळण्याची भीती निर्माण होणे, अनेक वेळा आदरणीय मुख्यमंत्री महोदय, लोकप्रतिनिधी व नगरविकास विभागाचे अधिकारी यांच्याबरोबर चर्चा होऊनही नागरिकांना दिलासा न मिळणे, या गंभीर व सार्वजनिक महत्वाच्या विशयाकडे शासनाने लक्ष घालावे व कार्यवाही करावी अशी मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून विनंती करीत आहे." धन्यवाद.

----

. . . .2 यु-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: पटपडताळणीनंतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या सेवामुक्तीच्या नोटीसा याबाबत श्री.भगवान साळुंखे वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, एका महत्वाच्या विषयाकडे सर्वांचे लक्ष वेधत आहे.दि.3 ते 5 ऑक्टोबर 2011 मध्ये राज्य शासनाने व्यापक प्रमाणावर शाळांची पटपडताळणी केली.त्यामध्ये 50 टक्क्यापेक्षा जास्त गैरहजेरी असलेल्या सुमारे 2600 शाळा आढळून आल्या. या 2600 शाळांना मान्यता देण्याची प्रक्रिया गेल्या 8 ते 10 दिवसामध्ये सुरु आहे. या 2600 शाळांमध्ये काम करीत असलेले शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची संख्या सुमारे 40 हजाराच्या घरात आहेत. त्यांना सेवामुक्तीच्या नोटीसेसही देखील देण्यात आल्या आहेत. त्याचबरोबर संस्था चालक आणि मुख्याध्यापक यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया देखील सुरु आहे. आदरणीय आमदार श्री.ना.गो.गाणार सरांनी नागपूर येथील अधिवेशनाच्या काळामध्ये आंदोलन केले, बेमुदत उपोषण केले. त्यानंतर माननीय शिक्षण मंत्री श्री.राजेंद्र दर्डासाहेब यांनी याबाबत बोलणी करण्याचे मान्य केले. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी आपले आंदोलन सोडले.पण अजून बोलणी झाली नाहीत. शासनाने या बाबतीत त्यांच्याकडे पूर्णपणे पाठ फिरविली आहे. त्यामुळे 40 हजार शिक्षक मोठ्या प्रमाणात रस्त्यावर उतरले आहेत. तसेच त्यांनी येत्या 1 मे रोजी सोलापूरला सामुदायिक आत्मदहनाचा इशारा देखील दिला आहे. तसेच उद्यापासून नागपूर येथे अन्न त्यागाचा कार्यक्रमही करण्यात येणार आहे. अशा या गंभीर प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधत आहे. शासनाने या सर्व शाळांना आपली गुणवत्ता वाढविण्यासाठी एक-दोन वर्षाची संधी देणे आणि या सर्व शिक्षकांची सेवा सुरक्षित करण्याची नितांत आवश्यकता आहे एवढेच मला सांगावयाचे आहे.

----

. . . .2 यु-4



**पृ.शी / मु.शी** : मुंबईतील विविध कार्यालयात वीज

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

व पाणी याबाबत होत असलेली गैरसोय
याबाबत श्री.रमेश शेंडगे वि.प.स. यांनी
दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, मुंबईतील अंधेरी येथील आर.टी.ओ.कार्यालयांकडून जवळपास 300 कोटी रुपयांचे उत्पन्न महाराष्ट्र शासनाच्या तिजोरीमध्ये जमा होत असते. पण सदर कार्यालयाचे कामकाज हे जुन्या आणि अडगळीच्या बॅरॅक्समध्ये चालणे. सदर बॅरॅक्स कार्यालयात कधी लाईट नसतो तर कधी पाणी नसते. अशा या जुन्या-पुराण्या कार्यालयात घाणीचे साम्राज्य आहे. तथापि 2006 मध्ये सदर कार्यालयासाठी सुरु करण्यात आलेल्या इमारतीचे केवळ 3 मजल्याचे बांधकाम करण्यात आले. मात्र ते देखील अपूर्ण अवस्थेमध्ये असणे. तेथे लाईट व पाणी याच्या सुविधा नसणे. परिणामी तेथील कर्मचाऱ्यांना सोयी-सुविधांच्या अभावी तेथील अडगळीमध्येच काम करावे लागणे आणि त्यामुळे नागरिकांची गैरसोय होणे. याबाबत सदर कार्यालयासाठी सुरु करण्यात आलेल्या इमारतीचे काम पूर्ण करुन नवीन कार्यालय सुरु करण्याबाबत होत असलेली मागणी आणि त्याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष व याबाबतच्या करावयाच्या कार्यवाहीसाठी मी या विशेष उल्लेखाव्दारे सूचना देत आहे.

-----

. . . .2 यु-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी./मु.शी.** : वृत्तपत्र पोहोचविणाऱ्यांना कोणत्याही
सेवा उपलब्ध न होणे याबाबत श्री.

जयवंतराव जाधव,वि.प.स.यांनी दिलेली

विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"राज्यातील वृत्तपत्र विक्रेते ऊन, वारा, पाऊस तसेच वैयक्तिक किंवा नैसर्गिक समस्यांचा विचार न करता अव्याहतपणे जनतेच्या घरी वृत्तपत्र पोहोचविण्याचे काम करीत असतात. त्यांना कोणत्याही किमान मुलभूत सेवा उपलब्ध होत नसल्याने, अतिशय प्रतिकूल परिस्थितीत ते आपले काम अखंडपणे काम करीत असतात.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव....

सदर वृत्तपत्र विक्रेत्यांना असंघटीत कामगारांचा दर्जा देणे, रात्री अपरात्री पहाटे काम करावे लागत असल्याने त्यांना ओळखपत्रे देणे, सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेमध्ये त्यांना सवलत मिळणे, त्यांच्यासाठी प्रमुख रस्त्यांवर स्टॉल उपलब्ध करुन देणे, यासह त्यांच्या इतर मागण्यांवर निर्णय घेतला जात नाही. त्यामुळे त्यांच्यामध्ये निराशेची भावना तयार झाली आहे. राज्यातील दुर्लक्षित असलेल्या व असंघटीत असलेल्या हजारो वर्तमानपत्र विक्रेत्यांच्या समस्यांवर उपाय योजना करण्यासाठी शासनाने तातडीने कार्यवाही करावी अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी**. : कोकणात वणव्यामुळे आंबा, काजू, चिकू, पेरुच्या बागांना अचानकपणे आग लागून झालेले नुकसान या बाबत श्री.विनायक राऊत,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.विनायक राऊत ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"कोकणात वणव्यामुळे आंबा, काजू, चिकू व पेरुच्या बागांना लागलेल्या आगी, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात भर उन्हात अचानकपणे लागलेल्या भीषण वणव्यामुळे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. आंबा व काजूच्या कलमांची झाडेही जळून खाक झाली आहेत. ऐन हंगामात काजू कलम व आंबा कलम बागेला आग लागल्याने येथील शेतकऱ्यांचा वर्षभराचा चरितार्थ हा काजू बागायतीवर अवलंबून असल्याने शेतकऱ्यांचा चरितार्थाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. काही ठिकाणी जंगलमय भाग आणि भौगोलिक परिस्थिती डोंगरदऱ्याची असल्यामुळे लागलेला वणवा अग्निशामक बंबाने विझवणे देखील शक्य होत नाही. सदर वणवा हा रखरखत्या उन्हामुळे सुध्दा लागत असल्यामुळे ती नैसर्गिक आपत्ती होत आहे. सदर नैसर्गिक आपत्तीला शासनाकडून भरीव आर्थिक मदत देणे अत्यंत गरजेचे आहे. तरी कोकणात सातत्याने लागणाऱ्या वणव्या संदर्भात काही ठोस पावले उचलण्याची नितांत आवश्यकता आहे. तसेच वणव्यामुळे नुकसानग्रस्त असलेल्या शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत देण्याकरिता मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे. "

------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीपूर्व नाही

**पृ. शी./मु. शी.** : नागपूरच्या धर्तीवर पुणे येथे महिलांसाठी स्वतंत्र न्यायालय स्थापन करणे या बाबत श्री.अनिल भोसले, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.अनिल भोसले ( पुणे स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

महिलांवर झालेल्या अत्याचारांच्या प्रकरणांचा न्याय निवाडा लवकरात लवकर करण्यासाठी नागपूर जिल्ह्यात आठ विशेष न्यायालये सुरु झाली आहेत. या न्यायालयांमध्ये विशेष महिला न्यायाधीश व सर्व महिला कर्मचारी असणार आहेत. त्यामुळे महिलांवरील खटले चालवणे व ते लवकरात लवकर निकाली काढणे सोपे होणार आहे. कौटुंबीक हिंसाचार व महिलांवरील अन्याय कमी होण्यासाठी तसेच सदर अत्याचारांच्या प्रकरणांचा लवकर न्याय निवाडा होण्यासाठी पुणेसह राज्यामध्ये नागपूरच्या धर्तीवर महिलांसाठी विशेष न्यायालये स्थापन करण्यासाठी शासनाने कार्यवाही करावी अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे. "

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु.शी.** :जिल्हा शिक्षणाधिकारी प्राथमिक शाळांच्या मान्यता काढून शिक्षकांना सेवा मुक्त करीत असल्यामुळे दहा महिला शिक्षक अन्नदान सत्याग्रह करणार असल्याबाबत श्री.नागो पुंडलिक गाणार, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. नागो पुंडलिक गाणार ( नागपूर विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

" बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षण अधिकार अधिनियम, 2009 हा राज्यात 1 एप्रिल, 2010 पासून लागू करण्यात आला. त्यामुळे 1 एप्रिल 2010 पूर्वी अस्तित्वात असलेला मुंबई प्राथमिक शिक्षण कायदा अस्तित्वहीन झालेला आहे. परंतु या अस्तित्वहीन कायद्याचा आधार घेऊन जिल्हा शिक्षणाधिकारी प्राथमिक शाळांच्या मान्यता काढून शिक्षकांना सेवा मुक्त करीत आहेत. त्या विरुध्द अनेक आंदोलने झाली. परंतु त्या आंदोलनाची दखल घेण्यात आली नाही. उद्या पासून नागपूर शहरात नागपूर उप विभागीय कार्यालयासमोर 10 महिला शिक्षिका अन्नदान सत्याग्रह करणार आहेत. मी या विशेष उल्ल्खाच्या निमित्ताने विनंती करतो की, आपण या अन्नदान सत्याग्रहाची दखल घेण्यासाठी शासनाला निर्देश द्यावेत."

-------

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** :उल्हासनगर पॅटर्नप्रमाणे मध्यमवर्गीयांची स्वत:च्या मालकीच्या जागेवरील घरे नियमित करणे या बाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

डॅा.नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

"राज्यातील विशेषत: मुंबई, ठाणे, पुणे,नाशिक,संभाजीनगर, नागपूर या सारख्या शहरांमध्ये गरिबांकरिता शासन स्तरावर अनेक योजनांतर्गत बांधण्यात येणारी घरे अपुरी पडत आहेत. गरीब व मध्यमवर्गीय लोक खाजगी विकासकांकडून बांधण्यात आलेल्या सदनिका विकत घेतात. उल्हासनगरमध्ये मध्यमवर्गीय व गरीब लोकांच्या सदनिका शासनाने नियमित केल्या. परंतु उल्हासनगर पॅटर्नची प्रत्यक्षात अंमलबजावणी झालेली नाही. ज्यांनी स्वत:च्या मालकीच्या जागेवर छोटी घरे बांधली आहेत ती घरे उल्हासनगर पॅटर्नची प्रत्यक्षात अंमलबजावणी करुन नियमित करण्यात यावीत आणि याबाबत शासनाने सहानुभूतीपूर्वक विचार करावा यासाठी मी या विशेष उल्ल्‍ोखाद्वारे शासनाचे लक्ष वेधत आहे."

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: स्वातंत्र्य सेनानी उमाजी नाईक यांचे स्मारक उभे करण्याबाबत श्री.हेमंत टकले, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ची सूच□ मांडतो.

"पुणे जिल्ह्यातील हवेली तहसील कार्यालयाच्या आवारात दि.3 फेब्रुवारी, 1832 रोजी स्वातंत्र्य सेनानी उमाजी नाईक यांना फाशी देण्यात आली होती. ब्रिटिश राजवटीच्या खुणा आजही त्या तहसील कार्यालयात व लगतच्या बंदीखान्यात आहेत. या आद्य क्रांतिवीराचे छोटेसे स्मारक 'अंकुर' या संस्थेने जतन केले आहे. सन 1791 साली जन्मलेल्या या रामोशी समाज पुरुषाचे कार्य अलौकिक स्वरुपाचे आहे. या समाजाने ब्रिटिश साम्राज्याविरुध्द पहिल्यांदा मोठा लढा दिला. उमाजी नाईक यांना फाशीवर चढविलेल्या जागेवर आज एक झाड व त्यांचा पुतळा सुध्दा आहे. हा समाज पुरातन ठेवा जतन करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे येथे उमाजी नाईक संग्रहालय व्हावे अशी सामान्य जनतेची इच्छा आहे. विस्मृतीत गेलेल्या या प्रेरणादायी स्वातंत्र्य योध्द्याचे यथोचित स्मारक उभे करावे अशी विनंती मी महाराष्ट्र शासनास या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: विशेषाधिकार समितीचा अहवाल सादर करण्याची मुदत वाढविणे

श्री.हेमंत टकले (समिती प्रमुख) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव प्रस्तुत करतो की, श्री.पुरुषोत्तम खेडेकर लिखित "शिवरायाच्या बदनामीची केंद्रे" या पुस्तकातील मजकुरांवर आधारित "लोकप्रभा" अंकामधील प्रा.हरी नरके यांच्या "फॅसिस्ट शक्तीमुळे बहुजनांचे विभाजन" या लेखातील अवमानजनक लिखाणामुळे उद्‌भवलेले विशेषाधिकार भंग व अवमानाचे प्रकरण, या प्रकरणांवरील विशेषाधिकार समितीचा अहवाल सादर करण्याकरिता म.वि.प. नियम 178 (1) च्या परंतुकान्वये, पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत मुदत वाढवून देण्यात यावी."

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

-----------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या प्रस्तावान्वये अहवाल सादर करण्यास समितीला मुदतवाढ दिल्याचे मान्य केले आहे. या प्रकरणी समितीपुढे साक्ष सुरु आहे. शिवाय याच विषयी उच्च न्यायालयात याचिका दाखल झाली आहे. उच्च न्यायालयाने 10 एप्रिलपर्यंत शासनाने या संदर्भात आपले म्हणणे मांडावे असे निर्देश दिले होते. मी 6-7 एप्रिल रोजी हा विषय विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मांडून शासनाला जाणीव करुन दिली होती. शासनाने 10 एप्रिलला आपले म्हणणे उच्च न्यायालयात दाखल केले आहे काय हे समजले पाहिजे. ही गंभीर बाब आहे. उच्च न्यायालय सुध्दा या प्रकरणात पडले आहे. या प्रकरणी समितीपुढे ज्या साक्षी सुरु आहेत त्यावर न्यायालयाच्या निर्णयाचा फार मोठा परिणाम होणार आहे. या प्रकरणी संबंधितांवर विशेषाधिकाराचे प्रकरण निर्माण झाल्यामुळे विशेषाधिकार समितीने या बाबतीत काय केले या बाबत न्यायालयाकडून विचारणा होण्याची शक्यता आहे. मला कायद्याच्या चौकटीत जायचे नाही. मी आपल्या मार्फत शासनाला विनंती करतो की, शासनाने या संदर्भात सभागृहामध्ये वस्तुस्थितीदर्शक निवेदन करावे. आपण तसे निर्देश दिले तर फार बरे होईल. 10 एप्रिल ही तारीख उलटून गेली असून आज 16 एप्रिल आहे. त्यामुळे आम्हाला या बाबत समजले पाहिजे.

**तालिका सभापती** : माननीय मंत्री महोदयांनी या मुद्याची नोंद घ्यावी.

श्री.संजय देवतळे : होय.

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक आता मध्यंतरासाठी स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक दुपारी 3.45 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 3.14 ते 3.45 पर्यंत स्थगित झाली.)

-----------

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( मध्यंतरानंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

**पृ. शी.** : विनियोजन विधेयक

L.A. BILL NO. XII OF 2013

( A BILL TO AUTHORISE PAYMENT AND APPROPRIATION OF CERTAIN FURTHER SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES OF THE YEAR ENDING ON THE THIRTY FIRST DAY OF MARCH 2014.)

श्री. राजेंद्र मुळक ( वित्त राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2013 चे. वि.स.वि.क्रमांक 12- दिनांक 31 मार्च 2014 रोजी संपणाऱ्या वर्षाच्या कामांसाठी राज्यांच्या एकत्रित निधीतून आणखी विवक्षित रकमा देणे व त्यांचे विनियोजन करणे यांस अधिकृत मंजुरी देण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असतना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) व्दारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडशः सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

( खंड 2 व 3, अनुसूची, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

**उप सभापती** : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशींसह हे विधेयक विधानभेकडे परत पाठविण्यात येईल.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>विशेष उल्लेख (पुढे चालू....)</u>**

**पृ.शी./ मु.शी.** : पुण्यातील ससून हॉस्पिटल व बै.जी. वैद्यकीय महाविद्यालयास विविध कामांसाठी तातडीने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत श्री. मोहन जोशी, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. मोहन जोशी ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"पुणे शहरच नव्हे तर पुणे जिल्हा आणि पश्चिम महाराष्ट्रातील सर्वसामान्य गरीब माणसांसाठी आणि लाखो आम जनतेच्या आरोग्याच्या बाबतीत मोलाची जबाबदारी पार पाडणाऱ्या ससून हॉस्पिटलच्या खालील महत्वाच्या प्रलंबित समस्यांबाबत तातडीने निधीची तरतूद करुन प्रशासकीय मान्यता देण्यात यावी अशी विनंती मी या विशेष उल्लेखाच्या सूचनेव्दारे शासनास करीत आहे. बै.जी. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रशासकीय कार्यालयाच्या नूतनीकरणास अधिकचा 50 लाख रुपये निधी देण्यात यावा. बै.जी. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे नवीन नामफलक तयार करुन बसविण्याकरिता 10 लक्ष रुपयांचा निधी मंजूर करुन प्रशासकीय मान्यता देण्यात यावी.

शरीर रचनाशास्त्र विभागातील शवविच्छेदन कक्ष, पॅथॉलॉजी लॅब, सी.सी.एल.लॅब, क्लिनीकल लॅब, फिजीओलॉजी 2, 3 व 4, हिमॅटॉलॉजी लॅब 2 रा मजला, हिमॅटॉलॉजी लॅब पहिला मजला, डायबिटीक लॅब 1 व 2, सेंट्रल लॅब, मायक्रोबायोलॉजी लॅब यांचे नूतनीकरण, हाऊसमन वसतिगृहामध्ये विद्युत पंखे व पाणी तापविण्याची संयंत्रे (वॉटर हिटर) बसविणे, मुख्य इमारतीमधील विद्युत पॅनलकरिता कपॅसिटर बसविणे, मुलींच्या वसतिगृहातील विद्याथीनींच्या निवासाकरिता हॉलमध्ये पार्टिशन, शासकीय इमारतीमधील अस्तित्वात असलेल्या वीज संच मांडणीमध्ये विद्युत सुरक्षा परीक्षण अहवालानुसार प्रमुख बदल करणे व फेरफार करणे इत्यादी तसेच मध्यवर्ती ग्रंथालयातील विद्युतीकरणाचे नूतनीकरण, कॅथलॅब यंत्रणा, ऑक्सिजन पाईपलाईन, नूतनीकरण केलेल्या अतिदक्षता विभागामध्ये सेंट्रल ऑक्सिजन आणि बेड हेड एन्ड पॅनल बसविणे, ट्रॉमा केअर सेंटरमध्ये सेंट्रल ऑक्सिजन आणि बेड हेड एन्ड पॅनल बसविणे, ससून सर्वोपचार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..3...

RDB/ D/ ST/

श्री. मोहन जोशी .....

रुग्णालयात प्रथम मजल्यावर असणाऱ्या शस्त्रक्रियागृहामध्ये सेंट्रल ऑक्सिजन आणि बेड हेड एन्ड पॅनल बसविणे, मल्टिपॅरामिटर मॉनिटर, मेकॅनाईज्ड लॉंड्री, इ.एन.टी. ओटीचे नूतनीकरण, विविध कक्षांमध्ये एक्झॉस्ट फॅन व वॉटर हीटर बसविणे, ससून सर्वोपचार रुग्णालय असा फलक लावणे, ससून सर्वोपचार रुग्णालयात सर्व टॉयलेट ब्लॉकमध्ये कमोड बसविणे, ससून रुग्णालय कम्पाऊंड भिंतींची उंची वाढविणे, मुख्य शस्त्रक्रिया विभागातील वातानुकुलन नेत्रशल्यचिकित्सा नूतनीकरण, बी.एस्सी, नर्सिंग ट्रेनिंग कॉलेज याकरिता शासनाने 18 कोटी रुपयांची तरतूद करुन त्यास तातडीने प्रशासकीय मान्यता देऊन ही कामे प्राधान्याने हाती घेऊन पुणे व परिसरातील आम जनतेच्या आरोग्याचा प्रश्न मार्गी लावावा अशी विनंती मी या विशेष उल्लेखाव्दारे करीत आहे."

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्राधिकृत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोहन जोशी...........

विशेषत: ससून हॉस्पिटलमधील टॉयलेटमध्ये कमोडची व्यवस्था नाही. ते कामही निधीअभावी प्रलंबित आहे. राज्याचे माननीय उप मुख्यमंत्री, अर्थ मंत्री आणि पुणे जिल्ह्याचे पालक मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. त्यांनी या हॉस्पिटलसाठी 100 कोटी रुपये देण्याचे जाहीर केलेले आहे. परंतु ससून हॉस्पिटलच्या विविध कामांसाठी 18 कोटी रुपये देणे गरजेचे आहे. या कामांना प्रशासकीय मान्यता देऊन ही कामे प्राधान्याने हाती घेऊन पुणे जिल्ह्यातील लोकांच्या आरोग्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी शासनाने या हॉस्पिटलसाठी लवकर निधी उपलब्ध करुन द्यावा अशी विनंती मी या विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे शासनाला करीत आहे.

----

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी. / मु.शी.** :महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाचे प्रशासन विकासकांना मूल्यांकन देण्यासाठी टाळाटाळ करीत असणे याबाबत श्री.विनोद तावडे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.विनोद तावडे ( विरोधी पक्ष नेते ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"राज्याच्या 720 कि.मी.लांबीच्या कोकण किनारपट्टीवरील 48 लहान बंदरांचे अनन्यसाधारण महत्व विचारात घेऊन शासनाने बंदर विकासाचे धोरण निश्चित केले, यानुषंगाने या बंदराच्या विकासासाठी राज्य शासनाच्या मान्यतेनंतर महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने खाजगी विकासक कंपन्यांशी बांधा, वापरा व हस्तांतरित करा या तत्वावर सवलत करारनामे केले आहेत, खाजगीकरणाच्या माध्यमातून विकसित होत असलेल्या सर्व बंदर विकास प्रकल्पांसाठी तसेच सर्व प्रकारचे जेट्टी प्रकल्प, जहाज बांधणी व जहाज दुरुस्ती प्रकल्प तसेच बंदर विकासाशी संबंधित ज्या ज्या प्रकल्पांना भरती-ओहोटीच्या पाण्याखालील जमिनीची आवश्यकता आहे अशा सर्व प्रकल्पांसाठी भरती-ओहोटीच्या पाण्याखालील जमिनीच्या मूल्यांकनाची गरज भासणार आहे. याकरिता मंत्रिमंडळाच्या दिनांक 18 फेब्रुवारी, 2009 रोजीच्या बैठकीत "ज्या ज्या प्रकल्पांना भरती-ओहोटीच्या पाण्याखालील जमिनीची आवश्यकता भासणार आहे अशा सर्व प्रकल्पांसाठी लागणाऱ्या भरती-ओहोटीच्या पाण्याखालील जमिनीचे मूल्यांकन हे जमिनीच्या लगत असलेल्या जिरायत जमिनीच्या महसूल व वन विभागाने ठरविलेल्या प्रचलित दराप्रमाणे करण्यात यावे, जमिनीचे मोजमाप झाल्यानंतर येणाऱ्या फरकाची रक्कम भरण्याची तयारी असलेले हमीपत्र विकासकाकडून घेण्यात यावे, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाद्वारे संबंधित विकासकांसोबत करण्यात येणाऱ्या जमिनीच्या करारनाम्यामध्ये आवश्यक तरतूद करण्यात यावी" असे निर्णय घेण्यात आले असतानाही महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाचे प्रशासन हे विकासकांना मूल्यांकन देण्यासाठी टाळाटाळ करीत आहेत, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाचे प्रशासन मूल्यांकन महसूल विभागाने अथवा पतन अभियंता विभाग,

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/

श्री.विनोद तावडे...

हार्बर इंजिनिअर यांनी करावे असे विकासकांना सांगत असल्यामुळे अनेक बंदरांचे प्रकल्प विकसित होण्यास विलंब होत आहे. प्रलंबित असलेल्या प्रकल्पांना तत्काळ मूल्यांकन (Inter-tidal & tidal land) व (Reclaimed Land) करण्याची जबाबदारी मेरीटाईम बोर्डाची असल्यामुळे त्यांनीच तत्काळ मूल्यांकन करावे अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे उपस्थित करीत आहे."

----------

4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/

**पृ.शी.**: शासनाने दुष्काळावर कायम स्वरुपी उपाययोजना करण्यासाठी सुरु केलेल्या महत्वाकांक्षी कार्यक्रमात विदर्भ व मराठवाडा भागात भयानक दुष्काळ पसरलेला असतानाही या भागातील एकाही तालुक्याचा समावेश न करणे

**मु.शी.**: शासनाने दुष्काळावर कायम स्वरुपी उपाययोजना करण्यासाठी सुरु केलेल्या महत्वाकांक्षी कार्यक्रमात विदर्भ व मराठवाडा भागात भयानक दुष्काळ पसरलेला असतानाही या भागातील एकाही तालुक्याचा समावेश न करणे या विषयावर सर्वश्री दिवाकर रावते, रामदास कदम, डॉ.नीलम गोऱ्हे, डॉ.दीपक सावंत, ॲड.अनिल परब, श्री.विनायक राऊत यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

**उप सभापती** : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेसाठी मी दीड तासांचा वेळ दिलेला आहे. सूचना देणारे सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री.दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो :-

"भूगर्भातील पाण्याची पातळी वाढवून पिण्याच्या पाण्याची कायमस्वरुपी व्यवस्था करणे, जमिनीची धूप थांबवून सिंचनाची सोय करणे व कृषि उत्पादनात वाढ करण्याच्या उद्देशाने साखळी पध्दतीने सिमेंट नाला बांध घालून दुष्काळावर कायम स्वरुपी उपाययोजना करण्यासाठी राज्य शासनाने गेल्या वर्षी 29 मे, 2012 रोजी महत्वाकांक्षी कार्यक्रम सुरु करणे, सदर कार्यक्रमाच्या पहिल्या टप्प्यात राज्यातील 15 तालुक्यांचा समावेश करुन सदर कार्यक्रमासाठी 143 कोटी रुपये खर्च करणे, उपरोक्त 15 तालुक्यांपैकी 14 तालुके पश्चिम महाराष्ट्रातील असून केवळ एक भूम तालुका उस्मानाबाद जिल्ह्यातील असणे, विदर्भ, मराठवाडा भागात यावर्षी भयानक दुष्काळ

5...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/

श्री.दिवाकर रावते.........

पसरलेला असून सुध्दा विदर्भातील 11 जिल्ह्यांमधील एकाही तालुक्याचा सदर कार्यक्रमात समावेश न केल्यामुळे विदर्भ, मराठवाड्यातील जनतेत पसरलेला असंतोष."

सभापती महोदय, राज्यातील दुष्काळी परिस्थितीबाबत आम्ही खूप गंभीर आहोत. या दुष्काळासंबंधी आम्ही खूप काही करीत आहोत जे कोणी करु शकत नाही असे आम्ही वाहून घेतलेले आहे. दुष्काळासाठी सरकारची संपूर्ण क्रयशक्ती पणाला लावली आहे अशा प्रकारची वक्तव्ये, भाष्ये आम्ही ऐकत असतो. या सभागृहामध्ये दुष्काळावर वारंवार चर्चा होत असते. त्यावेळी आम्ही या विषयावर आमची मते प्रकर्षाने मांडण्याचा प्रयत्न करीत असतो.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 15:55

महाराष्ट्राच्या दुष्काळी भागातील अतितीव्र दुष्काळी भाग कोणता असेल तर तो मराठवाड्याचा आहे. त्यामध्ये धाराशिव, जालना, बीड आणि संभाजीनगर या भागामध्ये तीव्र दुष्काळ आहे. काही भागातील दुष्काळ इतका तीव्र आहे की त्या ठिकाणी एक पेला पाणी मिळणे देखील मुश्किल आहे. मराठवड्यामध्ये सुरुवातीला 500 टँकर होते. त्यांची संख्या वाढत जाऊन ती 2500 च्या पुढे गेली आहे. मे महिन्याच्या अखेरीस ही संख्या 5 हजारापर्यंत जाईल. त्याचवेळी पश्चिम महाराष्ट्राच्या दुष्काळी परिस्थितीचे कोडकौतुक करुन राज्यकर्ते सातत्याने त्या भागामध्ये धावत आहेत आणि त्या भागामध्ये दुष्काळासाठी उपलब्ध झालेला प्रचंड निधी खर्च करीत आहेत. सांगोला आणि इतर भागामध्ये टेंभू, म्हैसाळा या प्रकल्पाच्या माध्यमातून पाणी देण्याचा प्रयास केला त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. जेवढे प्रयत्न आपण पश्चिम महाराष्ट्रमध्ये केले तेवढे प्रयत्न आमच्या मराठवाड्यामध्ये होत नाहीत अशी परिस्थिती आहे.

सभापती महोदय, आजच्या दुष्काळी परिस्थितीमध्ये महाराष्ट्रामध्ये ज्या ज्या उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे मग त्या चारा छावण्या असतील, पाण्याचे टँकर असतील किंवा रोजगार हमी योजनेची कामे असतील अशा उपाययोजनांच्या बाबतीत आपण चर्चा करीत असतो. जे कायमचे अवर्षण प्रवण भाग आहेत जेथे मागील 10-12 वर्षापासून सातत्याने पावसाची कमतरता जाणवते त्या ठिकाणी पावसाचा प्रत्येक थेंब कसा अडविता येईल या विषयी आपण विशेष चर्चा करतो, तज्ज्ञांना बोलावतो आणि अनेक संस्थांच्या माध्यमातून तेथे कामे व्हावीत अशी अपेक्षा करतो. डॉ. पतंगराव कदम यांच्याकडे पुनर्वसन खाते आहे. दुष्काळाच्या बाबतीत त्यांची महत्वाची भूमिका आहे. त्यांनी या सदनामध्ये जोरात सांगितले की, जतमध्ये 325 सिमेंटचे बंधारे बांधले. त्यांनी असेही सांगितले की, पावसाळयानंतर काय केले ते आपणास दिसेल. ते बंधारे बांधले असतील तर आनंद आहे. मी जतमध्ये फिरलो, परंतु मला कुठे ते दिसले नाहीत. हे बंधारे पहाण्याची माझी मोठी इच्छा होती. कदाचित जेथे हे बंधारे बांधले असतील तेथे मी गेलो नसेन. त्यांनी जतमध्ये 325 सिमेंटचे बंधारे बांधलेले असून आम्ही तेथे काय केले हे पावसाळयानंतर दिसून येईल असे सभागृहामध्ये सांगितले. हे तुम्ही करता त्याबद्दल दु:ख नाही.

सभापती महोदय, काल 14 एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती देशभर साजरी करण्यात आली. सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी सांगितले की, संपूर्ण

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 15:55

श्री. दिवाकर रावते....

महाराष्ट्रातील दीनदलितांची डॉ. बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी रीघ लागली होती. त्याच वेळेला या राज्यातील प्रमुख राज्यकर्त्यांनी महापौरांसहीत टपाल तिकिटाचे प्रकाशन केले आणि ते आदरणीय डॉ. बाबासाहेबांच्या दर्शनाकरिता गेले. पण या महाराष्ट्रमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एका बाजूला पडले आणि आमच्या कराड मधल्या प्रीतीसंगमाची दूरदर्शनच्या माध्यमातून

(सत्ताधारी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

मी काही वेडेवाकडे बोललो नाही. जे दृश्य होते तेवढे बोललो. सबंध दिवस जे लोक बघत होते तेवढेच मी बोललो. मी टीव्ही माध्यमाबद्दल बोललो. अपमानाच्या गोष्टी करु नका. मला शांतपणे माझ्ा विषय मांडू द्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचा कार्यक्रम होता.... यामध्ये अवमानाचा काय प्रश्न आहे ?

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ ST/ पूर्वी श्री.शिगम 16:00

श्री.दिवाकर रावते.......

मी यात कोणाचा अवमान केला का? तो कार्यक्रम दूरदर्शन वाहिन्यांवर बाजूला पडला आणि दिवसभर एकच दृश्य दाखविले जात होते.

सभापती महोदय, माझ्याकडे महाराष्ट्र शासनाची वृत्तपत्रात प्रसिध्द झालेली एक जाहिरात आहे. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 122 व्या जयंतीच्या निमित्ताने त्यांना अभिवादन करणारी एक जाहिरात जलसंधारण विभागातर्फे प्रसिध्द करण्यात आली आहे. ही बाब अतिशय चांगली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव कशासाठी वापरले, त्याच्याशी काही संबंध नाही. त्यासाठी तरी आमची काही हरकत नाही. या जाहिरातीमध्ये जलसंधारण विभागातर्फे साखळी पध्दतीने सिमेंट नाले बांधून दुष्काळावर कायमस्वरुपी उपाययोजना करण्याचा शासनाचा महत्वाकांक्षी कार्यक्रम आहे. ही बाब अभिनंदनीय आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनाही आनंद होईल. ग्रामीण भागातील दुष्काळग्रस्त परिसराकरिता माझ्या नावाने जाहिरात देऊन शासन काम करीत आहे याचा त्यांना आनंद झाला असेल.

सभापती महोदय, आम्हाला पठारावरील शेळ्या मेंढ्या दिसतात. त्यांना खायला घास नाही, चारा नाही, ही व्यथा आहे. अंगावरील माशी त्यांना उडविता येत नाही, अब्रू झाकता येत नाही, अशा परिस्थितीत चारा नाही आणि पाणीही नाही, त्यांनी काय करायचे? डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करीत असताना महत्वाची जाहिरात दिली ही स्वाभिमानाची आणि आनंदाची बाब आहे. गोरगरीब लोकांपर्यंत पाणी जाईल या अपेक्षेने हा महत्वाकांक्षी कार्यक्रम सरकारने हाती घेतला आहे. दुष्काळग्रस्त भागासाठी असलेला कार्यक्रम सर्व ठिकाणी पोहोचला पाहिजे. आमचा आक्षेप याच गोष्टीबद्दल आहे.

सभापती महोदय, या जाहिरातीत उद्दिष्टे काय आहेत हे नमूद केले आहे. भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविणे, पिण्याच्या पाण्याची शाश्वत व्यवस्था करणे, जमिनीची धूप थांबविणे, पिकांना सिंचनाची सोय करणे आणि कृषी उत्पन्न वाढविणे ही उद्दिष्टे आहेत. दुष्काळग्रस्त भागांसाठी स्वागतार्ह असा हा कार्यक्रम आहे.

सभापती महोदय, आदरणीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार साहेब सतत आणि सातत्याने पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागात फिरले. त्यानंतर ते मराठवाड्यात आले आणि जालना जिल्हयातील दुष्काळग्रस्त भागात माननीय मंत्री श्री.राजेश टोपे यांच्यासमवेत फिरले.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.......

मंत्री महोदयांना बाजूला ढकलून बाकीचे नेते पुढे पुढे करीत आहेत हे दृश्य दूरदर्शनच्या वाहिनीवर आम्हाला दिसत होते. त्याबद्दल आम्हाला काही म्हणावयाचे नाही. तुमच्यामध्ये सुध्दा मंत्र्यांना मागे ढकलून साहेबांबरोबर जायला अहमहमिका लागलेली होती.

आदरणीय श्री.शरद पवार साहेब शेतामध्ये उतरले. मोसंबीच्या बागेत गेले. संभाजीनगरला आल्यानंतर त्यांनी काढलेले उद्गार अत्यंत गंभीर होते. पश्चिम महाराष्ट्रात फिरल्यानंतर त्यांनी असे उद्गार काढलेले नव्हते. परंतु मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त भागात फिरल्यानंतर त्यांनी असे उद्गार काढले की, हा दुष्काळ 1972 पेक्षा गंभीर आहे. मराठवाड्यातील दुष्काळाच्या तीव्रतेची जाणीव त्यांच्या मुखातून बाहेर पडली. नेत्यांना जाण आल्याबद्दल लोकांना आधार वाटला. आम्हालाही आधार वाटला. सध्याच्या परिस्थितीत पश्चिम महाराष्ट्रापेक्षाही दुष्काळाची भीषणता मराठवाड्यामध्ये अधिक आहे, हे नाकारता येणार नाही. माननीय उप मुख्यमंत्री देखील नाकारणार नाहीत. त्यांनीही मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त भागाची पाहणी केली आहे. त्यांच्या जाण्याबद्दल कोणी तरी हिणवले होते. हे सर्व वास्तव असताना मराठवाड्यात दुष्काळाची परिस्थिती गंभीर असताना......

नंतर 3बी.2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ......

मराठवाडयाच्या जायकवाडी धरणाची पातळी शुन्यापेक्षाही खाली गेली असतांना टेंभू, म्हैसाळ आणि इतर धरणातून पाणी पोहचविण्याची व्यवस्था असतांना किंबहुना यासंदर्भात दोन कार्यक्रम माननीय श्री. अजित पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली झाले होते. दोन धरणाचे पाणी सोडण्याकरिता ज्या पध्दतीने पाणी गेले त्यावेळेस जत मध्ये आदरणीय मुख्यमंत्री सुध्दा उपस्थित होते. आपण तिकडच्या लोकांना पाणी पोहचविण्याचे काम केल्यामुळे मी सुध्दा आपले अभिनंदन केले होते. मराठवाडा तहानलेला असतांना त्याला पाणी पुरवण्याची कोणतीही यंत्रणा नाही. दुर्दैवाने मराठवाडयाला टँकरनेच पाणी पुरवठा केला जातो. मराठवाडयामध्ये योजना निर्माण करुन भविष्यातील दुष्काळाला पश्चिम महाराष्ट्राबरोबर साथ द्यावी अशी अपेक्षा असतांना आपण जाहिराती मधून पुरंदर, माण, खटाव, जत, कवठेमहांकाळ, खानापूर, कडेगाव, मिरज, तासगाव, आटपाडी, पारनेर, संगमनेर, सांगोला, मंगळवेढा व भूम या ठिकाणी पहिला टप्पा जाहीर केला. आमच्या आमदारांनी पाण्यासाठी 15 दिवस उपोषण केले होते. जालन्यामध्ये तीव्र दुष्काळ आहे. बीडमध्ये तर दुष्काळाने कहर केलेला आहे. अशी सर्व परिस्थिती असतांना पहिला टप्पा मराठवाडयाला डावलून पश्चिम महाराष्ट्राला दिला गेला व तो सुध्दा परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना विनम्र अभिवादन करुन. मराठवाडयामध्ये पददलित जनतेच्या आकांक्षेला आंबेडकरांच्या नावाने कोठेही निळा टिळा पाण्याने लावला नाही. कोणी कोणाचा अपमान केला हे ज्याने त्याने ठरवावे.

सभापती महोदय, काल सन्माननीय सदस्य श्री. भाऊसाहेब फुंडकर यांनी चांगला प्रश्न मांडला होता. त्यासंदर्भात आपण जे निदेश दिले त्याबद्दल मला काही बोलावयाचे नाही. हा प्रश्न महाराष्ट्र व्यापी होता त्यामुळे तो अतारांकित व्हावयास पाहिजे. आपण जलसंधारणाच्या कामासाठी 22 कोटी रुपये दिले आहेत त्यातील किती पैसे कोणकोणत्या जिल्हयाला दिले गेले याची विभागवार माहिती मिळाली तर चांगले होईल. परंतु माझ्या माहिती प्रमाणे यातील 90 टक्के हिस्सा पुण्यामध्ये गेलेला आहे. यासंदर्भात माझी चूक व्हावी अशी अपेक्षा आहे. यासंदर्भात आपण उत्तरात माहिती दिली तर मला आनंद होईल. सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर याचा प्रश्न अतारांकित न झााल्यामुळे आम्हाला यासंदर्भात माहिती मिळाली नाही.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ......

सभापती महोदय,दुष्काळग्रस्त भागामधील धाराशिव मधील आळणी, खामगांव, ढोकी, खेड, रुहीढोकी तसेच कळंब येथील हाशेगांव, शिराढोण, केवडगांव, नागूरगांव, बीड जिल्हयातील अंतरवन-पिंपरी, भावणी, खमांडवदाळी, पाली, विमानगाव, पालीतलाव, आष्टीतलाव, संभाजीनगर जिल्हयातील कदीमशहापूर, नंदाद्रबाद, कोडापूर धांदर्डी, गंगापूर येथील वडगाव कोल्हाटी, कन्नड येथील औराळा, खामगाव, परतुर येथील शिंगोणा, पांडेपाखरी, परतवाडी, सुरमगांव, खांडवी, तसेच मंठा येथील तळतोंडी, पेवा, शेळके, अंभूर, आंदवाडी या सर्व गावांमध्ये मी गेलो, तेथील गावकऱ्यांना भेटलो, दुष्काळी परिस्थिती पाहिली. त्या ठिकाणी सेल्फवर आजही कामे आहेत परंतु ती सुरु झाली नाही. कामे सुरु करण्याच्या संदर्भात मी जिल्हाधिकाऱ्यांना भेटलो. आता नवीन जीआर काढण्यात आला असून 50 लोकांनी जरी कामाची मागणी केली तरी त्यांना आता काम दिले जाणार आहे. आपण जनावरांच्या छावण्यांचे काम थांबवलेले आहे. जनावरांच्या छावण्यांचे डिपॉझीट घेण्याचे आपण बंद केले ही स्वागतार्ह बाब आहे. मराठवाडयामध्ये छावण्यांच्या संदर्भात ज्या पध्दतीने काम व्हावयास पाहिजे त्या पध्दतीने झालेले नाही.

सिमेंट बंधाऱ्याचे किती प्रस्ताव आले आहेत यासंदर्भात मी जिल्हाधिकाऱ्यांकडे चौकशी केली होती. संभाजीनगर मधील गेवराई कुबेर, पैठणमध्ये डोणगाव, फुलंब्री येथे निधोना, गंगापूर येथे जांभाळा, सिल्लोड येथे वजीरवाडी

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

कन्नडमध्ये औरोळा, खामगाव मध्ये मी गेलो.परतूरमध्ये शिगोणा, पडेखासरी, परतवाडी, सुरणगाव, खांडवी या गावामध्ये मी गेलो. मणका मध्ये धरतोडी, अंबुरे आणि आंधळवाडी येथील गावकऱ्यांना भेटलो. दुष्काळाची परिस्थिती पाहिली. तेथे सेल्फवर कामे असली तरी ती आजही सुरु झालेली नाहीत आणि ती कामे सुरु झाली नसली तरी मी आज सरकारकडे तक्रार केलेली नाही. मग मी जाऊन जिल्हाधिकाऱ्यांना भेटलो. लोक कामाची मागणी करीत आहेत. आता एक नवीन जी.आर. काढण्यात आला आहे. त्यानुसार किमान पन्नास माणसे असली तरी कामे देऊ. त्या नुसार गावामध्ये कामे द्यावी. आता तुम्ही जनावरांची छावणी थांबविली आहे. डिपॉझिट बंद केले आहे. माननीय वित्त मंत्री श्री.अजितदादा पवार यांनी स्वागतार्ह निर्णय घेतला. त्याबद्दल आम्हाला आनंद झाला.

सभापती महोदय, गावामध्ये 200, 300, 500 जनावरे असतात, तेथे गावामध्येच छावणी द्यावी म्हणजे जनावरे कामाला जातील आणि परत छावणीमध्ये येतील. मी मराठवाड्यातील अनेक गावांमध्ये फिरत असताना अजूनही त्या प्रकारची हालचाल मला जाणवली नाही. त्याच वेळेला मी जिल्हाधिकारी यांच्याकडे चौकशी केली की, सिमेंट बंधाऱ्यांचे प्रस्ताव किती आले आहेत? याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडीत बसलेले आहेत, सन्माननीय सदस्य श्री.सुरेश नवले अण्णा बसलेले आहेत. संभाजीनगर मध्ये गेवराई, कुबेर, पैठण मध्ये ढोणगाव, फुलंब्री मध्ये निढोणा, गंगापूरमध्ये जामरा, सिल्लोडमध्ये वंजीरवाडी, कन्नडमध्ये मुंजापूर, जेऊर, सोयगामध्ये उमरगीर, बीड मध्ये शहाजहानपूर, जेरुरा व वरगाडी आष्टीमध्ये बागृत, जामगाव, देऊळगाव, शेळी, डोंगरगड, आष्टा, पाटोडामध्ये कुसळगाव, वैजाळा, चौसाळा, शिरुरमध्ये रायमोहा, धनगरवाडी, गेवराई मध्ये दोन-चार कमी पडले तर सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडीतसाहेब सांगतील. गेवराई मध्ये आड-पिंपळी, जसुलावा, बंगाली-पिंपळी . . . .

(काही सन्माननीय सदस्य खाली बसून बोलतात.)

**उप सभापती** : मघाशी माननीय सभापती साहेबांनी बोलाविल्यानंतर आमची जी चर्चा झाली, त्या चर्चेच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांना बोलावयास दिले आहे. कृपया त्यांच्या भाषणामध्ये व्यत्यय आणू नका. सन्माननीय सदस्यांना जेथे भाषण थांबवावयाचे असेल तेथे ते थांबवतील.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझे भाषण थांबविण्याचा काय विषय आहे? मी नियम 289 च्या प्रस्तावाबाबत बोलत आहे.



असुधारीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(काही सन्माननीय सदस्य खाली बसून बोलतात.)

**उप सभापती** : याठिकाणी नियम 97 अन्वये चर्चा सुरु आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, सदरहू चर्चा सुरु झाली आहे काय?

**उप सभापती** : नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, नियम 289 अन्वये चर्चा सुरु आहे.

**उप सभापती** : मुळात नियम 289 अन्वये या चर्चेबाबत प्रस्तावाची सूचना दिलेली होती. पण मूळात सदर नियम 289 अन्वयेची सूचना नाकारण्यात आली होती. दुपारी मध्यंतरानंतर मला माननीय सभापतींकडे बोलाविण्यात आले, तेव्हा आपण सर्वजण तेथे उपस्थित होतो आणि त्यावेळी सदरहू चर्चा नियम 97 खाली घेण्यात यावी आणि त्यावर तेथे दोन सन्माननीय सदस्य बोलतील अशा त्यांनी मला सूचना दिलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आणि दुसरे सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर या चर्चेमध्ये भाग घेतील. सदरहू विषय 45 मिनिटांमध्ये संपवावयाचा असून त्यानंतर पुढील विधेयके चर्चेसाठी घ्यावयाची आहेत अशा सूचना मला देण्यात आल्या होत्या आणि असे सर्व ठरल्यानंतर मी त्याप्रमाणे कामकाज पुकारत आहे.

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : या चर्चेसाठी एक तास दिला आहे.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, या विषयाच्या संबंधात विचार व्यक्त करण्यासाठी दोन्ही सन्माननीय सदस्यांना 45 मिनिटांचा वेळ दिला असेल तर मग माननीय मंत्री महोदयांना उत्तराच्या भाषणा साठी किती वेळ देण्यात आला आहे?

**उप सभापती** : मी माननीय उप मुख्यमंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, हे सर्व कामकाज आपल्याला 45 मिनिटांमध्ये पूर्ण करावयाचे आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अगोदर माननीय मंत्री महोदयांनी 45 मिनिटांचा वेळ सांगितला होता. त्यानंतर आम्ही उठून उभे राहिलो तेव्हा माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरासहित एक तासाचा वेळ मिळाला पाहिजे म्हणून एक तासाची वेळ करण्यात आली होती. सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकलेसाहेब, मी जे सांगत आहे, ते बरोबर आहे ना.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, होय.

**उप सभापती** : ठीक आहे. आता सन्माननीय सदस्यांनी वेळ घालवू नये. सन्माननीय सदस्यांना जे काही बोलावयाचे असेल तर ते लवकर बोलावे.

3 सी-3 . . . .



श्री.रामदास कदम : सभापती महोदय,माझा अधिकार आहे. वेळ घालवू नका म्हणजे काय?

असुधारीत प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

**उप सभापती** : मी याठिकाणी बोलत असताना सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम कशासाठी उभे राहिले आहेत?

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझा अधिकार आहे.

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आता तुम्ही वेळ वाया घालवू नका. सन्माननीय सदस्यांना जे काही बोलावयाचे असेल ते पटकन बोलावे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, सदरहू प्रस्तावावर कोणी बोलावयाचे हे गटनेत्यांनी ठरविले पाहिजे. माननीय सभापतींच्या दालनामध्ये कसे ठरणार? या प्रस्तावावर माझे देखील नाव आहे. पण या सभागृहामध्ये कुठल्या प्रस्तावावर कोणी बोलावयाचे हे जर माननीय सभापतींच्या दालनात निश्चित होणार असेल तर आम्ही उद्यापासून तुमच्यासोबत येणार नाही. जर माननीय सभापतींच्या दालनामध्ये कोणी बोलावयाचे याचा निर्णय होणार असेल तर मग आम्ही उद्यापासून तोंडाला पट्टी लावून येतो.

(यानंतर सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम निषेध करुन सभागृहाच्या बाहेर जातात.)

श्री.अजित पवार : सभापती महोदय, मला नुकताच माननीय सभापतींचा निरोप आला आहे की, नियम 97 अन्वये चर्चा करण्याच्या बाबतीत निर्णय घेतलेला आहे. अगोदर मला हा विषय कळला नव्हता. मी येथे येण्याअगोदर पासून ही चर्चा सुरु होती. या संबंधात उत्तर देताना असे सांगितले जाईल की, आम्हाला माहिती द्यावी. तर तुम्ही शासनाला थोडीशी संधी दिली पाहिजे या दृष्टीने हस्तक्षेप करावा.

सभापती महोदय, या प्रस्तावावर सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर व सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते बोलणार आहेत आणि काही सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनाही बोलण्याची संधी द्यावी आणि उद्या सकाळी खास बैठक घेऊन माननीय मंत्री महोदयांनाही उत्तरासाठी अर्ध्या तासाची वेळ देता येईल.जेणेकरुन सन्माननीय सदस्य जे मुद्दे उपस्थित करतील, त्याचा अभ्यास करुन माननीय मंत्री महोदय उत्तर देऊ शकतील.

यानंतर श्री.अ.शिगम . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, जालना येथील मंठेवाडीमध्ये टेपेवाडी, भोकरदन येथे बंजाळ साबळे, घनसावंगी येथे निबोनी व कंदाळी या भागात बंधाऱ्याचे प्रस्ताव प्रस्तावित आहेत. या व्यतिरिक्त दुष्काळी भागात मोठ्या प्रमाणावर प्रस्ताव आले असतील.

सभापती महोदय, मराठवाड्यात मोठ्या प्रमाणावर अनुशेष आहे. त्या भागाला कृष्णा खोऱ्याचे पाणी मिळत नाही. त्या ठिकाणी जे काही प्रकल्प होणार आहेत ते पूर्ण होण्यासाठी आणखी पाच-सहा वर्षे लागतील आणि त्यामध्ये 60 टीएमसी पाणी जमा होईल अशी परिस्थिती आहे.

सभापती महोदय, कायम स्वरुपी दुष्काळी भागासाठी आलेला निधी हा फक्त पश्चिम महाराष्ट्रासाठी वापरला जाणार असेल आणि मराठवाडयाची अशाप्रकारे उदासीनता होत असेल तर ती अतिशय गंभीर बाब आहे अशी चर्चा मी या प्रस्तावाच्या निमित्ताने उपस्थित केलेली आहे.

सभापती महोदय, मला येथे खुलासा करावयाचा आहे की, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांचा काहीतरी गैरसमज झालेला आहे. या चर्चेसाठी आम्हाला 45 मिनिटांऐवजी एक तास द्यावा असा आग्रह आम्ही माननीय सभापतींकडे धरला होता. सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर म्हणाले की, मला देखील या विषयावर बोलायचे आहे कारण त्यामध्ये विदर्भाचा देखील विषय आहे. तेव्हा माननीय सभापतींनी त्यांना देखील बोलण्याची संधी मिळेल असे सांगितले. हा मराठवाड्याचा विषय असल्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित आणि सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांनी देखील या चर्चेवर बोलावे असे मी सांगितले. तेव्हा अमुक एका सदस्याने बोलावे आणि दुसऱ्याने बोलू नये हा माझा विषय होत नाही. या विषयावर बोलण्यासाठी मी त्यांना माझ्या प्रस्तावाची झेरॉक्स प्रत देखील दिलेली आहे.

सभापती महोदय, या प्रस्तावावर ज्या सन्माननीय सदस्यांची नावे आहेत त्यांना बोलू देण्याचा अधिकार आपला आहे आणि आपण त्यांना तो दिला पाहिजे. आम्ही माननीय सभापतींकडे या प्रस्तावाची वेळ बदलून मागण्यासाठी गेलो होतो. कारण माननीय सभापतींनी नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावानंतर आमचा प्रस्ताव घेण्यात येईल असे सांगितले होते. नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चेसाठी बराच वेळ लागणार आहे आणि त्यामुळे आमच्या प्रस्तावाचे महत्व कमी होईल असे आम्ही त्यांना सांगितले.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

सभापती महोदय, या विषयावर कोणाला बोलू द्यायचे किंवा कसे हा आपला अखत्यारितील विषय आहे. मी त्या संदर्भात नावे सांगण्याचा प्रश्न येत नाही आणि मला देखील कोणी तसे विचारले नाही. आपण फक्त वेळेची मर्यादा घालून दिली. तातडीचा विषय आहे तेव्हा वेळेमध्ये चर्चा झाली पाहिजे असा आपण आग्रह धरला.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर म्हणाले की, इतक्या कमी वेळेत चर्चा कशी होईल ? त्यावर मी त्यांना सांगितले की, आपण चर्चा सुरु करु या. सन्माननीय मंत्री श्री.भास्कर जाधव म्हणाले की, आपण चर्चा सुरु करावी आपणास नंतर वेळ वाढवून घेता येईल. आताच माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार म्हणाले की, या चर्चेवरील उत्तर उद्या घ्यावे. थोडक्यात आपण चर्चा मान्य करुन घेणे महत्वाचे असते. तेव्हा कोणाचे गैरसमज नसावेत. याकरिता मी हा खुलासा केलेला आहे.यामध्ये माझा काही संबंध नाही. कोणी बोलू नये असे सांगण्याचा माझा विषय नाही. मी हे ना दालनात सांगितले ना येथे सांगितले. आपल्याकडून असे जाहीर होते त्यावेळी दुर्दैवाने असे गैरसमज निर्माण होतात.

सभापती महोदय, आपल्याकडे रोजगार हमी योजनेची कामे होत नाहीत. आपण गावामध्ये चारा छावणी काढली तर जनावरे उपलब्ध होतील असे असताना देखील चारा छावणी काढली जात नाही अशी परिस्थिती आहे. त्या ठिकाणी टँकरने पाणी पुरवठा देखील व्यवस्थित होत नाही.

सभापती महोदय, कायम स्वरुपी दुष्काळी भागात कायम स्वरुपी योजना करण्याच्या संदर्भात शासनाच्या महत्वाकांक्षी कार्यक्रमातून मराठवाड्याला वगळणार असाल तर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विद्यापीठाचे नाव देऊन मराठवाड्यामध्ये जे विद्यापीठ उभे आहे त्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा अवमान नाही काय असा प्रश्न आमच्या मनात देखील निर्माण होतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या अवमानाचा विषय काढला म्हणून मी हे बोलतो आहे. दुष्काळग्रस्त भागामध्ये तातडीने योजना राबविल्या गेल्या पाहिजेत या आग्रहातून मी चर्चा उपस्थित केली आहे. मराठवाड्यावर जो अन्याय केलेला आहे त्याची जाण करुन देत असताना सरकार सर्वच प्रकल्प पश्चिम महाराष्ट्रामध्ये करणार असेल आणि मराठवाड्याला असेच दुर्मुख ठेवणार असेल तर भविष्यात मराठवाडा पाणी पेटविल्याशिवाय राहणार नाही हे मी या निमित्ताने सांगतो.

..3.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

सभापती महोदय, संपूर्ण पश्चिम महाराष्ट्रात 143 कोटी रुपयांचे 1486 बंधारे बांधण्यासाठी घेतलेले आहेत. तेव्हा मराठवाड्यात देखील अशाप्रकारचे बंधारे बांधण्यात येतील अशी घोषणा करावी आणि ते काम कोणत्या तारखेला सुरु करणार याची देखील माहिती मंत्री महोदयांनी आज द्यावी. मराठवाड्यातील कायम स्वरुपी दुष्काळी भागाकरिता उपाय योजना करण्याकरिता कोणती पावले उचलणार आहात याची माहिती द्यावी. सभापती महोदय, आपण मला अल्पकालीन सूचना मांडण्याची परवानगी दिली त्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण पूर्ण करतो.

--------

यानंतर श्री.बोर्डे..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ KTG/ D/ पूर्वी श्री.अजित... 16:20

श्री.पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आम्ही सकाळी नियम 289 अन्वये चर्चा उपस्थित करण्याबाबतची सूचना दिली होती. सर्व भागाच्या भूगर्भातील पाण्याची पातळी वाढली पाहिजे हा त्या मागील मुख्य उद्देश होता. पिण्याच्या पाण्याची कायमस्वरुपी व्यवस्था झाली पाहिजे आणि जमिनीची धूप थांबून त्यातून सिंचनाची सोय निर्माण करुन कृषी उत्पादनात वाढ करण्याच्या दृष्टीने सिमेंटच्या साखळी नाला बंधाऱ्याची योजना पुढे आली.

सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंती निमित्त परवा "साखळी पध्दतीने सिमेंट नाला बांध घालून दुष्काळावर कायमस्वरुपी उपाययोजना करण्याचा शासनाचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम" या मथळ्याखाली जाहिरात प्रसिध्द झाली होती. या जाहिरातीचे अभिनंदन आम्ही सुध्दा करतो. परंतु दु:ख असे आहे की, जलसंधारण मंत्री हे आमच्या विदर्भातील आहेत. माननीय मंत्री डॉ.नितीन राऊत, आपण हा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम जाहीर केला आहे. यामध्ये मराठवाड्यातील केवळ भूम या एका तालुक्याचा समावेश केला आहे. परंतु विदर्भातील एकाही तालुक्याचा या कार्यक्रमात समावेश केला नाही. मी आपल्याला विचारु इच्छितो की, विदर्भ दुष्काळी नाही काय ? 1978 पूर्वी विदर्भातील 87 तालुक्यांचा सर्व्हे झाला होता. त्यामध्ये विदर्भातील काही तालुके कायमस्वरुपी दुष्काळी होते. सिंचनाची सरासरी काढली तर विदर्भ आणि मराठवाड्यातील सिंचनाचा अनुशेष हा पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत मोठ्या प्रमाणावर आहे.

महोदय, हा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम दि.29 मे, 2012 पासून राबविण्यास सुरुवात झाली. राज्यातील 15 तालुक्यांमध्ये पहिल्या टप्प्यात 186 बंधारे बांधण्यास सुरुवात केली. या कार्यक्रमावर 143 कोटी रुपये खर्च झाला आहे. 15 तालुक्यांमध्ये हा कार्यक्रम राबविण्याला आमचा विरोध नाही. पण हा कार्यक्रम कोठे राबवावा ? पुणे जिल्ह्यातील पुरंदर, सातारा जिल्ह्यातील माण व खटाव, सांगली जिल्ह्यातील जत, कवठे महांकाळ, खानापूर, कडेगाव, मिरज, तासगाव व आटपाडी, नगर जिल्ह्यातील पारनेर व संगमनेर, सोलापूर जिल्ह्यातील सांगोला व मंगळवेढा आणि उस्मानाबाद जिल्ह्यातील भूम तालुक्यात हा कार्यक्रम राबविला आहे. हा कार्यक्रम राबविलेल्या जिल्ह्यांपैकी उस्मानाबद जिल्हा वगळता सर्व जिल्ह्यात सिंचनाचे प्रमाण सर्वाधिक आहे. ज्या ठिकाणी सिंचनाचे प्रमाण अधिक आहे त्या ठिकाणी हा कार्यक्रम राबविला जाणार असेल तर खऱ्या अर्थाने विदर्भ व मराठवाड्याला न्याय मिळणार आहे काय ?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

महोदय, विदर्भ, मराठवाडा हा संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत सहभागी होऊन मराठी भाषिक राज्य व्हावे म्हणून महाराष्ट्रात सामिल झाला आणि त्या वेळी नागपूर करार झाला. नागपूर करारान्वये विदर्भ-मराठवाडा या दोन्ही भागाला निधीचे समन्यायी वाटप करण्याचे मान्य करण्यात आले. परंतु समन्यायी निधीचे तत्त्व कोठेही पाळले नाही. त्यामुळे विदर्भ आणि मराठवाड्याचा अनुशेष निर्माण झाला. विशेष करुन सिंचनामध्ये मोठ्या प्रमाणावर अनुशेष निर्माण झाला.

सभापती महोदय, सिंचनाचे सर्वाधिक प्रमाण असलेल्या सांगली जिल्ह्यातील मिरज व आटपाडी तसेच सातारा जिल्ह्यातील माण व खटाव या तालुक्यांचा या कार्यक्रमाच्या यादीत समावेश केला त्याबद्दल आमचे काही म्हणणे नाही. किंबहुना त्याबद्दल आमचे काही दुमत नाही. परंतु या कायमस्वरुपी दुष्काळी तालुक्यांबरोबर एका बलाढ्य मंत्र्याच्या मतदारसंघाचा सुध्दा त्यात समावेश करण्यात आला. ज्या ठिकाणी सिंचनाची पुरेपूर व्यवस्था आहे, अशा तालुक्यांचा या कार्यक्रमात समावेश करण्यास आमची हरकत आहे. विदर्भ आणि मराठवाड्यात आम्ही जन्म घेतला हा आमचा दोष आहे काय ? माननीय जलसंधारण मंत्री विदर्भातील आहेत. मी त्यांना विचारु इच्छितो की, विदर्भ दुष्काळी नाही काय ? बुलढाणा जिल्ह्यातील शेकडो गावांमध्ये 50 पैशांपेक्षा कमी आणेवारी आहे. या भागात सुध्दा मोठ्या प्रमाणावर अडचण आहे. मराठवाडा किंवा पश्चिम महाराष्ट्रातील काही भागात पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई आहे हे खरे असले तरी त्यापेक्षा भयानक टंचाई मराठवाड्याच्या बाजूला लागून असलेल्या बुलढाणा जिल्ह्यात आहे. विदर्भात 87 तालुके कायमस्वरुपी दुष्काळी आहेत. त्यामध्ये बुलढाणा जिल्ह्यातील 4 तालुक्यांचा समावेश आहे. अशा परिस्थितीत आपण हे तालुके या महत्त्वाकांक्षी कार्यक्रमात का घेतले नाहीत ? मुळात राज्य सरकारने अशा प्रकारचा भेदभाव न करता समन्यायी पध्दतीने मराठवाडा व विदर्भातील तालुक्यांचा या महत्त्वाकांक्षी कार्यक्रमात समावेश केला असता तर आमच्यावर आज नियम 289 ची सूचना देण्याची वेळ आली नसती.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ......

ज्या विदर्भामध्ये हजारो शेतकरी आत्महत्या करीत आहेत, कर्ज बाजारी होत आहेत, सिंचनाचा बॅकलॉग निर्माण झालेला आहे त्या विदर्भाकडे आपण सोयीस्कर दुर्लक्ष करीत आहात. जीगाव सारख्या महत्वाकांक्षी प्रकल्पाच्या माध्यमातून 70 हजार हेक्टरला पाणी पुरवठा होणार होता पण तो प्रकल्प गेली दहा वर्षे रखडलेला आहे. या वर्षी त्या प्रकल्पासाठी फक्त 160 कोटी रुपये दिले. पण ते पैसे कोणासाठी दिले ? 500 कोटी रुपयांचे कंत्राटदाराचे बिल राहिले म्हणून 160 कोटी रुपयांची तरतूद केली. 70 हजार हेक्टरचे सिंचन होणाऱ्या प्रकल्पाच्या बाबतीत सुध्दा शासनाने आम्हाला मागे टाकले आहे. मागच्या वर्षी त्या प्रकल्पाचे 170 कोटी रुपये बेंबळा प्रकल्पासाठी पळविले. त्यामध्येही आपण आमच्यावर अन्याय केला. असा अन्याय करीत करीत विदर्भातील सिंचनाचा बॅकलॉग जाणीवपूर्वक वाढवित आहात. विदर्भामध्ये जलसंधारणाची कामे देत नाहीत. सिमेंटचे साखळी पध्दतीचे बंधारे घेत असताना ज्या ठिकाणी सिंचनाचा बॅकलॉग आहे ते तालुके त्यामध्ये घेतले असते तर आम्ही आपले अधिक अभिनंदन केले असते. जे तालुके घेतले त्याला आमचा विरोध नाही पण हे तालुके घेत असताना जर आपण समन्यायी वाटप केले असते तर आम्हाला निश्चितपणे अभिमान वाटला असता. परंतु मराठवाडा आणि विदर्भाला अशा पध्दतीने प्रत्येक ठिकाणी जर तुम्ही जाणीवपूर्वक डावलण्याच्या प्रयत्न करणार असाल तर मराठवाड्यातील आणि विदर्भातील जनता आता हे सर्व सहन करण्याच्या पलीकडे चाललेली आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये भयानक दुष्काळ आहे. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये गेले चार सहा महिने दुष्काळाची ओरड चालू आहे. आपण हजारो कोटी रुपये खर्च करीत आहोत. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितल्याप्रमाणे काल एका प्रश्नाला उत्तर देत असताना असे सांगण्यात आले की, शासनाकडून चाऱ्यासाठी इतका खर्च झाला, छावण्यांसाठी इतका खर्च झाला, पाण्यासाठी इतका खर्च झाला. त्यावेळी आम्ही मागणी केली की, शासनाने त्या खर्चाचा ब्रेकअप द्यावा. चारा छावण्यासाठी कोणत्या जिल्ह्यात किती खर्च केला, पिण्याच्या पाण्यासाठी कोणत्या जिल्ह्यात किती खर्च केला याची माहिती द्यावी.

सभापती महोदय, दुष्काळाच्या नावाखाली उपसिंचन योजनेच्या वीज बिलाच्या माफीसाठी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ D/ KTG/

श्री. पांडुरंग फुंडकर .....

125 कोटी रुपयांचा निधी शासन मंजूर करीत आहे. हे दुष्काळाचे पैसे आहेत. ज्यांनी मागच्या वेळेला उपसिंचन योजना निर्माण केल्या, ज्यांनी पाण्याचा वापर केला, ज्यांनी जाणीवपूर्वक वीज बिले भरलेली नाहीत, ज्यांनी जाणीवपूर्वक वीज बिले थकविली अशा लोकांचा उल्लेख यामध्ये करुन त्यांना वीज बिलाची माफी आपण दिली. त्यापैकी विदर्भाला किती माफी दिली, मराठवाड्याला किती माफी दिली ? माझ्या माहितीप्रमाणे उत्तर महाराष्ट्रातील फक्त एक सिंचन योजना त्यामध्ये आहे.

सभापती महोदय, वीज बिलाची माफी देतानाही मराठवाडा आणि विदर्भावर अन्याय होतो. सिमेंट बंधारे देताना विदर्भ आणि मराठवाड्यावर अन्याय होतो. धरणांची कामे करताना, निधीचे वाटप करताना विदर्भ आणि मराठवाड्यावर अन्याय होतो. साखळी पध्दतीचे सिमेंट बंधारे देतानाही जर विदर्भ आणि मराठवाड्यावर अन्याय होणार असेल तर आम्ही निधीचे समन्यायी वाटप करतो हे शासनाचे म्हणणे बरोबर नाही. आपण हा कार्यक्रम महाराष्ट्रामध्ये निश्चितपणे राबवावा. परवा मी माझ्या भाषणामध्ये सांगितले की, या महाराष्ट्रामध्ये 3 कोटी बोअर झाल्या. या महाराष्ट्रामध्ये 3 कोटी बोअर झाल्यामुळे भूगर्भातील पाणी उपसले गेले, पाण्याचे पुनर्भरण झाले नाही त्यामुळे पाण्याची पातळी इतकी खाली गेली आहे की, एक हजार फुटापेक्षाही खाली गेलो तरी बोअरला पाणी लागत नाही अशी परिस्थिती महाराष्ट्रामध्ये निर्माण झालेली आहे.

सभापती महोदय, परवा मी माननीय उप मुख्यमंत्र्यांना असे सुचविले होते की, आपण आमदार निधीमध्ये 50 लाख रुपयांची वाढ करावी. प्रत्येक आमदाराला 50 लाख रुपये वाढवून द्यावे ते वाढवित असताना असे बंधन घालावे की, आमदार निधीच्या अडीच कोटी रुपयांपैकी 50 लाख रुपयांमध्ये फक्त आपापल्या मतदारसंघामध्ये सिमेंट बंधारे बांधावेत, जलसंधारणाची कामे करावीत. आमदार निधीतून आपण अशा प्रकारचा कायमस्वरुपी कार्यक्रम केला पाहिजे. आपल्याला जर दुष्काळावर कायमस्वरुपी मात करणाऱ्या योजना करावयाच्या असतील तर निश्चितपणे असा कार्यक्रम घेतला पाहिजे. पण ज्या ठिकाणी सिंचन आहे, ज्या ठिकाणी भूगर्भातील पाण्याची पातळी उंचावलेली आहे अशा ठिकाणी सिमेंट बंधारे घेऊन जो पोटभर जेवलेला आहे त्यालाच जर तुम्ही

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ D/ KTG/

श्री. पांडुरंग फुंडकर .....

जेवू घालण्याचा प्रयत्न करणार असाल आणि जो उपाशी आहे, ज्याला भूक लागलेली आहे, आपल्या ताटात कोणी तरी अन्न टाकेल अशा आशेने जो पाहात आहे त्या माणसाला उपेक्षित ठेऊन जर तुम्ही राज्य करणार असाल तर जनतेवर अन्याय केल्यासारखे होईल. एवढेच मला या ठिकाणी सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, माननीय मंत्री डॉ. नितीन राऊत यांना सांगू इच्छितो की, या ठिकाणी उत्तर देत असताना आपण मराठवाड्याच्या आणि विदर्भाच्या पदरात काही तरी टाकले पाहिजे. आपण विदर्भातील मंत्री आहात. या महत्वाकांक्षी योजना देत असताना जाणीवपूर्वक विदर्भाला आणि मराठवाड्याला न्याय देण्याचे काम आपण करावे एवढीच आग्रहाची विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

---

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, नियम 97 अन्वये उपस्थित करण्यात आलेल्या चर्चेवर माझी मते मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. मला संधी दिल्याबद्दल मी आपले मनापासून आभार मानतो.

सभापती महोदय, एका वर्तमानपत्रातील एका जाहिरातीमुळे आज ही अल्पकालीन चर्चा उपस्थित करण्यात आलेली आहे. "भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त जलसंधारण विभागातर्फे विनम्र अभिवादन. साखळी पध्दतीने सिमेंट बंधारे बांधून दुष्काळावर कायम स्वरुपी उपाययोजना करण्याचा शासनाचा महत्वाकांक्षी कार्यक्रम." या जाहिरातीची हेड लाईन खूप काही बोलून जाते. दुष्काळी तालुक्यांपैकी पुरंदर, माण, खटाव, जत, कवठेमहांकाळ, खानापूर, कडेगाव, मिरज, तासगांव, आटपाडी, पारनेर, संगमनेर, सांगोला, मंगळवेढा आणि भूम या तालुक्यांचा यात उल्लेख केलेला आहे. यापैकी काही तालुके कायम दुष्काळी आहेत हे मला मान्य आहे. मराठवाड्यातील भूम हा तालुका चुकून त्यात आलेला आहे असे मला वाटते. परंतु चुकून का होईना भूम तालुक्याचा त्यात उल्लेख आलेला आहे. परंतु विदर्भातील एकाही तालुक्याचा उल्लेख करण्यात आलेला नाही.

मंत्री महोदय विदर्भातील आहेत. परंतु पैशाचे वाटप करीत असताना विदर्भातील एकही तालुका त्यात येऊ नये यापेक्षा दुसरे दुर्दैव असू शकत नाही. विदर्भ व मराठवाडा यासारखा दुष्काळी भाग नाही. आम्ही समदु:खी असल्यामुळे मंत्री महोदय आमचे आहेत असे मी म्हणतो. दुष्काळी तालुक्यांना निधी देत असताना नवीन दुष्काळी तालुक्यांची घोषणा झालेली आहे त्या तालुक्यांना म्हणजे पुरंदर, माण, संगमनेर या तालुक्यांना अधिकच्या रकमेचे वाटप झाल्याचे दिसून येते. माननीय मुख्यमंत्री बीड येथे 12 तारखेला आले होते. त्याच दिवशी नेमके विधानपरिषदेचे बॅलेट होते. त्या दिवशी त्यांनी असे जाहीर केले होते की, ज्या तालुक्यांची आणेवारी 50 पैशापेक्षा कमी आहे त्या तालुक्यांसाठी 10 कोटी रुपये देऊन जलसंपदा विभागामार्फत सिमेंट बंधारे बांधले जातील. माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर करुनही बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील सर्वच्या सर्व 193 गावांमध्ये 50 पैशापेक्षा कमी आणेवारी असतानाही तेथे सिमेंट बंधाऱ्याची कामे मंजूर करण्यात आली नाहीत. गोदावरी नदी आता कोरडी पडण्याची वेळ आलेली आहे. संगमनेर तालुक्यातील सिमेंट बंधाऱ्यांसाठी मात्र 10-10 कोटी रुपये उपलब्ध करुन दिले जातात.

2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/ ST/ D/

श्री.अमरसिंह पंडित........

आमचा मूळ आक्षेप असा आहे की, उत्तर महाराष्ट्रातील लोकांनी आमचे पाणी अडविले आहे आणि त्याच भागात मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करुन दिला जातो. माननीय मंत्री श्री.राजेश टोपे यांचा जालना जिल्हा, बीड, उस्मानाबाद आणि विदर्भातील काही जिल्हे येथे भीषण दुष्काळ आहे. आपण विदर्भातील मंत्री असतानाही विदर्भ व मराठवाड्याबाबत विचार केला जात नसेल तर आम्ही कोणाकडे दाद मागावयाची ? आपलीच माणसे आमचा विचार करीत नसतील तर आम्ही कोणाकडे बोलावयाचे ?

या अल्पकालीन चर्चेद्वारे दुष्काळाचा विषय हाताळत असताना शासनाची अशी धारणा असू शकेल की, तुमच्या भागात टँकरने पाणी पुरवठा केला जात आहे. तुमच्या भागात एमआरजीएसची कामे चालू आहेत. परंतु जत तालुक्यासाठी आकस्मिकता निधीतून 15-20 कोटी रुपये घेतले जातात. दुष्काळाच्या नावाखाली तुमच्या भागातील कालव्याची कामे केली जात आहेत. पिण्याच्या पाण्यासाठी हा खर्च केला असता तर आमचे काही म्हणणे नव्हते. परंतु आमच्या भागासाठी असा विचार का होऊ शकत नाही ? ही राजकीय इच्छाशक्ती विदर्भ व मराठवाड्यासाठी का निर्माण होत नाही ? मंत्री महोदयांनी अशी इच्छाशक्ती दाखवावी अशी आपल्याकडून आम्ही अपेक्षा व्यक्त केली तर त्यात काही गैर आहे असे वाटण्याचे कारण नाही. आम्ही आपल्यासंबंधी या सदनात येण्यापूर्वी बरेच काही ऐकलेले आहे. विदर्भातील ढाण्या वाघ असे आपल्या विषयी वर्तमानपत्रातून लिहिले जात होते.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अमरसिंह पंडित...

हा विदर्भाचा ढाण्या वाघ कोठे गेला ? विदर्भाबद्दल आणि मराठवाड्याबद्दल तुम्ही बोलत नाही. उद्या पश्चिम महाराष्ट्राकडे हे खाते गेल्यानंतर त्यांच्या दरवाज्यात त्यांच्या उंब-यावर जाऊन आम्ही बसावे असे तुम्हाला वाटत असेल तर तुमचे आमचे दुसरे दुर्दैव असू शकणार नाही.

या दुष्काळी परिस्थितीमध्ये 50 पैशा पेक्षा कमी आणेवारी असलेल्या प्रत्येक विधानसभा मतदारसंघाच्या संदर्भात महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळामध्ये निर्णायक असा प्रस्ताव आणावा. या सदनामध्ये 260 अन्वये प्रस्ताव मांडला होता. काल लॉबीमध्ये आम्ही माननीय मुख्यमंत्री महोदयांना भेटलो. त्यांनी सांगितले की, 250 ते 600 एकरच्या संदर्भातील प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे आलेला नाही. अशा दुष्काळी परिस्थितीमध्ये हा विचार होणार नसेल तर मराठवाडयातील आणि विदर्भातील जनतेवर या महाराष्ट्रामध्ये रहायचे की महाराष्ट्रापासून वेगळे व्हायचे याचा विचार करण्याची वेळ आलेली आहे. होय ही वस्तुस्थिती आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात देखील इतका अन्याय आणि अत्याचार आमच्यावर कधी झाला नाही.

उत्तर महाराष्ट्रात संगमनेरला अर्जून बंधारा बांधला. त्या वेळी तेथील लोकांना पाणी मिळावे असा इंग्रजांचा हेतू होता. परंतु अलीकडच्या काळातील उत्तर महाराष्ट्रातील इग्रज त्याच्या पुढे जाऊन पूरपरिस्थितीमध्ये कॅनॉल टाकायला लागले आहेत. अभ्यासगट बसवायला लागले आहेत. मी माननीय मंत्री महोदय श्री. नितीन राऊत यांना पुनश्च आठवण करुन देतो की नियम 260 च्या प्रस्तावावर चर्चा होऊन देखील अभ्यासगट रद्द करण्याच्या संदर्भात प्रधान सचिवांनी निर्णय घेतलेला नाही. स्वतंत्रपणे अभ्यासगट बसविले जातात. हायड्रॉलॉजीचे प्रमाणपत्र नसताना स्वतंत्रपणे अभ्यासगट बसवून जर राज्यात पूरपरिस्थिती निर्माण झाली तर ते देखील पाणी वळवून घ्या. खाली गोदावरीमध्ये प्लॉटींग पाडा, तेथे आम्ही घरे बांधून रहायला जाऊ. कारण अशीही गोदावरी नदी वाहणार नाही आणि चुकून पाणी आले तर ते खालच्या मजल्यातून वाहून जाईल. आज आम्ही मंत्री महोदयांकडून एका धाडशी निर्णयाची अपेक्षा केली तर ते गैर होणार नाही.

या मराठवाड्याला आणि विदर्भाला वाळवंट होण्यापासून वाचवायचे असेल तर किमान साखळी बंधारे बांधण्याचा निर्णय घ्या. ज्या विधानसभा मतदारसंघाची 50 पैशापेक्षा कमी आणेवारी आहे त्या मतदारसंघाचा नव्याने विचार करुन तेथे साखळी बंधारे घेणे ही काळाची गरज आहे. हे साखळी बंधारे केवळ कृषी विभागाने सर्व्हे केलेल्या भागात नव्हे तर लाभक्षेत्रात देखील हे साखळी

श्री. अमरसिंह पंडित....

बंधारे घ्यावे लागणार आहेत. आपण तेथे एक तृतीयांश काम करा असे सांगता. आपल्याला आज लाभक्षेत्राची व्याख्या बदलावी लागणार आहे. ज्या प्रकल्पाचा त्या भागाला लाभ मिळत नाही त्या भागाला लाभक्षेत्र असे म्हणता येणार नाही. त्या त्या वर्षी आपण लाभक्षेत्र घोषित केले पाहिजे.

आज गेवराई तालुक्याची डिपेण्डिबिलिटी 42 टक्के आहे. त्या ठिकाणी लाभक्षेत्राच्या नावाखाली जलसंधारणाची कामे करु देत नाही. आज त्या ठिकाणी अधिकचे पाणी वाहून जाते. पण आपण सांगता की, आपल्याला लाभक्षेत्रामध्ये बंधारे घेता येत नाहीत. कारण तेथे वॉटर क्लॉगिंग जास्त होईल आणि पाणी खाली जाणार नाही. म्हणजे तुम्हाला आंध्रप्रदेशची काळजी आहे. आमचे भुस्कट झाले, वाळवंट झाले तरी तुम्हाला आंध्रप्रदेशची काळजी आहे. हायड्रॉलॉजीच्या प्रमाणपत्राची गरज नाही. शिरपूर पॅटर्नचे काम पुन्हा एकदा उत्तर महाराष्ट्रामध्ये होणार असेल तर मग कुठे गेले वॉटर क्लॉगिंग ? 5 एमसीएफटीच्या आत हायड्रॉलाजीच्या प्रमाणपत्राची आवश्यकता नाही. जर तुम्ही शिरपूर पॅटर्न प्रमाणे काम करणार असाल तर ते काम तुम्हाला लखलाभ होवो. परंतु ही कामे मराठवाड्यामध्ये करण्यासाठी तुम्ही का उदासीन आहात ? मराठवाड्यामध्ये काम करायला पाहिजे असे तुमची सद्सदविवेकबुद्धी तुम्हाला का सांगत नाही ? उत्तर महाराष्ट्रामध्ये तुम्ही शिरपूर पॅटर्नप्रमाणे काम केले तरी मराठवाड्यात एक तृतीयांश लाभक्षेत्रात कामे करण्याचे जे आदेश काढलेले आहेत ते बाजूला ठेवून साखळी बंधा-याची कामे लाभक्षेत्रात देखील करावीत अशी मी मंत्री महोदयांना विनंती करतो.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित....

हा निर्णय अतिशय धाडसाने घ्यावा. माझा विश्वास आहे, महाराष्ट्रातील मराठवाडा आणि विदर्भ प्रदेशातील दुष्काळाच्या निमित्ताने जलसंधारण आणि जलसंपदा विभाग योग्य तो निर्णय घेईल अशी या चर्चेच्या माध्यमातून अपेक्षा व्यक्त करतो आणि थांबतो. धन्यवाद.

----------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, नियम 97 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, नियम 260 अन्वये याच अधिवेशनामध्ये मराठवाड्याच्या विविध प्रश्नांबाबत या सभागृहात चर्चा झालेली आहे. नियम 97 अन्वये शासनाच्या एका जाहिरातीमुळे चर्चेचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 122 व्या जयंतीच्या निमित्ताने त्यांचे छायाचित्र वृत्तपत्रात छापून प्रत्यक्ष कामाला सुरुवात केलेली आहे. महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज यांचे स्मरण करुन योजनेला प्रारंभ केला आहे. हे राज्य पुरोगामी आहे, हे राज्य विचारवंतांचे आहे, या राज्याची वाटचाल समतेच्या तत्वाप्रमाणे चालणारी आहे यावर आमचा विश्वास आहे.

सभापती महोदय, माननीय मंत्री डॉ.नितीन राऊत हे तडफदार, धाडसी, तरुण आणि विद्वान आहेत. ते विद्वान आहेत म्हणूनच मराठवाड्याची अपेक्षा आहे की, त्यांनी तेथील दुष्काळग्रस्त भागात पायपीट करावी. तेथील भीषण दुष्काळ, पाणी टंचाई आणि पाण्याचे दुर्भिक्ष मंत्री महोदयांच्या नजरेस पडेल. तसा आमचा दावा आहे. शासन अनवधानाने दुर्लक्ष करीत आहे की काय, म्हणून आमचा टाहो सुरु आहे. मराठवाड्याचा टाहो आपल्या कानावर पडावा म्हणून आमची विनंती आहे. महामानवाचे स्मरण करणारा मराठवाडा आज दुष्काळाच्या छायेत आहे. प्रचंड पाणी टंचाई आहे लोक मैल न् मैल हंडे घेऊन पाण्यासाठी पायपीट करीत आहेत, वणवण भटकत आहेत.

सभापती महोदय, पुरंदर, माण, खटाव, जत, कवठे महांकाळ, खानापूर, आटपाडी, कडेगाव, पारनेर, संगमनेर, सांगोला, मंगळवेढा, भूम हे कायम दुष्काळी तालुके आहेत. मंगळवेढा तालुक्यात संत दामाजी पंत जन्माला आले. त्या काळात त्यांनी आपली गोदामे उघडी केली. क्षुधा मुक्तीचा तो मंत्र होता. तो मंत्र हे शासन अंमलात आणणार आहे की नाही? आमच्या भागात वेड्या बाभळीची संख्या मोठ्या प्रमाणात आहे.

नंतर 3जे.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले .....

सभापती महोदय, वेडी ही अशी कशी, दाभणासारखे काटे हिचे. वेडया बाभळीचे काटे कसे असतात ते तुम्हाला कळणार नाही. सर्व पाणी शोषण करण्याची क्षमता वेडया बाभळीत असते.आमच्या भागातील सर्व पाणी ही वेडी बाभूळ पिऊन टाकते. वेडया बाभळीमुळे आमचा आंबा, डाळिंब करपून गेले आहे.वेडया बाभळीवर प्रक्रिया करणारे ऊर्जा प्रकल्प आपण उभे करु शकतो एवढे पाणी वेडी बाभूळ पिते. उन्हाळा असो, पावसाळा असो किंवा हिवाळा असो या तीनही ऋतूमध्ये वेडी बाभूळ हिरवीगार असते.

सभापती महोदय, भूगर्भातील पाण्याचे नियोजन करणे, नियमन करण्यासाठी दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शासन काय उपाययोजना करणार आहे याची माहिती मिळण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, आदरणीय श्री. शरदचंद्र पवार मराठवाडयाच्या दौऱ्यावर आले होते. त्यांनी जालन्यातील अनेक छावण्यांना भेट दिली होती. ते प्रत्यक्ष जनावरांच्या छावणीवर गेले असता त्यांनी सांगितले की, दुष्काळाचे रुपांतर इष्टापत्तीत करण्याचा प्रयत्न राज्य शासनाने करावा. इच्छा शक्ती असेल तर राज्य शासन दुष्काळाचे रुपांतर इष्टापत्तीत करु शकते. इच्छाशक्तीच्या बळावर आमच्या मराठवाडयातील अनेक प्रस्ताव झाले आहेत. यामध्ये सिमेंट बंधारे,भूमिगत बंधारे, कोल्हापुरी तलाव, पाझर तलाव,शेततळी आहेत. जलसंधारण विभाग शेततळयाकडे दुर्लक्ष करीत आहे असे म्हटले तर ते चूक होणार नाही. मराठवाडयाची पाण्याची टंचाई दूर करावयाची असेल तर माननीय डॉ. नितीन राऊत साहेबांनी त्यांच्या विभागाच्या मार्फत मोठया प्रमाणात शेततळी करण्याची गरज आहे. परंतु माझ्या माहिती प्रमाणे त्यांच्या विभागाने शेततळयाकडे दुर्लक्ष केलेले आहे.

सभापती महोदय, मराठवाडयामध्ये उजाड डोंगर आहेत, वृक्षहीन डोंगर आहेत. अशा डोंगरावर शेततळी केली आणि उताऱ्याच्या बाजूने वाहत येणारे पाणी शेत तळयांमध्ये अडवले तर मराठवाडयातील भूगर्भातील पाण्याची पातळी आपल्या वाढविता येऊ शकते. मराठवाडयातील पाण्याची क्षमता वाढविण्यासाठी आपण कोणते प्रयत्न करणार आहात ? नियोजन काय करणार आहात ? भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविण्याच्या संदर्भातील आराखडा राज्य शासनाने या ठिकाणी स्पष्ट करण्याची आवश्यकता आहे. नियम 260 च्या प्रस्तावाच्या अनुषंगाने आमच्या माननीय तटकरे साहेबांनी राणा भीमदेवी थाटात भाष्य केले होते.

यानंतर श्री. भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले....

मी त्यांचे स्वागत करतो. 18.33 टीएमसी पाणी मराठवाड्याला देऊ अशा प्रकारची घोषणा त्यांनी केली त्याबद्दल मी त्यांचे मनापासून स्वागत करतो, अभिनंदन करतो. या घोषणेची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळामध्ये ठराव करणे आवश्यक आहे. महाराष्ट्राच्या राज्यपालांची भेट घेऊन त्यांच्या परवानगीने प्रत्यक्ष कामाला सुरूवात करणे आवश्यक आहे. ही सर्व प्रक्रिया पुढल्या काळामध्ये सुरू केली तर मराठवाड्यातील दुष्काळावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासंबंधी शासनाने ठोस पावले टाकली आहेत असा संदेश मराठवाड्यामध्ये निश्चितपणे जाईल.

सभापती महोदय, आम्हाला प्राचीन संस्कृती आहे. आर्यांची, द्रविडांची संस्कृती आहे. सिंधू संस्कृती आहे. या प्रत्येक संस्कृतीचे अध्यापन आणि अध्ययन केले तर एक गोष्ट स्पष्ट होते की, त्या प्रत्येक संस्कृतीमध्ये दुष्काळ पडला होता. कुठलीही संस्कृती अपवाद नाही. आज मराठवाड्यामध्ये दुष्काळ आहे. कदाचित विदर्भामध्ये तो दुष्काळ वाटचाल करू शकेल. हा दुष्काळी राक्षस .... (अडथळा) ....

सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना सांगू इच्छितो की, आपण नियम 97 अन्वये दुष्काळावर प्रस्ताव आणला असून त्यावरील चर्चा सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे ऐकत आहेत. सदर चर्चा आपणही ऐकावी अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, बीड जिल्हा अवर्षण प्रवण जिल्ह्यामध्ये मोडतो. बीडमध्ये मोठ्या प्रमाणावर डोंगरपट्टा आहे. हा डोंगरपट्टा इष्टापत्तीमध्ये परिवर्तीत करण्याची क्षमता निर्माण केली पाहिजे. त्यासाठी नियोजन केले तर तसे होऊ शकते. या डोंगरपट्ट्यातील सर्व पाणी खालच्या दिशेला अडविले तर मराठवाड्यातील भूगर्भातील पाण्याची पातळी निश्चितपणे वाढेल. मध्यतंरी माननीय मुख्यमंत्री मराठवाड्यामध्ये आले होते. त्यांनी बीड जिल्ह्यातील दुष्काळाची पाहणी केली व बैठक घेतली. त्यांनी काही घोषणा केल्या. या घोषणांची अंमलबजावणी करणे हे प्रशासनाचे काम आहे. प्रशासनाने हे काम चोखपणे केले तर मला खात्री आहे की, मराठवाड्यामध्ये कायमस्वरूपी उपायोजना करण्याच्यादृष्टीने आपण प्रयत्न करू शकू. माझी सन्माननीय मंत्री डॉ.नितीन राऊत यांना विनंती आहे की, आमच्या बीड जिल्ह्यातून जे जे प्रस्ताव येतील त्या सगळ्या प्रस्तावांना आपण तात्काळ मंजुरी द्यावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले...

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी)**

सभापती महोदय, मला एका गोष्टीकडे सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे लक्ष वेधायचे आहे. माननीय श्री.पवार साहेब मराठवाड्यामध्ये आले होते. त्यांनी दुष्काळग्रस्त भागाला भेटी दिल्या. त्यांनी दुष्काळग्रस्तांचे अश्रू पुसण्याचा प्रयत्न केला. आमचे मुख्यमंत्री मराठवाड्यामध्ये आले होते. त्यांनी देखील अश्रू पुसण्याचा प्रयत्न केला. आमच्या श्री.रावते साहेबांनी मराठवाड्यामध्ये प्रचंड मोठी सभा घेतली. मला अपेक्षा होती की, आपले प्रमुख एखाद्या दावणीला जातील. गुरा-ढोरांची विचारणा करतील. पण दुर्दैवाने तसे होऊ शकलेले नाही. अशा वेळी किमान ते गेले असते तर मराठवाड्यात एक चांगला संदेश गेला असता की, एका पक्षाचा प्रमुख मराठवाड्यातील जनतेचे अश्रू पुसण्यासाठी आला आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांनी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी मराठवाड्यामध्ये सभा घेतली असा उल्लेख करून आपले पक्ष प्रमुख एखाद्या दावणीला गेले असते तर बरे झाले असते असे म्हणाले. त्यांना कल्पना नाही युवा सेनेचे प्रमुख श्री.आदित्य ठाकरे यांनी स्वत: जाऊन छावणीचे उद्‌घाटन केले. राज्यातील पहिल्या छावणीचे उद्‌घाटन त्यांनी केले आहे. त्याची सन्माननीय सदस्यांना पुसटशी कल्पना देखील नाही. माननीय श्री.उद्धवजी ठाकरे दुष्काळग्रस्त जनतेसाठी पैसे जमा करून 100 टँकरने पाणी पुरवठा करत आहेत. एवढेच नव्हे तर त्यांनी 500 टाक्या देखील पुरवल्या आहेत.

यानंतर श्रीमती रणदिवे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR पूर्वी श्री.भारवि . . . . 4.55

श्री.रामदास कदम . . . .

तेथे जनावरांसाठी चाऱ्याची व्यवस्था केली. आता आपल्या पक्ष प्रमुखांनी काय केले हे विचारण्याची आमच्याकडे पध्दत नाही. उलटपक्षी एखाद्या पक्षाने चांगले काम केले तर चांगल्याला चांगले म्हणण्याची दानत सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले साहेबांकडे असावी असा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, काटा लगे तो हम क्या करे? मी नव्या पिढीविषयी बोलत नाही तर मधल्या पिढी बद्दल बोलत आहे. मधल्या पिढीकडून अपेक्षा आहे की, त्यांनी जनतेमध्ये गेले पाहिजे आणि प्रत्यक्षात जर मराठवाड्यामध्ये पाऊल ठेवले असेल तर याबाबतीत तुमची ती जबाबदारी नाही काय? आज सामान्य शेतकऱ्यांचे काय चालू आहेत, जनावरांना प्रत्यक्षात पाणी मिळते की नाही हे त्यांनी पाहिले पाहिजे. पण ते 30 मिनिटे बोलतात आणि निघून जातात. मराठवाडा याची देखील गंभीरपणे दखल घेईल. तुम्ही ज्यांचा नामोल्लेख केलेला आहे ते कोण आहेत ?

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, आता कसला हरकतीचा मुद्दा आहे. मी कोणाचेही नाव घेतलेले नाही. मग एवढे दुखले काय?

श्री.रामदास कदम : सभापती महोदय . . . ..

प्रा.सुरेश नवले :सभापती महोदय, याठिकाणी गटनेते शांत बसले आहेत. आपण गटनेते नाही. आपण थोडा वेळ थांबावे. एवढी घाई का करीत आहात? मी महाराष्ट्र शासनाचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. कारण त्यांनी पश्चिम महाराष्ट्रातील योजना सुरु करीत असताना भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मरण करुन योजनांना सुरुवात केली आहे. मराठवाड्यामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पावन स्मृती जपणारा फार मोठा वर्ग आहे आणि त्यामुळे या योजनांचा प्रारंभ मराठवाड्यामध्ये सुध्दा होणे आवश्यक आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने मराठवाड्यामध्ये विद्यापीठ आहे, ते बुध्दीवंतांचे माहेरघर आहे. तेथे मिलिंद महाविद्यालय आहे. वाद-विवाद निपुण मिलिंद आमच्या मराठवाड्यामध्ये आहे.

सभापती महोदय, चित्रलेखामध्ये जो संदर्भ आलेला आहे त्यापेक्षा आजचा विषय अतिशय महत्वाचा आहे."प्रत्यक्ष नेता नेतो म्हणे परा आणि त्याच्या मागे सारे"मी विषयांतर केले तर सर्वजण





असुधारीत प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले . . .

माझ्या अंगावर येतील. काल गोमूत्र शिंपडून . ..याचा काय अर्थ आहे? मध्यम युगामध्ये आमचे गरीब बांधव रस्त्यावरुन गेल्यानंतर गोमूत्र शिंपडले जात असे म्हणजे अजूनही अस्पृश्यच समजता. याचा अर्थ तुमच्या मनामध्ये अस्पृश्यतेची बिजे अजून रोवलेली आहेत. ही अभिचाराची जी प्रवृती आहे ती सोडून द्या.ज्ञानेश्वरांकडे सुध्दा शुध्दीपत्र मागितले होते. ज्ञानेश्वरांकडे ज्यांनी शुध्दीपत्र मागितले, त्यांचे तुम्ही वंशज आहात काय हा प्रश्न आहे. आमच्या ज्ञानेश्वरांनी मराठवाड्यामध्ये रेड्यामुखी वेद बोलविले. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब, त्या रेड्याला मराठवाड्या- मध्ये वेद बोलविण्यास ज्ञानेश्वर कारणीभूत ठरले असतील तर अशा मराठवाड्याची जी विवंचना आहे, जे दु:ख आहे, जे शल्य आहे, ज्या वेदना आहेत, त्या श्री.नितीनजी राऊत आपण समजून घेऊन त्यावर उपाययोजना करणे आवश्यक आहे.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले...

आमच्या डोळ्यात आता पाणी येत नाही. ते कोरडे पडले आहेत.

सभापती महोदय, मराठवाड्यामध्ये प्रचंड पाणी टंचाई आहे. राज्य शासनाने दुष्काळावर मात करण्यासाठी प्रयत्न केले तर त्यामध्ये यश मिळू शकते. आज भूगर्भातील पाण्याचा साठा संपलेला आहे. हा पाण्याचा साठा वाढविण्याच्या दृष्टीने, वृध्दींगत करण्याच्या दृष्टीने शासनाने प्रयत्न केले तर त्यामध्ये निश्चितपणे यश मिळू शकेल. फक्त शासनाने उजव्या व सढळ हाताने मराठवाड्याला मदत करावी.

सभापती महोदय, माननीय मंत्री श्री.राजेश टोपे या ठिकाणी उपस्थित आहेत. आमच्या डोक्यावरील छत्र गायब झालेले आहे ते परत आणण्याची क्षमता आपल्यामध्ये आहे. आम्ही त्या अपेक्षेने आपल्याकडे पाहत आहोत. तेव्हा आमच्या इच्छा आकांक्षा आज ना उद्या पूर्ण कराल अशी अपेक्षा आपल्या सारख्या तरुण व तडफदार मंत्र्यांकडून आहे आणि आपण ती पूर्ण कराल अशी अपेक्षा व्यक्त करुन माझे भाषण पूर्ण करतो.

--------

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नितीन राऊत (रोजगार हमी योजना आणि जलसंधारण मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी नियम 97 अन्वये जलसंधारण विषयावर चर्चा उपस्थित केलेली आहे.

सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी देशाची घटना लिहून देशाला एक सार्वभौमत्व प्राप्त करुन दिले. त्यांच्या जन्म दिवशी जलसंधारण विभागाची जाहिरात आली. त्या जाहिरातीच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी अल्पकालीन चर्चा उपस्थित केली आहे.

सभापती महोदय, परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर या सभागृहाचे सदस्य होते याची आठवण या निमित्ताने झाली. त्यांनी जलसंधारण क्षेत्रामध्ये फार मोठ्या प्रमाणावर काम केलेले आहे. दामोदर व्हॅलीसारखा प्रकल्प त्या काळात आणून त्यांनी जलसिंचन क्षेत्रामध्ये आणि विजेच्या क्षेत्रामध्ये मोलाचे काम केलेले आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी सांगण्यात आले की, हे शासन समन्यायी भूमिका घेत नाही. आपण सर्वजण 1972 च्या दुष्काळाचा उल्लेख करतो. परंतु 1972 चा दुष्काळ हा थोडा वेगळा दुष्काळ होता. त्या दुष्काळामध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न नव्हता. त्या दुष्काळामध्ये अन्नधान्याचा प्रश्न निर्माण झाला होता. त्या वेळी गावोगावी पाणी उपलब्ध होते. भूजलाची पातळी खाली गेली नव्हती. परंतु या दुष्काळामध्ये भूजलाची पातळी खोलवर गेलेली आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी उल्लेख करण्यात आला की, मी विदर्भातील असताना देखील विदर्भाकडे दुर्लक्ष करीत आहे. परंतु त्यामध्ये अजिबात तथ्य नाही. मराठवाडा आणि विदर्भ सम दु:खी आहे. तेव्हा आम्ही न्यायाची भूमिका घेणार आहे.

सभापती महोदय, काही ठिकाणी उभा ऊस दिसतो तर काही रखरखीत वाळवंट दिसते. तेव्हा आपणास त्या प्रदेशाकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही.

सभापती महोदय, या राज्याने यशवंतराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली राज्याचा विकास समन्यायी भावनेने पुढे न्यावा ही संकल्पना मांडली. स्व.वसंतराव नाईक यांची आपण जन्मशताब्दी साजरी करीत आहोत. त्यांनी त्यांच्या काळात पश्चिम महाराष्ट्राला झुकते माप दिले आणि दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी उपाय योजना केल्या.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नितीन राऊत....

दुष्काळ पडण्यास सुरुवात झाल्यानंतर माझ्या विभागाने मृद संधारण आणि लघु पाटबंधारे विभागाची प्रत्येकी एक टीम तयार केली. या दोन्ही टीमला दुष्काळी भागात पाठविण्यात आले. त्या ठिकाणी शॉर्ट टर्म आणि लाँग टर्म पध्दतीने कामे कशी करता येतील याचा अभ्यास करण्यास सांगितले. त्या टीमचा अहवाल माझ्याकडे आल्यानंतर त्या अनुषंगाने आम्ही काम करण्याचा प्रयत्न केला.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते व पांडुरंग फुंडकर यांनी 15 तालुक्यांच्या बाबतीत उल्लेख केला. या अनुषंगाने मी सांगू इच्छितो की, भूगर्भातील पाण्याची पातळी ज्या भागात सर्वाधिक खोल गेली होती त्या 15 तालुक्यांची या कार्यक्रमामध्ये पहिल्या टप्प्यात निवड करण्यात आली. या 15 तालुक्यांसाठी 150 कोटी रुपये निधी देण्यात आला. महोदय, हे तालुके आम्ही आमच्या मनाप्रमाणे निवडले नाहीत. जीएसडीएने त्यांच्या निकषानुसार या 15 तालुक्यांची निवड केली. मला सांगण्यास आनंद वाटतो की, या 15 तालुक्यांमध्ये 1486 कामांवर 150 कोटी रुपयांपैकी 143 कोटी रुपये खर्च केले आहेत. एक बंधारा बांधण्यासाठी साधारणत: 8 ते 10 लाख रुपये खर्च येतो. आम्ही काही तालुक्यांना 8 कोटी रुपये, काही तालुक्यांना 9 कोटी रुपये व काही तालुक्यांना 10 कोटी रुपये दिले.

महोदय, साखळी पध्दतीने बंधारे बांधून परतीचे पाणी थांबविणे व त्यातून भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविणे हा या मागील एकमेव उद्देश होता. मी सातारा आणि सांगली भागाचा दौरा केला. त्या वेळी मी स्वत: तेथील परिस्थिती आणि बंधारे पाहिले. त्या भागात सिमेंट प्लगची उंची विचारात घेऊन 1.5 मीटरपर्यंत खोलीकरण करण्यात येत होते. मी 3 मीटरपर्यंत खोलीकरण करण्यास सांगितले. शिवाय बॅन्कस् बनविण्यास सांगितले, बॅन्कस्वर प्लांटेशन करण्यास सांगितले. त्याचे साईनेजेस सांगितले, डाऊन स्ट्रीमवर जास्त खोल भाग कसा राहू शकेल आणि अप स्ट्रीमवर वाहते पाणी कसे जाऊ शकेल या बाबतचे नियोजन करण्यात आले. रिच टू व्हॅली ही संकल्पना, पाणी वरुन खालपर्यंत कसे आणता येईल ही संकल्पना त्या ठिकाणी राबविली. महोदय, माण, खटाव या भागात गेल्यानंतर माझ्या निदर्शनास आले की, एका पावसात ते बंधारे पूर्णपणे भरलेले आढळले. त्या भागात 200 हेक्टर जमिनीपर्यंत पाण्याची पातळी वाढल्याचे लोकांना दिसले. त्या पाण्याच्या माध्यमातून त्या भागात शेती करण्यास सुरुवात झाली.

..2..

डॉ.नितीन राऊत....

सभापती महोदय, आम्ही एकाच भागात निधी दिला असे नाही. उस्मानाबाद जिल्ह्यातील भूम तालुक्यात पाण्याची पातळी 2 मीटरपेक्षा खाली गेली होती. तो तालुका जीएसडीएच्या निकषात बसत असल्यामुळे त्याचा या कार्यक्रमामध्ये समावेश करण्यात आला. उस्मानाबाद, बीड व जालना या भागात पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झालेली आहे. या बरोबरच बुलढाणा जिल्ह्यातील चिखली, सिंदखेडराजा व देऊळगांवराजा या भागात पाण्याची मोठ्या प्रमाणावर टंचाई आहे. एक कार्यकर्ता या नात्याने मी प्रथम त्या भागात दौरा केला. शिवाय नागपूर जिल्ह्यातील मौदा येथे सुध्दा मी गेलो होतो.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझी विनंती वजा सूचना आहे. माननीय मंत्र्यांनी सांगितले की, 15 तालुक्यांना जीएसडीएच्या अहवालाच्या आधारावर पैसे दिले. परंतु या कार्यक्रमामध्ये मराठवाड्यातील केवळ एकाच तालुक्याचा समावेश करण्यात आला. आतापर्यंत जीएसडीएच्या अधिकाऱ्यांनी स्वत: पाहणी न करता घरी बसून अहवाल दिलेले आहेत. विशिष्ट नेत्याने सांगितल्यानुसार जीएसडीएच्या अधिकाऱ्यांनी अहवाल द्यायचा आणि ते पैसे आपल्या भागात न्यायचे असा प्रकार वर्षानुवर्षे सुरु आहे. मी जबाबदारीने बोलत आहे. माझ्याकडे सर्व पुरावे आहेत. मी ते देण्यास तयार आहे. जीएसडीएच्या माध्यमातून चुकीचा अहवाल देऊन संबंधितांनी आपल्या भागात पैसे नेले आहेत.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना देण्यामागचा उद्देश एकच होता की, आपल्याच विशिष्ट भागामध्ये फावड्याने माती ओढावी त्या पध्दतीने पैसे घेऊन जाण्याचे काम होत आहे. म्हणून आपण जीएसडीएचा रिपोर्ट पुन्हा एकदा तपासून घ्यावा अशी माझी विनंती आहे.

डॉ. नितीन राऊत : सभापती महोदय, मी निश्चितपणे याची नोंद घेतो. मी विदर्भाच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांना सांगू इच्छितो की, आपल्याकडे निधीची कमतरता अजिबात नाही. विदर्भामध्ये सिमेंट प्लग बंधारे करावयाचे असतील तर विदर्भातील जे आठ जिल्हे आहेत त्यामध्ये बुलढाणा, वाशिम, अमरावती, अकोला, यवतमाळ, नागपूर, वर्धा आणि चंद्रपूर या जिल्ह्यातील 77 तालुक्यांसाठी 462 कोटी रुपयांची तरतूद करुन ठेवलेली आहे. विदर्भ इंटेन्सिव्ह इरिगेशन डेव्हलपमेंट प्रोगाम अंतर्गत 3250 कोटी रुपयांचा कार्यक्रम आपल्या राज्याला केंद्र शासनाने दिलेला आहे. त्या अंतर्गत सुध्दा निधी उपलब्ध आहे. जसजशी कामे येतील तसतसा निधी देणार आहोत. मराठवाड्यामध्ये निधी उपलब्ध झाला नाही असे सांगण्यात आले. पण 2013-2014 च्या अर्थसंकल्पामध्ये त्यासाठी 165 कोटी रुपयांची तरतूद करुन ठेवलेली आहे.

सभापती महोदय, मी सांगू इच्छितो की, या निधीचे वाटप करीत असताना ज्या ठिकाणी जास्तीत जास्त टॅकर सुरु आहेत त्या ठिकाणी पहिल्यांदा तो निधी देण्याचा आपला कार्यक्रम आहे. त्या वाड्यांमध्ये निधी पुरविण्याचा कार्यक्रम आहे. हाच आमचा मुख्य निकष आहे. माझ्या खात्याच्या माध्यमातून जी कामे सुरु आहेत त्यामध्ये विदर्भात प्रगतिपथावर असलेल्या कामांची संख्या 456 आहे. तो 225.77 कोटी रुपयांचा कार्यक्रम आहे. तसेच ज्या दोन योजना प्रस्तावित केलेल्या आहेत त्यासाठी 25.59 कोटी रुपये लागणार आहेत. म्हणजे एकंदर 251.36 कोटी रुपयांचा कार्यक्रम विदर्भामध्ये सुरु आहे.

सभापती महोदय, मराठवाड्यामध्ये जलसंधारणाची 691 कामे प्रगतिपथावर आहेत. ही 282.01 कोटी रुपयांची कामे आहेत. प्रस्तावित योजना 408 आहेत. त्याला 168.53 कोटी रुपये लागणार आहेत. अशी एकंदर 450.54 कोटी रुपयांची कामे त्या ठिकाणी दिलेली आहेत. आता ती कामे मंजूर होऊन कामाला सुरुवात होणार आहे. मराठवाड्यामध्ये पाण्याचा तुटवडा आणि

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नितीन राऊत ....

खोलीकरणाची बाब प्रकर्षाने जाणवते आणि त्याला मदत करण्याची राज्य शासनाची भावना आहे. या पध्दतीने आम्ही काम करीत आहोत.

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी शेततळ्यांचा प्रश्न उपस्थित केला. आरकेव्हीवाय मधून 73.32 कोटी रुपयांची शेततळ्यांची कामे घेण्यात आलेली आहेत. एकूण खर्च जवळपास 441 कोटी रुपयांचा आहे. पैशाची कमतरता नाही. सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले कामांची नावे विचारत आहेत. मला नावे सांगता येणार नाहीत. परंतु मराठवाड्यामध्ये सुध्दा मागेल त्याला शेततळी देत आहोत.

प्रा. सुरेश नवले : यापैकी मराठवाड्यामध्ये किती शेततळी घेतली ?

डॉ. नितीन राऊत : यामध्ये मराठवाडा, विदर्भ असे क्लासिफिकेशन केलेले नाही. मी राज्याच्या बाबतीत सांगत आहे. सन्माननीय सदस्य जी माहिती विचारत आहेत ती पटलावर ठेवण्यात येईल. मी आपल्याला सांगेन की, कायमस्वरुपी उपाययोजना घेणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे जे जुने प्रकल्प आहेत त्यांची देखभाल व दुरुस्ती आणि त्याचे व्यवस्थितपणे नियोजन करण्यासाठी निधी देण्यात येणार आहे. जे प्रकल्प अपूर्ण आहेत ते पूर्ण करण्याला प्राधान्य राहणार आहे. त्यानंतरच नवीन प्रकल्पांना मान्यता देण्यात येणार आहे. भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविण्याचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणात घेत आहोत. या कार्यक्रमाच्या बाबतीत आम्ही दुजाभाव करीत आहोत असे कोठेही होणार नाही. कोठेही दुजाभाव होणार नाही याची खात्री मी आपल्याला देतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित यांनी पाण्याच्या उपलब्धतेबद्दल सांगितले तसेच त्यांनी 5 एमसीएफटी पाण्याच्या संदर्भात सांगितले. नियमाच्या अंतर्गत जे असेल त्याप्रमाणे त्या ठिकाण्ी कार्यवाही केली जाईल. शिरपूर पॅटर्नबद्दल अलीकडे खूप बोलले जाते. शिरपूर पॅटर्नमध्ये 10 मीटरपेक्षा जास्त खोली गेलेली आहे आणि त्याच्या वरच्या भागात पाझर तलाव आहे. वर पाझर तलाव असल्यामुळे त्या ठिकाणी आपल्याला पाणी दिसते

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नितीन राऊत...

पण त्या ठिकाणी शॅलो ॲक्यूपर 30 मीटरवर असतो आणि त्याच्या खाली डिप ॲक्यूपर असतो. त्यामध्ये पाणी खोलपर्यंत मुरले असेल तर ते पाणी कोठेही पसरते. शिरपूरला दिसणारे पाणी धुळे येथे दिसू शकते आणखी कोठेही दिसू शकते. त्यामुळे शासनाने तेथे एक टेक्निकल टिम पाठविली होती. त्यांनी असा निर्णय दिला आहे की, आता कोठे बंधारे करावयाचे आहेत त्यांची खोली तीन ते साडेतीन मीटरपेक्षा जास्त असू नये. मला वाटते की, ते सफिशिअण्ट आहे. त्यामुळे रिच टू व्हॅली असे व्यवस्थितरित्या केले तर तेथे निश्चितपणे कामे होतील.

सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी लाभक्षेत्रातील कामे करण्याची मुभा द्यावी अशी मागणी केली आहे. हा विषय सिंचन विभागाचा असल्यामुळे आपल्या भावना मी त्यांच्यापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करीन. संपूर्ण राज्यात विभागाने 73,328 शेत तळी पूर्ण केलेली आहेत. मराठवाड्याची माहिती मी पटलावर ठेवणार आहे. शासनाकडून कोणताही दुजाभाव केला जात नाही. संपूर्ण राज्यासाठी समन्यायी भूमिका ठेवून काम केले जात आहे. राज्यातील दुष्काळी परिस्थिती कोणत्याही एका भागाची नाही. राज्य शासनाची ही संपूर्ण जबाबदारी आहे. ही जबाबदारी शासन निश्चितपणे पूर्ण करील असा विश्वास देतो आणि मी येथेच थांबतो.

श्री.दिवाकर रावते : मी मंत्री महोदयांचे प्रथम अभिनंदन करतो. आपण प्रथमच या सभागृहात येऊन आम्ही उपस्थित केलेल्या चर्चेला उत्तर दिले आहे. मंत्री महोदयांनी बजेटमधील तरतुदीचा उल्लेख केलेला आहे. पण 15 जून पर्यंत किती सिमेंट बंधारे बांधून पूर्ण होतील ते सांगावे. जेणे करुन येणाऱ्या पावसाळ्यामध्ये पाणी अडविले जाईल. अन्यथा आर्थिक तरतूद डिसेंबरमध्ये केली जाईल, त्यानंतर मे महिन्यात काम सुरु होईल आणि त्याच्या पुढच्या पावसाळ्यात पाणी अडविले जाईल असे होता कामा नये. मराठवाडा व विदर्भातील बंधाऱ्यांसाठी शासनाने काही तयारी केली आहे का ?

डॉ.नितीन राऊत : सभापती महोदय, आजच विधानसभेमध्ये विनियोजन विधेयक मंजूर झालेले आहे. या सभागृहातही विनियोजन विधेयकाला मंजुरी मिळालेली आहे. त्यामुळे या कामासाठी निधीची कमतरता भासणार नाही. दिनांक 11 एप्रिल, 2013 रोजी क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी केली आहे. काल दुपारी महात्मा ज्योतिबा फुले जन्मभूमी

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ D/

डॉ.नितीन राऊत....

अभियानाचा शुभारंभ केलेला आहे. त्यावेळी माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री यांनी सांगितलेले आहे की, या कामासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही. निधी प्राप्त झालेला आहे, तो खर्च करावा आणि अधिकचा निधी देण्याची तयारी शासनाने दाखविलेली आहे. सीएनबीसाठी निधीचे वाटप याच आठवड्यात केले जाणार आहे. त्याबाबत त्वरित कार्यवाही केली जाईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : मी मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. आपण आताच विदर्भाची आकडेवारी दिलेली आहे. मी परवाच विभागाच्या अधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली आहे. त्यांनी मला असे सांगितले की, आमच्याकडे निधी आहे, परंतु सर्व्हे करण्यासाठी निधी नाही. सर्व्हे विभागाचे काम ठप्प झालेले आहे. त्या विभागाला ॲक्टिव्ह केले पाहिजे. त्यासाठी निधीची तरतूद केली पाहिजे. सर्व्हेनंतर स्पॉट निश्चित होतील. त्यानंतर कामांना सुरुवात होईल. पैसा पाठविला तरी तो पैसा पडून राहील आणि मग मार्च अखेर पैसा ट्रान्सफर केला जाईल. असे होता कामा नये, विदर्भ व मराठवाड्यातील पैसा अन्यत्र वळविण्याची पाळी येऊ देऊ नका, एवढीच माझी मंत्री महोदयांना विनंती आहे. मंत्री महोदय याप्रमाणे कार्यवाही करतील काय ?

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, जलसंधारण विभागाकडे मराठवाड्यातील शेतकऱ्यांकडून जेवढे शेत तळ्यांचे प्रस्ताव येतील त्यांना मंजुरी दिली जाईल काय ?

श्री.अमरसिंह पंडित : मी मंत्री महोदयांनी एका सिमेंट बंधाऱ्यांची किंमत 7-8 लाख रुपये असते असे सांगितलेली आहे. परंतु आमच्या भागातील नाल्यांची रुंदी अधिक असल्यामुळे कृषी विभागाने 12 ते 15 लाख रुपयांचे एस्टिमेटस् तयार केलेले आहेत.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अमरसिंह पंडित...

एका मतदारसंघाला, एका तालुक्याला निधी देत असताना दुष्काळी भागासाठी खास बाब म्हणून 12 ते 15 लाख रु.ची रक्कम द्यावी अशी मी विनंती करतो.

डॉ. नितीन राऊत : सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी चांगला प्रश्न उपस्थित केलेला आहे. विदर्भामध्ये मोठया प्रमाणात निधी उपलब्ध असताना तो निधी खर्च होत नाही आणि तो निधी इतरत्र वळविला जातो असे सांगितले जाते. यंत्रणेमध्ये मनुष्यबळाचा अभाव मोठ्या प्रमाणावर आहे. मी आपणास सांगू इच्छितो की, व्हीआयबीपीचा जो कार्यक्रम आला त्यासाठी पूर्ण मनुष्यबळ देण्याची मागणी रेटलेली आहे. एवढेच नाही तर मुख्य अभियंत्याच्या कार्यालयाला मान्यता देऊन व्हिआयबीपी हा विशेष कार्यक्रम म्हणून विदर्भामध्ये राबविण्यात यावा या दृष्टीने आम्ही कार्यवाही केलेली आहे.

दुसरा विषय असा आहे की, आम्ही सर्व सुजाण आणि जागरुक असे लोकप्रतिनिधी आहोत. आमच्या जिल्ह्यामध्ये किंवा तालुक्यामध्ये कोठे कोठे भूजल पातळी खाली गेलेली आहे, कोठे भूजल साठा वाढविला पाहिजे, साठवण बंधारे, पाझर तलाव, गाव तलाव कोठे केले पाहिजेत हे लोकप्रतिनिधी म्हणून आपल्याला माहीत असते. या संदर्भात सर्व्हे करण्याचे अधिकार जिल्हा परिषदेला दिलेले आहेत. शून्य ते 100 हेक्टर पर्यंतचे अधिकार दिल्यानंतर डीपीसीमध्ये निधीची देखील तरतूद केलेली आहे. जलसंपदा विभागाचे आरएसआर आपण वापरत आहोत. दोन्हीसाठी एकच मापदंड आहेत. काही मापदंडामध्ये बदल करण्याच्या सूचना मी कालच दिलेल्या आहेत. कृषी खाते त्यांच्या पध्दतीने बंधारे बांधते. आधी ते दगडाचे बंधारे बांधत होते आता सिमेंटचे बंधारे बांधत आहे. खरे म्हणजे त्यांनी उपचाराच्या कार्यक्रमामध्ये अधिक लक्ष दिले पाहिजे. त्यासंबंधी देखील त्यांना सूचना दिलेल्या आहेत. योग्य खोलीकरण व्हावे, प्लॅन्टेशनची तरतूद करावी, बंधा-यासाठी तरतूद करावी आणि लांबी जास्त असेल तर त्याचा देखील विचार करण्यात यावा असे सूचित केलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित यांनी लांबी-रुंदी वाढत असल्यामुळे कॉस्ट 15 लाखापर्यंत गेली तर त्या कामास मंजुरी देणार नाही का, अशी विचारणा केली. ज्या पध्दतीने एस्टिमेट येईल त्या पध्दतीने विचार करण्यात येईल. काही बाबतीत निकष

..2..

डॉ. नितीन राऊत....

सुध्दा शिथिल केले जाऊ शकतात. मराठवाड्यामध्ये शेततळी करण्यासाठी परवानगी देण्यात येईल काय अशी विचारणा येथे करण्यात आली. त्या बाबतीत माझे उत्तर "होय" असे आहे.

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी)** : अल्पकालीन चर्चा आता संपली आहे.

--

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: करविषयक कायदे (कर बसविणे व सुधारणा) विधेयक

**L. A. BILL NO. XI OF 2013**

(A BILL FURTHER TO AMEND CERTAIN TAX LAWS IN OPERATION IN THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री. राजेंद्र मुळक (वित्त राज्यमंत्री) सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमणे सन 2013चे वि.स.वि. क्रमांक 11, महाराष्ट्र राज्यात अंमलात असलेल्या विवक्षित करविषयक कायद्यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. आशिष शेलार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या विधेयकाच्या संदर्भात माझा एकच प्रश्न आहे. या विधेयकाच्या पृष्ठ क्रमांक 2 वरील परिच्छेद क्रमांक 4 मधील आर्टिकलमध्ये आपण एका गोष्टीचा समावेश केलेला आहे. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, "agreement to sell an immovable property" आणि त्यानंतर कन्व्हेअन्स डीड हे सुध्दा "shall be treated as an another instrument." म्हणजे ॲग्रीमेण्ट ऑफ सेलवर देखील तुम्ही चार्ज करणार आहात. ते कन्व्हेअन्स झाल्यानंतर ते दुसरे इन्स्ट्रुमेण्ट समजून त्यावर 100 रुपये चार्ज करण्यात येणार आहेत. एकाच ॲग्रीमेण्टला दोन वेळा चार्ज करण्याची पध्दत आजपर्यन्त नव्हती. या तरतुदीमुळे सामान्य लोकांवर आर्थिक बोजा पडणार आहे काय ?

श्री. राजेंद्र मुळक : हे विधेयक 1998च्या सुधारणांच्या संदर्भात आहे. त्यासोबत 2002मधील काही सुधारणा आहेत आणि महाराष्ट्र लॉटरीच्या संदर्भातील 2006च्या सुधारणा आहेत. सन्माननीय सदस्यांनी असा प्रश्न उपस्थित केला की, 100 रुपये चार्ज केल्यामुळे सामान्य माणसावर काही आर्थिक बोजा पडेल काय, तसा प्रकार होणार नाही. या विधेयकामध्ये ज्या प्रमाणे सुधारणा करीत आहोत त्याचप्रमाणे त्याची अंमलबजावणी होणार आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

..नंतर श्री. भोगले..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** (श्री.मोहन जोशी) : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड 2 ते 15, अनुसूची, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

**तालिका सभापती** : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशीसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक

**L. A. BILL NO.III OF 2013**

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.)

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील (ग्रामविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2013 चे विधानसभा विधेयक क्रमांक 3 महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, 1961 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

**तालिका सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2013 चे विधानसभा विधेयक क्रमांक 3 महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, 1961 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 विधेयकाचा भाग झाला.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केलेले सन 2013 चे वि.स.वि.क्रमांक-3 संमत करण्यात यावे, असा मी प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : सन 2013 चे वि.स.वि.क्रमांक-3 संमत झाले आहे.

-------

नंतर 3एस.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबई, ठाणे व कल्याण-डोंबिवली महानगरपालिकांची विविध समस्यांमुळे होत असलेली दुरवस्था

**मु.शी.**: मुंबई, ठाणे व कल्याण-डोंबिवली महानगरपालिकांची विविध समस्यांमुळे होत असलेली दुरवस्था या विषयावर सर्वश्री किरण पावसकर, अशोक ऊर्फ भाई जगताप, हेमंत टकले, जयप्रकाश छाजेड, प्रकाश बिनसाळे, सुभाष चव्हाण, विक्रम काळे, निरंजन डावखरे, मुझफ्फर हुसेन, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री जयवंतराव जाधव, नरेंद्र पाटील, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.रमेश शेंडगे, वि.प.स.यांचा प्रस्ताव

(प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला.)

**तालिका सभापती** (श्री. मोहन जोशी ): आता आपण नियम 260 अन्वयेच्या मुंबईच्या प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात करणार आहोत. सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार या प्रस्तावावर ऑनलेग होते. त्यांनी या अगोदर 20 मिनिटे विचार मांडलेले आहेत. या प्रस्तावावर अगोदर 1 तास 34 मिनिटांची चर्चा झालेली आहे. सत्तारुढ व विरोधी पक्षासाठी एक एक तासाचा वेळ देण्यात येत असतो व 40 मिनीटांचा वेळ माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरासाठी दिला जातो. या प्रस्तावावर जवळ 10 सन्माननीय सदस्यांना आपले विचार व्यक्त करावयाचे आहेत.

श्री. दिवाकर रावते :सभापती महोदय, मुंबईच्या सन्माननीय सदस्यांनीच या चर्चेमध्ये भाग घेणे आवश्यक आहे. आमच्या बाजूने केवळ सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम व सन्माननीय सदस्य श्री. विनायक राऊत बोलणार आहेत. सत्ताधारी बाजूच्याही दोनच सन्माननीय सदस्यांना विचार मांडण्याची संधी द्यावी अशी विनंती आहे.

**तालिका सभापती** : आता 5 वाजून 30 मिनीटे झालेली आहेत. 6.30 वाजता ही चर्चा संपल्यानंतर 6.30 वाजता माननीय मंत्री महोदयांच्या उत्तराला सुरुवात करण्यात येईल. आता सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी आपल्या भाषणाला सुरुवात करावी.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. आशिष शेलार (विधानसभेने निवडलेले): सभापती महोदय, मी गेल्या वेळच्या मुद्यांची पुनरावृत्ती करणार नाही. मुंबईच्या विषयासंदर्भातील चर्चा करीत असतांना मुंबई, ठाणे, एमएमआरडीए रिजनच्या प्रस्तावावर तसेच मुंबईच्या मोकळया जागेच्या संदर्भात चर्चा झालेली आहे.

सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने मी राज्य सरकारकडे काही प्रश्न उपस्थित करुन माझे भाषण पूर्ण करणार आहे. मी उपस्थित केलेल्या मुद्यांवर माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देणे अपेक्षित आहे.

सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेला येणाऱ्या रक्कमेंची आकडेवारी माझ्याकडे आहे. राज्य सरकारकडून अजूनही मुंबई महानगरपालिकेला 2611 करोड रुपये येणे बाकी आहे. गृहनिर्माण विभागाकडून 179 करोड रुपये, सार्वजनिक आरोग्य विभागाकडून 70 करोड रुपये, शालेय शिक्षण अनुदानाचे 1782 करोड रुपये असे सर्व मिळून 2611 करोड रुपये महाराष्ट्र शासनाकडून मुंबई महानगरपालिकेला येणे अपेक्षित असून राज्य सरकार हे पैसे कधी देणार आहे हा माझा पहिला प्रश्न आहे.

सभापती महोदय, मुंबईमध्ये अपुऱ्या पाणी पुरवठयाचा प्रश्न उपस्थित करण्यात आलेला आहे. परंतु मुंबई शहरामध्ये अपुरा पाणी पुरवठा होतो असे मानण्याची काहीच आवश्यकता नाही.

यानंतर श्री. भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार...

मी पटलावर आकडेवारी ठेवत आहे. ती वाचून वेळ फुकट घालवणार नाही. मंत्र्याचे बंगले आणि त्यांना मिळणारे पाणी या संबंधातील थोडक्यात माहिती देऊ इच्छितो. मी प्रत्येक मंत्र्यांच्या बंगल्याचे नाव वाचणार नाही. कारण त्यांना आवश्यकते नुसार पाणी पुरवठा मिळाला असेल. माननीय मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांच्या पर्णकुटी बंगल्याला 4952000 लिटर पाण्याचा पुरवठा करण्यात आलेला आहे. माननीय मंत्री श्री.आर.आर.पाटील यांच्या चित्रकूट बंगल्याला 7914000 लिटर पाण्याचा पुरवठा करण्यात आलेला आहे. माननीय मंत्री श्री.राजेंद्र दर्डा यांच्या नंदनवन बंगल्याला 495000 लिटर पाण्याचा पुरवठा करण्यात आला आहे. माननीय मंत्री श्री.पतंगराव कदम यांच्या अग्रदूत बंगल्याला 1823000 लिटर पाण्याचा पुरवठा करण्यात आला आहे. ही यादी मी पटलावर ठेवतो आहे. येथे अपुऱ्या पाणी पुरवठ्याचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी तो ऐकून घेण्याची आवश्यकता आहे.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, आपल्या कामकाजामध्ये चुकीच्या फिगर्स आणि फॅक्टस येतील. बाहेर चुकीचा मेसेज जाईल. आपण बाहेर पाणी वाचवा म्हणून सांगत आहोत. सन्माननीय सदस्य जी आकडेवारी देत आहेत त्याबाबत आम्ही तेथील पाईप लाईन्स किती फुटलेल्या आहेत, त्यातून किती पाणी फुकट जाते, ते पाणी खरोखर बंगल्या पर्यंत पोहोचते आहे काय की, अगोदरच पाईप लाईन मधून चोरी झाली आहे, असे सांगितले तर जनतेमध्ये चुकीचा मेसेज जाईल.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी उत्तर देणार असल्यामुळे सन्माननीय सदस्यांना डिस्टर्ब करावे असा माझा हेतू नाही. आमच्या बाजूने काही सन्माननीय सदस्य उठले म्हणून त्यांना सांगू इच्छितो की, मंत्र्यांच्या नावावर लाखो लिटर पाणी दाखविले जाते ते माननीय मंत्र्यांच्या बंगल्यामधील असले तरी ते पाणी एकट्या मंत्र्यांकरिता वापरले जात नाही, हे सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांना पक्के माहीत आहे. सरकारच्या विरोधात बाहेर व्यवस्थितपणे मेसेज पोहचविण्याचा प्रयत्न केला जात आहे. तसा प्रयत्न होऊ नये म्हणून मी सांगतो की, मंत्र्यांच्या बंगल्याचे बिल असले तरी बंगल्याच्या आजूबाजूला सुरक्षा असते, माळी असतो, त्यांचा स्टाफ असतो, त्यांच्याकडे येणारी माणसे आहेत हे सर्वजण पाणी वापरत असतात व ते दाखविण्यात येते. नागरिकांना नियमानुसार पाणी दिले जाते तेच त्यांना देखील दिले जाते. त्यांच्याकरिता वेगळी व्यवस्था नाही.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार बोलत असताना त्यामध्ये व्यत्यय अणण्याचा प्रयत्न माननीय राज्यमंत्री श्री.भास्कर जाधव यांनी केला आहे. आता येथे माननीय राज्यमंत्री श्री.भास्कर जाधव यांनी जो खुलासा केला आहे तो खुलासा ते त्यांच्या उत्तराच्या भाषणामध्ये करू शकले असते. प्रत्येक वेळी मध्ये उठून सन्माननीय सदस्यांच्या भाषणाची लिंक तोडण्याचे काम सन्माननीय राज्यमंत्री श्री.भास्कर जाधव करीत आहेत, असा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

ॲड्.आशिष शेलार : सभापती महोदय, मी अतिशय जबाबदारीने मुद्दे मांडत आहे. मी सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांना असत्य माहिती देत नाही. सभागृहाला असत्य माहिती देत नाही. सर्व 19 बंगल्यांना मिळून 9 करोड 49 लाख 34 हजार लिटर पाणी मिळते. मी असत्य माहिती देत असेन तर ती सन्माननीय सदस्यांनी खोडून काढावी.

मुंबई शहराच्या विषयावर चर्चा करताना मी असे म्हटले की, मुंबई शहराला नगरविकास विभागाकडून आणि केंद्र शासनाकडून पाहिजे तेवढी मदत मिळत नाही. मुंबई राज्याला आणि देशाला खूप काही देत असल्यामुळे स्वाभाविकपणे अपेक्षा ही असणारच. "14 एप्रिल रोजी इंदू मिलच्या जागेवर आंबेडकर स्मारकासाठी आरक्षण केंद्राच्या जमीन हस्तांतरण निर्णयासंबंधी प्रतीक्षा" अशा आशयाची बातमी आहे. अजूनही आपण सीआरझेडचा सन 2011 मधील कायदा बदलेला नाही. इंदू मिलची जागा स्मारकासाठी मिळणार आहे त्यासाठी जानेवारी 2011 ची अधिसूचना शासन कधी बदलणार आहे ?

माझ्या हातामध्ये दुसरी एक माहिती आहे. ती अतिशय गंभीर आहे. मुंबईची लाईफ लाईन रेल्वे आहे. एमयुटीपी-2 च्या अंतर्गत 5300 करोड रूपयांची कामे सन 2008 पासून अपेक्षित आहेत. मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशनचे श्री.राकेश सक्सेना म्हणतात की, "Failure to generate funds will heat the procurement of 72 rakes, extension of Harbour Line, AC-DC conversion of CR, augmentation of fifth and sixth line of Thane-Diva-Kurla-Parel." ही कामे अपेक्षित आहेत. या सगळ्या कामांना राज्य सरकारने आपला निधी दिलेला नाही. मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन राज्य सरकारने आपला निधी न दिल्याने कामे सुरू करू शकत नाही, असे मी म्हणत नसून मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशनचे अधिकारी म्हणत आहेत.

यानंतर श्रीमती रणदिवे....

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यु -1

APR

पूर्वी श्री.भारवि . . . .

5.40

श्री.आशिष शेलार . . .

.

राज्य शासन मुंबईच्या रेल्वेसाठी अधिकचा निधी केव्हा येणार आहे? मी हे अशासाठी सांगत आहे की, यापूर्वी देखील शासनाने काही निधी दिलेला नाही. मुंबईच्या विषयाच्या बाबतीत दोन महत्वाच्या गोष्टी आहेत. याठिकाणी मोनो रेलच्या बाबतीत चर्चा करण्यात आली, एमएमआरडीए बाबत उल्लेख करण्यात आला. मोनोरेलसाठी सेवा कराची आकरणी करु नये. मोनोरेल ही सुध्दा मुंबईची लाईफ लाईन होणार आहे. अशा वेळी मोनो रेलला सर्व्हीस टॅक्समधून एक्झमशन मिळावे यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे विनंती केली. पण केंद्र शासनाने असे सांगितले की, आम्ही तुमची विनंती मान्य करु शकणार नाही. केंद्र शासनाने सर्व्हीस चार्जेसच्या बाबता 100 कोटीचा दावा टाकला आणि तो कायम ठेवलेला आहे. अशा वेळी आपण याबाबतीत कोणती भूमिका घेणार आहात हा प्रश्न आहे.

सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये एमएमआरडीएने 30 हजार घरे पी.ए.पी.म्हणून बनविली. एमएमआरडीएची ती घरे ही कॅपिटल गेन आहेत असे समजून इन्कम टॅक्सने तुम्हाला 1 कोटी रुपयांची नोटीस दिली. केंद्र शासनाने सांगितले की, याठिकाणी गरीबांसाठी घरे बांधण्यात येणार आहेत म्हणून 1 कोटी रुपये प्रथम भरावेत आणि नंतर 56 कोटी रुपये भरावेत. याबाबतीत एमएमआरडीए हाय कोर्टामध्ये जाणार होती. राज्य सरकार केंद्र शासनाकडून 56 कोटी रुपये माफ करुन घेणार आहे की नाही हा माझा प्रश्न आहे.

सभापती महोदय, एमएमआरडीएला ॲथॉरिटीचा दर्जा आहे. या राज्याचे माननीय मुख्यमंत्री महोदय हे त्याचे अध्यक्ष आहेत. पण एमएमआरडीएला इन्कम टॅक्सने 3200 कोटी रुपयांची नोटीस दिली आहे. एमएमआरडीए चे बजेट आणि मुंबईला सेवा देण्याची इच्छा आणि केलेली कामे या दोन्ही गोष्टी प्रशंसनीय आहेतच आणि त्याची प्रशंसा करावीच लागेल. परंतु केंद्र शासनाच्या इन्कम टॅक्स विभागाचे म्हणणे आहे की, हे तुमचे गेन आहे. तुम्ही जागा विकली. त्यामुळे 3200 कोटी रुपयांचा इन्कमटॅक्स एमएमआरडीएला भरला पाहिजे. याबाबतीत आपण ट्रॅब्युनलमध्ये, अपिलामध्ये गेलात आणि आज हे मॅटर हाय कोर्टामध्ये आहे. तुम्ही मोनो रेलसाठी सेवाकरातून माफी देणार नाही. तुम्ही कॅपिटल गेनमधून 56 कोटी रुपयांची माफी देणार नाही. तुम्ही एमएमआरडीएला 3200

असुधारीत प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

कोटी इन्कम टक्समधून माफी देणार नाही. मुंबई शहरासाठी तुम्ही काय न्याय देणार आहात हे आपण सांगितले पाहिजे. यापेक्षाही एक गंभीर गोष्ट मला सदनासमोर आणावयाची आहे.

. . . .3 यु-2



ॲड.आशिष शेलार . .

. .

सभापती महोदय, माझ्या हातामध्ये मुंबई महानगरपालिकेचे परिपत्रक आहे. यामध्ये कायदा आणि सुव्यवस्थेचा उल्लेख केलेला आहे. दिनांक 27-9-2012 च्या परिपत्रकानुसार मुंबई शहरामध्ये दोन प्रकारची प्रार्थना स्थळे डिस्क्रीमिनेट केलेली आहेत. **अ**-कॅटॅगरीची प्रार्थना स्थळे आणि **ब**-कॅटॅगरीतील प्रार्थना स्थळे अ-कॅटॅगरीतील प्रार्थनास्थळे जी अनधिकृत होती, पण त्यांना व्यापक जनमत आहे आणि ती पोलिसांच्या आणि नियोजन प्राधिकरणाच्या अहवालानुसार नियमित करता येऊ शकतात आणि **ब** कॅटॅगरीची प्रार्थना स्थळे अशी आहेत की, जी नियमित करता येणे शक्य नाही. ज्याच्यामुळे प्लॅन आणि डीसीआर तसेच लॉ-ॲण्ड ऑर्डर व ट्रॅफीक याचा भंग होऊ शकतो.

सभापती महोदय, (अ) कॅटॅगरीमुळे मुंबई शहरातील 208 प्रार्थनास्थळे ही नियमित होऊ शकतात असा प्रस्ताव केला आहे. ज्यामध्ये 136 मंदिरे, 3 मशिदी, 66 क्रॉस आणि 3 बुध्दविहार आहेत. पण सभापती महोदय, त्यापेक्षा गंभीर गोष्ट अशी आहे की, ज्यामधून कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होऊ शकते आणि ती म्हणजे (ब) कॅटॅगरीची प्रार्थनास्थळे अनधिकृत म्हणून डिमॉलिशनच केली पाहिजेत. अधिसूचने मार्फत हरकती आणि सूचना मागविल्यानंतर जवळजवळ मुंबई शहरातील 445 मंदिरे तोडणे अपेक्षित आहेत, ती तोडण्यात येतील, जवळजवळ 17 मशिद व दर्गे तोडणे अपेक्षित आहे. 41 क्रॉस व चर्च तोडणे अपेक्षित आहे. 10 बौध्द मंदिरे तोडणे अपेक्षित आहे आणि एक गुरुव्दारा तोडणे अपेक्षित आहे अशी 534 प्रार्थना स्थळे तोडणे अपेक्षित आहे.

सभापती महोदय, माझी माननीय मंत्री महोदयांना अशी विनंती आहे की, आपण जी 27 सप्टेंबर 2012 ला नोटीफीकेशन काढले. 14-12-2012 ला सर्क्युलर काढले आणि त्यावेळी आपण सजेशन व ऑब्जेक्शन दिले ते 14 जानेवारी 2013 पर्यंत संपले. जी **(ब)** कॅटॅगरीमध्ये असलेली प्रार्थना स्थळे आहेत, त्यांना अजूनही काही पुरावे द्यावे लागतील. त्यामुळे सध्या आपण एक महिन्याची मुदत दिली असली तरी आणखी सहा महिन्यापर्यंत वाढवून देणार आहात काय? अन्यथा

असुधारीत प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

जर त्यांच्यावर कारवाईचे सावट पसरले तर मुंबई शहरामध्ये कायदा आणि सुव्यवस्थेची काय परिस्थिती होईल याचे उत्तर सुध्दा माननीय मंत्री महोदयांनी देणे अपेक्षित आहे.नगरविकास विभागाबद्दल मुंबईच्या बाबतीतील ही चर्चा आहे. मी सुरुवातीलाच म्हटले की, नगरविकास विभागाचा रोल यामध्ये सर्वात मोठा आहे. माझ्या हातामध्ये एक डॉक्युमेंट आहे. गरिबाला एक न्याय आणि श्रीमंतांना दुसरा न्याय. सभापती महोदय, 33 (6) माननीय मंत्री महोदयांना माहिती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ D/ KTG/ पूर्वी श्रीमती रणदिवे... 17:45

ॲड.आशिष शेलार...

जुन्या मोडकळीस आलेल्या व आग लागून पडलेल्या इमारतीच्या पुनर्विकासाकरिता एफ.एस.आय.मध्ये काही कन्सेशन देण्यात येते. रेमंडचे मालक श्री.गौतम सिंघानिया हे आपले स्वत: घर डेव्हलप करण्यासाठी त्या स्कीमचा वापर करीत आहेत. 33 (6) खाली ती स्कीम असू शकते.

सभापती महोदय, मलबार हिल येथील जे.के.हाऊस,डी वॉर्ड, सिटी सर्व्हे क्रमांक 764 चा प्रस्ताव पुनर्विकासासाठी आला होता. त्यासंदर्भात तत्कालीन आयुक्तांनी दिनांक 2 मे 2012 रोजी म्हटलेले आहे की, "Not only the concessions given are excessive and mis-useable but even the height above the given FSI is violating the DCR provisions. Each floor in addition to the separate refuge floor.... In respect of all these irregularities please make the report to the Government to fix responsibility in this matter." इमारत अनधिकृत रित्या बनली आहे. इमारतीला अनधिकृतपणे कन्सेशन दिलेले आहे असे आयुक्तांचे म्हणणे आहे. त्यांनी सदरहू प्रस्ताव दिनांक 2 मे 2012 रोजी नगर विकास विभागाकडे पाठविला. नगर विकास विभागाने पाच महिन्यानंतर कळविले की, "हा प्रस्ताव तुमच्या विचारासाठी परत महानगरपालिकेकडे पाठविला आहे." आज एप्रिल 2013 सुरु आहे.आयुक्तांनी कन्सेशन इललीगल आहेत असे सांगितले. परंतु गौतम सिंघानियाची फाईल आहे म्हणून टोलवाटोलवी चालू आहे असे मत होऊ नये म्हणून त्यासंदर्भात कोणती कारवाई करणार आहात हे माननीय मंत्री महोदयांनी सांगावे. गरिबाला एक न्याय आणि श्रीमंताला एक न्याय अशाप्रकारची भावना होता कामा नये.

सभापती महोदय, बेस्ट ही मुंबईची दुसरी लाईफ लाईन आहे. मुंबई आणि आजूबाजूच्या परिसरामध्ये बेस्ट काम करीत आहे हे आपणा सर्वांना माहीत आहे. इलेक्ट्रीक सप्लाय आणि ट्रान्सपोर्टेशनचे काम बेस्ट करते. एमईआरसीने सीआरसीच्या आधारावर सांगितले की, क्रॉस सबसिडी दिली जाणार नाही. क्रॉस सबसिडीला चार वर्षे मान्यता नव्हती. इलेक्ट्रीसिटीतून मिळालेला फायदा ट्रान्सपोर्टला मिळाला तरच ट्रान्सपोर्ट डिव्हीजन चालत होते. परंतु ही क्रॉस सबसिडी होऊ नये अशी भूमिका घेतल्यावर ट्रान्सपोर्ट डिव्हीजनचे कर्ज 1600 करोड रुपयांवर गेले आहे. बेस्ट ओपन मार्केटमध्ये नॅशनलाईज बँकाकडे गेली होती. बेस्टच्या जी.एम.ने म्हटले आहे की, "Now, it is informed by the Bankers that Finance Ministry of

..2..

ॲड.आशिष शेलार...

Government of India has issued certain directions and therefore as per these directions the Banks require collateral securities against Working Capital." म्हणून आम्हाला सॉफ्ट लोन मिळू शकत नाही. मुंबई महानगरपालिकेने 1600 करोड रुपयांचा सॉफ्ट लोन करण्याचा निर्णय घेतला. या संदर्भातील फाईल नगर विकास विभागाकडे मागील पाच महिन्यांपासून निर्णयासाठी पडून आहे. नगर विकास विभागाने त्यावर अद्याप निर्णय घेतलेला नाही. याबाबत मंत्री महोदयांनी आपल्या उत्तरामध्ये खुलासा करावा.

सभापती महोदय, दिनांक 2 मार्च 2009 मध्ये 33 (9) रिडेव्हलपमेंट आणि क्लस्टर रिडेव्हलपमेंट संदर्भात निर्णय झाला. Tenant Verification, Telescopic Assessment, Public Housing for dis-housed and Reservation या प्रत्येक मुद्याचे मी स्पष्टीकरण देत नाही. आपण अजून सुटेबल गाईडलाईन्स दिलेल्या नाहीत. तेव्हा मुंबईचा विकास 33 (9) खाली कसा होणार हे सांगणे अपेक्षित आहे.

सभापती महोदय, माझ्याकडे माननीय उच्च न्यायालयाचे एक जजमेंट आहे आणि ते मुंबई शहरातील प्रॉपर्टीशी संबंधित आहे. त्यामध्ये असे म्हटले आहे की, "While there can be no two opinions that the need to preserve ecology, one cannot overlook the fact that Mumbai, the Commercial Capital of the Country, is an island city already having thousands of structures within 500 meters and 1000 meters of the coast of several decades. The CRZ, 1991 which are now replaced by CRZ, 2011." हजारो बिल्डींग सीआरझेडमध्ये आहेत. तेव्हा न्यायालयाचे असे म्हणणे आहे की, राज्य सरकारने केंद्र सरकारशी समन्वय साधून मुंबई शहरांसाठी अन्य राज्यांप्रमाणे सीआरझे्ड कायदा न लावता मुंबईचा विकास आणि पुनर्विकास करण्यासाठी वेगळा कायदा प्रपोज केला पाहिजे. माननीय उच्च न्यायालयाने आदेश देऊन सात महिने झाले, परंतु अजून नगर विकास विभागाकडून काही कार्यवाही झालेली नाही. तेव्हा माननीय मंत्री महोदय मुंबईला न्याय देणार आहेत काय ?

यानंतर श्री.बोर्डे...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार....

या चर्चेच्या माध्यमातून मुंबई, मुंबईचा परिसर, मुंबईतील वाहतुकीचे प्रश्न, विजेचे प्रश्न, पाण्याचे प्रश्न, एमएमआरडीए इ. गोष्टींना न्याय द्यावयाचा असेल तर मी उपस्थित केलेल्या सर्व मुद्यांच्या बाबतीत तातडीने कार्यवाही करुन उत्तर देण्याची आवश्यकता आहे. अन्यथा या चर्चेतून मुंबईला काय मिळाले असा प्रश्न उपस्थित होऊ शकतो.

महोदय, या प्रस्तावाच्या निमित्ताने मी जे मुद्दे मांडलेले आहेत त्यावर माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे अशी अपेक्षा व्यक्त करतो व माझे भाषण पूर्ण करतो.

-------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी म.वि.प. नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी उभा आहे.

महोदय, एक गोष्ट सुरुवातीलाच सांगू इच्छितो की, मुंबईच्या बाबतीत ज्या ज्या वेळी चर्चा झ ाली त्या त्या वेळी वेळेचे बंधन टाकण्यात आले. या चर्चेला आपण वेळ वाढवून द्यावा असे मी म्हणणार नाही. मी विधानसभेत सुध्दा काम केले आहे आणि आता या सभागृहात सुध्दा काम करीत आहे. परंतु ज्या वेळी मुंबईवर चर्चा होते त्या वेळी आपण सर्वजण भरभरुन बोलतो. जी मुंबई देशाला भरभरुन देते त्या मुंबईच्या चर्चेसाठी पुरेसा वेळ मिळत नाही ही माझी खंत आपण नोंद करुन घ्यावी अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी मांडलेल्या मुद्यांचे मी रिपीटेशन करणार नाही. परंतु काही मुद्दे या ठिकाणी बोललो नाही तर ते मुद्दे अनुत्तरीत राहतील असे मला वाटते्. म्हणूनच काही मुद्दे प्रकर्षाने मांडण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

सभापती महोदय, मुंबईची चर्चा एमएमआरडीए किंवा अन्य प्रश्नांच्या भोवती ज्यावेळी फिरते त्या वेळी ती प्रामुख्याने जास्तीत जास्त मुंबई महानगरपालिकेच्या आजूबाजूलाच फिरत असते. अर्थात त्यामुळे इतर विभागांना सूट मिळत नाही. म्हाडा किंवा तत्सम विभागांना सुध्दा सूट मिळत नाही.

महोदय, या निमित्ताने मी एका गोष्टीकडे लक्ष वेधू इच्छितो. ज्या मुद्याचा उल्लेख वारंवार सन्माननीय सदस्यांनी केला आहे. या देशातील अनेक राज्याचे बजेट 10-15 हजार कोटी रुपयांच्या आत आहे. परंतु मुंबई महानगरपालिकेचे या वर्षीचे बजेट तब्बल 27 हजार कोटी रुपयांचे आहे. या पूर्वीचे बजेट 23 हजार कोटी रुपयांचे होते. मी फार पूर्वीच्या काळात जाणार नाही. परंतु 2008 पासून आतापर्यंत म्हणजेच गेल्या चार-पाच वर्षातील मुंबई महानगरपालिकेचे एकूण बजेट 1 लाख कोटी रुपयांचे होते. हे बजेट कशासाठी मिळत असते ? मुंबईकरांच्या बेसिक गरजा पूर्ण करण्यासाठी या बजेटचा खऱ्या अर्थाने उपयोग झाला पाहिजे. वीज, पाणी, प्रवास, सांडपाण्याची व्यवस्था किंवा मुंबईच्या इन्फ्रास्ट्रक्चरसाठी हे बजेट नियमितपणे ठेवलेले असते. मला प्रश्न पडला आहे की, गेल्या चार-पाच वर्षातील 1 लाख कोटी रुपये मुंबईच्या

श्री.भाई जगताप....

कोणत्या विभागावर खर्च झाले ? ही रक्कम खर्च केल्याने मुंबईतील असा कोणता भाग सुजलाम् सुफलाम् झाला याचे चित्र आपण दाखवू शकतो काय ? आजही पाण्याचा, वाहतुकीचा, विजेचा प्रश्न अनुत्तरीत आहे.

कोणी किती पाणी वापरावे या बाबत मी टिकाटिप्पणी करणार नाही. मुंबईतील नागरिकांना एकेकाळी 90 लीटर पाणी मिळत होते. ते आता 45 लीटरवर आले आहे. ही मर्यादा राज्य सरकारने आणलh नाही. मुंबईत पाण्याची कमतरता आहे हे आम्ही मान्य करतो.

नंतर श्री.बरवड....

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप .....

परंतु हे मांडत असताना त्यासाठी कोणी तरतूद केली पाहिजे ? मला आठवते की, ज्यावेळी अप्पर वैतरणाचा प्रश्न आला त्यावेळी 800 कोटी रुपये केंद्र सरकारने दिले. मध्य वैतरणा प्रकल्प मार्गी लावला. पाण्याच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा राजकीय अभिनिवेश न ठेवता मला एक गोष्ट या ठिकाणी प्रामुख्याने मांडावीशी वाटते की, नागरिकांना या सुविधा पुरविण्याचे काम कोणाचे आहे ? आज जर आरोग्याच्या दृष्टीने, शिक्षणाच्या दृष्टीने, पाण्याच्या दृष्टीने, स्वच्छतेच्या दृष्टीने विचार केला तर या सर्व गोष्टी महानगरपालिकेच्या अवतीभवती फिरत असतात.

सभापती महोदय, मला आपल्या निदर्शनास काही महत्वाच्या गोष्टी आणून द्यावयाच्या आहेत. सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार भाषण करुन निघून गेले. त्यांनी या ठिकाणी काही गोष्टी मांडल्या. त्याच्या संदर्भासह काही आकडेवारी मी सुध्दा आपल्याला देऊ इच्छितो. मागच्या वेळी जेव्हा मुंबई महानगरपालिकेची निवडणूक झाली त्यावेळी आम्ही 'करुन दाखविले' असे मोठमोठे होर्डीन्ग पाहिले तसेच तशा पध्दतीची भाषणे ऐकली. काय काय करुन दाखविले ते मी सांगतो. त्याचे कारण असे आहे की, आपण जे कॅप्शन घेतले होते त्यामध्ये आपण यशस्वी झालात का ? आपण लोकांच्या डोळ्यामध्ये धूळ फेकण्यामध्ये यशस्वी झालात. पण आपण प्रत्यक्षात काय केले याचा सुध्दा कधी तरी आढावा घ्यावा लागेल. मुंबईची चर्चा म्हणजे नक्की काय ? ज्या वेळी आपण मुंबईतील नागरिकांच्या भावनिक गोष्टींना हात घालत असता तेव्हा बजेट सादर करताना बेस्टचे दर वाढविले नाहीत. मग आज अचानक असे काय झाले की, ज्यामुळे आपण विजेचे दर 40 टक्के वाढविले. आपण बेस्टचे दर कशाच्या आधारावर वाढविण्याचा प्रयत्न करीत आहात ?

सभापती महोदय, सॉफ्ट लोनसाठी परवानगी देणे हा प्रशासनाचा भाग झाला. त्याबद्दल मी मत व्यक्त करीत नाही. त्या बाबतीत प्रशासन सक्षम आहे आणि ते उत्तर देतील. त्या ठिकाणी तुमच्यावर असलेले जे कर्ज असेल किंवा जे बर्डन असेल ते काढण्यासाठी तुम्ही शेवटी मुंबईच्या जनतेलाच पकडले. आज ज्या पध्दतीची करप्रणाली बेस्टमध्ये अवलंबिण्याचा प्रयत्न करीत आहात त्यासाठी कारणे देताना पेट्रोलचे दर वाढले अशी कारणे सांगितली जात आहेत. बेस्टच्या 70 टक्के बसेस सीएनजीवर चालतात. त्यांना डिझेल किंवा पेट्रोल लागत नाही. असे असताना एकीकडे तुम्ही

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/

श्री. भाई जगताप .....

बेस्टची दरवाढ करीत आहात आणि दुसरीकडे आम्ही मुंबईकरांना दिलासा देतो असे सांगता. आपण हेच करुन दाखविले का ? आपल्या त्या कॅप्शनमध्ये 'करुन दाखविले', 'करुन दाखविले' असे आपण सांगितले. मुंबईतील सर्वसामान्य लोकांचे वीज बिल 40 टक्के वाढविले, 1 कोटी 25 लाख लोकांवर तो बोजा टाकला. हेच करुन दाखविले का ? सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे जशी रेल्वे आपली लाईफलाईन आहे तशी मुंबईची लाईफलाईन आणि मुंबईचा आत्मा बेस्ट आहे. पण आज बेस्टच्या बसमधून विद्यार्थी जाऊ शकत नाहीत. आज बेस्टच्या बसने प्रवास करताना सर्वसामान्य माणूस आपल्या खिशाचा विचार करतो. आधी मात्र आपण मोठमोठ दावे केले होते की, आम्ही बेस्टचा एकही पैसा वाढविला नाही. पण आजची परिस्थिती पाहिली तर ती फार वाईट आहे. त्यावेळी असलेले 6 रुपयांचे तिकीट आज जवळजवळ 10 ते 11 रुपये झालेले आहे. मग आपण हेच करुन दाखविले का ?

सभापती महोदय, मला आणखी एक गोष्ट या ठिकाणी प्रामुख्याने सांगावीशी वाटते. मध्यंतरीच्या काळामध्ये भूमीगत जलबोगदा बांधल्याचा दावा करुन त्यामुळे पाण्याची कॅपॅसिटी वाढेल असे सांगितले. ते केले पाहिजे हे मान्य आहे. त्याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. त्या संदर्भात मोठमोठे कार्यक्रम झाले, फोटो छापून आले. त्या कामावर 900 कोटी रुपये खर्च केले. मी या ठिकाणी धूळफेक असा जो शब्द वापरला त्याला कारण आहे. आपण जनतेची फसवणूक करीत आहात आणि ती फार काळ चालणार नाही. मी सांगू इच्छितो की, मोडकसागरला कशेळी पूल आणि मुलुंड कांदिवली बोगदा 1978 साली झाला.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप....

1978 सालातील भांडुप संकुल येथील सॅण्डल बोगदा आहे. 1989 साली तेथे यांची सत्ता नव्हती. महालक्ष्मी ते मलबार हिल बोगदा हा त्या काळातील आहे. 1994 साली किंग्ज सर्कल ते मलबार बोगदा हा देखील त्या काळातील आहे. त्या काळात यांची महानगरपालिकेत नुकतीच सत्ता आली होती. आता रुपारेल ते महालक्ष्मी बोगदा असेल किंवा भांडुप-मालाड बोगदा या सर्व या बोगद्यांसाठी जवळजवळ 900 कोटी रुपये खर्च केलेले आहेत. हे करुन दाखविले काय ? सर्वसामान्यांचा पैसा मूलभूत गरजा भागविण्यासाठी, अडचणी सोडविण्यासाठी खर्च करावयास पाहिजे होता, परंतु तो अशा पध्दतीने खर्च केला जात आहे.

अक्राळ विक्राळ स्वरुपात असलेल्या मुंबई शहरातील पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नासंबंधी नेहमी चिंता व्यक्त केली जाते. पावसाळा आला की मुंबईत साथीचे रोग पसरतात. मुंबईकरांच्या आरोग्याचा प्रश्न तितकाच महत्वाचा आहे. या महानगरपालिकेने मुंबईकरांच्या आरोग्यासाठी काय करुन दाखविले आहे ? आरोग्य या विषयासाठी 2100 कोटी रुपये बजेटमध्ये तरतूद केलेली आहे. यापूर्वी या खात्यात किती खर्च झाला आहे हे मी सांगण्याची आवश्यकता नाही. 2008 या वर्षात राज्यात रुग्णांची संख्या 11,266 इतकी होती. त्यावेळी 98 रुग्णांचा मृत्यू झाला होता. 2009 या वर्षी 17,303 रुग्णांची संख्या होती, त्यापैकी 198 रुग्णांचा मृत्यू झाला होता. 2010 या वर्षी 72,768 रुग्णांची संख्या होती, त्यापैकी 134 रुग्ण मरण पावले, 2011 मध्ये 37,814 रुग्ण होते त्यापैकी 58 रुग्ण मरण पावले. हे सर्व रुग्ण साथीच्या रोगाने म्हणजे मलेरिया, डेंग्यूच्या आजाराने मरण पावले आहेत. या 4 वर्षात मुंबईतील साथीच्या रोगाने 350-400 रुग्ण मरण पावले आहेत. मुंबईच्या नागरिकांच्या आरोग्याबाबत हेच करुन दाखविले आहे का ? आम्ही करुन दाखविले, आम्ही करुन दाखविले असे नेहमी बोलले जाते. तुम्ही नेमके काय करुन दाखविले ते तरी आम्हाला एकदा सांगावे.

सभापती महोदय, मला एक गंभीर बाब मुद्दाम आपल्या आणि आपल्यामार्फत राज्यातील जनतेच्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे. माझ्याजवळ जी आकडेवारी आहे ती पूर्वीचीच आहे. या मुंबईत 16 उपनगरीय रुग्णालये, 163 दवाखाने, 168 आरोग्य केंद्रे, 10,169 खाटा होत्या. त्यामुळे मला मुंबई महानगरपालिकेला असा प्रश्न विचारावयाचा आहे की, महानगरपालिकेने





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ D/

श्री.भाई जगताप....

आरोग्यावर हजारो कोटी रुपये केलेला खर्च कोठे केला आहे त्याचे उत्तर आम्हाला मिळणे आवश्यक आहे. खाटांमध्ये किंवा रुग्णालयाच्या संख्येत किंवा प्राथमिक आरोग्य केंद्रात एकानेही वाढ झालेली नाही. आज मुंबईची लोकसंख्या पूर्वीपेक्षा तिपटीने वाढलेली आहे. मुंबईकरांच्या आरोग्यासाठी कोणती साधने निर्माण केली आहेत ? केवळ घोषणा करावयाच्या प्रत्यक्षात काही करावयाचे नाही आणि आम्ही करुन दाखविले असे म्हणावयाचे.

सभापती महोदय, या सभागृहात काही सन्माननीय सदस्य मराठी भाषेचा केवळ त्यांनाच पुळका असल्याचे दाखवून तावातावाने भाषण करीत असतात.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 18:05

श्री. भाई जगताप...

मराठीचे जतन व्हावे यासाठी केवळ यानीच तावातावाने बोलण्याची आवश्यकता नाही. हे तुमचे, आमचे सर्वांचेच कर्तव्य आहे. शिक्षणाच्या संदर्भातील आकडेवारी मी येथे वाचून दाखविणार आहे. सभापती महोदय, मराठीचा गळा घोटण्याचे काम यानीच करुन दाखविलेले आहे असे मी म्हटले तर ती अतिशयोक्ती होणार नाही. या सभागृहामध्ये जर एखादे वाक्य इंग्रजीमध्ये उच्चारले गेले तर त्या बाबतीत तावातावाने मराठीत बोला म्हणून सांगितले जाते. सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेच्या शाळेतील 27.48 विद्यार्थ्यांनी जय महाराष्ट्र केलेला आहे. हे त्यांनी का केले ? आम्ही करुन दाखवले, आम्ही करुन दाखवले, असा जो उदो उदो केला जातो ते हेच का त्यांनी करुन दाखविले आहे ? महाराष्ट्राची राजधानी असलेल्या या मुंबई शहरातील मराठी शिकणा-या विद्यार्थ्यांसाठी हेच करुन दाखविले आहे काय ? या विद्यार्थ्यांची गळती का झाली ? म्युनिसिपल शाळांची काय अवस्था आहे हे आपण जाऊन पहा. मी या ठिकाणी असे सांगेन की, त्या ठिकाणी जनावर देखील कोणी बांधून ठेवू शकणार नाही अशी अवस्था या म्युनिसिपल शाळांची झालेली आहे. मुंबई सारख्या महानगरातील शाळांची ही अवस्था आहे. या मुंबई महानगरपालिकेचे बजेट 27 हजार कोटी रु.चे आहे. हेच का तुम्ही करुन दाखविले आहे ? शाळा भाड्याने देण्याचा देखील प्रश्न आहे. आज प्राईम लोकेशनला असलेल्या शाळा भाड्याने दिलेल्या आहेत. मला कुणावर वैयक्तिक टीकाटिपणी करुन चर्चेचे महत्वे कमी करावयाचे नाही. प्राईम लोकेशनवर असलेल्या शेकडो शाळा खाजगी संस्था आणि खाजगी विकासकांना भाडेतत्वावर दिलेल्या आहेत. त्या शाळांचे तुम्हाला नूतनीकरण करता आले नसते काय ?

सभापती महोदय, शाळेतील विद्यार्थ्यांचे युनिफॉर्म, शूज, पुस्तके इत्यादी साहित्य खरेदी करण्यामध्ये कोट्यवधी रुपयाचा घोटाळा झालेला आहे. या बाबतीत ताशेरे ओढलेले आहेत. सुगंधी दूध कुणाला खूष करण्यासाठी, कुणाला सुगंध देण्यासाठी सुरु केले ? त्यावर आपसात भांडण केले. सुगंधी दुधाच्या तरतुदीच्या माध्यमातून कुणाचे पितळ सुगंधी केले हे मुंबईतील 1 कोटी 25 लाख जनतेला जाणून घेण्याची आवश्यकता आहे.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती ॲड अनिल परब)**

==2==



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप...

सभापती महोदय, निवडणुकीच्या काळामध्ये मोठमोठ्या घोषणा करण्यात आल्या. 66 भूखंड ताब्यात घेऊ अशा वल्गना केल्या. मग आता पर्यंत यांनी किती भूखंड ताब्यात घेतले आहेत ? 66 भूखंड नोटिफाईड केलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर हे या विषयावर बोलले आहेत म्हणून मी त्यावर बोलणार नाही. सभापती महोदय, मुंबईच्या जनतेची लूट चालवलेली आहे. हेच का आपण मुंबईच्या जनतेला करुन दाखविले आहे, याचे उत्तर मुंबईकर म्हणून आपणाकडून अपेक्षित आहे. मुंबईतील रस्त्यांच्या बाबतीत या सभागृहामध्ये अनेक वेळा चर्चा करण्यात आली. मुंबईतील मिठी नदीच्या ब्युटीफिकेशनवर मी नंतर बोलतो. मिठी नदी आणि मुंबईचे रस्ते या गोष्टी यांच्यासाठी पळवाटा आहेत. मिठी नदीचा 17 कि.मी.चा पॅच आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ पूर्वी श्री.शिगम 18:10

श्री.भाई जगताप....

मुंबईच्या रस्त्यांची डागडुजी, मुंबईच्या रस्त्यांचे डांबरीकरण, कॉंक्रीटीकरण करण्याचे काम इतक्या द्रुतगतीने झाले की त्याबाबत बोलत असताना मला थोडा अवधी वाढवून दिला तर बरे होईल.

सभापती महोदय, मिठी नदीच्या एकूण 17.4 कि.मी. परिसरापैकी 4 कि.मी.चा परिसर एमएमआरडीएकडे असून उर्वरित संपूर्ण परिसर मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यात असताना विकासाची कामे पूर्ण का झाली नाहीत? 700 कोटी रुपये खर्चाचा प्रकल्प आज 1260 कोटी रुपयांवर गेला आहे. तरी देखील केवळ 40 टक्के कामे पूर्ण झाली असून 60 टक्के कामे अपूर्ण आहेत. याला जबाबदार कोण? मुंबईच्या जनतेला हे तुम्ही करुन दाखविले का?

सभापती महोदय, रस्त्यांच्या बाबतीत अनेकदा या सभागृहात प्रश्न मांडले जातात. रस्ते किंवा इतर मूलभूत सुविधांबाबत राजकीय अभिनिवेष नसावा असे मी मानतो. मुंबईतील रस्त्यांचे कॉक्रीटीकरण आणि डांबरीकरण केले जात आहे. डांबरीकरणाची तीन वर्षाची गॅरंटी घेतली जाते. तीन वर्षाच्या काळात रस्ते डॅमेज झाले तर ठेकेदाराला स्वखर्चाने दुरुस्ती करुन द्यावी लागते. तशी कायद्यात तरतूद आहे. कॉक्रीटीकरणाच्या कामाची पाच वर्षाची गॅरंटी घेतली जाते. पाच वर्षाच्या आत जर रस्ता डॅमेज झाला तर ठेकेदाराला स्वखर्चाने दुरुस्ती करुन द्यावी लागते. एकीकडे दावा केला जातो की, 60 ते 70 टक्के रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण पूर्ण झाले आहे. मुंबईचे रस्ते चकचकीत बनविले आहेत असे म्हटले जाते. चकचकीत रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यासाठी 262 कोटी रुपये का खर्च करावे लागले? मुंबईकर नागरिक मुंबईच्या विकासासाठी कर रुपाने आपले योगदान देत आहेत. त्या मुंबईकरांना हे तुम्ही करुन दाखविले का?

सभापती महोदय, नेमेचि येतो पावसाळा अशी म्हण आहे. हा नेमेचि येणारा पावसाळा कोणाचे उखळ पांढरे करुन जातो? मागील पावसाळी अधिवेशनात प्रचंड गदारोळ झाला होता. मुंबई शहर आणि उपनगरातील नाल्यांमधील गाळ कसा काढला गेला, 100 टक्के नालेसफाई कशी केली गेली, प्रत्येक वर्षी शेकडो कोटी रुपये खर्चून नालेसफाई होत असताना त्या नाल्यांची डागडुजी करणे, ते नाले पूर्ववत व्हावेत यासाठी महापालिकेने कधी प्रयत्न केले का? कचऱ्यातून पैसा, नाल्यातून पैसा, पाण्यातून पैसा वाहतो आहे. मुंबईच्या जनतेचे 27 हजार कोटी रुपये जातात कुठे? याचे उत्तर प्रशासनाने दिले पाहिजे. मंत्री महोदय याबाबतीत निश्चितपणे उत्तर देतील अशी अपेक्षा आहे.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ पूर्वी श्री.शिगम 18:10

श्री.भाई जगताप........

सभापती महोदय, मुंबईच्या नागरिकांच्या आरोग्याशी खेळण्याचा जो प्रयत्न सुरु आहे, मुंबईच्या स्वच्छतेच्या संदर्भात जो खेळ करुन दाखविला आहे, रस्त्यांची जी दुरवस्था आहे, शेकडो कोटी रुपयांचा भ्रष्टाचार रस्त्यांमध्ये पडलेल्या खड्डयांच्या माध्यमातून झाला याबाबत शासनाने कडक धोरण अवलंबून या प्रकरणाची पूर्ण चौकशी करुन................................................

नंतर 4बी.1...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप .....

खऱ्या अर्थाने मुंबईकरांचा पैसा कोठे जातो व त्या पैशाचा कसा अपव्यय होतो याबाबतीत मला शासनाकडून उत्तर अपेक्षित आहे.

सभापती महोदय, मुंबईच्या अक्राळ विक्राळ शहरामध्ये झोपडपट्टयांची मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. मुंबईचा मूळ नागरिक कोळी समाजाचा बांधव असू शकेल, किंवा आदिवासी समाजाचा आमचा बांधव असेल. आदिवासींचा उल्लेख केल्याबरोबर काहींच्या भुवया उंचावल्या गेल्या आहेत. मुंबईचा आदिवासी हा मुंबईच्या आरे कॉलनीमध्ये राहतो आहे. मुंबईच्या आरे कॉलनीमध्ये 32 आदिवासी पाडे आहेत. या आदिवासी पाडयांची स्थिती भयंकर आहे. ज्यावेळेला फोर्सवनची निर्मिती होत होती त्यावेळेला आदिवासी पाडयातील 100 एकर जागा ॲक्वायर करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता तेव्हा आम्ही त्याला विरोध केला व त्या ठिकाणच्या एकाही आदिवासी पाडयाला हात लावू दिला नाही. आदिवासी पाडयाचे जतन आणि संवर्धन करण्याच्या दृष्टीने आम्ही सर्वांनी प्रयत्न केलेले आहेत.

सभापती महोदय, आदिवासी पाडयांच्या आजूबाजूला झोपडया बांधण्याचे रॅकेट तयार झाले असून यामध्ये काही अधिकाऱ्यांचा तसेच काही पोलिसांचा देखील समावेश आहे. या ठिकाणचा आदिवासी शेकडो वर्षापासून त्या जागेचा मालक आहे. या आदिवासी पाडयांचा विकास करीत असतांना आपण एसआरए खाली या पाडयांचा कसा काय विकास करु शकता ? आपल्याला या आदिवासी पाडयांचा विकास एसआरए खाली करता येणार नाही. आदिवासी हे त्या जागेचे आणि त्या ठिकाणच्या संपूर्ण परिसराचे मालक आहेत. त्यामुळे माझी आपल्याला विनंती आहे की, आदिवासी त्या ठिकाणी वर्षानुवर्षापासून वास्तव्य करीत आहेत हे लक्षात ठेवूनच आपल्यला आदिवासी पाडयांचा विकास करावा लागणार आहे. आदिवासी पाडयांचा विकास एसआरए खाली करता येणार नाही. ज्या अधिकाऱ्यांनी आदिवासीं पाडयांमध्ये संगनमताने झोपडया वाढविल्या आहेत त्या निष्कासित करण्यासाठी आपण कोणती पाऊले उचलणार आहात याचे उत्तर मिळण्याची आवश्यकता आहे.

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप .....

सभापती महोदय, एमएमआरडीएने अनेक ठिकाणी इमारती बांधलेल्या आहेत. जोगेश्वरी, मुंबईतल्या इतर भागात तसेच उपनगरातील इतर भागातही एमएमआरडीएने अनेक इमारती बांधलेल्या आहेत. या इमारती 25-30 वर्षा पूर्वीच्या नसून या इमारती अलिकडच्या 4-5 वर्षापूर्वी बांधण्यात आलेल्या आहेत. आज या इमारतींची अवस्था फार बिकट झाली आहे. 7-7 माळयाच्या इमारतीमधील एकही लिफ्ट काम करत नाही. मुंब्रा येथे मागच्या हप्त्यात जी दुर्घटना घडली होती तशाच प्रकारच्या दुर्घटना एमएमआरडीच्या इमारतीच्या बाबतीत घडू शकते अशी परिस्थिती आहे.

सभापती महोदय, सातव्या माळयावर वयस्कर माणूस राहत असेल तर तो लिफ्ट नसल्यामुळे खाली येतच नाही. या इमारतींमध्ये पाण्याचा प्रश्न सुध्दा मोठया प्रमाणात आहे. सात माळयाच्या इमारतीमध्ये केवळ दोन माळयापर्यंत पाणी जाते. सातव्या माळयावरील लोक खालच्या माळयावर येऊन पाणी भरत असतात. माझी माहिती अशी आहे की, एमएमआरडीएच्या इमारती बांधण्याचे काम ज्या कंत्राटदारांना दिले होते त्या कंत्राटदारांनी सबकंत्राटदार नेमून या ठिकाणी अतिशय निकृष्ट दर्जाच्या इमारती बांधलेल्या आहेत. एमएमआरडीएच्या सर्व इमारतींना तडे गेलेले आहेत. मुंबईचा नागरिक एमएमआरडीएच्या इमारतीमध्ये जीव मुठीत धरुन राहतो आहे. त्यामुळे याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी यासंदर्भात आपल्या उत्तरात उल्लेख करणे आवश्यक आहे.

यानंतर श्री. भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप...

सभापती महोदय, येथे 33 (9), 33 (6) संबंधी बोलले गेले आहे. मी 33 (7) संबंधी बोलणार आहे. आपण यात बदल केले आहेत. पण ते गेले कुठे ? 33 (7) मध्ये बदल केल्यानंतर आपण आमचे किती प्रोजेक्ट पास करून दिलेले आहेत ? यामध्ये क्लिष्ट अटी व शर्ती आहेत. त्याचा आपल्याला विचार करणे आवश्यक आहे. रस्ते, आरोग्य, पाणी, खड्डे यासंबंधी बोलत असताना सीआरझेडच्याबाबतीत सरकारला वेगळे धोरण आखावे लागेल.

आपण जगभरातील मोठी मेट्रो शहरे पहावीत. त्यांची आपण वाहतुकीची सुविधा पहावी. तेथे मेट्रो आहे, मोनो रेल आहे. जगभरात जल वाहतुकीची सोय आहे. ती आपल्याकडे नाही. आज आपल्याकडे संधी असताना देखील काहीच केले जात नाही. आपण फक्त टेंडर काढले आहे. बोरिवली पासून गेटवे पर्यंत, नवी मुंबईपासून गेटवे पर्यंत जल वाहतूक करू अशी घोषणा करण्यात आली ती आपण सुरू केलेली नाही. आपण कितीही ताण कमी करण्याचा प्रयत्न केला तरी पाहिजे तेवढ्या प्रमाणात ताण कमी होणार नाही. आपण जल वाहतुकीला सुरूवात केली तर त्याचा दिलासा मुंबईकरांना नक्कीच मिळेल असे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. माझे काही मुद्दे राहिले असले तरी माझे मित्रवर्य त्यावर बोलतील. माननीय सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार व्यक्त करतो आणि येथेच थांबतो. जय हिंद जय महाराष्ट्र.

...........

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, मुंबईचा विस्तार मोठ्या प्रमाणावर होणार आहे. याचे नियोजन राज्य शासनाने 40-45 वर्षापूर्वीच केले होते. एमएमआरडीए आता झाली आहे. पूर्वी बीएमआरडीए होती. मी अलिबाग पंचायत समितीचा सदस्य होतो. त्यावेळी आमच्याकडे बीएमआरडीएचे अधिकारी यायचे आणि मुंबई कशी वाढणार आहे याचे प्रबोधन द्यायचे. रायगड जिल्ह्यातील अलिबागचा अर्धा तालुका, पेणचा अर्धा तालुका, पेणचा 75 टक्के भाग, आणि उरणचा जवळ जवळ 90 टक्के भाग विकसित होणार आहे. त्यावेळी या सर्व तालुक्यांमध्ये बीएमआरडीएचे अधिकारी येऊन प्रबोधन करायचे. आम्हाला नवनवीन योजनांची माहिती देत असत.

सभापती महोदय, मी ग्रामपंचायत, पंचायत समितीमध्ये, जिल्हा परिषदेमध्ये काम केले आहे. त्यावेळी मी बीएमआरडीएच्या ऑफिसमध्ये जात होतो. मी एमएमआरडीएच्या ऑफिसमध्ये एकदाच गेलो. त्यानंतर पुन्हा तेथे जाण्याची माझी हिंमत झाली नाही. आज त्यांचा जनतेशी संबंध तुटलेला दिसतो.

मुंबई महानगरपालिकेसाठी मर्यादित कायदे न करता ते एमएमआरडीएसाठी केले पाहिजेत. एसआरएसह अन्य योजना आहेत. एमएमआरडीएच्या क्षेत्रात येणारा सर्व भूभाग हा मुंबईसारखा विकसित होणार आहे. आज काय होत आहे ? गिरगावमधील मराठी माणसे आपली खोली विकतात आणि पेण-पनवेल-खोपोली आणि विरार येथे झोपडी बांधून राहतात. हे सर्व थांबले पाहिजे. त्यासाठीच एमएमआरडीए आहे.

यानंतर श्रीमती रणदिवे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील . . . .

सभापती महोदय, हे थांबविण्यासाठी एमएमआरडीए आहे आणि ते फक्त मुंबईपुरते काम पहाते, ग्रामीण भागासाठी काही करीत नाही. आज निधीचे वाटप करताना नगरपालिकेमध्ये एमएमआरडीए निधी देते. ग्राम पंचायतीला निधी देत नाही. जर तुम्ही याचे पर्सेंटेज काढले तर ते .0 मध्ये येईल म्हणजे जसे सिंचनाच्या बाबतीत आहे तसे. एक राजकीय जागरुक कार्यकर्ता आहे. मी विविध क्षेत्रात काम करतो. एक आमदार म्हणून किंवा मी विविध क्षेत्रात काम करीत असताना मला विषय डेव्हलप करण्यासाठी, प्रबोधन करण्यासाठी एमएमआरडीएचा कुठलाही अधिकारी भेटावयास आला नाही. माननीय मंत्री महोदय, यामध्ये बदल करण्याची गरज आहे.

सभापती महादय, माझे आजोबा देखील 1925 साली आमदार होते. मी रेकार्ड पहात होतो, 1967 सालापासूनचे रेकॉर्ड आहे. त्यावेळी 1925 साली 7:12 वर मतदान होत असे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याबरोबर त्यांनी काम केले आहे. ते स्वतंत्र मजूर पक्षाचे सदस्य होते. पण त्यांना आमदार होण्याची संधी मिळाली नाही.1952साली ते निवडणूक हरले. पण 1957 साली त्यांनी सन्माननीय सदस्य कै.दत्ता पाटील यांना विधानसभेत पाठविले.शेतकऱ्यांचे नेते म्हणून लोक आमच्या आजोबांना भेटावयास येत असत. मग अधिकारी कलेक्टर असो, माननीय मंत्री महोदय असो किंवा इतर कोणीही असो, सर्वसामान्य माणसासाठी झगडणारा व जनतेचे प्रश्न सोडविणारा नेता म्हणून त्यांना अनेक जण भेटावयास अनेक जण येत असत.आम्ही लहानपणी त्यांना दिवाणखान्यातून हळूच पहात असू आणि ते त्यांच्याशी चर्चा करावयाचे.आज एवढी अधोगती झालेली आहे की,अधिकारी हे स्वत:ची खाजगी मालमत्ता असल्याचे समजतात. मात्र एमएमआरडीए मध्ये कामाच्या बाबतीत नियोजन असल्याचे मला दिसत नाही.

सभापती महोदय, याठिकाणी एमएमआरडीएचे कोणतेही काम नियोजनबध्द होत नाही. जर मी चुकत नसेन तर एमएमआरडीए चे जवळजवळ सहा ते साडेसहा हजार कोटी रुपयांचे बजेट असेल. ही आकडेवारी माननीय मंत्री महोदयांना तोंडपाठ असेल. तसेच मुंबईच्या बरोबरीने एमएमआरडीए परिसरामध्ये नवीन शहरे वसत असताना त्यांची प्रथम काळजी घेतली पाहिजे. मी चायनामध्ये वर्षातून 2-3 वेळा व्यवसायाच्या निमित्ताने जात असतो. परंतु चायना मध्ये उलटी गंगा वहाते.जर एखादे शहर विकसित करावयाचे असेल तर तेथील अधिकारी त्या ठिकाणी 60 कि.मी.च्या पुढे संपूर्ण गावेच्या गावे उठवतात. याठिकाणी प्रथम विकासाची कामे करतात आणि त्यानंतर पुढचा नवीन प्रोजेक्ट उभा करतात. 25 वर्षानंतर सदरहू प्रोजेक्टमुळे उद्या ते गाव किंवा



असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील . . . .

शहर तेथपर्यंत येणार असेल तर त्याचे नियोजन अगोदरच करण्यात येते. आज आपल्याकडे काय स्थिती आहे? आज एम.एम.आर.डी.ए.बाबत देखील चर्चा होते. काम कोणाला द्यावयाचे, कोणता प्रोजेक्ट घ्यावयाचा, किती प्रोजेक्ट करावयाचे याचे कोणतेही सूत्र नाही.

सभापती महोदय,माननीय मंत्री महोदय या चर्चेच्या निमित्ताने माझी अपेक्षा आहे की, ग्रामीण भागामध्ये एमएमआरडीए एरिया आहे, ज्या ग्राम पंचायती आहेत. त्यांना तुम्ही किती साथ देणार आहात हा प्रश्न आहे. ग्राम पंचायतीमध्ये झोपडपट्टयांचे दुखणे आहे. मग उदाहरण द्यावयाचे तर मुंब्रा येथे काय स्थिती होती? आपण कोकणातून येताना वडखळ येथे थांबत असू. दुसरा स्टॉप पनवेल आणि तिसरा स्टॉप हा चौसाळा किंवा तळोजा येथे असे. तळोजा येथे बिर्याणी खाल्ल्यानंतर मग मुंबईला जावयाचे. पूर्वी मुंब्रा हे एक खेडे होते.आज मुंब्रा येथे काय परिस्थिती आहे आणि तशीच परिस्थिती आज आमच्या अलिबागची देखील आहे.आज अलिबाग येथील एमएमआरडीए मध्ये साडेपाच हजार रु.स्वे.फू.इतका भाव सुरु आहे.उद्या दहा वर्षाकरता काही नियोजन आखण्यात येणार आहे काय?

सभापती महोदय, मी सकाळी लक्षवेधी सूचनेवरील चर्चेच्या वेळी याबाबतीत विचारणा केली होती. एमएमआरडीएच्या एरियात फ्लॅट आणि घरांसाठी परवानगी ही एमएमआरडीएने दिली पाहिजे. ग्राम पंचायतीने नाही, नगरपरिषदेने नाही, कोणीही नाही. पण त्याचे केंद्रीकरण करु नका. तालुका पातळीवर, ग्राम पंचायत पातळीवर एमएमआरडीए चे अधिकारी तेथे बसले पाहिजेत तसेच त्यांना बैठकीसाठी बोलवावे आणि प्लॅनिंगनुसार तेथील विकास झाला पाहिजे. याठिकाणी केवळ मुंबईबाबत चर्चा होत नाही तर ती दुसरी मुंबई, तिसरी मुंबई, चौथी मुंबई होणार असून माणगाव पर्यंत जाऊन वसणार आहे.

यानंतर श्री.अ.शिगम . . .

.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

त्याचे नियोजन या चर्चेच्या निमित्ताने आम्हाला कळले पाहिजे.

सभापती महोदय, मी जास्त वेळ बोलणार नाही. परंतु मी जलवाहतुकीवर अधिकारवाणीने बोलू शकतो. या मुंबईमध्ये पहिली स्पीड जलवाहतूक मी सुरु केली. मी त्या ठिकाणी स्पीड बोटी आणल्या. तसेच हिंदुस्थानामध्ये ए.सी.प्रवासी जलवाहतूक सर्वप्रथम मी सुरु केली. अलिबाग ते मांडवा अशी सेवा सुरु केली होती. शासन मांडवा ते भाऊचा धक्का किंवा रेडियो क्लब अशी 250 कोटी रुपयांची योजना करीत आहे. पंरतु ती योजना होऊ शकत नाही. नरीमन पॉईंट ते बोरिवली अशी जल वाहतूक होऊ शकत नाही. कारण तो ओपन समुद्र आहे. तेथे ब्रेक वॉटरची तदतूद करावी लागेल. शासनाला साधे मांडव्याचे 40 कोटी रुपयांचे ब्रेक वॉटर करता आले नाही. शासन नरीमन पॉईट ते बोरिवली अशी जल वाहतूक सुरु करण्ार असेल तर त्यासाठी जागा घेतील तेथे हॉटेल्स बांधली जातील, परंतु तेथे बोटीची सुविधा करु शकणार नाहीत.

सभापती महोदय, शासनाने साखर कारखान्यातील तज्ज्ञ लोकांना बोलावून सहकार कायदा केला. त्या चर्चेसाठी आम्हाला बोलावले नाही. महाराष्ट्रात सहकार क्षेत्रात काम करणाऱ्या विद्वानांना बोलावून सहकार कायद्याचे प्रबोधन केले. आम्ही त्यामध्ये नव्हतो. आम्ही सहकारामध्ये शून्यातून उभे राहून इतके काम केले, परंतु आम्हाला बोलावले नाही. तेव्हा आपण आम्हाला जल वाहतुकी संदर्भात तरी चर्चा करण्यासाठी बोलवावे अशी विनंती आहे.

सभापती महोदय, एमएमआरडीएला टॅक्स भरावा लागणार आहे. शासन वकिलांना पैसे देण्याचे काम करीत आहे. श्री.चिदंबरम साहेब असेपर्यत ते होणार नाही. एमएमआरडीए कंपनी आहे. एमएमआरडीए हे महामंडळ असले तरी शासनाला टॅक्स भरावा लागणार आहे.

सभापती महोदय, गतीने काम करण्यासाठी मेरी टाईम बोर्ड करण्यात आले. रस्ते विकास महामंडळासाठी वेगळे बजेट करण्यात आले. त्यानंतर महाजनको करण्यात आले.

सभापती महोदय, माननीय मंत्री हे एमएमबीचे व्हाईस चेअरमन आहेत. त्यांच्याकडे बंदरे विभागाचा कार्यभार देखील आहे. आपणास मंत्रिमंडळाने जे अधिकार दिलेले आहेत त्याचा वापर आपण करता काय असा प्रश्न आहे. या ठिकाणी मस्त पॉलिसी केलेली आहे, त्यांना सर्व अधिकार आहेत, पण त्याचा ते वापर करीत नाहीत. आपण सर्व फाईल्स महसूल विभागाकडे पाठवित आहात.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

सभापती महोदय, 720 कि.मी.च्या परिसरामध्ये रिलायन्स कंपनी व्यतिरिक्त अन्य कोणत्याही कंपनीला जागा दिलेली नाही. आपणास जे अधिकार दिलेले आहेत म्हणजे जमिनी देण्याचे, जमिनी घेण्याचे, टॅक्स लावण्याचे, जल वाहतूक सुरु करण्याचे, त्याचा वापर आपण करणार आहात की नाही ? कारण नसताना अशाप्रकारे फाईल्स फिरवून मुंबईचा विकास होणार नाही. जल वाहतूक ही जगातील सर्वात स्वस्त असलेली वाहतूक आहे. कार्गोमध्ये सर्वात स्वस्त असलेली ही वाहतूक आहे. युरोप आणि चायनामध्ये सर्वात जास्त वाहतूक जलवाहतुकीद्वारे होते.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

आपल्याकडे या बाबतचे काय नियोजन आहे ? मुंबईमध्ये नवीन खाजगी बंदर होत आहे. बीपीटीने नवीन जेट्टी बांधली आहे. त्या ठिकाणी दिवसाला 5 हजार कंटेनर येणार आहेत. म्हणजेच 2500 हजार कंटेनर येणार आणि तितकेच कंटेनर बाहेर जाणार आहेत. हे एमएमआरडीएला माहीत आहे काय ? या निमित्ताने मी सुचवू इच्छितो की, आपण जल वाहतुकीच्या बाबतीत एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांबरोबर बैठक घ्यावी.

सभापती महोदय, होशांग, शांघायमध्ये काय आहे ? छोट्या खाड्यांतून हाँगकॉगला मोठ्या जहाजाद्वारे माल नेला जातो. मुंबईत 5 हजार कंटेनर उतरले तर तितकेच ट्रेलर आतमध्ये येण्याची क्षमता आज या मुंबईत आहे काय ? यासाठी आपल्याला छोटीछोटी बंदरे निर्माण करावी लागतील. काही खेडमध्ये, काही रत्नागिरीमध्ये निर्माण करावी लागतील आणि तेथून बार्जेसमधून ती बाहेर न्यावी लागतील.

महोदय, सर्वात जास्त ड्रॉप मुंबई बंदरात आहे. मुंबई बंदर हे बाराही महिने चालणारे बंदर आहे. गोवा बंदर काही दिवस बंद असते. कारवार, मेंगलोर बंदर पावसाळ्यात बंद असते. त्यामुळे त्या भागातील व्यवसाय आपण आपल्याकडे आणू शकतो. त्यामुळे या संदर्भात योग्य तो विचार झाला पाहिजे. माननीय नगर विकास राज्यमंत्री हे कोकणातील आहेत. त्यांच्याकडून मी अपेक्षा करतो की, त्यांनी जास्तीत जास्त जल वाहतुकीकडे लक्ष दिले पाहिजे.

महोदय, एमएमआरडीएच्या नवीन विकास निधीचे वाटप करण्याचे अधिकार कोणाला आहेत ? एमएमआरडीएचे बोर्ड या बाबत काय नियोजन करते, कोणत्या लोकप्रतिनिधीकडे आपण कामाची मागणी करता हे समजले पाहिजे. ती कामे कोण मंजूर करतो किंवा आम्ही कोणाला सांगितल्यास ती कामे मंजूर होणार आहेत हे माननीय मंत्र्यांनी सांगितले पाहिजे. सर्वात अद्ययावत आणि सुखसोई असलेले कोणते महामंडळ असेल तर ते एमएमआरडीए आहे असे मला वाटते. भविष्यात मेट्रो प्रकल्प झाला तर एमएमआरडीएचे बजेट मुंबई महानगरपालिकेपेक्षा जास्त होणार आहे. आमच्या अपेक्षेप्रमाणे एमएमआरडीएवर नियंत्रण ठेवण्याचे काम चांगल्या प्रकारे झाले पाहिजे. एमएमआरडीएच्या माध्यमातून मुंबईत नवीन विकास कामे होत आहेत. आपण मुंबई स्वच्छ करीत 10 वर्षे पुढे जाल आणि पुन्हा पुढे मुंबई तशीच निर्माण होण्याची शक्यता आहे. ती तशी निर्माण होऊ नये अशी अपेक्षा व्यक्त करुन माझे भाषण संपवितो.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, म.वि.प. नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभी आहे.

महोदय, जागतिक किर्तीचे शहर म्हणून मुंबई शहराचा वारंवार उल्लेख केला जातो किंबहुना तशी ओळख करुन दिली जाते. त्या मुंबई शहराच्या एकूणच लक्तरांविषयी मी बोलणार आहे.

महोदय, आज मुंबईतील रुग्णालयांची काय स्थिती आहे ? पूर्वी मुंबईतील रुग्णालयात महाराष्ट्रातून आणि देशातून रुग्ण येऊन व उपचार घेऊन आपल्या घरी आनंदाने जात होते. परंतु आज त्या रुग्णालयांची काय अवस्था आहे ? के.ई.एम. रुग्णालय असेल, सायन रुग्णालय असेल किंवा अन्य रुग्णालये असतील. या सर्व रुग्णालयांतील एक्स-रे मशीन, चाचणी मशीन बंद आहेत. त्या मशीन मुंबई शहरातील राज्यकर्त्यांच्या काळात दुरुस्त झाल्याचे आपल्याला दिसत नाही.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई .....

त्यांच्यावर उपचाराची बाब तर त्याहून पुढे आहे. आज मुंबई शहरातील रुग्णालयांमध्ये औषधे नाहीत. गेल्या तीन ते चार वर्षात वेळावेळी साथीच्या रोगामध्ये डेंग्यू, मलेरिया, टायफाईड अशा आजाराच्या साथी पसरल्या. कस्तुरबा हॉस्पिटल साथीचे हॉस्पिटल म्हणून परिचित आहे. त्या हॉस्पिटलमध्ये रुग्णांना मच्छर चावू नयेत म्हणून ज्या जाळ्या लावलेल्या आहेत त्याही दुरुस्त होत नाहीत. अशी मुंबई शहरातील आरोग्याची आज अवस्था आहे. याला कोण जबाबदार आहे आणि हे कोठे तरी बदलणार की नाही ?

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी सांगितले सरकारकडून एवढे पैसे यावयाचे आहेत, तेवढे पैसे यावयाचे आहेत. मुंबई महानगरपालिकेचे 27 हजार कोटी रुपयांचे बजेट आहे हे आपण विसरलात का ? मी मुंबई महानगरपालिकेमध्ये 20 वर्षे होते. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. विनायक राऊत उपस्थित आहेत. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आता सभागृहातून बाहेर गेलेले आहेत. त्यांनी मुंबई महानगरपालिकेत काम केले आहे. मोठमोठ्या लोकांनी या महानगरपालिकेमध्ये काम केलेले आहे. या महानगरपालिकेत काम केलेले दोन मंत्री आपल्या विधिमंडळात आहेत.

सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या इमारतींची बांधकामे होत आहेत. आज मुंबई शहरामध्ये 40 मजल्यांच्या इमारती उभ्या राहात आहेत तसेच याच शहरामध्ये माणसे दारिद्र्यामध्ये सुध्दा राहताना दिसतात. मग ते झोपडपट्टीमध्ये राहात असतील किंवा जुन्या इमारतींमध्ये राहात असतील. याला कोण जबाबदार आहे ? नगरविकास विभाग आहे, अमूक विभाग आहे, याच्या चर्चेमध्ये मी जाणार नाही. ती चर्चा वेगळी असते. परंतु या परिस्थितीला कोण जबाबदार आहे ? आज लालबाग, परळ अशा मराठी गिरणगावामध्ये मोठमोठे इमले उभे राहात आहेत. त्या ठिकाणी मोठमोठ्या इमारती झाल्या. परंतु तेथील मराठी माणूस कोठे गेला आहे याची चौकशी मराठीचे राजकारण करणाऱ्या लोकांची कधी केली आहे का ?

सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये जशा मोठमोठ्या इमारती आहेत त्याचप्रमाणे सरकारच्या अंतर्गत म्हाडाच्या 56 वसाहती आहेत. या 56 वसाहती वेगवेगळ्या संस्थांच्या आहेत. त्यामध्ये

RDB/

श्रीमती अलका देसाई ....

रिपेअर बोर्डे, स्लम, एलआयजी, एमआयजी आहे. मी फक्त ट्रान्झीटच्या विषयावर बोलणार आहे. पुनर्विकास होणार आहे अशी चर्चा मी सारखी ऐकत असते. पण अजून त्या ठिकाणी पुनर्विकास झालेला नाही. मी गेली 25 वर्षे पाहात आहे. रिपेअर बोर्डाच्या ट्रान्झीट कॅम्पमध्ये जे लोक राहतात त्यांच्याकडून भाडे वसूल करुन घेतले जाते. पुढे काय होणार आहे याबाबत त्यांना सांगितले जाते. त्या त्या खात्याचे अधिकारी आणि त्यांचे जे दलाल आहेत हे लोक त्यांना ते सांगतात आणि परीक्षेच्या तोंडावर कोणता तरी एखादा मूर्ख अधिकारी येऊन सांगतो की, तुमचे घर आता आम्ही खाली करणार आहोत. प्रॉपर्टी कोणाची आणि कोण हे सांगतो, कोण भाडे घेतो याचा आपण कधी विचार करणार आहोत की नाही, त्या बाबतीत काही निर्णय घेणार आहोत की नाही ? जोपर्यंत अधिकारी आपले गुण दाखवत नाहीत तोपर्यंत ते लोक आपापल्या घरामध्ये राहू शकत नाहीत. हे कशाचे द्योतक आहे ? मुंबई शहरातील कष्टकरी लोकांना, मुंबई शहरातील उद्योग करणाऱ्या लोकांना कोठे तरी न्याय मिळणार आहे की नाही हा खरा प्रश्न आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई.......

मला या विषयावर एवढेच सांगावयाचे आहे. या मुंबई शहराला कोणी न्याय देणार आहे की नाही ?

मुंबई शहरातील पिण्याच्या पाण्याच्या लाईन्सची आणि भूमिगत असलेल्या पाईप लाईन्सची अवस्था काय आहे ? आज ठिकठिकाणी मोठमोठी गटारे तुंबल्याचे दिसून येते. मुंबई शहराच्या पिण्याच्या पाण्याच्या लाईन्स गटारातून गेलेल्या आहेत. त्यामुळे मुंबई शहर हे विकलांग झालेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी मुंबई शहरासंबंधी नियम 260 अन्वये प्रस्ताव मांडून मुंबई शहरावर फार मोठी मेहेरबानी केलेली आहे. सभापती महोदय, ठाणे, कल्याण-डोंबिवली या शहरांतील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न वेगळा आहे आणि मुंबई शहराचा पाण्याचा प्रश्न वेगळा आहे.

मुंबईच्या वाहतुकीसंबंधी सभागृहात नेहमी बोलले जाते. हजारो मुंबईकर बेस्टमधून रोज प्रवास करीत असतात. त्यामुळे बेस्टला लाईफ लाईन म्हटले जाते. हे मुंबईकर रडतखडत का होईना बेस्टच्या बसेसमधून प्रवास करतात. या बेस्टच्या वाहतुकीवर कोणी लक्ष ठेवले पाहिजे ? सामान्य नागरिकांचा प्रवास स्वस्त कसा होईल याचा विचार कोणी करावयाचा ? आम्ही करुन दाखविले, आम्ही करुन दाखविले या चर्चेत मी जाणार नाही. परंतु जी वस्तुस्थिती आहे ती मी येथे सांगत आहे.

सभापती महोदय, मी मुंबई महानगरपालिकेत नगरसेवक असताना आम्ही आयुक्तांकडे सार्वजनिक कामाचा एखादा प्रस्ताव घेऊन गेल्यावर आणि त्यांना समजावून सांगितल्यावर त्या कामासाठी निधी दिला जात होता. परंतु आज तशी परिस्थिती राहिलेली नाही. आता कचऱ्याच्या टेंडरवर सुध्दा वर्षभर चर्चा केली जाते. त्यामुळे मुंबईत कचऱ्याची बजबजपुरी झाल्याचे चित्र पहावयास मिळते. याला जबाबदार कोण आहे ? याची सुध्दा चर्चा होणे आवश्यक आहे. याबाबत काही तरी धोरण ठरविले पाहिजे अन्यथा भविष्यात यापेक्षा भयावह परिस्थितीला आपल्याला सामोरे जावे लागेल.

2........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्रीमती अलका देसाई.......

सभापती महोदय, या मुंबई शहराला देशाची आर्थिक राजधानी म्हटले जाते. श्रीमंत मुंबई म्हटले जाते, पैसा देणारी मुंबई म्हटले जाते. त्याच मुंबई महानगरपालिकेला केंद्र शासनाकडूनही निधी मिळतो. तो पैसा कोठे व कसा खर्च केला जातो याचेही आम्हाला उत्तर मिळणे आवश्यक आहे. सध्या मुंबई महानगरपालिका आयसीयू मध्ये आहे. (अडथळा) माझाही महापालिकेसंबंधी गाढा अभ्यास आहे. त्यामुळे मी चमकण्यासाठी बोलणार नाही.

सभापती महोदय, यानंतर मी मुंबई शहरातील खड्डयांसंबंधी बोलणार आहे. तत्कालीन मुंबई महानगरपालिका आयुक्त श्री.सदाशिवराव तिनईकर यांच्याबाबत मी गर्वाने सांगेन. ते स्वत: आमच्यासोबत रस्त्यांची पाहणी करण्यासाठी येत असत. आज तशा प्रकारे किती अधिकारी रस्त्यांची पाहणी करतात ? मुंबईतील रस्त्यांसाठी किंवा खड्डे बुजविण्यासाठी करोडो रुपयांचे टेंडर दिले जाते. परंतु एक पावसाळ्यात त्या रस्त्यांची दुर्दशा होते, त्यामुळे रस्त्यांवर अपघात होतात, त्याला कोण जबाबदार आहे ?

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई...

वेळ फार कमी आहे. माननीय मंत्री महोदय प्रस्तावाला उत्तर देणार आहेत. मी एवढेच नम्रपणे सांगू इच्छिते की हे प्रकार जर थांबले नाहीत तर मुंबई शहराचे काय होईल हे सांगता येणार नाही.

सभापती महोदय, पेव्हर ब्लॉकच्या बाबतीत कोणी कोणाला फेव्हर केले हे मला माहीत नाही. पेव्हर ब्लॉकची संकल्पना कोणी आणली हे मला माहीत नाही. आज पेव्हर ब्लॉक लावले तर दुस-या-तिस-या दिवशी लोक त्यावरुन चालताना लटपटतात. हे प्रकार थांबवून चांगल्या प्रकारचे रस्ते करा. श्री. तिनईकर यांच्या कारकिर्दीमध्ये होते तशा प्रकारचे रस्ते करा. केवळ मराठी मराठी बोलून चालणार नाही. मुंबईतील समस्या वाढत राहिल्या तर मुंबईतील जनता तुम्हाला आम्हाला माफ करणार नाही एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राम पंडागळे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी मुंबई, ठाणे आणि कल्याण-डोंबिवली महानगरपालिकांची विविध समस्यांमुळे झालेली दुरवस्था यासंबंधीचा नियम 260 अन्वयेचा जो प्रस्ताव या ठिकाणी आणलेला आहे. त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सदनातील अनेक सन्माननीय सदस्यानी मुंबईतील समस्याबाबत आपली मते व्यक्त केलेली आहेत. समस्यांचे वेळीच निराकरण केले नाही तर समस्यांची फार मोठी श्रृंखला तयार होते. मुंबई आणि ठाणे शहरातील समस्यांची खूप मोठी मालिका तयार झालेली आहे. मुंबईतील 1995 पर्यंतच्या झोपड्यांना संरक्षण देण्याचा निर्णय तत्कालीन शासनाने घेतला. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस पक्षाच्या मॅनिफेस्टोमध्ये 2000 पर्यंतच्या झोपड्यांना संरक्षण देण्याचा संकल्प माडण्यात आला. मुंबई शहरामध्ये जवळ जवळ 50 लाख लोक झोपडपट्टीमध्ये रहातात. कुलाबा, सिमला होऊस, कांदिवली, बोरीवली, कुर्ला या भागामध्ये झोपडपट्टी निर्माण झालेली आहे. जणूकाही या झोपडपट्टीने मुंबई शहराला विळखाच घातलेला आहे अशा प्रकारची परिस्थिती मुंबई महानगरपालिकेची झालेली आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पंडागळे....

सभापती महोदय, 1978 साली या देशाच्या तत्कालीन पंतप्रधान स्व.इंदिरा गांधी यांनी एक धाडसी निर्णय घेतला. झोपडपट्टीमध्ये राहणारा हा माणूस आहे, त्या माणसाला सुध्दा मूलभूत सुविधा मिळाल्या पाहिजेत. 1978 पर्यंत झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या माणसाला पाणी द्यायचे म्हणजे अछूत वर्गाला पाणी देण्यासारखे समजले जात होते. झोपडपट्टीत राहणारे लोक कोणाच्या तरी घरी जाऊन हंडा भरुन पाणी आणायचे किंवा नळ जोडणी तोडून चोरीच्या मार्गाने पाणी मिळवायचे. मी त्या काळात कांदिवली येथील हनुमाननगर येथे रहात होतो. महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीच्या गेटजवळ एक हौद होता. त्या हौदातून 50 ते 60 हजार लोक पाणी भरुन न्यायचे.

सभापती महोदय, 1978 साली स्व.इंदिरा गांधी यांनी जो निर्णय घेतला त्या निर्णयाची ताकदीने अंमलबजावणी करण्याचे काम तत्कालीन राज्यमंत्री श्री.प्रभाकर कुंटे यांनी केले. झोपडीत जो माणूस राहतो त्याचे ते घर आहे. त्या घराला अधिकृत दर्जा देण्यासाठी झोपडपट्टीला स्लम जाहीर केले. त्या ठिकाणी सर्व मूलभूत सुविधा पुरविण्याचा निर्णय घेतला. स्लम योजना आल्यानंतर झोपडपट्टी परिसरात रस्ते, पायवाटा, दिवाबत्ती, पाण्याची नळजोडणी या सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या. झोपडीधारक झोपडीचे मालक बनले. हाहा म्हणता संपूर्ण मुंबई शहराला झ ोपड्यांनी विळखा घातला. याला राज्य सरकार कारणीभूत आहे हे मान्य केले पाहिजे.

सभापती महोदय, सर्वसामान्य घटकांना घरे बांधून देण्यासाठी म्हाडाची निर्मिती केली गेली. म्हाडाची सामान्य लोकांसाठी घरे बांधून देण्याची योजना होती. मुंबई शहरात अनेक ठिकाणी सुनियोजित पध्दतीने अनेक वसाहतींची उभारणी करण्यात आली. उदाहरण द्यायचे झाले तर वांद्रे येथील खेरनगर व गांधीनगर, विक्रोळी येथील कन्नमवार नगर, घाटकोपर येथील पंतनगर या वसाहतींचे देता येईल. परंतु गेल्या 20-22 वर्षाच्या काळात म्हाडाने नवीन योजना आणली नाही. सुनियोजित वसाहतींची निर्मिती केली नाही. म्हाडाची किंवा सरकारची घरे उपलब्ध होत नाहीत, बिल्डरांच्या घरांचे भाव गगनाला भिडले असल्यामुळे सामान्य गरीब माणसे जेथे मोकळी जागा मिळेल तेथे झोपडी बांधू लागली आणि हाहा म्हणता संपूर्ण मुंबई शहराला झोपड्यांनी विळखा घातला.

..2..

श्री.राम पंडागळे....

सभापती महोदय, मी शासनाचे एका गोष्टीबद्दल अभिनंदन करतो. एसआरए ही अभिनव योजना सुरु करण्यात आली. या योजनेमागील संकल्पना अशी होती की, झोपडपट्टयांचे निर्मूलन व्हावे व झोपड्यांमध्ये राहणाऱ्या नागरिकांना दर्जेदार व मोफत घरे उपलब्ध व्हावीत. परंतु संकल्पनेप्रमाणे घरे बांधणारी यंत्रणा पुढे आली असती तर कदाचित मुंबई शहरात एकही झोपडी शिल्लक राहिली नसती. योजना आणून ती लोकांसमोर फेकली गेली आणि योजनेकडे पूर्णतः दुर्लक्ष केले गेले. त्यामुळे एसआरए योजना मुंबई शहरात पूर्णत्वाकडे जाऊ शकली नाही. या योजनेच्या माध्यमातून घरे बांधण्यासाठी दलाल मंडळींचा वावर सुरु झाला. महापालिकेच्या स्तरावर काळ्या यादीत असलेल्या किरण हिमानीसारखे विकासक या योजनेत घुसले. काही विकासकांनी चांगल्या प्रकारची घरे बांधून दिली. दादर, अंधेरी भागामध्ये झोपड्यांमध्ये राहणाऱ्या नागरिकांना दर्जेदार घरे उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. परंतु एसआरए योजनेत बोगस विकासकांच्या नावाने काही मंडळींनी घुसखोरी केली.

नंतर 4 के.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राम पंडागळे....

सरकारने या बाबतीत कधी चौकशी केली आहे काय ?

काही लोक झोपडपट्टीत जातात आणि मी विकासक आहे असे सांगून झोपडपट्टीतील लोकांकडून स्टँप पेपरवर लिहून घेतात व या जागेची सर्व व्यवहार मी केलेला आहे असे सांगून ही व्यक्ती बिल्डर शोधण्याचे काम करते. या व्यक्तीला योग्य प्रकारचा भाव मिळाला नसल्यामुळे त्या ठिकाणच्या झोपडपट्टयांचा अजूनही विकास झालेला नाही. काही दलाल घरांच्या धंद्यात घुसल्यामुळे 15-15 वर्षापासून त्यांनी एक फूट सुध्दा जागा बांधलेली नाही. अशा प्रकारे काही लोक एसआरएच्या विकासकाच्या नावाने काम करीत आहेत. त्यामुळे शासन अशा गोष्टीला पायबंद घालणार आहे की, नाही ? मुंबईतील झोपडपट्टीतील लोकांना तुम्ही किती दिवस वेठीस धरणार आहात ? जे झ ोपडपट्टीत राहतात त्यांनी यापुढेही झोपडपट्टीतच रहायचे असे आपल्याला वाटते काय ? एसआरएमध्ये विकासकाने अतिशय निकृष्ट प्रतीची घरे बांधलेली असल्यामुळे ही घरे 2-4 वर्षात मोडकळीस येऊन पडणार आहेत. त्यामुळे अशा लोकांवर तुम्ही काही अंकुष ठेवणार आहात की, नाही ? या लोकांची योग्य प्रकारे चौकशी करणार आहात की, नाही ?

सभापती महोदय, काही वर्षापूर्वी मी राज्यमंत्र्यांना वांद्रे (पश्चिम) येथील घरे दाखवण्यासाठी घेऊन गेलो होतो. या ठिकाणी एकंदर सहा इमारती बांधल्या आहेत. दोन माणसेही जाऊ शकत नाही एवढा कमी रस्ता दोन इमारती मध्ये ठेवण्यात आलेला आहे. त्यामुळे हा जो काही प्रकार चालला आहे त्याबाबत सरकारने अंकुश ठेवण्याची आवश्यकता आहे अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम व मी स्वत: कांदिवली येथे राहतो. किरण हेमाणी कांदिवली येथे गेल्या 25 वर्षापासून काम करीत आहे. दर वर्षी नवीन नवीन फलक लावून या या ठिकाणी काम सुरु होणार आहे असा तो फलक लावत असतो. या दलालाने कांदिवली येथे 25 वर्षात एकही घर बांधलेले नाही. यासंदर्भात आम्ही अनेक तक्रारी केल्या आहेत. किरण हिमानी हा बिल्डर नसून दलालच आहे. मुंबई महानगरपालिकेच्या लिस्टमध्ये या दलालाचे नाव काळया यादीमध्ये आहे. त्यामुळे या दलालाची आपण कधी चौकशी करणार आहात की, नाही ? मी आपल्या वतीने सरकारला विनंती करतो की, हा दलाल गेल्या 25 वर्षापासून त्या ठिकाणच्या लोकांना झोपडपट्टीत ठेवतो असे असतांना त्याचा लेखाजोखा सरकार घेणार आहे की,

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राम पंडागळे....

नाही ? ही व्यक्ती काम करणार नसेल तर या व्यक्तीला तुरुंगात टाकण्याचे काम हे सरकार करणार आहे की, नाही ? आम्ही ज्या झोपडपट्टीत राहत होतो तेथील लोक आजही त्याच झोपडपट्टीत राहत आहेत.

सभापती महोदय, एसआरएच्या बिल्डरांना जर कोणी विरोध केला तर तो बिल्डर त्या व्यक्तीला घरच देत नाही. कुर्ला येथील एक उदाहरण मी आपल्याला देतो. ही व्यक्ती आज ज्या घरात राहत आहे त्या व्यक्तीचे वय आज 75 वर्षे आहे. या व्यक्तीच्या आधी त्यांचे वडील त्या घरामध्ये राहत होते. त्या व्यक्तीने सांगितले की, घराची जागा कमी असल्यामुळे मला तू थोडे मोठे घर दे. परंतु या व्यक्तीने असे सांगितल्यामुळे या व्यक्तीचे नाव यादीमधून वगळण्यात आले. वांद्रे येथे एसआरएचे कार्यालय असल्यामुळे या व्यक्तीला मी तेथील ठाकूर नावाच्या अधिकाऱ्याकडे घेऊन गेलो आणि सांगितले की, या व्यक्तीचे वडील याच घरात राहत होते,यांचा जन्म येथेच झाला, प्रिमियरमध्ये त्यांचे वडील काम करीत होते. असे असतांनाही या योजनेत या व्यक्तीचे नाव का नाही. 3 वर्षापासून यासंदर्भात चौकशी सुरु आहे अद्याप पावेतो काहीही निर्णय झालेला नाही. आमदार म्हणून मी पत्र दिलेले असतांनाही या संदर्भात काहीही निर्णय झालेला नाही. बिल्डरांनी वाटेल तसे काम करायचे का ? विकासक ठरवेल तसे काम चालणार आहे काय ? असे असतांना सरकारची यामध्ये काहीही जबाबदारी राहणार नाही काय ? राज्यामध्ये सरकार नावाची यंत्रणा काही आहे की, नाही ? बिल्डरांपुढे हे सरकार सरेंडर झाले आहे काय ? या सर्व प्रकरणाची योग्य ती चौकशी झाली पाहिजे अशी माझी मागणी आहे.

**उप सभापती** :सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे यांनी त्यांच्या भाषणात एका नावाचा उल्लेख केलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी सतत तीन वर्षे प्रयत्न करुनही अद्याप निर्णय लागलेला नाही. ही व्यक्ती त्या ठिकाणी राहत असतांना त्या व्यक्तीचे नाव या ठिकाणच्या योजनेत का नाही ? त्यामुळे अधिवेशन संपण्याच्या आत या प्रकरणाची चौकशी करुन अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी सर्व माहिती सभागृहाला दिली जावी. जर हे जाणीवपूर्वक केले असेल तर संबंधित अधिकाऱ्याला कडक शासन झाले पाहिजे.

श्री. भास्कर जाधव : ठीक आहे.

यानंतर श्री. भारवि.....

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पडांगळे . . ..

त्या झोपडपट्ट्या एसआरए मध्ये झाल्या. तेथे आता पुन्हा झोपड्या होत आहेत. याबाबतीत सरकार आणि महानगरपालिकेची सारखी जबाबदारी आहे. एकदा ही जबाबदारी ठरवा आणि हे सगळे थांबवा अशी मी आपल्या वतीने विनंती करतो.

सभापती महोदय, आता वाहतुकीच्या बाबतीत सांगावयाचे तर पेडर रोडला राहणाऱ्या आमच्या गानसम्राज्ञी श्रीमती लता मंगेशकरताई यांच्याबद्दल आम्हाला नितांत आदर आहे. पण तुम्ही संपूर्ण मुंबईला वेठीस धरीत आहात काय? तो रस्ता करावयास सांगा. त्याठिकाणी तो ब्रिज करणे जरुरीचे आहे. त्या रस्त्यावरुन येताना आणि जाताना पुढे सरकण्यासाठी अर्धा तास लागतो.

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.राम पडांगळे यांना सांगू इच्छितो की, त्यांची वेळ संपलेली आहे.

श्री.राम पडांगळे : सभापती महोदय, आपण मला अर्धवट बोलावयास दिले, त्याबद्दल मी आपले आभार मानतो. धन्यवाद.

-----

4 एम-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक राऊत ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मुंबई,कल्याण, डोंबिवली, ठाणे या सर्व महानगरपालिका क्षेत्रामध्ये ज्या विविध सामाजिक समस्या आहेत, त्या समस्यांचे भांडवल करुन विधान परिषद नियम 260 अन्वये याठिकाणी चर्चा उपस्थित करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, 1985 पासून मुंबईच्या महानगरपालिकेमध्ये शिवसेना-भारतीय जनता पक्षाचे शासन आहे. मधली पाच वर्षे सोडली तर जवळजवळ 23 वर्षे महाकाय पसरलेल्या या शहरातील कोट्यावधी जनतेला त्यांना आवश्यक असणाऱ्या सेवा-सुविधा त्यांच्या मनाप्रमाणे पुरविण्याचे अखंडपणे काम या मुंबई मध्ये शिवसेना-भाजपची महायुती करीत आहे. आपण जर मागच्या अधिवेशनाचा अभ्यास केला तर दर दिवशी सरकारच्या नावाने खडे फोडले जात आहेत. दुष्काळाच्या नावाने वाभाडे काढले जात आहेत. पाण्याच्या नावाने सरकारचे पाप वेशीवर टांगले जात आहे आणि सरकार या महाराष्ट्रामध्ये शासन करीत असताना हे सरकार अपयशी ठरलेले आहे.जनतेच्या डोळ्यामध्ये धूळफेक करीत आहे आणि या अपयशी ठरलेल्या महाराष्ट्र शासनाच्या कारभारामुळे गोरगरीब जनतेचा संसार उद्ध्वस्त होत आहेत. ईश्वराने दिलेल्या त्या जीवनातून केवळ या सरकारच्या धोरणामुळे स्वत:चे जीवन संपवावे लागत आहे अशी ही दुरवस्था संपूर्ण महाराष्ट्रामध्ये पसरलेली असताना आणि या दुरवस्थेवर या अधिवेशनामध्ये दररोज चर्चा होत असताना याबाबतीत मार्ग काढण्याची गरज आहे. मुंबई महानगरपालिकेमध्ये तसेच कल्याण, डोंबिवली, ठाणे येथे शिवसेना-भाजप युतीचे प्रशासन कार्यरत असून लोकांनी त्यांना स्विकारलेले आहे. अशा वेळी शासनकर्त्या पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना पोटशूळ झाला असून त्यांनी नियम 260 च्या माध्यमातून तेथील प्रशासनावर ओढून-ताणून जे आरोप केले जात आहेत, त्याची कीव करावीशी वाटते.

सन्माननीय सदस्य श्री.राम पडांगळे यांच्या जे पोटात आहे, ते त्यांच्या ओठात आले. जे दररोज मुंबई बघत आहेत ते मुंबइचे खरे कार्यकर्ते आहेत. प्रामाणिक कार्यकर्त्यातून उभे राहिलेले एक लोकप्रिय नेतृत्व आहे. ते जागरुक आहेत, डोळस आहेत. त्यामुळे त्यांना राजकीय कावीळ झालेली नाही. त्यामुळे खऱ्या अर्थाने या महामुंबईमध्ये जे चालले आहे, ते चांगले चालू आहे. ज्यांच्याकडून वाईट होत आहे, ज्यांची पाप आहेत त्यानी ते सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

**उप सभापती** : काविळ किती प्रकारची असते ?

4 एम-3...





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक राऊत : सभापती महोदय, कावीळ दोन प्रकारची असते. एक राजकीय कावीळ आणि दुसरी आरोग्याची कावीळ अशा दोन काविळी प्रचलित आहेत. मघाशी सत्ताधारी पक्षाच्या एका थोर, मोठ्या नेत्यांनी, सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणामध्ये मुंबई महानगरपालिकेच्या दरवर्षीच्या बजेटची रक्कम गुणिले पाच वर्षे असा हिशोब करुन येणाऱ्या एकंदरीत रकमेचा आढावा घेतला.

यानंतर श्री.अ.शिगम . . .

..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक राऊत..

मला त्यांच्या बुध्दिमत्तेची कीव वाटली. अशा प्रकारचा आढावा घेण्याचे म्हटले तर राज्य शासनाचे बजेट 45 हजार कोटी रुपये गुणिले 5 हजार म्हणजे किती हजार कोटी रुपये होतात याचा आपण विचार केला पाहिजे. जर असे असेल तर मुंबई महानगरपालिका राज्य शासनाच्या बाबतीत किती तरी पुढे आहे असे म्हणावे लागेल.

सभापती महोदय, आपण मुंबई महानगरपालिकेचे आणि राज्य शासनाचे बजेट पहावे. तसेच राज्य शासनाचे आणि मुंबई महानगरपालिकेचे काम पहावे. मुंबई महानगरपालिकेचे कामे राज्य शासनापेक्षा चांगले आहे असे म्हणावे लागेल.

सभापती महोदय, केंद्र शासनाने मुंबई महानगरपालिकेचा सन्मान केलेला आहे. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची सत्ता असलेल्या इतर कोणत्याही महानगर पालिकेचा केंद्र सरकारने सत्कार केलेला नाही. मुंबई महानगरपालिकेने आतापर्यंत 550 कि.मी.चे क्राँक्रीटचे रस्ते केले. आम्ही राज्य शासनाकडे मुंबई-गोवा महामार्गाचे चौपदरीकरण करण्याची मागणी करतो. परंतु त्यासाठी राज्य शासनाकडे निधी नाही. मी अगोदर सांगितल्याप्रमाणे शिवसेना व भाजप युतीची सत्ता असलेल्या मुंबई महानगरपालिकेने मुंबईत 550 कि.मी.चे सी.सी.चे रस्ते केले. तेथे पाहिजेत जातीचे हे येऱ्या गबाळ्याचे काम नाही.

सभापती महोदय, मुंबईत रोज किती टन कचरा होतो याचा आपण हिशोब मांडू शकत नाही इतका कचरा होतो. परंतु मुंबई महानगरपालिकेने शून्य कचरा मोहीम राबविली आणि या शून्य कचरा मोहिमेचा केंद्र सरकारने गौरव केलेला आहे. केंद्राचे अधिकारी येथे येऊन गेले आणि त्यांनी शून्य कचऱ्याची मोहीम पाहून शाबासकी दिली. तेव्हा मुंबई महानगरपालिकेमध्ये शिवसेना-भाजची सत्ता आहे याचा आम्हाला अभिमान आहे.

सभापती महोदय, मागे ताज आणि ओबेरॉय हॉटेलमध्ये बॉम्बस्फोट झाले तेव्हा संपूर्ण सरकार त्यांच्या कंट्रोल रुममध्ये न बसता ते सरळ मुंबई महानगरपालिकेच्या आपत्कालीन व्यवस्था रुममध्ये आले आणि तेथून त्यांनी कारभार केला. जागतिक स्तरावरील यंत्रणेने मुंबईच्या अधिकाऱ्यांना शाबासकी दिली याचा आम्हाला अभिमान आहे. आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेला जागतिक स्तरावर अवॉर्ड मिळालेले आहे. आम्ही देखील मुंबई महानगरपालिकेमध्ये नगरसेवक म्हणून काम केलेले आहे. त्यामुळे तेथील कामांची आम्हाला माहिती आहे. ..2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक राऊत..

सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेचा जागतिक स्तरावर गौरव करण्यात आला त्याचा आम्हाला अभिमान आहे. मागील 23 वर्षापासून मुंबई महानगरपालिकेमध्ये शिवसेना -भाजप युतीची सत्ता आहे.

सभापती महोदय, या सरकारला आतापर्यंत शिव्याशाप मिळाले. गोरगरिबांची हाय लागली. ज्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या त्यांच्या घरांतील लोकांचा तळतळाट या शासनाला भोगावा लागला. परंतु मुंबई महानगरपालिका अशी एकमेव महानगरपालिका आहे की, या महानगरपालिकेला हिंदुस्थानच्या राष्ट्रपतींनी राष्ट्रीय पातळीवर "एक्सलन्स अवॉर्ड" देऊन सत्कार केला. हा अवॉर्ड हिंदुस्थानातील सर्व महानगरपालिकांमधून फक्त मुंबई महानगरपालिकेला देण्यात आला याचा आम्हाला अभिमान आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ पूर्वी श्री.अजित.... 19:20

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, मुंबईला अनेक समस्यांचा विळखा आहे. मला वाटते सन्माननीय सदस्यांनी राजकारण सोडून बोलावे. सन्माननीय सदस्य मुंबई महानगरपालिकेला किती ॲवार्ड मिळाले या बाबत सांगत आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, त्यांनी मुंबईच्या समस्यांवर सुध्दा बोलावे.

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, एखाद्या सन्माननीय सदस्यांनी भाषणाला सुरुवात केल्यानंतर विषयांतर होऊ नये म्हणून त्यांना मध्येच डिस्टर्ब करणे योग्य नाही. तसेच दुसरी बाब अशी की, या प्रस्तावामध्ये बऱ्याच ठिकाणी अपुरा पाणी पुरवठा, कचरा, रस्त्यावरील दुर्गंधी इ. बाबींचा उल्लेख केल्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.विनायक राऊत त्यावर बोलत आहेत. त्यांचे मुद्दे या सर्व बाबींशी रिलेव्हंट आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्बन क्रेडीट अर्न करणारी देश स्तरावरील कोणती महानगरपालिका असेल तर ती म्हणजे मुंबई महानगरपालिका होय. गोराई डंपिंग ग्राऊंडच्या बाबतीत देशाच्या राष्ट्रपती महोदयांनी मुंबई महानगरपालिकेला ॲवार्ड देऊन गौरव केला आहे.

श्री.विनायक राऊत : महोदय, मुंबईतील पाण्याचा प्रश्न, शाळांचा प्रश्न, आरोग्याचा प्रश्न, कचऱ्याचा प्रश्न इ. विषयावर या ठिकाणी चर्चा करण्यात आली. मुंबईतील दीड-पावणे दोन कोटी लोकांना मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून योग्यप्रकारे पाणी पुरवठा केला जात आहे. ब्रिटिशांच्या नंतर जमिनीच्या 225 फूट खाली जाण्याचा क्रांतिकारी निर्णय मुंबई महानगरपालिकेने घेतला. 225 फूट जमिनीच्या खाली जाणे सोपी गोष्ट नाही. एकप्रकारे पाताळाचा शोध ज्या मुंबई महानगरपालिकेने घेतला त्या मुंबई महानगरपालिकेत शिवसेना-भाजपाची सत्ता आहे. 225 फूट खाली जाऊन मरोळ मरोशी ते रुपारेल कॉलेजपर्यंत 12.5 कि.मी. अंतराचा बोगदा करणे ही सोपी गोष्ट नाही. अजून तेथे पाणी सोडलेले नाही. अजूनही तो बोगदा आम्ही दाखवू शकतो. मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून 4 हजार कोटी रुपये खर्च करुन जल बोगदा बांधण्यात आला हे जागतिक आश्चर्य आहे. राज्याच्या माननीय जलसंपदा मंत्री व माननीय पाणी पुरवठा मंत्र्यांनी तो जल बोगदा अवश्य पहावा. माननीय मुख्यमंत्री आणि माननीय मंत्री श्री.छगन भुजबळ यांनी तो जल बोगदा पाहून मुंबई महानगरपालिकेचे कौतुक केले आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक राऊत.....

महोदय, मुंबईतील नागरिकांना मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून आरोग्याची सुविधा दिली जाते. मलेरिया निर्मूलन आणि साथीच्या रोगाचे निर्मूलन करण्यासंदर्भात मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने जी प्रगती केली त्याचे कौतुक केंद्र सरकारच्या आरोग्य विभागाने केले. परंतु महाराष्ट्र सरकारने या बाबत मुंबई महानगरपालिकेचे कौतुक केले नाही. कॅन्सरच्या रुग्णांना उपचारासाठी फिरावे लागत होते. शिवसेना पक्षाचे प्रमुख माननीय श्री.उध्दवजी ठाकरे यांनी पुढाकार घेऊन मुंबई महानगरपालिकेच्या नायर रुग्णालयात कॅन्सरच्या रुग्णांना उपचाराची सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी स्वतंत्र वॉर्ड निर्माण केला. मला वाटते राज्याच्या आरोग्य मंत्र्यांनी तो वॉर्ड बघितलेला असावा. इतर सत्ताधारी मंडळींनी सुध्दा तो वॉर्ड पहावा असे मला वाटते. आरोग्याच्या दृष्टीने संपूर्ण महाराष्ट्राला नव्हे तर देशाला अभिमान वाटावा असे काम मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांनी केले आहे.

महोदय, मध्यंतरी मुंबईत साथीचे रोग पसरले होते. मुंबई महानगरपालिकेच्या नायर रुग्णालयाजवळ शासनाचे जे.जे.समूह रुग्णालय आहे तसेच मुंबई महानगरपालिकेच्या के.ई.एम. रुग्णालयाजवळ शासनाचे जी.टी. हॉस्पीटल आहे. मुंबईत साथ पसरली असताना लोक म्हणायचे की, आमच्यावर शासनाच्या रुग्णालयातून उपचार नको. मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयात जमिनीवर झोपावयास दिले तरी चालेल, परंतु आमच्यावर महापालिकेच्याच रुग्णालयातूनच उपचार करावेत. महोदय, अशा प्रकारची मुंबईकरांची प्रतिक्रिया होती.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक राऊत ....

सभापती महोदय, मुंबईमध्ये बेस्टच्या माध्यमातून विद्युत पुरवठा केला जातो. या महाराष्ट्रामध्ये मुंबई शहरामध्ये सर्वात स्वस्त दरात वीज पुरवठा करण्याचे काम मुंबईतील बेस्ट यंत्रणा करीत आहे. अद्यापही सरकारच्या नावाने खडे फोडावे लागले नाही. एका सेकंदाचेही लोडशेडींग नाही. कमी दर आणि 100 टक्के वीज पुरवठा हा प्रयोग केवळ मुंबई महानगरपालिकेच्या बेस्टने केलेला आहे याचा आम्हाला अभिमान आहे. या मुंबईचा गाडा चालवित असताना मुंबईमध्ये एमएमआरडीए, म्हाडा, रेल्वे, टेलिफोन एक्स्चेंज, एमटीएनएल अशा अनेक यंत्रणांकडून खड्डे खणले जातात. त्या सर्वांच्या पापांचे क्षालन करण्याचे काम मुंबईमध्ये मुंबई महानगरपालिका करते आणि लोकांना सुविधा देत असते. म्हणून मी शेवटी एकच सांगेन की, आम्ही शिवसेना पक्षप्रमुख माननीय श्री. उद्धवजी ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली हे करुन दाखवले आहे. आम्ही खाऊन दाखविले नाही तर करुन दाखविले आहे. ते करुन दाखविल्यामुळेच मुंबईकरांनी विश्वास ठेवला आणि तुम्ही खाऊन दाखविल्यामुळे तुमच्या विरोधात एसआयटी निर्माण करावी लागली. म्हणून आज ज्या पध्दतीने 23 वर्षे मुंबई महापालिकेचा कारभार या महायुतीच्या ताब्यात आहे त्यामुळे पुढे भविष्यात आणखी 25 वर्षे तुम्हाला त्या ठिकाणी प्रवेश नाही याची जाणीव कृपया आपण ठेवावी. पुढचे कामकाज करण्यासाठी मुंबई महापालिकेवर आपण ज्या आकसाने टिका करीत आहात ते योग्य नाही. आपण चांगल्या कामाचे कौतुक करावे आणि काही चुकत असेल तर मार्गदर्शन करावे अशी एकच विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

----

...2....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनायक राऊत यांनी बेस्टच्या संदर्भात एक मुद्दा मांडला तो बरोबर आहे. या ठिकाणी माननीय मंत्री श्री. भास्कर जाधव उपस्थित आहेत. मी त्यांना विचारु इच्छितो. बेस्टच्या कर्मचाऱ्यांच्या पगाराचे पैसे देण्याकरिता महानगरपालिकेच्या तिजोरीतून त्यांना कर्ज देण्याचे ठरले. त्या संदर्भात महानगरपालिकेचा ठराव पास झाला. बेस्टच्या बाबतीत महानगरपालिकेचा जो ठराव पास झाला त्याला फक्त शासनाची परवानगी पाहिजे होती. शासन सहा महिने ती फाईल तशीच ठेवते आणि आम्ही काय करुन दाखविले हे आम्हाला विचारता ? आज ही चर्चा संपल्यानंतर ती नस्ती जर सही करुन पाठवली तरी फार मोठे काम केले असे होईल.

--

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. निरंजन डावखरे ( कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर आणि इतर सदस्यांनी नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावाच्या माध्यमातून मुंबई महानगरपालिका तसेच झपाट्याने शहरीकरण होत असलेल्या ठाणे महानगरपालिका व कल्याण-डोंबिवली महानगरपालिकांची वेगवेगळ्या समस्यांमुळे होत असलेल्या दुरवस्थेची चर्चा आपण या सभागृहात करीत आहोत.

मी सुरुवातीला ठाणे महानगरपालिका आणि कल्याण महानगरपालिकेच्या हद्दीत होणाऱ्या मुंबई युनिव्हर्सिटीच्या सबसेंटरच्या संदर्भात बोलणार आहे. गेली दोन वर्षे त्या ठिकाणी सबसेंटरचे काम चालू आहे. भूमीपूजन झाले परंतु अजूनही सबसेंटरचा पत्ता नाही. ते सबसेंटर होणे अतिशय गरजेचे आहे. आपल्याला ठाण्यापासून कलिना युनिव्हर्सिटीमध्ये जाण्यासाठी जर त्रास होतो तर कल्याण, वसई, विरार, डहाणू, पालघर या आदिवासी भागातील जी मुले आहेत त्यांना कलिना युनिव्हर्सिटीमध्ये जाऊन आपले काम करुन घेणे किती त्रासदायक होत असेल याची कल्पना येईल. यासाठी या सबसेंटरचे काम लवकरात लवकर होणे फार गरजेचे आहे. गेली दोन वर्षे हे काम रखडलेले आहे. कल्याण उपकेंद्राचा जो विषय आहे त्यासाठी विद्यार्थी संघटनेचे एक पदाधिकारी श्री. प्रशांत इंगळे कालपासून उपोषणाला बसलेले आहेत. या गोष्टीसाठी जास्तीत जास्त निधी शासनाकडून उपलब्ध होणे गरजेचे आहे. युजीसीकडून पाच-पाच कोटी रुपये याप्रमाणे निधी येतो. हा निधी बांधकामासाठी पुरेसा नाही. सध्या त्या ठिकाणी अनधिकृत बांधकाम होत नसले तरी पुढे जाऊन तशी बांधकामे त्या ठिकाणी होणार नाहीत याची शाश्वती देता येत नाही.

सभापती महोदय, ठाणे जिल्ह्याच्या हद्दीमध्ये मॅनग्रोव्हजची फार मोठ्या प्रमाणावर कत्तल होत आहे. ठाणे शहराच्या पलीकडे नाशिक महामार्गावर भिवंडीनजीक नवीन शहर वसविण्याची कल्पना सरकारी पातळीवर जोर धरु लागली आहे. ठाणे महापालिकेचे आयुक्त श्री. आर.ए.राजीव यांनी ही कल्पना मांडली आणि माननीय मुख्यमंत्री श्री. चव्हाण साहेबांनी ती कल्पना उचलून धरली. मुंबई, ठाणे, नवीन मुंबई या शहरांमध्ये जी लोकसंख्या वाढत आहे त्याचा महापूर वाहू लागला आहे आणि त्यामुळे ठाण्यापलीकडे एखादे शहर बसविण्याची कल्पना जोर धरु लागली.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.निरंजन डावखरे......

भूमाफियांनी याच गोष्टीचा फायदा उचलला आहे. खारेगाव-माणकोली पट्टयात सरकारी यंत्रणा हताश आहे. या पट्टयात मोठ्या प्रमाणात होत असलेली तिवरांची कत्तल सातत्याने दिसून येत आहे. खारेगाव पासून माणकोली पर्यंत लांबलचक पसरलेल्या खाडी किनाऱ्यावर भराव टाकून तिवरांचे जंगल नष्ट करण्याचे सत्र सुरु केलेले आहे. 2-4 वर्षांपूर्वी त्या जागेवर तिवरांचे घनदाट जंगल दिसत होते. आज मिरा-भाईंदर व इतर महापालिका क्षेत्रातील डेब्रिज उचलून तिवरांची कत्तल करुन ती जागा बुजविण्यात आलेली आहे. खाडी किनाऱ्याच्या भागात अनधिकृत बेट तयार करण्याचे काम भूमाफियांच्या माध्यमातून सुरु आहे.

मुंबई, ठाणे, मिरा-भाईंदर तसेच आसपासच्या नगरांमधून दररोज निघणाऱ्या शेकडो टन डेब्रिजची विल्हेवाट लावण्यासाठी डेब्रिज माफियांची टोळी सक्रिय झाली असून त्यांनी मुंबई-नाशिक महामार्गावरील खारेगांव टोल नाक्यापासून माणकोलीपर्यंत खाडीकिनारी पट्टयातील तिवरांचे विस्तीर्ण जंगल नष्ट करण्याचा धडाका लावला आहे. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडे विचारणा केली असता त्यांनी हतबलता व्यक्त केलेली आहे. या संदर्भात थातूरमातूर, किरकोळ कारवाया होतात, एखाद्याला अटक केल्याचे दाखवून दिवसरात्र भरणी घालण्याचे काम सातत्याने सुरु आहे.

सभापती महोदय, आज सकाळीच भिवंडीतील गोदामांचा विषय उपस्थित झाला होता. तेथे मोठ्या प्रमाणात बेकायदेशीरपणे गोदामांचे बांधकाम चालू आहे. जेएनयुआरएमएम अंतर्गत ज्या प्रकल्पांची कामे मंजूर झालेली आहेत. त्यापैकी 40 प्रकल्प केंद्र शासनाकडे पाठविण्यात आलेली आहेत. या अभियानासाठी राज्य व केंद्र शासनाचा मिळून 500 कोटी रुपयांचा नियतव्यय प्रस्तावित केला होता. ठाणे जिल्ह्यातील परिवहन सेवा आहे, त्याबाबत शासनाने सकारात्मक दृष्टीकोन ठेवणे गरजेचे आहे. ठाणे जिल्ह्यामध्ये 7 महानगरपालिका आहेत. नवी मुंबई व वसई-विरार महानगरपालिका आहेत. त्यापैकी वसई-विरार महानगरपालिका नव्यानेच स्थापन झालेली आहे. या दोन महानगरपालिका वगळता इतर सर्व महानगरपालिकांच्या परिवहन सेवेची परिस्थिती अतिशय वाईट आहे. ठाणे महानगरपालिकेच्या एकूण 317 बसेस आहेत. त्यापैकी 205 ते 225 बसेस

2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.निरंजन डावखरे......

रस्त्यावर धावत आहेत. उर्वरित 112 बसेस नादुरुस्त असल्यामुळे रस्त्यावर धावू शकत नाही. त्यामुळे तीन हात नाक्यापासून घोडबंदर रोडवर बेकायदेशीरपणे खाजगी बसेस चालू आहेत. त्यामुळे शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे.

त्याचप्रमाणे ठाणे महानगरपालिकेत चांगले अधिकारी काम करीत आहेत. श्री.के.डी.लाला यांच्यासारखे अधिकारी जल वाहतुकीची संकल्पना सातत्याने मांडत आहेत. ठाणे, वाशी, भाईंदर, पालघर या सारखी शहरे आहेत ती या जल वाहतुकीतून जोडता येतील. या शहरांमधील बरेच लोक मुंबईतच नोकरी करीत आहेत. त्यामुळे या शहरांना मायग्रेटिक सिटीज म्हटले जाते. त्यामुळे शासनाने ही जल वाहतूक लवकरात लवकर सुरु करुन त्यांचा प्रवास सुखकर करावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, मेट्रो रेल्वे ठाण्याला येईल असे आपण बरीच वर्षे ऐकत आहोत. ठाणे महानगरपालिकेचे भौगोलिक स्थान व दळणवळणाच्या साधनांची उपलब्धता, किफायतशीर राहणीमान, यामुळे ठाण्यात नागरिकीकरण झपाट्याने वाढलेले आहे. 18 लाख लोकसंख्येसाठी मात्र ठाण्यात सुलभ वाहतूक सेवा उपलब्ध नसल्यामुळे पालिकेने शासन निर्देशित संस्थांमार्फत मोनो रेल्वे व एलआरटीमार्फत वाहतुकीचे पर्याय सुचविले आहेत. परंतु या घोषणांची अंमलबजावणी किती दिवसात होणार आहे याचे उत्तर कोणीही देऊ शकत नाही. या कामासाठी 2500 कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. हा प्रकल्प अनेक वर्षे रखडलेला आहे. त्यामुळे हा प्रकल्प एमएमआरडीएच्या माध्यमातून ठाण्यात येऊ घातलेला आहे. परंतु मेट्रो रेल्वे ठाण्यात लवकर सुरु होईल अशी चिन्हे दिसत नाहीत.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 19:35

श्री. निरंजन डावखरे...

मेट्रोसाठी कारशेड प्रस्तावित केलेली आहे. कारशेडचे रिझर्व्हेशन कोणत्या तरी मोठय बिल्डरसाठी हटविण्यात येत आहे काय ? सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी देखील हा विषय या ठिकाणी मांडला होता.

सभापती महोदय, ठाण्यामध्ये मोठया प्रमाणावर बांधकामे चालू आहेत. त्यामुळे डेंग्यू, मलेरिया सारख्या साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव पावसाळयामध्ये होत असतो. ठाणे शहर हा भौगोलिकदृष्टया डोंगराळ असून तो भाग खाडीने व्यापलेला आहे. या भागामध्ये वन विभागाचा कायदा व सीआरझेड कायदा लागू होतो. ठाणे शहरामध्ये मोठमोठे बांधकाम व्यावसायिक व विकासक हे कमी किंमतीच्या गृह योजना हाती न घेता उच्चभ्रू लोकांसाठी गृह योजना हाती घेतात. वास्तविक कमी किंमतीच्या घरांची मागणी असताना देखील मोठे बांधकाम व्यावसायिक व विकासक हे गरिबांना परवडतील अशा कमी किंमतीची घरे उपलब्ध करुन देत नाहीत. याबाबतीत शासन काही उपाययोजना करणार आहे काय ? शासन पातळीवरुन बांधकामाना रीतसर मान्यता मिळण्यास फार विलंब होतो. त्यामुळे अनधिकृत बांधकामे होतात काय असा प्रश्न निर्माण होतो. वर्तक नगर येथे जनतेला परवडतील अशा कमी किंमतीमध्ये म्हाडाने घरे बांधली होती. परंतु तशा प्रकारची कमी किंमतीची घरे म्हाडाकडून नंतर बांधण्यात आली नाहीत. ठाणे शहराची लोकसंख्या 19.5 लाख असून या लोकांसाठी कमी किंमतीची घरे उपलब्ध होणार नसतील तर मोठेमोठे टाऊनशीप उभारणा-या बांधकाम व्यावसायिकांवर व विकासकांवर त्यांच्या टाऊनशीपमध्ये कमी किंमतीची घरे उपलब्ध करुन देण्याचे बंधन घालण्यात येईल काय ?

सभापती महोदय, ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये अनधिकृत बांधकामाचे पेव फुटलेले आहे. प्रशासनाने दुर्लक्ष केल्यामुळे गेल्या वर्षभरामध्ये मुंब्रामध्ये 428 अनधिकृत इमारती उभ्या राहिल्या आहेत. मुंब्रा-दिवा या भागामध्ये महापालिकेने 829 बांधकामावर कारवाई केल्याची नोंद कागदोपत्री आहे. त्याठिकाणी 428 अनधिकृत बांधकामे असताना महापालिकेने 829 बांधकामावर कारवाई केल्याची नोंद आहे. याचा अर्थ एका बांधकामवर दोन वेळा कारवाई करण्यात आलेली आहे काय असा प्रश्न निर्माण होतो. ही अनधिकृत बांधकामे अजूनही तशीच उभी आहेत. अशा अनधिकृत इमारतीमधील घरांच्या किंमती तुलनेने कमी असल्यामुळे लोक अनधिकृत इमारतीमधील

श्री. निरंजन डावखरे...

घरे घेतात.

दिवा परिसरामध्ये बेकायदेशीर बांधकामाची परंपरा आहे. एवढेच नाही तर गेल्या काही वर्षामध्ये वाढलेल्या नागरिकीकरणामुळे हा परिसर चर्चेमध्ये आलेला आहे. सुरुवातीला महानगरपालिका प्रशासन आणि सत्ताधा-यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्यामुळे या गावामध्ये भूमाफिया आणि गावगुंड यांनी पूर्ण कब्जा केला आहे. बेकायदेशीर बांधकामे तोडण्याची भीती दाखवून माया उकळण्याचे उद्योग काही अधिकारी करीत होते. अशा प्रकारे कोटयवधीची माया जमवली गेल्याचे आरोप करण्यात आलेले आहे. ॲण्टीकरप्शनने गोडबोले नावाच्या अधिका-याला अटक केली आहे. तसेच दीपक चव्हाण याची देखील चौकशी होऊन त्याच्यावर कारवाई झालेली आहे. दिवा परिसरातील शेकडो इमारती पैकी फक्त 9 इमारती अधिकृत आहेत. गेल्या काही वर्षामध्ये बेकायदेशीर बांधकामे तोडण्याची धमकी देऊन महापालिकेचे काही अधिकारी आणि काही पोलीस पैसे उकळण्याचे काम मोठ्या प्रमाणावर करीत आहेत अशा प्रकारच्या तक्रारी दिवावासीयांनी आणि काही बांधकाम व्यावसायिकांनी केलेल्या आहेत.

ठाणे येथील वागळे इस्टेटमधील इंदिरा नगर, राम नगर, हनुमान नगर, साठे नगर, आदिवासी पाडा व आंबेवाडी इत्यादी ठिकाणच्या पात्रअपात्र झोपड्याची यादी दिनांक 31 जुलै 2011 रोजी महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाने जाहीर केली. तसेच बंद असलेल्या झोपड्यांची यादी देखील जाहीर केली.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.निरंजन डावखरे..........

परंतु एमआयडीसीने यादी जाहीर केल्यानंतरही झोपड्यांची जैसे थे स्थिती आहे. परिणामी एमआयडीसीला कोणतीही कारवाई करण्यात यश आलेले नाही किंवा कारवाई करता येत नाही. सदर झोपडपट्टयाचा विकास एमआयडीसी करणार की खाजगी विकासकांमार्फत केला जाणार आहे याबाबत सुस्पष्टता येणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, ठाण्यातील कोपरी येथे सिंधी कॉलनी आहे. फाळणीनंतर बरेच सिंधी बांधव उल्हासनगर, ठाणे येथे स्थलांतरित झाले. कोपरी येथील सिंधी कॉलनीच्या जागेवर ज्या इमारती बांधण्यात आलेल्या आहेत त्या अत्यंत जीर्ण अवस्थेत आहेत, धोकादायक स्थितीत आहेत. पुढील पावसाळा बघतील की नाही अशी दुरवस्था झालेली आहे. या इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत शासन सुस्पष्ट निर्णय घेत नाही. मुंब्रा येथे जी दुर्घटना घडली त्याची पुनरावृत्ती कोपरी येथील सिंधी कॉलनीमध्ये घडली तर त्याला जबाबदार कोण राहणार आहे याचा विचार करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, भिवंडी आणि उल्हासनगर येथे कचऱ्याचे साम्राज्य निर्माण झालेले आहे. रस्त्यावर कुठेही पाहिले तर कचरा आणि कचराच दिसून येतो. कचरा आणि रस्ते याबाबत अतिशय बिकट अवस्था आहे. या संदर्भात शासनाने योग्य ती कारवाई करावी एवढे बोलून माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : भूमाफिया आणि डेब्रिज टाकणारे यांच्या संगमताने खाडीच्या फार मोठ्या एरियामध्ये भराव टाकण्याचे काम चालू आहे. तो संपूर्ण खाडी किनारा आहे. 26 जुलै, 2005 रोजी जी घटना घडली त्यामुळे ठाण्यामध्ये देखील अपरिमित नुकसान झाले होते. डेब्रिज टाकण्याचे काम ताबडतोब थांबवावे. डेब्रिज टाकण्यासाठी ज्या रस्त्यांचा वापर होतो ते चारही नाके बंदोबस्त ठेवून आपण व्यवस्थित बंद करु शकलात तर याला प्रतिबंध घालता येईल. आपण ही सूचना निश्चितपणे अंमलात आणावी.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, तिवरांची होत असलेली कत्तल याबाबत हायकोर्टाने निर्णय दिलेला आहे. तिवराच्या जंगलापासून 200 मीटरपर्यंत कन्स्ट्रक्शन करता येत नाही असा तो निर्णय आहे. मंत्री महोदय या संदर्भात उत्तर देतील अशी अपेक्षा आहे. खाडीच्या परिसरात डेब्रिज आणून टाकले जाते, त्या जागेवर झोपड्या उभारल्या जातात आणि कालांतराने चाळी बांधल्या जातात. तिवरांची बेसुमार कत्तल केली जात आहे. या संदर्भात कोणती कारवाई करणार आहात याचे मंत्री महोदयांकडून उत्तर मिळावे. सभापती महोदय, मेट्रो रेल्वेच्या कारशेडबद्दल जे आरक्षण होते ते हटवून रुस्तमजी बिल्डरला कन्स्ट्रक्शन करण्यास परवानगी दिली आहे, त्या संदर्भात मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

**उप सभापती** : मेट्रो रेल्वेच्या कारशेडचे आरक्षण काढले आहे किंवा कसे याची माहिती आता उपलब्ध नसेल तर हे अधिवेशन संपण्यापूर्वी शक्यतो उद्याच सभागृहाला द्यावी.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, आपण या संदर्भात उद्या सभागृहाला माहिती द्यावी असे सूचित केले आहे. मेट्रो रेल्वेच्या कारशेडचे आरक्षण होते आणि ते बदलले या संदर्भातील माहिती या क्षणाला माझ्याकडे उपलब्ध नाही. मुख्य म्हणजे मुंबई महानगरपालिकेची माहिती या क्षणाला माझ्याकडे असणे अवघड आहे. तरी देखील उद्या सायंकाळपर्यंत या संदर्भातील वस्तुस्थिती सभागृहाला अवगत केली जाईल.

नंतर 4एस.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई गिरकर (विधानसभेने निवडलेले): सभापती महोदय, मुंबईच्या समस्येच्या प्रस्तावावर मला आपण बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी प्रथमत: आपले आभार मानतो. या प्रस्तावाच्या संदर्भात मी शासनाला थोडक्यात सूचना करणार असून माननीय मंत्री महोदय माझ्या सूचनांचा नक्की विचार करतील अशी अपेक्षा आहे. सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी हा प्रस्ताव मांडलेला आहे. या ठिकाणी मी राजकीय भाषण करणार नाही. या विषयाच्या संदर्भात ज्या सन्माननीय सदस्यांनी जे मुद्दे मांडले आहेत त्या मुद्यांचा मी पुनरुच्चार करणार नाही.

सभापती महोदय, आम आदमीका नेता, सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे यांनी या ठरावावर चांगले विचार व्यक्त केलेले आहेत. मुंबई शहर अवाढव्य वाढले आहे. मुंबई शहराच्या क्षमतेपेक्षा जास्त लोक मुंबईमध्ये राहत आहेत. मुंबई शहरामध्ये कोणीही आला तरी त्याला या शहरात काम मिळते. मुंबई हे औद्योगिक शहर आहे. मुंबई शहराला इंटरनॅशनल शहर म्हणून मान्यता मिळाली आहे. माझे सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप व सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम हे मुंबई महापालिकेतून निवडून आलेले प्रतिनिधी आहेत. मुंबई महापालिकेचे राज्य शासनाकडून 2611 कोटी रुपये येणे बाकी आहे. हे पैसे महाराष्ट्र शासनाने लवकरात लवकर दिले तर मुंबई महानगरपालिकेला काम करणे सोईस्कर होईल.

सभापती महोदय, मुंबई शहरासाठी महाराष्ट्र शासनाने हौसींग पॉलिसी ठरविण्याची आवश्यकता आहे. मुंबई शहरामध्ये जुन्या चाळी असून शहरामध्ये त्यांना रिपेअर सेस आहे. उपनगरात ज्या जुन्या चाळी आहेत त्या चाळींना कोणी वालीच नाही. 100-150 वर्षापूर्वी ब्रिटिशांनी मिलट्रीच्या बराकीसाठी या बीडीडी चाळी बांधल्या होत्या.

सभापती महोदय, मुंबईत कोळीवाडे व गावठाणे आहेत. धारावी येथे आशियातील सर्वात मोठी झोपडपट्टी आहे. विमानतळ प्राधिकरणाने विकासाचे काम सुरु केलेले आहे. मुंबई शहरामध्ये किंवा उपनगरामध्ये जुन्या गृहनिर्माण संस्था आहेत. पूर्वी 20-25 लोकांनी एकत्र येऊन घरांचे बांधकाम केलेले आहे. परंतु त्यांच्या कन्व्हेअन्सचा प्रश्न निकाली निघालेला नाही. मुंबईमध्ये काही म्हाडाच्या वसाहती सुध्दा आहेत. मुंबईमध्ये निरनिराळया योजनेच्या माध्यमातून लोक घरांमध्ये राहत आहेत. मुंबईतील झोपडपट्टीसाठी सर्वात मोठा विषय एसआरएचा आहे. मी जे काही मुद्दे मांडले आहेत त्यासाठी शासनाने एखादी गृह निर्माण पॉलिसी तयार करण्याची आवश्यकता आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई गिरकर.....

मुंबईतील बीआयटी, बीडीडी चाळीला आता कोणीच वाली राहिलेले नाही. आज मुंबईमध्ये जी मराठी माणसे राहत आहेत त्यांच्यासाठी स्वस्त घराची योजना केली नाही तर हे लोक पनवेलच्या पुढे राहण्यासाठी जातील. या सर्व कारणामुळे मूळ मुंबईकर मुंबईतून परागंदा झाल्याशिवाय राहणार नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे यांनी एसआरए योजेनचा उल्लेख केलेला आहे. स्व.बाळासाहेब ठाकरे यांनी मुंबईतील झोपडपट्टी नष्ट व्हावी यासाठी प्रयत्न केले होते. स्व.बाळासाहेबांनी झोपडपट्टीत राहणाऱ्या 40 लाख झोपडपट्टी वासियांसाठी मोफत घरांची योजना मांडली. एसआयडीची स्थापना माननीय शरद पवार साहेबांनी सुरु केली होती. एसआरडीमध्ये प्रत्यक्ष लोकांचा सहभाग होता. स्व.बाळासाहेबांनी मोफत घरांची योजना मांडली होती. 1995 मध्ये मुंबईतील जागेला जास्त भाव नसल्यामुळे बिल्डर लोक पुढे आले नाही. किरण हिमानी यांनी 1995 मध्ये पहिले एसआरएचे काम हाती घेतले होते. किरण हिमानी याने गेल्या 18 वर्षापासून झ ोपडपट्टीच्या जागेवर एकाही घराची निर्मिती केलेली नाही. किरण हिमानी याने सन 2000 मध्ये एक प्रतिज्ञापत्र केले होते त्यावेळेस आम्ही सभागृहात एसआरएचे काय झाले असा मुद्दा उपस्थित केला होता.

यानंतर श्री. भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ शरद 19:50

श्री.भाई गिरकर....

1995 नंतर एकही झोपडपट्टी होणार नाही आम्ही एसआरए मार्फत घरे बांधू असे त्यांनी प्रतिज्ञापत्र सादर केले. आज 2013 आहे. सन 2000 च्या निवडणूक जाहीरनाम्या मध्ये सन 2000 पर्यंतच्या झोपड्यांना संरक्षण देऊ असे जाहीर करून शासनाने झोपडपट्टीवासियांची मते मिळवली. नंतर सांगितले की, ती आमची प्रिटींग मिस्टेक होती. त्यानंतर सन 2004 च्या निवडणुकीच्या जाहीरनाम्यात सांगितले की, 2000 पर्यंतच्या झोपड्यांना मान्यता देऊ. पण तसे काही झाले नाही. त्यांनी सांगितले की, आम्ही निवडणुकीसाठी वचन दिले होते. सन 2009 मध्ये निवडणुका झाल्या. त्या जाहीरनाम्यात असे सांगितले की, सन 2000 पर्यंतच्या झोपड्यांना संरक्षण देण्याकरिता आम्ही सुप्रीम कोर्टात जाऊ. आता 2014 मध्ये निवडणुका होऊ घातल्या आहेत. अजूनही महाराष्ट्र शासनाला सुप्रीम कोर्टामध्ये जाण्यास वेळ मिळालेला नाही. वकील मिळालेला नाही. शासनाने यापूर्वीच सन 2000 पर्यंतच्या झोपड्यांना मान्यता दिली असती तर मुंबई शहरामध्ये झोपडपट्टी वाढली नसती. त्यावेळी एसआरएच्या माध्यमातून विकास केला असता तर त्या बाजूला पुन्हा झोपडपट्ट्या वाढल्या नसत्या. तेथे पुन्हा झोपडपट्ट्या वाढल्या असत्या तर महानगरपालिकेचे अधिकारी व पोलीस जबाबदार राहतील अशा प्रकारचा कायदा केला असता तर झोपडपट्ट्या नक्कीच झाल्या नसत्या.

आज झोपडपट्ट्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली आहेत. त्यामुळे एसआरए योजना यशस्वी झालेली नाही. आज जवळ जवळ 25 ते 30 लाख अपात्र लोक आहेत असे एसआरएचे म्हणणे आहे. 1995 पर्यंतचा पुरावा आपण ग्राह्य धरणार आहात. त्यांचे 1995 च्या व्होटर लिस्टमध्ये नाव नसेल तर त्यांना आपण अपात्र ठरवित आहात. हे अपात्र लोक मुंबईतील जुने रहिवासी आहेत. त्यामुळे माझी शासनाला विनंती आहे की, आपण लवकरात लवकर सुप्रीम कोर्टामध्ये जाऊन परवानगी घेऊन यावी.

एमयुटीपी अंतर्गत अनेक योजना राबविण्यात येत आहे. त्यासाठी आपण सन 2000 पर्यंतच्या झोपड्यांना सवलत दिलेली आहे. अशाच प्रकारची सवलत एमएमआरडीला सुद्धा देण्यात आली आहे. धारावी प्रकल्पासाठीसुद्धा आपण सन 2000 पर्यंतच्या झोपड्यांना मान्यता दिलेली आहे. तशीच मान्यता आपण एअर पोर्ट ऑथॉरिटीच्या जागेवर असलेल्या झोपड्यांना दिलेली आहे. तेव्हा एसआरएसाठी देखील 2000 पर्यंतच्या झोपड्यांना मान्यता द्यावी व मुंबई झोपडपट्टी मुक्त करावी अशी मी विनंती करतो.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ शरद 19:50

श्री.भाई गिरकर...

मुंबई शहरात कोळीवाडे आहेत. गावठाणे आहेत. त्या कोळीवाडे व गावठाण विकासासाठी शिवशाही सरकारने अफझलपूरकर समिती नेमली होती. या समितीने आपला अहवाल देखील दिला आहे. मुंबईतील कोळीवाडे आणि गावठाण यांना वेगळा एफएसआय द्यावा अशी सूचना या समितीने केली होती. कोळी हा मुंबईतील मूळ नागरिक आहे. त्यांना आपण सरंक्षण दिले पाहिजे. शासनाने अफझलपूरकर अहवाल स्वीकारलेला नाही. आजही कोळीवाड्यातील माणसला स्वत:चे घर बांधता येत नाही. त्याला स्वत:च्या घराची कौले बदलायची असतील तर ती देखील बदलता येत नाहीत. त्याला त्याच्या घराची दुरूस्ती देखील करता येत नाही.

सभापती महोदय, आरोग्य व शिक्षण देण्याची जबाबदारी राज्य शासनाची आहे. परंतु, पूर्वीपासून मुंबई महानगरपालिका ही सेवा करत आलेली आहे. 72 हजार रूग्णांपैकी 58 रूग्ण मरण पावल्याचे सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे. शासनाचे जे.जे.रूग्णालय, सेंट जॉर्जेस रूग्णालय, कामा रूग्णालय आहे. आज या रूग्णालयांची दूरवस्था झाली आहे.

यानंतर श्रीमती रणदिवे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई गिरकर . . ..

सभापती महोदय, याठिकाणी वाहतुकीची समस्या आहे. मी कांदीवलीला रहातो, त्यामुळे येण्या-जाण्यासाठी मला अडीच ते तीन तास लागतात. 2017 पर्यंत जेवढ्या गाड्या रजिस्टर व्हावयास हव्या होत्या, तेवढ्या 2012 मध्ये रजिस्टर झालेल्या आहेत. पण वाहतुकीच्या समस्येसाठी शासनाकडे काही प्लॅनिंग नाही. किती गाड्यांना परमिशन द्यावी, किती गाड्या रस्त्यावर याव्यात असा मुद्दा आहे. पण आज रस्त्यांची कपॅसिटी किती आहे? तुम्ही सांगत आहात की, रस्त्यावर खड्डे पडलेले आहेत. 2017 मध्ये जेवढ्या गाड्या रजिस्टर व्हावयास हव्या होत्या, तेवढ्या गाड्या 2012 मध्येच रजिस्टर झालेल्या आहेत. 26 जुलै 2005 मुंबई शहरामध्ये मोठा पाऊस पडला, त्यामुळे सगळीकडे पाणी साचले.परंतु 2005 नंतर मुंबई महानगरपालिकेने नियोजन केले आणि त्यानंतर मिठी नदीचे पात्र वाढविण्यात आले आणि ती कुर्ला येथे अडविली गेली आहे. पण 2005 पासून गेल्या आठ वर्षामध्ये मुंबईमध्ये एकदाही पाणी साठलेले नाही, याचे कोणी कुठेही कौतुक केलेले नाही. 2005 नंतर मुंबई शहराचे नियोजन झाले आहे. त्यानंतर शेवटचा मुद्दा मांडून मी माझे भाषण संपविणार आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी सांगितले की, मिडल वैतरणासाठी 800 कोटी रुपयांचा निधी शासनाकडून देण्यात आला आहे. परंतु ज्यावेळी 800 कोटी रुपये दिले, त्यावेळी गेवराई मध्ये जागा घ्यावयास सांगितली आणि मार्केटच्या दराने महानगरपालिकेने गेवराईमध्ये जागा घेतली.तेथे झाडे लावण्यात आली व त्या झाडाचे पैसे सुध्दा महानगरपालिकेने दिले. पण वैतरणा तलावाच्या बाबतीत शासनाने अनुदान द्यावयास हवे होते. तेथे येणारे एवढे लोक आणि त्यांची सेवा मुंबई महानगरपालिका करते.ही महाराष्ट्र शासनाची जबाबदारी आहे, पण त्यांनी ती पार पाडलेली नाही. म्हणून याठिकाणी महाराष्ट्र शासन कुठे चार एफएसआय तर कुठे तीन एफएसआय पर्यंत वाढवून देते. परंतु तेथे जे इन्फ्रास्ट्रक्चर करावयाचे आहे म्हणजे ड्रेनेजची व्यवस्था, रस्ते इ.व्यवस्था महानगरपालिकेने पहावी, त्यांनी टॉवरसाठी परवानगी द्यावी, एफएसआय द्यावेत. याच्या बाबतीतही मुंबई महानगरपालिके बरोबर महाराष्ट्र शासनाने नियोजन केले पाहिजे अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

-----

. . . .4 व्ही-2

असुधारीत प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.रामदास कदम (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मला माझ्या गटनेत्यांनी सर्वात शेवटी का होईना बोलण्याची संधी दिली, त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो आणि माननीय तालिका सभापती श्री.मोहन जोशी, सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर आणि सभापती महोदय, आपले देखील आभार मानतो.

सभापती महोदय, याठिकाणी सत्ताधारी पक्षाकडून नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडण्यात आला आहे, त्यावर मी माझे विचार मांडण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, या प्रस्तावाच्या संबंधात अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडले आहेत. अशा वेळी याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप साहेब असते तर मला आनंद वाटला असता. त्यांनी मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये शिवसेनेचे कार्याध्यक्ष माननीय श्री.उद्धवजी ठाकरेसाहेबांनी जी भूमिका बजावली होती किंवा आम्ही जो जाहीरनामा काढला होता, त्याबद्दल याठिकाणी वक्तव्य केले आहे. मी राजकीय भाष्य अधिक करणार नाही. याठिकाणी मी फक्त एवढेच सांगू इच्छितो की, 2009 च्या निवडणुकांमध्ये काँग्रेसने जो जाहीरनामा काढला होता तो आपण पहा. त्यातील काही ठळक मुद्दे मी वाचून दखवितो जेणेकरुन त्यांच्या लक्षात येईल की, आपण याठिकाणी एकमेकांवर राजकीय कुरघोडी करण्यासाठी आलो नाही. त्या मध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, 10 लाख हेक्टर नापिक जमीन आम्ही लागवडीखाली आणणार. शेतकऱ्यांना संगणकीय खाते पुस्तिका देणार. कापूस एकाधिकार सुग्रास प्रति क्वि. किमान भाव 2700 आम्ही देणार.तसेच अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा उभा करावयाचा आहे. तसेच एक संकुल उभे करण्यात येणार आहे. जल संधारणाला महत्व देण्यात येणार असून जल आयोगाची देखील स्थापना करण्यात येणार आहे. त्याच प्रमाणे जल आयोगाची स्थापना करण्यात येणार आहे. सध्या जल आयोगाची काय स्थिती आहे ते आपण पहात आहोत. तीन वर्षामध्ये 7 लाख हेक्टर जमीन सूक्ष्म सिंचनाखाली आणणार.सूक्ष्म सिंचनाच्या बाबतीत महाराष्ट्रात गेले आठ-दहा दिवस काय चालले आहे ते आपण पहात आहोत.

यानंतर श्री.अ.शिगम . . ..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम..

तीन वर्षात 7 लाख हेक्टर जमीन सूक्ष्म सिंचनाखाली आणणार, सूक्ष्म सिंचन कसे चालू आहे हे आपण मागील आठ-दहा दिवसांपासून पाहत आहोत.

सभापती महोदय, महिला व युवकांसाठी कालबध्द विकास कार्यक्रम, शेतकऱ्यांच्या वीज बिलाची माफी आणि वीजही मोफत, सर्व शेतकऱ्यांसाठी सर्वंकष विमा योजना, पाच वर्षात एक कोटी रोजगार निर्माण करणार, शेतकऱ्यांना कमी व्याज दराने व सरळ व्याज पध्दतीने कर्ज पुरवठा, प्रकल्पग्रस्ताच्या प्रत्येक कुटुंबातील एक व्यक्तीला त्याच प्रकल्पामध्ये नोकरी, विदर्भाचा अनुशेष दूर करण्यासाठी दरवर्षी विशेष तरतूद, सन 2000 पर्यंतच्या झोपड्यांना संरक्षण व सुविधा पुरविण्याचा निर्धार, असंघटित कामगारांसाठी स्वतंत्र बोर्ड, कृषी क्षेत्राला व ग्रामीण विकासाला प्राधान्य, जमिनी विषयीच्या सर्व माहितीचे संगणकीकरण असा कॉंग्रेस पक्षाचा जाहीरनामा आहे.

सभापती महोदय, "आपले ठेवावे झाकून आणि दुसऱ्याचे पहावे वाकून" अशी एक म्हण आहे. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांच्या भाषणातून तसा प्रकार पहावयास मिळाला. आपण दुसऱ्याकडे एक बोट दाखवितो तेव्हा तीन बोटे आपल्याकडे असतात याचे भान प्रत्येकाने ठेवले पाहिजे असे मला वाटते.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी त्यांच्या भाषणाची सुरुवात चांगली केली. परंतु प्रत्यक्ष भाषणास सुरुवात केल्यानंतर इतके खाली जाण्याचे कारण काय ?

सभापती महोदय, मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे त्याबद्दल कोणाचेही दुमत नाही. मुंबईतून दरवर्षी 1 लाख 20 हजार कोटी रुपये केंद्राला महसुलापोटी मिळतात. मुंबई महानगरपालिकेच्या निधीतून केंद्राला निधी मिळतो आणि त्या निधीतून देशातील इतर राज्यांचा विकास होतो. म्हणजे मुंबई महानगरपालिका संबंध देशाचा विकास असते. पण मुंबईच्या विकासाची जबाबदारी कोणी घ्यायची हा प्रश्न आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी ज्या समस्या मांडण्यात आल्या त्याला हे शासन जबाबदार आहे. मुंबई महानगरपालिकेकडून देशाला मोठ्या प्रमाणावर महसूल मिळतो. त्यातील किमान 20 टक्के निधी मुंबईच्या विकासासाठी दिला पाहिजे. माननीय मुख्यमंत्री दिल्लीमध्ये मंत्री होते. त्यांचे दिल्लीमध्ये चांगले वजन आहे. वरच्या टॉप लेव्हलला देखील त्यांचे चांगले वजन आहे. असे

..2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम..

असताना माननीय मुख्यमंत्री महोदयांनी आपले वजन दिल्लीमध्ये वापरुन मुंबईच्या विकासासाठी 10-20 टक्के निधी जो आपल्या हक्काचा आहे तो आणला तर आपणावर येथे अशी चर्चा करण्याची वेळ येणार नाही. पण तेवढे बाजूला ठेवून आपल्या सोईचे तेवढे बोलायचे हे मला येथे पहावयास मिळाले. तेव्हा माझी आपल्यामार्फत माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, राज्य शासनाने केंद्र शासनाकडे एक प्रस्ताव पाठवावा की, केंद्र सरकारला दर वर्षी मुंबई महानगरपालिकेकडून मोठ्या प्रमाणावर महसूल मिळतो त्यातील आमच्या हक्काचे काही टक्के आम्हाला द्यावेत. आपणास 10-20 टक्के निधी मिळाला तर आपणास साधारणत: 10-20 हजार कोटी रुपये मिळू शकतील.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम....

ऊठसूठ भिकेसाठी कटोरा घेऊन दिल्लीत जाऊन बसावे लागणार नाही. आमच्या हक्काचे पैसे आम्हाला द्यावेत असा प्रस्ताव शासनाच्या माध्यमातून केंद्र सरकारकडे पाठवावा अशी मी या निमित्ताने पहिली मागणी करतो.

सभापती महोदय, माननीय नगर विकास राज्यमंत्री हे धडाडीचे आहेत. त्यांनी निवडणुकीत मला पराभूत केले आहे. माझ्यासारख्याला पराभूत करणे ही साधी गोष्ट आहे काय ? परंतु इतके मोठे काम त्यांनी केले. माननीय राज्यमंत्री महोदय, आपण ती धडाडी या ठिकाणी दाखवावी अशी मी अपेक्षा बाळगतो.

माननीय विरोधी पक्ष नेते, आपली ज्या वेळी आवश्यकता असते त्या वेळी आपण हळूच सभागृहातून निघून जाता. कृपया गैरसमज करुन घेऊ नका. कधी कधी आमचे गट नेते माननीय श्री.दिवाकर रावते साहेब हे जर माझे ऐकत नसतील तर आपण मध्ये पडून मला मदत करु शकता हे मला या माध्यमातून सांगायचे होते. असो.

सभापती महोदय, मुंबईचे क्षेत्रफळ 737 चौ.कि.मी. असून, 7 बेटे मिळून ही मुंबई निर्माण झ ाली आहे. परंतु आज मुंबईची अवस्था काय आहे ? सबंध देशात 27.8 टक्के जनता शहरी भागात राहते. मात्र मुंबई ही एकच नगरी अशी आहे की, ज्या नगरीमध्ये 42.43 टक्के लोकसंख्या ही शहरी भागात राहते. हे खरे आहे की, मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे, मुंबईत रोजगार मिळतो. त्यामुळेच निरनिराळ्या भागातून लोक रोजगारासाठी मुंबईत येतात या बद्दल दुमत नाही.

महोदय, मुंबईची मागच्या काही वर्षातील लोकसंख्येची आकडेवारी मी या निमित्ताने सांगू इच्छितो. 1961 मध्ये मुंबईची लोकसंख्या 41 लाख 48 हजार होती, 1971 मध्ये ती 60 लाख झ ाली, 1981 मध्ये 93 लाख 90 हजार झाली, 1991 मध्ये 99 लाख 25 हजार झाली, 2001 मध्ये 1 कोटी 19 लाख 14 हजार झाली, 2006 मध्ये 1 कोटी 35 लाख झाली आणि आज जवळजवळ 1 कोटी 50 लाखांच्या आसपास आहे. महोदय, एखादी बाब या ठिकाणी मांडली जाते त्या वेळी आपण आत्मपरीक्षण केले पाहिजे. त्या बाबीस आपण जबाबदार तर नाही ना, हे पाहिले पाहिजे.

महोदय, एसआरएच्या योजना बोगस कशा होतात हे मी उदाहरणाने सांगतो. परप्रांतीयांना आज मुंबईत 1995 पूर्वीचे रेशन कार्ड 5 हजार रुपयांत मिळते. मी या संपूर्ण

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम....

प्रकरणाची फाईल माननीय राज्यमंत्र्यांकडे देणार आहे. मी संपूर्ण यादी आपल्याकडे देतो. त्या यादीतील 200 लोकांपैकी 95 लोकांचे रेशन कार्ड, विद्युत बील, दुकानाचे लायसेन्स बोगस आढळून येतील.

महोदय, अजमेरा सहकारी गृहनिर्माण संस्था, सी.टी.सर्व्हे नं.249, अंधेरी (पश्चिम) येथील ही योजना आहे. या योजनेमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाला आहे. या योजनेचा मालक शैलेश सावरा वाँटेड आहे. या मालकाच्या विरोधात दुसऱ्या प्रकरणी लोकांनी उच्च न्यायालयात धाव घेतली. हा मालक यापूर्वी तीन वेळा जेलमध्ये गेला होता. आज तो वाँटेड असताना तसेच उच्च न्यायालयाने ऑर्डर देऊनसुध्दा त्याच्या एसआरएच्या योजना व्यवस्थितपणे कशा मंजूर होतात ? स्थानिक पोलीस स्टेशनमध्ये लोक तक्रार करण्यासाठी गेले तर त्यांची तक्रार घेतली नाही. शेवटी ते लोक गुन्हे शाखेकडे गेले. गुन्हे शाखेकडून चौकशी करण्यात आली. त्यानंतर संपूर्ण प्रकार उघडकीस आला. महोदय, या प्रकरणाची संपूर्ण फाईल मी माननीय राज्यमंत्र्यांकडे पाठवितो. त्यांनी हे संपूर्ण प्रकरण तपासून संबंधितांवर कशी कारवाई करता येईल हे पहावे.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

सभापती महोदय, श्री. शैलेश सावरा याच विकासकाची जूहूतारा सोसायटी आहे. एसआरएच्या माध्यमातून ती इमारत बांधलेली आहे. त्या जागेचे रिझर्व्हेशन पी.जी. मध्ये आहे. पी.जी. मध्ये रिझर्व्हेशन असताना त्या ठिकाणी 11 मजल्यांची इमारत बांधलेली आहे. ती इमारत तोडण्याचे आदेश कोर्टाने दिले. कोर्टाने आदेश दिल्यानंतर सुध्दा मागच्या पाच वर्षात ही इमारत तोडली जात नाही. त्या इमारतीमध्ये कोणाकोणाचे फ्लॅटस् आहेत हे मी सांगू इच्छितो. त्या इमारतीमध्ये झरीन खान म्हणून कोणी तरी ॲक्टर आहे, फराह खान नावाची कोणी तरी ॲक्टर आहे तसेच कॅप्टन सलारिया, माजी डीजीपी श्री. पी.एस.पसरिचा इत्यादी सर्वांचे फ्लॅट आहेत. ती जागा पी.जी.साठी आरक्षित आहे. अशा पध्दतीने बोगस रेशनकार्ड घेऊन त्या माध्यमातून मुंबईमध्ये अशा इमारती होऊ शकतात. मुंब्रा येथे् एकवेळ ठीक आहे पण मुंबईतील जुहूमध्ये इमारत झाली. म्हणजे आंधळं दळते आणि कुत्रे पीठ खाते अशी परिस्थिती आहे. सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांना सांगू इच्छितो की, आपण कशाकरिता उगीच बोलत बसता ? शेंबूड माझ्या नाकाला आणि मी हसतो लोकांना, अशी आपली अवस्था आहे.

सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, अशा 100 फाईल्स मी आपल्याकडे पाठवीन. आपण जर सरळपणे एखादी योजना करावयास गेलो तर ती कधीही होणार नाही. आपण नियमानुसार, कायद्यामध्ये बसवून गेलात तर कधीच होणार नाही. त्यासाठी शैलेश सावरा सारखेच लोक लागतात. त्यांची योजना होणार, त्यांना परवानगी मिळणार आणि त्यांची इमारत होणार. मी माननीय मंत्री श्री. भास्कर जाधव यांना सांगू इच्छितो की, श्री. आर. आर. पाटील यांना त्यांना शोधण्यास सांगावे. तो हायकोर्टातून पळाला. त्याला आपण शोधावे. आपण ही इमारत कधी तोडणार ते सांगावे. मी ही फाईल माननीय मंत्री श्री. भास्कर जाधव यांच्याकडे देतो.

सभापती महोदय, आपल्याला जर मुंबईचा विकास करावयाचा असेल तर सीआरझेडच्या नियमावलीमध्ये कधी बदल करणार हे एकदा स्पष्ट होणे आवश्यक आहे. जोपर्यंत सीआरझेडच्या नियमावलीमध्ये बदल होत नाही तोपर्यंत समुद्र किनाऱ्यापासून 500 किंवा 1000 मीटरच्या

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. रामदास कदम .....

परिसरात कोणतेही बांधकाम करता येत नाही. त्यामुळे जोपर्यंत नियमावलीमध्ये बदल होत नाही तोपर्यंत मुंबईचा विकास होणार नाही. मुंबईचा तर विकास होणार नाहीच पण आपल्या कोकणाचाही विकास होणार नाही. त्या ठिकाणी आपल्याला पर्यटनाची एकही बाब मिळू शकणार नाही. या अनुषंगाने आपण शासन म्हणून गांभीर्याने विचार करावा. सभागृहामध्ये नुसते आश्वासन दिले जाते आणि त्यामध्ये शेवटचा शब्द लवकरात लवकर करु असा असतो. लवकरात लवकर याला काही अर्थ नाही. या सीआरझेडच्या बाबतीत नियमावली बदलण्याच्या संदर्भात आपण नेमका काय निर्णय घेणार आहात हे देखील आपल्या उत्तराच्या भाषणात ऐकण्यास मला अतिशय आनंद होईल्. किनारपट्टी नियंत्रणासाठी वेगळ्या नियमावलीची आवश्यकता आहे. नाही तर आपले जे कोळीवाडे आहेत त्यांची सुधारणा आपण करु शकणार नाही. कोळी बांधव हा मुंबईतील प्रथम नागरिक आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम....

परंतु आज कोळी बांधव तसाच राहिलेला आहे. इतर ठिकाणी मात्र इमारती उभ्या राहत आहेत. प्रथम नागरिक जो कोळी बांधव आहे त्यांना शासन कधी न्याय देणार आहे ? त्यांना सीआरझेडच्या बंधनातून कधी मुक्त करणार आहे त्याचे उत्तरही मंत्री महोदयांनी दिले तर मला त्याचा आनंद होईल.

सभापती महोदय, मी मुद्दाम मुंबईतील 1961 पासूनची लोकसंख्येची आकडेवारी वाचून दाखविली आहे. ती आकडेवारी माझी नाही, शासनाची आहे. शासन हे लोंढे कधी व कसे थांबविणार आहे ? मला नियम माहीत आहे, मला घटना माहीत आहे, घटनेत जे नमूद केले आहे त्याची मला कल्पना आहे. या देशामध्ये काश्मीर सोडून कोणी कोठेही व कधीही राहू शकतो. घटनेच्या कलम 19(2) व 19(6) मध्ये असे स्पष्टपणे नमूद केले आहे की, "या राज्यात राहणाऱ्या प्रत्येक नागरिकाला प्रदान केलेले पूर्ण अधिकार भोगण्याचा आणि त्याचे संरक्षण करण्याचा त्या त्या राज्याचा अधिकार आहे." त्यात पुढे असे म्हटले आहे की, "कोणी कोठेही जाऊन राहू शकतो, त्याचे संरक्षण त्या राज्याने केले पाहिजे. पण तेथील स्थानिक लोकांच्या अधिकारावर गदा येता कामा नये." याचा उल्लेख दुर्दैवाने कोठेच होत नाही. आपल्या सोयीचे आहे तेवढेच घेतले जाते.

आज आमच्या स्थानिक मराठी माणसांची अवस्था काय आहे ? डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या घटनेप्रमाणे मुंबईत सर्व गोष्टी होत आहेत काय ? बाहेरच्या किती लोकांनी यावे. या मुंबईत एसआरएच्या इमारती उभ्या राहिल्या आहेत त्यामध्ये परप्रांतीयांना किती फ्लॅट दिले आहेत त्याची आकडेवारी शासनाने मला सांगावी. ते सांगत नसतील तर मी सांगतो. काल परप्रांतातून आलेला माणूस बोगस कागदात्राच्या आधारावर एसआरएच्या इमारतीमध्ये फ्लॅट बळकावतो आणि या मुंबईत वर्षानुवर्षे झोपडीत राहणारा माणूस मात्र झोपडीत राहिला आहे. एक गोष्ट स्पष्ट झाली पाहिजे की, शासन स्थानिक लोकांवर अन्याय करीत आहे. त्या अन्यायाला वाचा फोडण्याचे काम मंत्री महोदय करणार आहेत की नाही ? ही मुंबई कोणी मिळविली ? ही मुंबई मिळविण्यासाठी 105 हुतात्मे झालेले आहेत.

ही मुंबई आम्हाला सहजासहजी मिळालेली नाही. एकेकाळी असे म्हटले जात होते की, मुंबई तुमची भांडी घासा आमची. हे आम्ही विसरलेलो नाही. या मुंबईतील....

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.रामदास कदम....

आमचा व्यवसाय काय होता ? या मुंबईतील गिरणी कामगार देशोधडीला लागला आहे. गिरणी कामगारांना मुंबईतून संपविले आहे त्यांना कोणी संपविले आहे ? आज त्या गिरणी कामगारांना जागा देऊ शकत नाही. ज्या गिरणी कामगारांमुळे आज आम्ही सभागृहात बसलो आहोत. मी भांडतो आहे, चर्चा करीत आहे. त्यांच्यासाठी शासनाकडे जागा नाही.

सन्माननीय सदस्य श्री.राम पंडागळे यांनी किरण हेमानी याचा मुद्दा मांडला होता. परंतु फक्त हेमानीच नाही. मी माननीय मुख्यमंत्र्यांना सांगितले होते की, श्रीके च्या माध्यमातून ज्या ज्या विकासकांना शासनाने जागा दिल्या आहेत मग हेमानी यांना कांदिवली येथील दिलेली 100 एकरची जागा असेल, अंधेरी येथील आकृती बिल्डरला दिलेली जागा असेल, गोळीबार येथील जिल्हाधिकाऱ्यांच्या अंतर्गत असलेली 100 एकर जागा शिवालिक बिल्डरने घेतलेली असेल त्याची चौकशी करा, ज्या हिरानंदानीने गरिबांना घरे देतो असे सांगून सरकारला फसविले आहे. त्याला शासनाने दंड लावला होता, पण सरकारने नंतर तो दंडही वसूल केला नाही. त्यालाच पुन्हा ठाण्यातील 100 एकर जागा देत आहे. मग हे सरकार कोणाचे आहे गरिबांचे आहे की, बिल्डरांचे आहे. हे शासन गिरणी कामगारांचे नाही. हे शासन 100 एकर शासकीय जागा बिल्डर्सच्या घशामध्ये घालत आहे. मी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती केली होती की, त्या जागा शासनाने ताब्यात घेऊन म्हाडाला द्याव्यात. त्या जागांमध्ये गिरणी कामगारांना घरे द्यावीत.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 20:20

श्री. रामदास कदम...

पण हे का होत नाही. कारण तुम्हाला ते करण्याची इच्छा नाही. तुम्हाला कोणती अडचण आहे ? किती पैसे तुम्ही घेतलेले आहेत ? गिरणी कामगारांना देशोधडीला लावण्याचे पाप या शासनाने केलेले आहे.

एकेकाळी गिरणगावामध्ये, लालबाग, परळ दादर या भागामध्ये 70 टक्के मराठी माणूस रहात होता. आज त्या परिसरामध्ये फक्त 20 टक्के मराठी माणूस शिल्लक राहिलेला आहे. हे कोणाचे काम आहे ? मराठी माणसांच्या खोल्या घेऊन तेथे मोठमोठय इमारती बांधल्या आणि त्या इमारतीखाली बोर्ड लावले की नॉनव्हेज खाणा-यांना फ्लॅट नाही. अशी मुंबईची परिस्थिती आहे. आम्ही कोठे आहोत ? ज्यानी 105 हुतात्मे देऊन ही मुंबई मिळविली त्या मराठी माणसाला तो नॉनव्हेज खातो म्हणून मुंबईमध्ये फ्लॅट घेण्याचा अधिकार नाही. मोठमोठ्या इमारतींच्या खाली अशा प्रकारे अधिकृतपणे बोर्ड लावलेले दिसतात. याला कोण जबाबदार आहे ?

सभापती महोदय, तत्कालीन मुख्यमंत्री स्वर्गीय विलासराव देशमुख यांचे मी आभार मानतो. मी विधानसभेमध्ये विरोधी पक्षनेता असताना अनधिकृत बांधकामाच्या संदर्भात चर्चा झाली होती. त्यावेळी मी विचारलेले होते की, मुंबईमध्ये येणारे लोंढे थांबविण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे ? त्यावेळी त्यांनी सांगितले होते की, भविष्यामध्ये या मुंबई शहरामध्ये ज्या ज्या ठिकाणी अनधिकृत बांधकाम होईल त्या त्या ठिकाणचे सहाय्यक आयुक्त आणि पोलीस निरीक्षक या दोघांनाही निलंबित करण्यात येईल. आता पर्यंत मुंबईतील किती अधिका-यांना आपण निलंबित केलेले आहे ? आपण घोषणा केली आहे ना, मग ही देखील माहिती माननीय मंत्री महोदयांनी दिली पाहिजे. मुंबई शहरामध्ये ज्या इमारती होतात त्यामध्ये कॉंग्रेसच्या नगरसेवकांची 20 टक्के पार्टनरशीप असते.

गणपत नगरचा प्रश्न मी सभागृहात उपस्थित केला होता. मी फोटो देखील आणून दाखविले होते. भाईंदर येथे आयुक्तांच्या बंगल्यासमोरील जागेवरील मॅनग्रोव्ह तोडून तेथे अनधिकृत बांधकामे होऊ लागली आहेत. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी तक्रार केल्यानंतर त्या बाबतीत काही कारवाई होत नाही. 8 दिवसांनी परत भरणीकाम चालू होते. मी गणपत नगरला

..2..

श्री. रामदास कदम...

तीन वेळा भेट दिली. त्या ठिकाणी एक म्हशीचा तबेला आहे. तेथील भय्याला मी विचारले, कब आया, त्याने सांगितले की, तीन महिना हुआ . तीन महिन्यामध्ये त्याने गणपत नगरमध्ये रस्त्यावर तबेला बांधला.

..नंतर श्री. भोगले...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.........

सभापती महोदय, याला जबाबदार कोण? मला संबंधित पोलीस ठाण्याच्या निरीक्षकांनी सात वेळा पत्र लिहून कळविले आहे की, आमच्याकडे पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध नसल्यामुळे अनधिकृत बांधकामे तोडण्यासाठी आम्ही पोलीस फोर्स पुरवू शकत नाही. याबाबत माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी अधिक खुलासा केला तर बरे होईल.

सभापती महोदय, मुंबईमध्ये 721 इमारती धोकादायक स्थितीत आहेत. पावसाळा आला की या इमारती कधी पडतील याचा नेम नाही. याबद्दल राज्य सरकारची भूमिका स्पष्ट झाली पाहिजे. मुंबई शहरातील 16 हजार इमारतींचा पुनर्विकास करण्यासाठी केंद्र सरकार निधी देणार असल्याचे सांगितले गेले. या प्रकरणाची स्थिती काय आहे, केंद्र सरकार किती निधी देणार आहे, किती इमारतींचा पुनर्विकास केला जाणार आहे याचा खुलासा मंत्री महोदयांनी करावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, मुंबईमध्ये डोंगर उतारावर 1.25 लाख झोपड्या आहेत. पावसाळ्यामध्ये कधीही अपघात घडू शकतो. 1.25 झोपड्यांपैकी 327 ठिकाणी अति धोकादायक स्थिती आहे. 9757 झोपड्या तातडीने हलविण्याची आवश्यकता आहे. 10281 झोपड्यांना भिंतीद्वारे संरक्षण देण्याची आवश्यकता आहे. मागील 8 वर्षाच्या काळात मुंबईमध्ये 231 जणांचा ढिगाऱ्याखाली गाडले गेल्यामुळे मृत्यू झाला आहे. या संदर्भात शासनाची भूमिका स्पष्ट होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, मुंबई महापालिकेच्या 63 भूखंडाचे आरक्षण उठविण्यात आले. या संदर्भात वस्तुस्थिती सभागृहासमोर आली तर माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांना आणि मलाही शांतपणे झोप येईल. महापालिकेच्या 63 भूखंडांचे आरक्षण सरकारच्या संमतीने उठविण्यात आले की सरकारने उठविले, कशा पध्दतीने उठविले हे स्पष्ट झाले पाहिजे. राज्यातील 11 कोटी जनतेला ही माहिती कळली पाहिजे. मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणात याबाबत खुलासा करावा अशी मी त्यांना विनंती करतो.

सभापती महोदय, 26.11 च्या घटनेनंतर मुंबई शहरामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा निर्णय घेण्यात आला. आणखी 26.11 सारख्या घटनेची वाट पहात आहात काय? मुंबई शहराच्या संरक्षणाबाबत नेमका कोणता निर्णय घेतला आहे? अर्थसंकल्पात 100 कोटी रुपयांची तरतूद .....

..2..

16-04-2013 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 5B.2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.........

केलेली असली तरी या योजनेसाठी 700 कोटी रुपयांची आवश्यकता आहे अशी माहिती मिळाली आहे. उर्वरित 600 कोटी रुपये कुठून उपलब्ध होणार आहेत याचा खुलासा मंत्री महोदयांनी करावा अशी मी त्यांना विनंती करतो.

सभापती महोदय, मुंबई शहराला दररोज 3340 दशलक्ष लीटर पाणी लागते. यातील 30 टक्के पाण्याची चोरी केली जाते. परप्रांतीयांचे लोंढे या शहरावर आदळत आहेत. बिल्डर मंडळी कामगार म्हणून बांगलादेशी नागरिकांना घेऊन येत आहेत त्यांना पुन्हा त्यांच्या देशात पोहोचविले जाते का? हे परप्रांतीय या शहरामध्ये कुठे राहतात, पाणी कुठून आणतात, बाथरुमला कुठे जातात? या संदर्भात शासनाने विचार केला पाहिजे. हा महापालिकेच्या अखत्यारितील विषय नाही. जे 30 टक्के पाणी वाया जाते त्या संदर्भात कोणती उपाययोजना करणार आहात हे सभागृहाला कळले पाहिजे.

सभापती महोदय, फेरीवाल्यांबाबत धोरणात्मक निर्णय होण्याची आवश्यकता आहे. मध्यंतरी माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले होते की, महिन्याभरात निर्णय घेऊ. आज मुंबई शहरात नागरिकांना चालण्यासाठी फुटपाथ उपलब्ध नाहीत. फुटपाथ फेरीवाल्यांनी व्यापले आहेत. काल या शहरात आलेला उत्तर भारतीय फुटपाथवरील मोकळ्या जागेत धंदा करण्यास सुरुवात करतो. एका वर्षानंतर तो ती जागा दुसऱ्याला धंदा करण्यासाठी भाड्याने देतो. त्या जागेचे महिन्याला 15 हजार रुपये भाडे घेतले जाते ही वस्तुस्थिती आहे.

नंतर 5सी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ...

सभापती महोदय, फेरीवाल्यांचे धोरण कधी जाहीर केले जाणार आहे याची माहिती देण्याची आवश्यकता आहे. माझी आपल्या मार्फत शासनाला विनंती आहे की, मुंबईतील मैदानाबाबत, बगिचा बाबतचा धोरणात्मक निर्णय मागच्या 8 वर्षापासून लाल फितीमध्ये सरकारने गुंडाळून ठेवला आहे.

सभापती महोदय, आज या सभागृहात मुंबईच्या प्रश्नाच्यासंदर्भात चर्चा असल्यामुळे मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांनी सभागृहात हजर रहावयास पाहिजे होते परंतु ते या ठिकाणी उपस्थित राहिलेले नाहीत. मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त श्री. सिताराम कुंटे स्वत:ला काही तरीच समजतात. आज ते या चर्चेच्या निमित्ताने येऊन बसले असते तर त्यांचे काही बिघडले असते का ? मुंबई महानगरपालिका ही स्वायत्त संस्था आहे. या मुंबई महानगरपालिकेचे एक एक हात काढणे, एक एक पाय काढण्याचे काम शासनाने सुरु केलेले आहे. एमएमआरडीएला आणणे, विमानतळ प्राधिकरणाला आणणे अशा वेगवेगळया गोष्टी आपल्या हातात घेण्याचे काम या शासनाने सुरु केले आहे. मुंबई महानगरपालिका स्वायत्त संस्था असतांना या संस्थेला आपल्या हातामध्ये घेण्याचा प्रयत्न सुरु केला आहे एवढेच नाही तर मुंबई महापालिका या शासनाने आपल्या हातामध्ये घेतली आहे असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. मुंबई महापालिकेचे आयुक्त स्वायत्त संस्था म्हणून काम करीत नाहीत तर ते बाथरुमला जातांना मुख्यमंत्र्यांना विचारतात की, नाही हे माहिती नाही. परंतु मुख्यमंत्र्यांना विचारल्याशिवाय ते कोणत्याही पेपरवर सही करीत नाहीत.

सभापती महोदय, आदरणीय शिवसेना प्रमुखाच्या स्मारकाच्या संदर्भात भूमिका घेण्यासाठी आम्ही आयुक्तांबरोबर बैठक घेतली होती. शिवाजी पार्क येथील मैदानावर 20x40 च्या आकाराचा मातीचा चौथरा बांधायचा होता परंतु त्याला परवानगी नाकारण्यात आली. या ठिकाणी सीआरझेड असल्यामुळे सिमेंटचे बांधकाम करता येत नाही. परंतु शिवाजी पार्कच्या पलीकडे समुद्रामध्ये भर टाकून रस्ता करण्यासाठी मुंबई महापालिकेच्या आयुक्तांना काहीही अडचण येत नाही, त्या ठिकाणी सीआरझेडची अडचण येत नाही. परंतु ज्या जागेवर शिवसेना प्रमुखांचा अत्यंविधी झाला होता त्या ठिकाणावर केवळ मातीचा चौथरा बांधण्याची परवानगी मागितली तर आम्हाला परवानगी



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ...

नाकारण्यात आली. या विषयाच्या संदर्भात मुख्यमंत्र्यांना विचारण्याचा प्रश्न येतोच कोठे ? मुंबई महानगरपालिका ही स्वायत्त संस्था आहे. माननीय शिवसेना प्रमुखांच्या चौथरा बांधण्याच्या संदर्भात आयुक्तांचे असे विचार असतील तर ते योग्य नाही. आयुक्त हे मुख्यमंत्र्यांच्या घरचे शिपाई नाहीत. आशिया खंडातील सर्वात मोठया महानगरपालिकेचे आपण आयुक्त आहात हे आपण कसे काय विसरता ? तुम्हाला अशा पध्दतीने काम करता येणार नाही. आम्ही शिवसेना प्रमुखांचे स्मारक करणारच. आदरणीय कै.शिवसेना प्रमुख माननीय बाळासाहेब ठाकरे यांचे भव्य स्मारक आम्ही मुंबईमध्ये करणारच. यासंदर्भात कोणी कितीही अडचणी आणल्या तरी आम्ही भव्य स्मारक करणारच. या स्मारकाचे काम आम्ही परवानग्या घेऊनच करणार आहोत. आम्ही सर्व काम नियमाने करणार आहोत. दादागिरीने कोणतेही काम करणार नाही. प्रत्येक गोष्ट कावीळ झाल्सारखी बघून चालणार नाही.

सभापती महोदय, वाहनांच्या व्यवस्थेबाबत, वाहनतळाच्या बाबतीत शासनाचे नेमके काय नियोजन राहणार आहे ? कांदिवली वरुन चर्चगेटपर्यंत येण्यासाठी ३ तास लागतात. या दरम्यान एखाद्या महिलेला प्रात:र्विधी करायचे असेल तर ती कशी काय करु शकेल ? यासाठी आपण काही नियोजन केले आहे काय ?

यानंतर श्री. भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम....

यासाठी आपण नेमके काय करणार आहात ? प्रत्येक गोष्टीमध्ये राजकारण करण्याचे काम या शासनाने केले आहे. शिवशाहीच्या काळामध्ये माननीय श्री.नितीन गडकरी साहेबांच्या माध्यमातून 55 उड्डाण पूल बांधले. त्या वेळी हेच शासनकर्ते आमच्यावर टीका करीत होते. आम्ही 55 उड्डाण पूल बांधले नसते तर काय अवस्था झाली असती. आज मला कांदिवली येथून सकाळी 7.00 वाजता निघावे लागते. तेव्हा मी येथे 10.00 वाजता पोहचतो. मला येथे येण्यासाठी 3 तास लागतात. अशी आमची अवस्था आहे. म्हणूनच मी आपल्या माध्यमातून राज्यकर्त्यांना सांगेन की, मुंबईमध्ये प्रतिदिन लाखो वाहने येत असतात. त्यांच्यासाठी वाहनतळ निर्माण केले पाहिजे. त्यासाठी आपण आयुक्तांना बोलावून चर्चा करावी. नगरविकास विभाग आपल्याकडे आहे. कदाचित आपण सांगाल की, हा महानगरपालिकेचा विषय आहे. यामध्ये कुठलेही राजकारण न आणता काम केले पाहिजे. आपण वेगळ्या दृष्टीने याचे नियोजन केले तर मला निश्चितच समाधान वाटेल. आपण मला संधी दिल्याबद्दल आपले तसेच आमचे गट नेते श्री.दिवाकर रावते साहेब यांनी मला बोलायला दिल्याबद्दल त्यांचेही मी मनापासून आभार मानतो. धन्यवाद. जय हिंद, जय महाराष्ट्र.

........

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नरेंद्र पाटील (विधानसभेद्वारा निर्वाचित) : सन्माननीय सभापती महोदय, आपण मला संधी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी नियम 260 अन्वये प्रस्ताव मांडला आहे त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी विविध महानगरपालिकांचा विषय येथे उपस्थित केला आहे. येथे बरीच चर्चा झाली असल्यामुळे मी फक्त मुद्दे मांडणार आहे. मुंबईमध्ये मोठ्या प्रमाणावर रेल्वे स्टेशनच्या बाहेर फेरीवाले आहेत. मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रात 150 ते 200 छोट्या मंडया आहेत. तेथे भाजी विक्रेते, फळ विक्रेते, मच्छी विक्रेत आहेत. पण काही फेरीवाले हे जाणूनबुजून लायसेन्स असून सुद्धा पदपथावर बसत आहेत. त्यामुळे पादचारी व वाहतुकीची मोठ्या प्रमाणावर कोंडी होत आहे. जेथे अशा मंडया आहेत तेथील फेरीवाल्यांना सक्तीने मार्केटमध्ये बसविले पाहिजे. मध्यंतरी मशिद बंदर, गोरेगाव रेल्वे स्टेशन येथील फेरीवाल्यांना उचलून त्यांना मार्केटमध्ये व्यापार करण्यासाठी सक्ती केली होती. परंतु, महानगरपालिकेच्या माध्यमातून कमी जास्तपणा करून रस्त्यावर बसण्याच त्यांना परवानगी देण्यात आली आहे.

आज सर्वच महानगरपालिकांमध्ये साफसफाई करण्यासाठी आऊटसोर्सिंग करण्यात आले आहे. यातील जे कामगार आहेत त्यांना कायम केले पाहिजे. तशी प्रत्येक कामगार चळवळीतील नेत्यांची भूमिका असते. राज्यातील प्रमुख महानगरपालिकांमध्ये आऊटसोर्सिंद्वारा कामगार नियुक्त केला जातो. त्या कामगाराला कायद्याचे कुठलेही संरक्षण मिळत नाही. या कामगारांना देखील कायम कामगारा प्रमाणे मजुरी मिळाली पाहिजे.

झोपडपट्टीचा प्रश्न आमचे सहकारी सन्माननीय सदस्य श्री.राम पंडागळे यांनी मांडला आहे. यदाकदाचित आपण सन 2015 पर्यंतच्या झोपड्या नियमित कराल असे वाटते. खरा मुंबईकर गिरणी कामगार आहे, माथाडी कामगार आहे, गोदी कामगार आहे.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, मी देखील बोलण्यासाठी माझे नाव दिलेले आहे. मग आम्हाला येथे कशासाठी बसवून ठेवता हा प्रश्न आहे. नाहीतर आम्ही बाहेर जातो. आमच्या पक्षाच्या प्रतोदांनी दिलेली नावे वाचावीत. त्यामध्ये माझे नाव पहिल्या क्रमांकावर आहे. आपण यादीमध्ये माझे नाव नाही असे जे सांगत आहात ते बरोबर नाही.

श्री.नरेंद्र पाटील : सभापती महोदय, याठिकाणी मोठ्या प्रमाणात मुंबईची ओळख दाखविणारा जसा कोळी समाज आहे, आगरी समाज आहे. त्याच प्रमाणे गोदी कामगार होता, गिरणी कामगार होता, माथाडी कामगार होता. परंतु या कामगारांना स्वत:ला मुंबई मध्ये रहाण्यासाठी स्वत:चे घर उपलब्ध करुन देऊ शकलो नाही. गिरणी कामगारांच्या घराबद्दल आमच्या सहकाऱ्यांनी विषय मांडलेला असल्याने त्याबाबत मी बोलणार नाही. परंतु आजही वडाळा ट्रक टर्मिनलमध्ये माथाडी कामगारांसाठी जी घरे देऊ केलेली आहेत, त्या वेगवेगळया प्रकारच्या कायद्याच्या अडचणी दाखवून आजही ती घरे पूर्ण होऊ शकली नाहीत ही खंत मी याठिकाणी व्यक्त करतो.माझी एवढीच विनंती आहे की, आपल्या माध्यमातून माननीय मंत्री महोदयांनी एमएमआरडीए च्या माध्यमातून लवकरात लवकर माथाडी कामगारांसाठी घरे उपलब्ध करुन द्यावीत.

सभापती महोदय, मुंबई महानगरपालिके नंतर ज्या महानगरपालिकेचा जन्म झाला, ती नवी मुंबई महानगरपालिका असून आज त्या नवी मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून फार मोठा असा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला. माननीय श्री.संजीवजी नाईकसाहेब, त्यावेळचे महापौर यांनी मोर्बे धरण विकत घेतले आणि नवी मुंबईच्या भविष्य काळातील पाण्याचा प्रश्न सोडविला. हाच निर्णय मुंबई महानगर पालिका देखील घेऊ शकत होती. परंतु त्यांनी काही कारणास्तव तो निर्णय घेतला नाही. पण माझी विनंती आहे की, मुंबईच्या पाण्याचा प्रश्न जर सोडवावयाचा असेल तर नवी मुंबई महानगरपालिकेचे जे धोरण आहे, तशाच प्रकारचे धोरण ठाणे महानगरपालिका आणि मुंबई महानगरपालिका यांनी घ्यावे. आज नव्या मुंबईचा विकास हा खरे म्हणजे इतरांनी, बाहेरच्या लोकांनी जरी केला असला तरी त्यासाठी जमीन देण्याचे सगळयात मोठे काम त्याठिकाणच्या कोळी, आगरी समाजाच्या स्थानिक गावकऱ्यांनी केलेले आहे. परंतु या ठिकाणी असणाऱ्या गावामध्ये कुठला विकास करावयाचा असेल तर त्याठिकाणी कायद्याची फार मोठी बंधने आहेत. आज तेथील गावाचा विकास करण्यासाठी तेथे 4 एफएसआय देणे फार गरजेचे आहे.सिडकोने बांधलेली 25-25,30-30 वर्षाची घरे ही मोडकळीस आलेली आहेत. त्याठिकाणी सिडको जाणूनबुजून त्याच्या....

5 ई-2

श्री.नरेंद्र पाटील . . . .

पुनबांधणीसाठी परवानगी देत नाही. माझी अशी विनंती आहे की, आपण त्यामध्ये बारकाईने लक्ष घालून त्या वाढीव एफएसआय च्या बद्दल लवकरात लवकर निर्णय घ्यावा.

सभापती महोदय, आज मुंबईमध्ये एअरपोर्ट आहे आणि तशा प्रकारचा एअरपोर्ट नवी मुंबई मध्ये स्थलांतरीत केलेला आहे. परंतु हा एअरपोर्ट स्थलांतर होत असताना स्थानिक ग्रामस्थांच्या जमिनी सदरहू एअरपोर्टसाठी जाणार आहेत, अशा वेळी त्यांनी मागितलेला मोबदला जरी जास्त असला तरी त्यांना दिला पाहिजे. कारण तोत्यांचा अधिकार आहे. राज्य सरकारने त्यामध्ये मध्यस्थी करुन आणि गरज भासल्यास केंद्र शासनाकडून वेगळा फंड मागून तेथील ग्रामस्थांनी मागणी केलेल्या प्रमाणामध्ये जमिनीचे दर आपण तेथे द्यावेत. जेणेकरुन तो एअरपोर्ट लवकर होईल आणि तो एअरपोर्ट लवकर झाला तर सरकारच्या तिजोरीत पैसा वाढेल आणि वाचेल.

सभापती महोदय, काही वर्षापूर्वी सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त साहेबांनी हा विषय चर्चेला घेत असताना या एअरपोर्टच्या बांधणीसाठी जो निधी लागणार आहे, तो दिवसेंदिवस आणि महिनोंमहिने वाढत जाणार आहे असे सांगितले होते. आज नवी मुंबईमध्ये आमचे छोटे-छोटे कोळीबांधव त्याठिकाणी बोटीमधून मच्छीमारी करीत होते.परंतु त्याठिकाणी त्यांना कोणत्याही प्रकारे जेटीची सोय उपलब्ध करुन दिलेली नाही. माझी विनंती आहे की, राज्य शासनाच्या माध्यमातून त्याठिकाणी त्यांना जे.टी.ची सोय उपलब्ध करुन द्यावी. जेणेकरुन त्या भागामध्ये आजही आमच्या मच्छीमार बांधवाला मच्छीमारी करण्यासाठी फार चांगल्या पध्दतीचे तेथे सहकार्य मिळेल.

सभापती महोदय, मुंबई मध्ये मोठ्या प्रमाणात प्रवास करणाऱ्या, बाहेरगावी प्रवास करणाऱ्या लक्झरी बसेस आहेत. परंतु आपण पाहिले तर मुंबईमध्ये कुठल्याही प्रकारे चांगल्या पध्दतीने तेथील बस स्टॉप नाहीत आणि हीच परिस्थिती नवी मुंबईमध्येही आहे. नवी मुंबईमध्ये जुन्या टोलनाक्याच्या बाजूला गाड्या लावतात आणि त्यामुळे तेथे कित्येक वेळेला अपघात झाले आहेत. याठिकाणी मुले, स्त्रिया बसची वाट पहात असतात.पण तेथे शौचालयाची सोय नाही. एमएमआरडीए असो किंवा राज्य सरकारच्या माध्यमतून, महानगरपालिकेच्या माध्यमातून अशा प्रकारच्या चांगल्या सुविधा त्याठिकाणी उपलब्ध करुन द्याव्यात अशी माझी विनंती आहे. जेणेकरुन जनता-जनार्दन आपले आभार मानेल.

(सभापतीस्थानी मा.तालिका सभापती श्री.मोहन जोशी)

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नरेंद्र पाटील...

जेणेकरुन जनता जनार्दन आपले आभार मानतील.

सभापती महोदय, मुंबईतील रस्त्यांची आणि नवी मुंबईतील रस्त्यांची तुलना केली तर मुंबईतील रस्त्याची अवस्था म्हणजे खड्डयांमध्ये रस्ते की रस्त्यांमध्ये खड्डे अशी आहे. या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी चांगला उल्ल्ेख केला. परंतु येणाऱ्या पावसाळ्यापूर्वी हे सर्व रस्ते चांगले करण्याचा प्रयत्न करावा जेणेकरुन कोणीही या महानगरपालिकेवर टीका करणार नाही. आपणास याचा बोध घ्यायचा असेल तर नवी मुंबई महानगरपालिकेने माननीय मंत्री श्री.गणेश नाईक यांच्या नेतृत्वाखाली चांगला आराखडा तयार करुन त्याप्रमाणे डेव्हलपमेंट केलेली आहे तशाप्रकारे आपण देखील डेव्हलपमेंट करावी अशी विनंती आहे.

सभापती महोदय, नवी मुंबईमध्ये असलेल्या गावठाणांना एफ.एस.आय.वाढवून देणे गरजेचे आहे. कारण तेथील लोकांनी आपल्या जमिनी दिल्यामुळे नव्या मुंबईचा विकास होऊ शकला. त्या ठिकाणी सिडकोची स्थापना होऊन डेव्हलपमेंट झालेली आहे. तेव्हा त्या ग्रामस्थांकडे दुर्लक्ष होता कामा नये. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून मी माझे भाषण पूर्ण करतो.

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे (नामनियुक्त ) : सभापती महोदय, या सभागृहातील सन्माननीय सदस्यांना आपल्यावर कुठेतरी अन्याय होतो याची जाणीव होता कामा नये आणि ही खबरदारी आपण सर्वांनी घेतली पाहिजे. माझ्या बोलण्यामुळे आपणास काही दुःख झाले असेल तर मी दिलगिरी व्यक्त करतो. आम्ही सभागृहात काही बोललो नाही तर आम्ही सभागृहामध्ये काही बोलत नाही, शांत बसतो, ठराविक विषयावर बोलून निघून जातो, अशा प्रकारचे आरोप देखील आमच्यावर बाहेर होता कामा नयेत. काल सुध्दा आपण रात्री 10.30 वाजेपर्यंत महत्वाच्या विधेयकावर चर्चा करीत होतो. आज सुध्दा आम्ही येथे बसलो आहोत. आम्हाला सुध्दा काही महत्वाचे मुद्दे मांडायचे आहेत. आम्ही देखील मुंबई शहराशी संबंधित आहोत.

सभापती महोदय, मुंबई ही देशाची आर्थिक तसेच मनोरंजनाची सांस्कृतिक राजधानी आहे. जगामध्ये मोठ्या शहरांमध्ये लोकसंख्येच्या मानाने मुंबई शहर हे चौथ्या क्रमांकाचे शहर आहे. मुंबई महानगरपालिकेचे बजेट 27 हजार कोटी रुपयाचे आहे. केरळ राज्याचे देखील तेवढेच बजेट आहे. मुंबई शहराला देशामध्ये नव्हे तर जगामध्ये अनन्य साधारण महत्व आहे.

सभापती महोदय, मुंबई शहरातून कराच्या माध्यमातून केंद्र सरकारला हजारो कोटी रुपये मिळतात. मुंबई शहरातून दहा टक्के फॅक्टरी एम्प्लॉयमेंट होते. देशाला जो प्राप्ती कर मिळतो त्याच्या 40 टक्के प्राप्तीकर मुंबई शहरातून मिळतो. 20 टक्के सेंट्रल एक्साईज, 60 टक्के आयात कर, 40 टक्के परदेश व्यापार आणि 50 अब्ज रुपये व्यावसाय कर एकटया मुंबई शहरातून मिळतो. मुंबईचे वार्षिक सकल उत्पन्न हे 10 हजार कोटी पेक्षा जास्त आहे म्हणून मुंबई हे आंतरराष्ट्रीय शहर म्हणून गणले जाते.

सभापती महोदय, मुंबईतील कारखानदारी बरीचशी बंद होत आहे. परंतु मुंबई शहरामध्ये सर्व्हीस इंडस्ट्री उदयास येत आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर मुंबई शहराचे महत्व अतिशय वाढू लागले आहे.

सभापती महोदय, मुंबई शहर हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर असताना मुंबईतील सोयी सुविधा देखील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या झाल्या पाहिजेत.

सभापती महोदय, आज मुंबईतील शिक्षणाचा दर्जा म्हणावा तसा चांगला नाही. मुंबई महानगरापालिकेच्या शाळांचा दर्जा सुधारण्याची आवश्यकता आहे. ज्यांच्याकडे शिक्षणासाठी दुसरा

..3.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे ....

कोणताही पर्याय नाही असे लोक आपल्या मुलांना महानगरपालिकेच्या शाळेत पाठवितात. तेव्हा शिक्षणाचा दर्जा सुधारणे आवश्यक आहे. शाळांच्या भूखंडावर डोळा ठेवून प्रशासन चालविणे किंवा शासन चालविण्यापेक्षा शिक्षणाचा दर्जा कसा चांगल्याप्रकारे सुधारता येईल यासाठी प्रयत्न केला पाहिजे.

सभापती महोदय, मुंबईला मोठा समुद्र किनारा लाभलेला आहे. या समुद्र किना-याच्या माध्यमातून पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी कोणतेही नवीन प्रकल्प मुंबई शहरामध्ये उभारण्यात आलेले नाहीत.

यानंतर श्री.बोर्डे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे....

आज ज्या देशांत समुद्र किनारे आहेत त्या ठिकाणी समुद्र किनाऱ्यांच्या माध्यमातून पर्यटन प्रकल्प राबवून उत्पन्न मिळविले जाते. मुंबईला सुध्दा समुद्र किनारा लाभल्यामुळे आपण पर्यटन प्रकल्प सुरु केले तर मोठ्या प्रमाणावर उत्पन्न मिळू शकते. आज आपण गेट वे ऑफ इंडियावर जाऊन 5-10 रुपयांचे तिकीट काढून एखाद्या लाँचमधून फिरुन येतो. एवढ्यापुरतेच आपल्याकडे पर्यटन आहे. याच्यापुढे आपण गेलेलो नाही. अजूनपर्यंत आपल्याकडे समुद्र किनाऱ्याच्या माध्यमातून पर्यटन होत नाही. त्यामुळे याकडे सुध्दा लक्ष दिले पाहिजे.

सभापती महोदय, मुंबईतील बीपीटी आणि जेएनपीटी बंदरातून मोठ्या प्रमाणावर उत्पन्नाचे साधन मिळू शकते. शासनाने या बंदरांकडे शहरी विकास करण्याच्या माध्यमातून लक्ष दिले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी स्वत:चे बंदर उभे केले आहे. कोकणपट्टीचा विकास करण्याचा प्रयत्न आपण चांगल्या प्रकारे करीत आहात. तशाच प्रकारे आपण मुंबई शहरातील बंदरांकडे बघितले तर त्यातून मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होऊ शकतो. शहराचा विकास, बाजारपेठ, उद्योगधंदे, यासाठी मुंबई बंदराचा चांगल्या प्रकारे उपयोग केला पाहिजे.

महोदय, केंद्र व राज्य सरकारकडून मिळणाऱ्या निधीतून एमएमआरडीएच्या माध्यमातून हजारो कोटी रुपयांच्या योजना केल्या जात आहेत. त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. 2000 पर्यंतच्या झोपड्यांना संरक्षण देण्याचा प्रश्न या ठिकाणी उपस्थित करण्यात आला. 2000 पर्यंतच्या झोपड्यांना संरक्षण दिले पाहिजे हा आपला सुध्दा हट्ट आहे. न्यायालयाच्या निर्णयामुळे हे काम रखडलेले आहे. यामध्ये कोणाला दोषी ठरविता येणार नाही.

महोदय, सार्वजनिक परिवहनाचा प्रश्न सुध्दा मोठा असून, त्याकडे लक्ष दिले पाहिजे. आज मुंबई शहरात 55 लाख प्रवासी बसने प्रवास करतात. त्यांना चांगल्या प्रकारच्या परिवहन सुविधा देण्याकडे लक्ष दिले पाहिजे. वाहतुकीला जल वाहतूक हा एक उत्तम पर्याय आपण देऊ शकतो. जल वाहतूक हा पर्याय देत असताना रो-रो पध्दतीच्या माध्यमातून माल वाहतुकीचा प्रकल्प राबविता येऊ शकतो. मुंबई आणि आजूबाजूच्या शहरांमध्ये रो-रो वाहतुकीचा प्रकल्प राबविला तर माल वाहतुकीचा प्रश्न सुटू शकतो.

..2..

श्री.रमेश शेंडगे....

महोदय, पर्यावरणाच्या अडचणी सुध्दा महत्त्वाच्या आहेत. त्याकडे देखील लक्ष दिले पाहिजे. या बरोबरच घनकचऱ्याचा विषय सुध्दा महत्त्वाचा आहे. काही वर्षांपूर्वी जागतिक बँकेकडून 240 मिलियन डॉलर्सचे कर्ज घेऊन कचऱ्यावर प्रक्रिया करणारा एमएसडीपी प्रकल्प राबविण्याचे ठरविण्यात आले होते. त्या प्रकल्पाचे काय झाले याचे स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे. तसेच दुसरी बाब अशी की, कोट्यवधी रुपये खर्च करुन हजारो लीटर सुगंधी द्रव्य फवारणी करण्याचे ठरविण्यात आले होते. त्या प्रकल्पाचे नेमके काय झाले हे सांगितले पाहिजे. किती कोटीचे द्रव्य खरेदी केले हे सांगितले पाहिजे.

महोदय, मुंबई महानगरपालिकेचा कत्तलखाना आहे. परंतु त्याकडे महापालिकेचे लक्ष आहे की नाही हे माहीत नाही. त्या कत्तलखान्यातून मटन एक्स्पोर्ट होते. त्या कत्तलखान्यातून संपूर्ण मुंबई शहरामध्ये मटन पुरविले जाते. परंतु ते मटन कोणत्या प्रतीचे आहे याची तपासणी केली जात नाही. खाजगी उद्योजक या कत्तलखान्यातील मटन एक्स्पोर्ट करतात. परंतु त्या कत्तलखान्यामध्ये त्यांच्यासाठी आवश्यक त्या मशिनरींचा पुरवठा केला जात नाही. त्याकडे दुर्लक्ष केले जाते. आपण त्यांच्यासाठी आवश्यक ती मशिनरी उपलब्ध करुन दिली तर मोठ्या प्रमाणावर उत्पन्न मिळू शकते.

महोदय, मध्यंतरी वर्तमानपत्रात एक बातमी आली होती. त्या बाबत मी माननीय मंत्र्यांना मागच्या अधिवेशनात सुध्दा सांगितले होते. एका आंतरराष्ट्रीय संस्थेने सर्व्हे केल्यानंतर देशात तिसऱ्या क्रमांकाचे सर्वात गलिच्छ शहर मुंबई असल्याचे नमूद केले होते. मला आश्चर्य वाटते की ज्यांच्या हातामध्ये महापालिकेची सत्ता दिली आहे त्या ठिकाणी अशा प्रकारचा सर्व्हे होत असेल तर त्याकडे लक्ष दिले पाहिजे. अशा प्रकारचा सर्व्हे होऊन आंतरराष्ट्रीय पातळीवर मुंबईची अशी प्रतिमा होत असेल तर आत्मपरीक्षण केले पाहिजे. म्हणून मुंबईच्या स्वच्छतेकडे लक्ष दिले पाहिजे.

महोदय, मुलुंड (पूर्व) येथील पाम एकर्स गृहनिर्माण सोसायटीच्या बाजूला बेकायदेशीर मच्छी मार्केट सुरु झाले आहे. मासळी विक्रेते त्या ठिकाणी बसतात. महापालिका आयुक्तांनी या बाबत विभागवार लोकप्रतिनिधी आणि आमदारांची बैठक बोलावली होती. त्या बैठकीत त्या

..3..



SJB/ पूर्वी श्री.अजित.... 20:50

श्री.रमेश शेंडगे....

बेकायदेशीर मच्छी मार्केट बाबत मी तक्रार केली होती. त्यानंतर आयुक्तांनी मला पत्राद्वारे कळविले की, सदरहू बेकायदेशीर मच्छी मार्केट तेथून हलविले आहे. माझ्याकडे फोटो आणि पुरावे आहेत. माझ्या माहितीनुसार अजूनही ते मच्छी मार्केट त्याच ठिकाणी सुरु आहे. महापालिका आणि पोलीस स्टेशनमधील अधिकारी/कर्मचारी मासळी विक्रेत्यांकडून हप्ते घेत आहेत. त्यामुळे अजूनही ते मच्छी मार्केट तेथे सुरु आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, त्या बेकायदेशीर मच्छी मार्केटवर कधी कारवाई करण्यात येणार आहे ? कारण या मार्केटमुळे त्या परिसरातील लोकांना घाणेरडा वास सहन करावा लागत आहे. त्या ठिकाणी कोणतीही प्रक्रिया न करता मार्केट सुरु असल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करावी अशी मी विनंती करतो.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे ....

सभापती महोदय, विकसनशील देशामध्ये इतर मोठ्या शहरांप्रमाणे मुंबईमध्ये देखील अतिनागरिकीकरणामुळे तसेच महानगरपालिकेच्या भोंगळ व बेजबाबदार कार्यपध्दतीमुळे गरिबी, निकृष्ट सार्वजनिक आरोग्य, बेरोजगारी, पायाभूत नागरी सुविधांचा अभाव, अतिस्थलांतर व बकाल वस्त्यांची म्हणजे झोपडपट्टयांची वाढ, असे प्रश्न निर्माण झाले आहेत. जागेची कमतरता, घरांच्या वाढत्या किंमतीमुळे लोक उपनगरात राहतात त्यामुळे वाहतूक व्यवस्थेवर ताण पडतो. या सर्व समस्यांचा आपण विचार करावा. मुंबईमध्ये राहणारा जो मराठी माणूस असेल, जो भूमीपूत्र असेल त्यांच्या घरांचे प्रश्न सुध्दा सोडवावेत. मला लोकशाहीर स्व.अण्णाभाऊ साठे यांच्या गाण्याची एक ओळ आठवते. ते मुंबईत राहात असत. ते गिरणी कामगार होते. मुंबईचे सौंदर्य बघून त्यांना आपल्या कुटुंबाची आठवण येत असे. ज्यावेळेला त्यांना आपल्या पत्नीची आठवण येत असे. तेव्हा ते असे म्हणत असत की, मला या ठिकाणी राहण्यासाठी घर नाही म्हणून मी माझ्या पत्नीला या ठिकाणी आणू शकत नाही. म्हणून ते असे म्हणायचे की, "माझी मैना गावाकडं ऱ्हायली, माझ्या जीवाची होतीया काहिली." निदान येथून पुढे तरी कोणाच्या जीवाची काहिली होऊ देऊ नका. महाराष्ट्रातील भूमीपुत्रांना आपल्या कुटुंबासह मुंबईमध्ये सुरक्षित राहण्यासाठी आपण योग्य पर्याय योजावेत अशी विनंती करतो. आपण मला बोलण्याची संधी दिली तसेच सर्व सन्माननीय सदस्यांनी मला सहकार्य केले त्याबद्दल सर्वांना धन्यवाद देऊन मी माझे भाषण संपवितो.

---

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ( विरोधी पक्ष नेता ) : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांच्या उत्तरामध्ये दोन मुद्दे आले तर बरे होईल म्हणून मी बोलण्यासाठी उभा राहिलो आहे नाही तर या ठिकाणी खूप चांगली भाषणे झालेली आहेत. सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांचे कुटुंब तिकडे असल्यामुळे यांना मुंबईची काहिली आठवते हे आम्हाला कळते.

सभापती महोदय, आमच्या मुंबईत आणि एमएमआरडीए रिजनमधील सर्वात महत्वाचा एकच प्रश्न आहे. या ठिकाणी एअरपोर्ट आहे, रेल्वे आहे, केंद्रीय वन विभाग आहे, बीपीटी आहे, मिठागरे आहेत, एमएमआरडीए आहे, म्हाडा आहे पण कोणी कोणाचा बाप नाही आणि कोणी कोणाला विचारत नाहीत. या सर्वांची एक एजन्सी केली पाहिजे. केंद्रातील संस्था असो किंवा राज्यातील संस्था असो पण त्यांची महिन्यातून, दोन महिन्यातून एक बैठक माननीय मुख्यमंत्र्यांकडे खाते असल्यामुळे त्यांनी घ्यावी आणि त्यांना वेळ नसेल तर तो अधिकार राज्यमंत्र्यांना द्यावा. त्यामध्ये मुख्य सचिव असावेत. सर्व कोऑर्डिनेशन झाले पाहिजे नाही तर हे सर्व प्रश्न सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांनी तीनदा मांडले, चारदा मांडले तरी तसेच राहतील. कारण या आयएएस केडरमधील सिनियॉरिटीची व्यवस्था एकवेळ जाईल पण जी बॅच व्यवस्था आहे ती फार भयानक आहे. त्यामुळे प्रश्न निर्माण होतो. शासनाने एक काही तरी धोरण ठरवावे. महिन्या दोन महिन्यातून अशी एक बैठक होईल, त्यामध्ये ते इश्यूज येतील ते सॉर्टआऊट करुन मुख्य सचिव जे आदेश देतील त्याप्रमाणे कार्यवाही झाली पाहिजे. यामध्ये राज्यातील संस्था सुध्दा आहेत. केंद्रातील रेल्वे खाते, फॉरेस्ट खाते, विमान, बीपीटी यांच्या संदर्भात जी.आर. निघाला पाहिजे. ते महाराष्ट्राच्या मुख्य सचिवांना उत्तरदायी असले पाहिजेत. तरच हे विषय सुटतील. नाही तर हे विषय सुटणार नाहीत.

सभापती महोदय, महापालिका आयुक्तांनी एक लेटेस्ट सर्क्युलर काढले आहे त्यानुसार मुंबईतील सर्व मैदाने, बगीचे या ठिकाणी आता एकही दिवस बाकीच्या ॲक्टिव्हिटीज होणार नाहीत. कोकण महोत्सव होणार नाही, कालाघोडा महोत्सव होणार नाही. यामध्ये उद्देश चांगला आहे पण आमचे असे म्हणणे आहे की, आता 30 दिवसातील 7 दिवस परवानगी आहे, आपण त्याऐवजी 5 दिवस, 3 दिवस करा पण पूर्णपणे बंदी करु नका. पूर्णपणे बंदी केल्यामुळे मुंबईतील

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. विनोद तावडे .....

जे कोळी उत्सव असतील किंवा इतर उत्सव असतील ते सर्व बंद होऊन जातील. ते बंद होणार नाही याची शासनाने काळजी घ्यावी.

सभापती महोदय, कन्नमवार नगरच्या संक्रमण शिबिरामध्ये गेली पाच, दहा, पंधरा, वीस वर्षे घुसखोर राहात आहेत पण त्यांना म्हाडाची पावती दिली जाते. मग ते अनधिकृत कसे ठरतात ? त्यांना श्री. शिर्के यांच्या सांगण्यावरुन ताबडतोब खाली करणे चालू आहे, त्यांना बेघर करणे चालू आहे. आपण ठाण्याच्या विषयात जशी भूमिका घेतलेली आहे तशी भूमिका या विषयात घ्यावी एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, ज्याला ट्रेझरी बेंच असे म्हटले जाते त्या सत्ताधारी बाकाकडून महाराष्ट्र विधानपरिषद नियम 260 अन्वये हा प्रस्ताव सभागृहासमोर चर्चेला आला आहे.

सभापती महोदय, या चर्चेला सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण यांनी सुरुवात केली होती. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी आपल्या भाषणातून काही महत्वाचे मुद्दे मांडले होते. त्यानंतर श्री.किरण पावसकर, ॲड.आशिष शेलार, श्री.भाई जगताप, श्री.जयंत पाटील, श्रीमती अलका देसाई, सर्वश्री राम पंडागळे, विनायक राऊत, निरंजन डावखरे, भाई गिरकर, रामदास कदम, नरेंद्र पाटील, रमेश शेंडगे आणि शेवटी या सदनाचे सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी काही महत्वाच्या सूचना केलेल्या आहेत. मी सुरुवातीलाच सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर आणि इतर सर्व सन्माननीय सदस्यांना धन्यवाद देतो. चर्चेच्या ओघामध्ये कदाचित माझ्या पलीकडच्या मित्रांना असे वाटले असेल की, मुंबई महानगरपालिका अनेक वर्षे आमच्या ताब्यात असल्यामुळे सत्ता मिळत नाही या निव्वळ असूयेपोटी हा प्रस्ताव सत्तारुढ पक्षाच्या वतीने आणण्यात आला आहे. मी या निमित्ताने जरुर राजकीय भाष्य करणार आहे. कारण सन्माननीय सदस्य श्री.विनायक राऊत आणि सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी राजकीय भाष्य केलेले आहे.

या प्रस्तावाची चांगल्या प्रकारे सुरुवात झाली होती. या महानगरपालिकेत सत्ता कोणाची आहे याचा विचार न करता ही महानगरपालिका देशाची राजधानी,सर्वांत जास्त उत्पन्न देणारी मुंबई महानगरपालिका आहे असे या प्रस्तावाच्या सुरुवातीलाच नमूद केलेले आहे. देशाच्या आर्थिक राजधानीचे कशा पध्दतीने विकासात्मक दृष्टीने नियोजन केले पाहिजे, राजधानीचा दर्जा कसा असावयास पाहिजे, त्यामध्ये कोणकोणत्या सुविधा असाव्यात, कोणकोणत्या गोष्टींचा ताण पडतो या सर्व गोष्टीतून मार्ग कसा काढावयाचा यादृष्टीने हा प्रस्ताव आलेला आहे. या प्रस्तावावर दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी सकारात्मक चर्चा केली आणि काही महत्वाचे मुद्दे मांडलेले आहेत. या महानगरपालिकेच्या संदर्भातील वाढत्या शहरीकरणाबाबत चिंता व्यक्त केली जाते. या शहरामध्ये एमएमआरडीए हे रिजन नजरेसमोर धरले असले तरी राज्यातील वाढते शहरीकरण व

2....

NTK/

श्री.भास्कर जाधव......

वाढत्या शहरीकरणामुळे निर्माण होणा-या ज्या समस्या आहेत त्या समस्यातून आपण कसा मार्ग काढणार आहोत अशा अर्थाने हा प्रस्ताव आला आहे असे मी गृहित धरतो. हे शहरीकरण राज्यातच वाढत आहे असे नाही. संपूर्ण जगातील शहरांचा विचार केला तर त्यात मुंबई शहराचा देखील अंतर्भाव दिसून येतो. देशाचे नागरिकीकरण पाहिले तर त्याचे प्रमाण 34 टक्क्यांपर्यंत पोहोचले आहे. कालपरवा पर्यंत नागरिकीकरणाच्या बाबतीत देशात राज्याचा दुसरा क्रमांक होता. तामिळनाडूचा पहिला क्रमांक होता. परंतु 2011 सालातील जनगणनेनुसार केरळ राज्य दुसऱ्या क्रमांकावर आणि महाराष्ट्र राज्य तिसऱ्या क्रमांकावर गेले आहे. 1961 सालातील जनगणनेनुसार राज्यात 28.62 टक्के नागरिकीकरण झाले होते. परंतु आज ते 49 टक्क्यांपर्यंत पोहोचलेले आहे. अवघ्या 50 वर्षांच्या कालखंडात शहरीकरणाचा जबरदस्त वेग वाढलेला आहे. ग्रामीण भागामध्ये अनेक प्रकारच्या निर्माण करुन सुध्दा आजपर्यंतच्या प्रत्येक योजनेसाठी ग्रामीण भाग केंद्रबिंदू मानून नियोजन केले तरी शहरामध्ये प्रचंड प्रमाणामध्ये लोकांचा वाढता ओघ दिवसेंदिवस वाढलेला आहे. ही परिस्थिती आपल्याकडेच नाही. चीन सारख्या मोठ्या देशातही 50 टक्के शहरीकरण झालेले आहे. त्यांना 2030 सालापर्यंत जाणीवपूर्वक 80 टक्के शहरीकरण करावयाचे आहे. आपल्या राज्यातही 2030 साली 52 ते 54 टक्के अधिकृतपणे शहरीकरण होईल आणि अनधिकृतरित्या 57 ते 58 टक्क्यांपर्यंत जाईल अशी परिस्थिती आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 21:05

श्री. भास्कर जाधव...

ही शहरे कशी वसली ? या शहरांच्या ग्रामीण भागाप्रमाणे हद्दी असतात अशातला भाग नाही. शहरांच्या हद्दी ठरलेल्या असतात. ज्या हद्दीमध्ये शहरे वसली त्या शहराचे त्यावेळचे पाण्याचे नियोजन, त्यावेळचे इमारतींचे नियोजन, रस्त्याचे नियोजन हे त्या वेळची लोकसंख्या गृहीत धरुन केलेले होते. आपण चांगले म्हणा किंवा वाईट म्हणा. पण इंग्रजांनी जे नियोजन केले त्यास शंभर वर्षे उलटून गेली तरी त्या नियोजनातून आजच्या परिस्थितीमध्येही नागरी सोयीसुविधा उपलब्ध होत आहेत. परंतु नंतरच्या काळामध्ये आपण केलेले नियोजन कोलमडून पडलेले आहे हे नाकारुन चालणार नाही.

शहराची पहिली समस्या ही पाण्याची आहे. आपण आता पाण्याचे अणि एनर्जीचे स्वतंत्रपणे ऑडिट करणार आहोत. या संबंधीचा आपण कायदा केलेला आहे. यापूर्वी कायद्यामध्ये ही तरतूद नव्हती.छोटया शहरासाठी यूआयडीएसएसएमटीच्या माध्यमातून विकास कामे करण्यासाठी केन्द्राचा हिस्सा, राज्य शासनाचा हिस्सा आणि स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा या प्रमाणे निधी मिळतो. अशा प्रकारचे 86 प्रकल्प राज्यामध्ये राबविले गेले आहेत. नंतरच्या काळामध्ये जेएनएनयूआरएम मधून मोठ्या शहरांसाठी मोठमोठया स्कीम आल्या. त्यामुळे मोठया शहरातून मोठमोठया पाण्याच्या योजना झाल्या, मोठमोठया रस्त्याच्या योजना झाल्या, मोठमोठे ब्रिजेस झाले. ट्रान्सपोर्ट करिता बसेस खरेदी करण्यासाठी मोठया प्रमाणावर रक्कम उपलब्ध झाली. त्याचा फायदा मुंबई, पुणे, ठाणे या शहरांना झाला. नंतरच्या काळात या योजना बंद झाल्या. परंतु राज्य सरकरने महाराष्ट्र राज्य सुवर्ण नगरोत्थान अभियान योजना सुरु केली. त्यामधून मोठ्या शहरांना मदत करण्याचे काम राज्य शासनाने सुरु केलेले आहे.

सभापती महोदय, स्थानिक स्वराज्य संस्थानी त्यांचे उत्पन्नाचे सोर्स वाढविले पाहिजेत अशी अपेक्षा आहे. हे उत्पन्नाचे सोर्स वाढवून नागरिकांना नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी ही त्या त्या स्थानिक स्वराज्य संस्थांची आहे. तरी देखील सरकार त्यांना विविध योजनांच्या माध्यमातून अनुदान देत असते. केन्द्र सरकारचे देखील अनुदान येत असते. केन्द्राच्या 13व्या वित्त आयोगाकडून 2077 कोटी रुपये राज्य सरकारला प्राप्त झाले.1100 कोटी रुपये परफॉर्मन्स ग्रॅण्ट म्हणून राज्य सरकारला प्राप्त झाले. दुसरीकडे आपण रस्ते अनुदान देत आहोत.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव....

आपण जकात बंद केली. सहाय्यक अनुदान तसेच वैशिष्टयपूर्ण अनुदान, मागासवर्गीय विकास निधी, यात्रा कर, सुवर्ण जयंती अभियानांतर्गत अनुदान अशा प्रकारची अनेक अनुदाने आपण शहरांना मदत करण्यासाठी देत आहोत. मध्यंतरीच्या काळामध्ये निवडणूक आली की, काही लोक सांगायचे की मी तुला नोकरीला लावतो मला निवडून दे, अशा प्रकारचे धोरण अवलंबिले गेले होते. म्हणून महानगरपालिकेने स्वत:च्या उत्पन्नाच्या किती टक्के खर्च एस्टॅब्लिशमेण्टवर करावा याचे धोरण ठरविले गेले.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नरेंद्र पाटील यांनी सांगितले की, वाशीने मोरबे धरण घेऊन आपली स्वत:ची पाण्याची योजना केली. अशा पध्दतीने प्रत्येक महानगरपालिकेने स्वत:ची पाण्याची योजना करावी, त्यासाठी लागणारी आर्थिक ताकद देण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न राहील. मुंबई महानगरपालिकेला इंग्रजांच्या काळामध्ये बांधलेल्या धरणातून 3500 द.ल.घ.लि. पाणी पुरवठा केला जातो. 2030ची लोकसंख्या गृहीत धरली तर आणखी पाण्याची आवश्यकता भासेल. त्यासाठी मध्यवैतरणाचे काम सुरु झालेले आहे. ते काम पूर्ण झाल्यानंतर 855 द.ल.घ.लि. पाणी मिळेल. मुंबईची जी पाण्याची पाईप लाईन आहे ती ....

...नंतर श्री.भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव........

एकंदरीत 1550 कि.मी.ची पाईप लाईन असून त्यात मेन लाईन आणि डिस्ट्रिब्यूशन लाईनचा समावेश होतो. 100 वर्षापूर्वीची ब्रिटिश काळातील ही पाईपलाईन आहे. ती आता बदलण्याची आवश्यकता आहे. जवळजवळ 539 कि.मी. पाईप लाईनची दुरुस्ती करण्यात आली आहे. अजून खूप मोठा पल्ला गाठायचा आहे. मुंबई महापालिकेने रस्त्यांच्या बाबतीत खूप काम केले असे सांगण्यात आले. शहरातील रस्त्यांची एकूण लांबी 1942 कि.मी.इतकी आहे. या क्षणाला फक्त 559 कि.मी.रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण झालेले आहे. या कामाची गती वाढवावी लागणार आहे.

सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेचे वार्षिक बजेट 27 हजार कोटी रुपयांचे आहे. असे असताना महापालिकेकडून इतक्या वर्षाच्या काळात 1942 पैकी 559 कि.मी.रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण झाले असेल तर या कामाची गती वाढविली पाहिजे. मुंबई महानगरपालिका इतक्या वर्षात स्वत:च्या मालकीचे एकही धरण बांधू शकली नाही, हे मान्य करावे लागेल. 1985 सालापासून सत्ता त्यांच्या हातामध्ये आहे.

श्री.विनायक राऊत : (जागेवर बसून) मध्य वैतरणा धरण कोणाच्या मालकीचे आहे?

श्री.भास्कर जाधव : त्याचे काम आता सुरु होत आहे. मी या क्षणापर्यंत राजकीय बोललेलो नाही. मला राजकीय बोलावयास लावू नका.

ॲड.आशिष शेलार : आपण मंत्री या नात्याने बोलावे अशी माझी विनंती आहे.

श्री.भास्कर जाधव : आपण रस्त्यांची कामे पूर्ण करु शकला नाहीत, त्या कामाची गती वाढवावी लागेल. त्यासाठी मुंबई महापालिकेला स्वतंत्रपणे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी लागेल. उशिरा का होईना धरण बांधावयास घेतले आहे. एमएमआरडीएच्या संदर्भात आक्षेप असू शकतात. प्रस्तावात देखील म्हटले आहे की, केंद्र सरकारकडून आमच्या हिश्श्याची 20 टक्के रक्कम मिळाली पाहिजे. मी माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांना सांगू इच्छितो की, मी तुमच्या बरोबर होतो. केंद्रात आणि राज्यात तुमचे आणि माझे सरकार होते. तेव्हा सुध्दा ही पध्दत पाळू शकलो नाही हे लक्षात घेतले पाहिजे. या सगळ्या स्थितीतून आपण गेलेलो आहोत.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मंत्री महोदयांचा भाषणाचा फ्लो चांगला आहे. फक्त तो टू दी पॉईंट असला पाहिजे. आता खूप उशीर झाला आहे. उद्या भाषणातील काही छापून येणार नाही. माननीय नगरविकास राज्यमंत्र्यांनी माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांच्याकडून शिकले पाहिजे. मध्य वैतरणा धरणाचे काम सुरु होण्यास विलंब लागण्याचे मुख्य कारण म्हणजे वन खात्याने 7 वर्षे प्रकरण अडवून ठेवले होते. बरेच मुद्दे आहेत. आम्हाला ते सांगावयाचे नाहीत. मुंबई आणि एमएमआर रिजनसाठी ठोस काहीतरी करावयाची इच्छा आहे. एमयुटीपी योजना आम्ही आणली की तुम्ही आणली या संदर्भात भरपूर बोलता येईल.

श्री.रामदास कदम : मंत्री महोदयांनी माझ्या नावाचा उल्लेख केला आहे. राज्यात युतीचे शासन सत्तेवर होते. 1999 नंतर राज्यात परप्रांतीयांचे लोंढे वाढले. आम्ही सातत्याने मागणी करीत आहोत, पोलीस फोर्स उपलब्ध करुन द्या, आम्ही त्यांना थांबवितो, आम्ही अतिक्रमणे होऊ देणार नाही. परंतु हे पाप कोणाचे? राज्यमंत्री महोदय, पूर्वी आमच्या पक्षात होते. आता सत्ताधारी पक्षात गेले असले तरी त्यांचे सरकार राज्यात अनेक वर्षे सत्तेवर आहे एवढेच मला त्यांना सांगावयाचे आहे.

श्री.भास्कर जाधव : आपण सर्व काही खेळीमेळीच्या वातावरणात घेत आहोत ही आनंदाची गोष्ट आहे. मघाशी माननीय सदस्य श्री.विनायक राऊत असे म्हणाले की, तुम्हाला सातत्याने प्रयत्न करुनही महापालिकेत सत्ता मिळत नाही, आम्ही करुन दाखविले म्हणून लोकांनी आम्हाला सत्ता दिली. तुम्ही करुन दाखविले नाही तर खाऊन दाखविले असे मला म्हणावयाचे आहे.

नंतर 5एल.1..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव.....

आता हाच शेर मी उलटा फिरवला तर ? 1995 साली आपली सत्ता आली,1999 साली गेली. आपल्याला पुन्हा सत्ता का मिळाली नाही ? खाऊन दाखवली म्हणून ? आपल्याला तीन वेळा सत्ता मिळाली नाही याचा अर्थ आपण पहिल्याच वेळेला एवढे खाल्ले की, दुसऱ्यावेळेस तुम्हाला जनतेने सत्ताच दिली नाही असे म्हटले तर तुम्हाला चालेल का ? खरे म्हणजे असे म्हणून चालणार नाही. (अडथळा) या चर्चेच्या दरम्यान काही सदस्यांनी व्यक्तिगत मुद्दे उपस्थित केले आहेत व त्यांची उत्तरे मी दिली नाही तर ते नाराज होतील ना ? त्यामुळेच हा उल्लेख मी केलेला आहे.

सभापती महोदय, मेट्रो व मोनो रेलचा प्रस्ताव आपल्याकडे आलेला आहे. संपूर्ण आशिया खंडात पहिल्यांदाच मुंबईमध्ये मोनो रेल आलेली आहे. मोनोरेलचा एकंदर खर्च 2460 कोटी रुपयांचा आहे. मोनो रेलचे जवळ जवळ 96 टक्के काम पूर्ण झालेले आहे. आता लवकरच मोनो रेल कार्यान्वित होणार आहे.

सभापती महोदय, मेट्रो रेलचा पहिला टप्पा 10,016 कोटी रुपयांचा असून मेट्रो रेल्वेचे सुध्दा 95 टक्के काम पूर्ण झालेले आहे. मेट्रो रेल सुध्दा याच वर्षी कायान्वित होणार आहे. मेट्रोचा दुसरा टप्पा 24,500 कोटी रुपयांचा असून हा प्रोजेक्ट सुध्दा आपल्याला पूर्ण करावयाचा आहे. मुंबईच्या एअर पोर्टवर मोठया प्रमाणात ताण येतो आहे. आपण जसे नवी मुंबई शहर वसवले आहे तशाच पध्दतीने मुंबईच्या बाहेर आंतरराष्ट्रीय दर्जाचे विमानतळ तयार करण्याचे काम सुरु झाले असून या कामाला सर्व प्राथमिक परवानग्या मिळालेल्या असून या विमानतळाचे काम सुध्दा लवकरच सुरु होणार आहे.

सभापती महोदय, मुंबईमध्ये जशी वाहतुकीची समस्या आहे तशी ती वाढत्या झोपडपट्टयांची आणि अनाधिकृत घरांची आहे. ही घरे मुंबईतच नाही तर मुंबईच्या आजूबाजूलाही उभी राहिली आहेत. मला या निमित्ताने सभागृहाला विनंती करावयाची आहे की, आपण सातत्याने मानवता दृष्टिकोनाचा उल्लेख करीत असतो. परंतु मानवता दृष्टिकोन आपण किती वेळा दाखवायचा ? मानवता दृष्टिकोन दाखवण्यापेक्षा आता आपण व्यवहारी झालो पाहिजे. नियमांची कडक अंमलबजावणी केली पाहिजे. जे नियमांची पायमल्ली करतील त्यांची अजिबात गय करता कामा नये असे मानणारा मी आहे. आपण 27 लाख झोपडपट्टया बांधण्याचा निर्णय घेतला होता.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव.....

यासंदर्भात मी सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांच्याकडून त्यांच्या जवळचा कागद मुद्दाम मागवून घेतला. मुंबईच्या झोपडपट्टयांची संख्या कधी वाढली ? 1994 मध्ये मुंबईतील झोपडपट्टीत 48 हजार लोक राहत होते परंतु 1991 मध्ये त्यांची संख्या 99.25 लक्ष झाली. याचा अर्थ आपल्या धोरणांचा कोठे तरी चुकीचा परिणाम होतो आहे. सन 2001 साली झोपडपट्टीतील लोकसंख्या 1.19 कोटी झाली. आज काल माझ्यासारख्या, तुमच्या सारख्या माणसाला मुंबईत घर घेणे हे फक्त स्वप्न आहे. आम्ही टॅक्स भरायचा नाही, पाण्याचे बील भरायचे नाही, वीज फुकट वापरायची, कोणताही नियम पाळायचा नाही अशा पध्दतीने आम्ही सर्व नियम तोडत राहिलो म्हणून आम्हाला अधिकृत करुन घ्या असे कोणी म्हणत असेल तर ते चालणार नाही.

सभापती महोदय, आपण जर मुंबईच्या चाळीत जाऊन पाहिले तर त्या ठिकाणची अवस्था फार बिकट आहे. मुंबईतील अनेक लोक 10X12 च्या खोलीत आयुष्यभर काढतात. मुंबईतील चाळीत कोकणातील आणि पुण्यातील अनेक लोक वर्षानुवर्षे राहत आहेत. हे लोक कसे राहत आहेत हे आपण पाहिले आहे काय ? मी स्वत: डोळयाने बघितले आहे की, 12X15 च्या एका खोलीमध्ये वयस्कर आई वडील तेथेच राहतात, मोठया मुलाचे लग्न होऊन त्याला लहान मुल झाले ते सुध्दा तेथेच, नवीन सूनबाई आली ती सुध्दा तेथेच, दुसरा मुलगा लग्नाला आला आहे तो सुध्दा तेथेच, मोठी मुलगी लग्नाला आलेली ती सुध्दा तेथेच. कोणी या बाजूला पडदा बांधतो, कोणी खाटेच्या खाली राहतो तर कोणी माळयावर राहतो. खरे म्हणजे आपण सर्वसामान्य माणसांसाठी निर्णय घ्यावयास पाहिजे होता.

यानंतर श्री. भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव....

ज्यांनी कायद्याचे, नियमाचे पालन केले आहे, ज्याने कुठल्याही प्रकारची चूक केली नाही, ज्याने कुठेही सरकारी जागा बळकावली नाही, अशा लोकांच्या पाठीशी आपण खंबीरपणे उभे रहायला पाहिजे होते. पण दुर्दैवाने ते आपल्याकडून होऊ शकले नाही. यासाठी मी माझ्यासह सर्वांनाच जबाबदार धरतो. परवाच ठाण्याला जी घटना घडली त्यात 74 माणसे दगावली. अशा प्रकारची घटना वारंवार होईल अशी भीती संपूर्ण सभागृह व्यक्त करीत आहे. तेव्हा मला असे वाटते की, सातत्याने मानवतावाद मानवतावाद म्हणता कामा नये. होय, आपण मानवतावाद दाखवला पाहिजे. पण नियमांचे उल्लंघन करतात त्यांच्याकरिता तो दाखवता कामा नये. कायदा मोडतात त्यांच्याकरिता मानवतावाद दाखवता कामा नये. सगळे नियम धाब्यावर बसवतात त्यांच्याकरिता मानवतावाद दाखवता कामा नये. जे कायद्याचे रक्षण करतात, सरकारची कायदेशीर देणी देतात, पाणीपट्टी, घरपट्टी भरतात, त्यांना मानवतावाद दाखविला पाहिजे. त्यांच्या पाठीशी सर्वांनी उभे राहिले पाहिजे. त्यांचे आपण पुनर्वसन केले पाहिजे, या मताचा मी आहे. मी शासनामध्ये असून देखील अगदी स्पष्ट बोलतो आहे. त्याचे मला काहीही वाटत नाही. माझी ही स्पष्ट भूमिका आहे. आपल्याला जर भीती वाटत असेल तर आपण स्वत:पासूनच सुरूवात केली पाहिजे की, चुकीच्या गोष्टीला मी पाठीशी घालणार नाही. मग तो कोणीही असू दे.

आज सगळे लोकप्रतिनिधी बदनाम होत आहेत. आज किती लोकप्रतिनिधींचा या गोष्टींना पाठिंबा आहे. एखाद्या लोकप्रतिनिधींचा पाठिंबा असेल. आज जी चूक घडते आहे ती लोकप्रतिनिधींमुळे घडत आहे. तो कुठल्या पक्षाचा आहे हर भाग नाही. पुढारी चूक करीत आहेत अशा प्रकारची आपली प्रतिमा उभी रहात आहे. आपण सगळी माहिती बाहेर काढली तर 0.1 टक्के सुद्धा राजकीय पुढारी दोन नंबरच्या गोष्टीच्या पाठीशी नाहीत हे दिसून येईल. आपण कायदे मंडळामध्ये कायदे करतो ते करत असताना त्याची अंमलबजावणी प्रशासन करणार नसेल तर त्या प्रशासनाला जबाबदार धरून त्याला शिक्षा करण्यासाठी आपण खंबीरपणाने एकमताने उभे राहण्याची भूमिका घेतली पाहिजे. त्याच वेळी हे सर्व शिस्तीमध्ये चालेल. आपण सभागृहामध्ये कायदा केला

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव...

आहे. त्यास मला देखील विरोध झाला. 25-30-40 वर्षापूर्वीचे बांधकाम असेल व ते सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांच्या वॉर्डामध्ये असेल तर ते बांधकाम तोडायला आमचे अधिकारी गेले की, लोक ॲड.अनिल परब यांच्याकडे येणार. ते लोक सांगायला गेले की, आमचे अधिकारी कलम 153, 353 लावायला मोकळे. तेव्हा अधिकारी म्हणतात की, आमच्या कामामध्ये यांनी अडथळा आणला. त्यांना अडथळा आणल्यामुळे त्यांचे सभासदत्व घालविण्याचा प्रस्ताव पाठवून देतात.

मला सभागृहाला सांगितले पाहिजे की, आपण कायदा मंजूर करून घेतला आहे. या पुढे तेथील जो कोणी डेझिग्नेटेड ऑफिसर असेल त्यांना ही गोष्ट सांगितल्यानंतर देखील अनधिकृत बांधकाम झाले व त्यावर कारवाई केली नाही तर त्याला जेलची शिक्षा होईल आणि दंडात्मक कारवाई देखील होईल. अशा प्रकारची कायद्यामध्ये तरतूद आपल्याला करावी लागली आहे. उद्या तेथे माझा कार्यकर्ता सापडला तरी माझा फोन त्या अधिकाऱ्याला जाता कामा नये. फक्त आपण एवढेच बघितले पाहिजे की, ही ॲक्शन एकावर घेतली जात आहे की, सरसकट सगळ्यांवर घेण्यात येत आहे.

आपण स्टाफिंग पॅटर्न आणला आहे. केंद्र सरकारचा निधी कशा प्रकारे खर्च करायचा यासंबंधी गाईड लाईन्स दिल्या. मघाशी कोणी तरी पोलीस संरक्षणाचा उल्लेख केला. त्यासंबंधी देखील कायद्यामध्ये तरतूद करण्यात आली आहे. एखाद्या महानगरपालिकेने पोलिसांकडे वर्ष भराचे पैसे ॲडव्हान्स म्हणून भरले तर वर्षभर लागतील तेवढे पोलीस आपल्या नावावर म्हणाल त्या दिवशी आणि वेळेवर उपलब्ध करून देण्याची जबाबदारी सुद्धा आपल्याकडे आहे. त्याचा देखील आपण सर्वांनी फायदा करून घेतला पाहिजे या मताचा मी आहे.

महानगरपालिका, नगरपालिका येथे अधिकारी कामाला लागले की, 7/12 त्यांच्या नावाचाच होतो. तो तेथे लागला की तेथेच निवृत्त होतो. त्यामुळे मग त्याचे इंटरेस्ट डेव्हलप होतात. त्यामुळे आज संवर्ग निर्माण करण्यात आला आहे. आज अकौंटस ऑफिसर आपल्याकडून पाठवितो.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव...

त्यात कोणाचाही अधिक्षेप नसतो. त्याची तीन वर्षे सेवा झाल्यानंतर बदली करण्यात येते. अशा प्रकारची शिस्त आणण्याचे काम गेल्या तीन वर्षामध्ये नगरविकास विभागाने केले आहे.

मला येथे झोपडपट्टी निर्मूलनासंबंधी देखील सांगितले पाहिजे. माझ्या बद्दल थोडीशी कटुता आहे हे मला माहीत आहे. भास्कर जाधव पटकन समोरच्या अधिकाऱ्याला फोन करतो आणि विचारतो की हे नियमात आहे की नाही. नियमबाह्य असेल तर मी मदत करणार नाही असे सांगतो. त्यामुळे माझ्या बद्दल राग आहे हे मला माहीत आहे. तो मला आवडेल. कारण ती माझी स्वतःची कार्यपद्धती आहे. ही कार्यपद्धती पूर्वी पासूनची आहे. मंत्री वगैरे हा नंतरचा विषय आहे. चुकीच्या गोष्टीसाठी कुणाला पाठीशी घालायचे नाही या मताचा मी आहे.

यानंतर श्रीमती रणदिवे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव . . . .

एखाद्याने गरजेपोटी काही केले असेल तर त्याला सहकार्य केले पाहिजे.पण जर कोणी जाणीव पूर्वक चुका करीत असेल तर त्याला पाठीशी घालण्यात येऊ नये या मताचा मी आहे.

सभापती महोदय, याठिकाणी मी मुंबईच्या आणि बाकीच्या ठिकाणी असलेल्या पाण्याच्या प्रश्नाबाबत बोलतो. आता मुंबईतील धरणाच्या बाबतीत तयारी सुरु झालेली आहे. तसेच मला आरोग्य विभागाच्या बाबतीत मुंबई शहराचा स्पष्टपणे उल्ल्ेख केला पाहिजे. काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, मुंबईमध्ये आरोग्याच्या बाबतीत दुरवस्था आहे. पण प्रत्यक्षात तसे नाही. आज मुंबईमध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणत लोकसंख्या वाढलेली आहे.मुंबईतील आरोग्याची जी व्यवस्था आहे त्याबाबत सांगावयाचे तर जवळजवळ 80 टक्के जबाबदारी मुंबई महानगरपालिका पार पाडत असते हे नाकारण्याचे कारण नाही. पण त्यामध्ये सुध्दा सेव्हन हील सारखे हॉस्पिटल आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब, ते एकमेव नवीन हॉस्पिटल होते. पण सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांना मी सांगू इच्छितो की, तुमच्या सारखी मागणी असतानाही चुकीच्या पध्दतीने करार झाला. त्यांनी आजपर्यंत आपल्याकडून सर्व प्रकारचा फायदा घेतला. तसे पाहिले तर आज आपल्यासमोर हा चर्चेचा विषय नाही किंवा याबाबत मला कोणी माहितीही दिलेली नाही. पण मागच्या वेळी विधान सभेमध्ये याबाबत सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केल्याचे मला आठवते. त्याठिकाणी करार चुकीचा झाला आहे, एम.ओ.यु.चुकीचा झालेला आहे, अशा वेळी आपण सर्वांनी मिळून ही जागा कशासाठी घेतली, आपण त्या जागेचा काय फायदा करुन घेतला हा प्रश्न आहे. ज्या हॉस्पिटलमध्ये आपल्या लोकांना, नर्सेसनां कामावर घेतले जात नाही, तसेच ज्याठिकाणी निर्धन व विकर सेक्शनकरता ज्या सोयी-सुविधा द्यावयाच्या आहेत. त्या देखील दिल्या जात नाहीत. उलट त्यांनी कोर्टामध्ये जाऊन आपल्या सर्वांसमोर अडचण निर्माण केलेली आहे. त्यामुळे आपण सर्वांनी या लोकांना ताळयावर आणले पाहिजे.

सभापती महोदय, याठिकाणी सत्ता कोणाची आहे हा विषय माझ्या दृष्टीने अजिबात महत्वाचा नाही. सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी असा प्रस्ताव आणावा की, त्यासाठी आपण सर्वजण निश्चितपणे मदत करु आणि ही मुंबई जी आपल्या सर्वांची आहे, ती आपण अबाधित राखू. आता चिंता करण्याचे फारसे कारण नाही. मुंबईमध्ये पाहिले तर पॉप्युलेशन ग्रोथ ..

. . . .5 एन-2

सगळ्यात कमी आहे. तसेच औरंगाबाद मध्येही कमी आहे. पण मोठ्या शहरांपैकी सगळयात पॉप्युलेशन ग्रोथ कुठे कमी असेल तर तो मुंबईचा आहे. संपूर्ण मुंबई महानगरपालिकेचा ग्रोथ हा 4.4 टक्के आहे आणि मी हे आपल्याला अधिकृतपणे सांगत आहे. पण दुसरा असा धोका निर्माण झ ााला आहे की, शहराच्या बाहेर जी मेट्रोपॉलिटन सिटी आहे, त्याठिकाणी मोठ्या प्रमाणात लोकसंख्या वाढत आहे. अशा वेळी मुंबईचे आणि त्याचे अव्हरेज पकडले तर बाहेर जवळजवळ 27 टक्के लोकसंख्या वाढणे म्हणजेच प्रचंड प्रमाणात लोकसंख्या वाढत आहे असे म्हणावे लागेल आणि ही अत्यंत चिंतेची बाब आहे. यासाठी आपल्याला कायद्याची कठोर अंमलबजावणी करावी लागेल आणि तसे झाले तर आणि तरच आपल्याला या सगळ्यातून बाहेर पडता येईल नाहीतर आपल्याला यातून बाहेर पडता येणार नाही.

सभापती महोदय, यानंतर रस्त्यांबाबतचा प्रश्न आहे. त्याबाबत मी सांगितले आहे. तसेच झोपडपट्टीच्या विषयाबाबत देखील सांगितले. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी काही विषय मांडलेले असून त्याबाबत मला चौकशी करण्याबाबत सांगितले आहे. मी सन्माननीय सदस्यांना 100 टक्के एवढेच सांगेन की, या संबंधातील ज्या सगळ्या गोष्टी आहेत, त्या 110 टक्के तपासून पाहिल्या पाहिजेत. पण मला माहिती आहे की, माझे अधिकार अतिशय मर्यादित आहेत. पण अधिकार किती कमी किंवा किती जास्त आहेत या पेक्षा देखील जर आपण आपल्या भूमिकेशी प्रामाणिक असलो तरमग थोडा उशीर झाला तरी हरकत नाही. मात्र जर समोरचा माणूस चुकत असेल तर त्याला अद्दल घडविता येते हा माझा स्वत:चा अनुभव आहे. मला किती अधिकार आहे आणि किती हक्क आहेत हे मला माहिती नाही. पण सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी प्रश्न विचारला होता की, मुंबई महानगरपालिकेकडून बेस्ट प्रशासनाला 1600 कोटी रुपये देण्याचा प्रस्ताव होता आणि त्यांना त्यांचेच पैसे द्यावयाचे होते. फक्त महाराष्ट्र शासनाने यासठी संमती द्यावयाची होती. साधारणपणे आपण पाहिले तर एस.टी.महामंडळ असेल किंवा इतर महामंडळे असतील, त्यांच्या मंजुरीच्या संबंधातील प्रस्ताव सरकारकडे येतच असतात. यात असा हेतू असतो की, याठिकाणी आपण प्रशासन चालवित असतो, तेथील व्यवस्था पहात असतो. अशा वेळी आपल्याला काही गोष्टी नाकारणे कठीण जाते. आता एल.बी.टी.चा विषय आहे आणि तो सरकारच्या नावावर खपविता येतो की नाही. तसेच रेटेबल व्हॅल्युएबल ॲडेड टॅक्सेसही आहेत आणि ती बाबही शासनाच्या नावावर खपविता येते की नाही?



(काही सन्माननीय सदस्य खाली बसून बोलतात.)

असुधारीत प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव . . . .

सभापती महोदय, आपण मुंबई महानगरपालिकेच्या बाबत सांगितले. मला येथे सांगितले पाहिजे की, 1600 कोटी रुपयांना दिनांक 14 मार्च 2013 रोजी शासनाकडून अधिकृत मान्यता मिळालेली आहे. त्यामुळे या संबंधात शासनाकडे प्रस्ताव पेंडींग नाही.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव....

सन्माननीय सदस्य श्री.निरंजन डावखरे यांनी कारशेडच्या रिझर्व्हेशनबाबत उल्लेख केला होता. मघाशी पीठासीन अधिकाऱ्यांनी कारशेडचे रिझर्व्हेशन बदलण्या संदर्भात वरुन निदेश दिले होते. त्याबाबत सांगू इच्छितो की, कारशेडचे रिझर्व्हेशन ठेवावे किंवा ठेवू नये याबाबत महासभेपुढे सहा महिन्यापूर्वी एक प्रस्ताव आला होता. परंतु अद्याप कारशेडचे रिझर्व्हेशन बदलण्याचा निर्णय झालेला नाही.

सभापती महोदय, मी मुंबईतील महानगरपालिकेच्या रुग्णालयाबद्दल सांगितलेले आहे. नायर आणि के.ई.एम रुग्णालयात दिवसाला लाखो रुग्ण उपचार घेतात. आपण या संख्येचा विचार केल्यास ते रुग्णालय कशाप्रकारे नियंत्रण करते ही एक आश्चर्याची गोष्ट आहे. तेव्हा त्या रुग्णालयांना लागणारी अधिकची मदत आपण सर्वांनी केली पाहिजे.

सभापती महोदय, या ठिकाणी जल वाहतुकीचा विषय मांडण्यात आला. आता माझ्याकडे जल वाहतुकी संदर्भातील माहिती नाही. परंतु दोन दिवसापूर्वी मी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून जलवाहतुकीसंबंधी माहिती दिली होती. ती माहिती मी देतो. जल वाहतुकीचा एकूण 9600 कोटी रुपयांचा प्रकल्प आहे. या प्रकल्पाच्या कामासाठी तीन टप्प्यामध्ये निविदा काढण्यात आलेल्या आहेत. हे काम एमएसआरडीसीमार्फत होणार आहे.

सभापती महोदय, शिवडी-न्हावा शेवा पुलाच्या कामाची किंमत 10 हजार 228 कोटी रुपये आहे. त्यासाठी केंद्र सरकारने 1763 कोटी रुपये देण्याचे मान्य केलेले आहे. हा साधारणत: साडेबावीस कि.मी.चा पुल आहे. 500 मीटर जमिनीवरुन आहे तर 22 मीटर वरुन आहे. त्या संदर्भात मी उत्तर दिले होते म्हणून मला हे सर्व माहीत आहे. हे शासन जल वाहतुकीसाठी प्रयत्न करीत आहे. मुंबईत काही ठिकाणी मेट्रो रेल, मोनो रेल सुरु करण्याचा प्रयत्न करीत आहे.

सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी जी.के हाऊसचा उल्लेख केला. त्या संदर्भातील माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. त्या संदर्भात निश्चित चौकशी करण्यात येईल.

सभापती महोदय, एसआरएमध्ये कशाप्रकारे चुकीच्या पध्दतीने कामे केली जातात हे अनेक सन्माननीय सदस्यांनी सांगितले. एसआरएचा विषय माझ्याकडे नाही. या विषया संदर्भातील सर्व मुद्दे माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देण्यात येतील.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव....

सभापती महोदय, मुंबईतील मराठी शाळा बंद पडत आहे ही बाब खरी आहे. मराठी शाळेत मुले कशी येतील याकडे सन्माननीय सदस्य श्री.विनायक राऊत यांनी लक्ष दिल्यास चांगले होईल्. व्हर्च्युअल क्लासची कन्सेप्ट नवीन राहिलेली नाही. आपण खाजगी लोकांना मराठी शाळा चालविण्यासाठी देत आहोत. या ठिक्राणी व्हर्च्युअल क्लास हा मुद्दा नाही. आपण हे समजून घेतले पाहिजे की, मराठी शाळेतील मुले कमी होत आहेत हे बरोबर नाही. ते आपल्या आयडॉलॉजीला सूट होत नाही.

सभापती महोदय, या ठिकाणी जीव्हीकेचा उल्लेख करण्यात आला. सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांच्या बऱ्याचशा मुद्यांचा मी उल्ल्ेख केलेला आहे.

सभापती महोदय, सन्मानीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी मिठी नदीचा उल्लेख केला.

सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी सांगितले की, सन २००९ मध्ये काही रस्त्यांची कामे काढण्यात आली होती.

यांनतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव....

रस्त्याच्या व्हेरिफिकेशन संदर्भात सीएजी ने महापालिकेवर रिमार्क्स पास केला आहे. त्या बाबत सुध्दा चौकशी सुरु आहे.

सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी रुग्णालयांमध्ये चांगली सेवा मिळत नाही असे सांगितले. मी सांगू इच्छितो की, या रुग्णालयांमध्ये चांगल्या सुविधा मिळत आहेत.

सन्माननीय सदस्य श्री.निरंजन डावखरे यांनी सांगितले की, खाडीमध्ये डेब्रिज टाकले जाते. माननीय उप सभापतींनी याकडे लक्ष देण्यास सांगितले आहे. त्यानुसार लक्ष दिले जाईल.

महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी 721 धोकादायक इमारती पावसाळ्यात पडण्याची शक्यता असून, या बाबत काळजी घेण्यास सांगितले. मुळात अनधिकृत इमारती पाडण्यास तुम्ही-मी पोलिसांना सांगितले आहे. सन्माननीय सदस्यांनी घटनेतील कलम कोट करुन व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाचा उल्लेख करुन सांगितले की, कोणी कोठेही राहू शकतो. महोदय, मी विधानसभा सभागृहात मुद्दाम पुन्हा पुन्हा हा मुद्दा फोकस केला की, घटनेतील वाक्याचा आपण चुकीचा समज करुन घेतलेला आहे. आपल्या घटनेमध्ये कोणीही, कोठेही जावे आणि कसेही राहावे किंवा हातपाय पसरावे, वस्ती करावी, व्यवहार वाढवावे असे अभिप्रेत नाही. कोणी कोठेही राहावे अशा प्रकारचा उल्लेख घटनेत असला तरी प्रत्येक शहराचे डीसी रुल्स वेगवेगळे आहेत. स्थानिक लोकांना त्रास देण्याचा किंवा डीसी रुल्स ब्रेक करण्याचे अधिकार कोणालाही दिलेले नाहीत. स्थानिक स्वराज्य संस्थेचे प्रशासन असेल, लोकप्रतिनिधी असतील त्यांनी पहिली गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, कोणाला कोठेही राहण्याचा अधिकार असला तरी त्या लोकांनी मूळच्या लोकांना त्रास देणासाठी किंवा कायद्याचे उल्लंघन करण्यासाठी राहायचे नाही.

आपण सातत्याने म्हणतो की, या प्रकरणी शासनाने अमुक केले पाहिजे. शासन म्हणजे प्रत्यक्ष त्या ठिकाणी ज्यांची सत्ता असेल ते होत. वास्तविक पाहता आपण सर्वांनी कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी होते की नाही हे पाहिले पाहिजे. बाहेरच्या लोकांना पाणी, वीज कोण चोरुन देतो हे सुध्दा पाहिले पाहिजे. म्हाडाच्या जागेवर जाऊन ती व्यक्ती राहत असेल तर म्हाडाचा उप जिल्हाधिकारी काय करतो, महसूल विभागाच्या जागेवर राहत असेल तर त्या

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव....

विभागाचा उप जिल्हाधिकारी काय करतो आणि महानगरपालिका हद्दीत राहत असेल तर अतिरिक्त महापालिका आयुक्त काय करतो हे पाहिले पाहिजे. कारण प्रत्येक ठिकाणी त्या त्या अधिकाऱ्याची जबाबदारी फिक्स केलेली आहे. म्हणून त्यांनी ती जबाबदारी योग्यप्रकारे पार पाडावी.

महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी विशेषत: कोकणातील सीआरझेडच्या बाबतीत उल्लेख केला. पूर्वी या संदर्भातील नियमावली 1, 2, 3 अशा प्रकारे तीन विभागात विभागली होती. या संदर्भात 2011 मध्ये नवीन नियमावली झालेली आहे. त्यानुसार आता 1, 2, 3, व 4 अशा चार कॅटॅगिरी झालेल्या आहेत. या माध्यमातून कोळी बांधवांना बऱ्याच प्रमाणात दिलासा मिळू शकतो. पूर्वीची 500 मीटरची मर्यादा आता 200 मीटरपर्यंत आणली आहे.

सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्या प्रश्नाला उत्तर देताना मी काल सांगितले होते की, कोळी बांधवांच्या घराखालच्या राहत्या जमिनी त्यांच्या नावावर नाहीत. या निमित्ताने सांगतो की, त्या जमिनी 18 जून पासून त्यांच्या नावावर करण्याचा निर्णय झालेला आहे. त्यानुसार त्या जमिनी त्यांच्या नावावर होतील.

सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र पाटील यांनी फेरीवाल्यांच्या बाबतीत मुद्दा मांडला. या निमित्ताने सांगू इच्छितो की, पूर्वी हॉकर्स झोन पॉलिसी तयार केली होती. परंतु दुर्दैवाने या चांगल्या धोरणामध्ये थोडे अडथळे निर्माण झाल्यामुळे ते धोरण अस्तित्वात येऊ शकले नाही. सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे यांनी महत्त्वाचे मुद्दे उपस्थित केले. त्या संदर्भात शासन निर्णय घेणार आहे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी एका परिपत्रकाचा उल्लेख केला. अशा पध्दतीचे चुकीचे परिपत्रक आयुक्तांनी काढले असेल आणि आमच्या सण-उत्सवांवर त्या परिपत्रकाचा परिणाम होणार असेल तर त्या परिपत्रकाचा अभ्यास करुन ते विथ्ड्रॉ करण्यात येईल.

नंतर श्री.बरवड....

अस्सुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव .....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी या ठिकाणी तीन मुद्दे उपस्थित केले. त्यांचा पहिला मुद्दा असा होता की, जी एमएमआरडीए स्थापन झालेली आहे ती लोकांपासून दूर गेलेली आहे. शेवटच्या माणसापर्यंत सहज, सुलभपणे आपल्या कामांकरिता, आपली गाऱ्हाणी मांडण्याकरिता एमएमआरडीए उपलब्ध व्हावी असा त्यांचा मुद्दा आहे. त्यांनी दुसरा मुद्दा असा उपस्थित केला की, महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाला काही स्वतंत्र अधिकार आहेत. परंतु त्यांची काही कामे पत्तन अभियंता, काही कामे मत्स्य विभाग अशांकडे विभागलेली आहेत. त्यांच्या ज्या स्वत:च्या जागा आहेत त्या संदर्भातील मुद्दा सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केला. आता आपण जी नवीन पोर्ट पॉलिसी तयार केलेली आहे त्यामध्ये त्या संदर्भातील क्लॉज आहे. त्याची अंमलबजावणी निश्चितपणे करण्यास सांगितली जाईल. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले ते सहज होऊन जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे यांनी सांगितले की, एमएमआरडीएने जी 7 हजार घरे बांधलेली आहेत ती अतिशय निकृष्ट दर्जाची आहेत. ती घरे एमएमआरडीएने पाच सात वर्षापूर्वी बांधलेली आहेत. एमएमआरडीएची जी घरे आहेत ती त्या त्या ठिकाणी जर प्रोजेक्ट होत असतील, मग महापालिकेचा प्रोजेक्ट असेल, एमएमआरडीएचा प्रोजेक्ट असेल तर त्या ठिकाणी ट्रान्झीट कॅम्प म्हणून वापरली जातात. परवाच माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले की, गिरणी कामगारांकरिता सुध्दा त्यातील काही घरे दिली जातील.

श्री. राम पंडागळे : झोपडपट्टीतील लोकांना ती घरे द्यावीत.

श्री. भास्कर जाधव : नियमाप्रमाणे आणि जे प्रतीक्षा यादीमध्ये पहिले असतील त्या पध्दतीने त्याचा विचार होईल. सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांनी मुलुंड येथील अनधिकृत मच्छी मार्केटच्या बाबतीत सांगितले. त्याची माहिती ताबडतोब घेतली जाईल आणि त्या संदर्भामध्ये योग्य ती कारवाई केली जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर आणि इतर सर्व सदस्यांना मला विशेष विनंती करावयाची आहे. आपण या चर्चेतून काही चांगले विचार, प्रबोधनात्मक विचार घेऊ.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ....

आज राज्य सरकार आमच्याकडे आहे, केंद्र सरकार आमच्याकडे आहे. एक-दोन महानगरपालिका तुमच्याकडे आहेत. एका महानगरपालिकेच्या विरोधातील दोन चार विषय काढल्यानंतर सन्माननीय सदस्य फार चवताळून उठले. राज्यामध्ये प्रत्येक गोष्ट झाली नाही म्हणून तुम्ही आम्हाला रोजच धारेवर धरता. तेव्हा किमान असे विषय आले तर प्रत्येक गोष्ट करणे किती अवघड आहे हे त्यांना कळेल जेणेकरुन आम्हाला महाराष्ट्रामध्ये एकत्रितपणे पुढे जाता येईल. रोज आंदोलने, रोज मोर्चे काढून सरकार काही करीत नाही असे त्यांना म्हणता येणार नाही. म्हणून सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर आणि इतर सदस्यांनी असे विषय उपस्थित करावेत जेणेकरुन सरकारमध्ये काम करताना काय अडचणी येतात हे कळेल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी आदरणीय हिंदूहृदयसम्राट कै. बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाबद्दल सांगितले. ते एका आयुक्तांबद्दल बोलले. त्या ठिकाणी आपली सत्ता आहे पण जरी आपली सत्ता असली तरी हे लोकशाही राज्य आहे. आपण प्रजासत्ताक राज्य मानतो. आपण संसदीय लोकशाही पध्दत मानतो. आपण डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या घटनेच्या आधारावर चालतो. बाहेर आपण भाषण करतो याचा अर्थ कोणतीही संस्था चालविताना नियम मोडून चालविता येत नाही. ही अडचण आमची सुध्दा आहे. हे आपण लक्षात घ्यावे. तुम्ही आदरणीय शिवसेना प्रमुखांचे एक स्मारक उभे करु शकत नाही, हे बरोबर नाही. आम्ही इंदू मिलच्या जागेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभे करीत आहोत. आम्ही शाहू मिलच्या ठिकाणी छत्रपती शाहू महाराजांचे स्मारक उभे करीत आहोत. आम्ही समुद्रामध्ये छत्रपती महाराजांचा पुतळा उभा करणार आहोत. तुम्ही आदरणीय शिवसेनाप्रमुखांचे स्मारक उभे केलेच पाहिजे असा माझा सुध्दा या ठिकाणी आग्रह राहणार आहे. आपण ते करावे. आमचे तुम्हाला निश्चितपणे सहकार्य राहील. कारण आमच्या सर्वांच्या सुध्दा आदराचा आणि श्रध्देचा तो विषय आहे. त्याबद्दल दुमत असण्याचे काही कारण नाही. म्हणून मी सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांना सांगू इच्छितो की, आपण ते स्मारक उभे करावे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी माझ्या नावाचा उल्लेख केलेला आहे त्यामुळे मला खुलासा करण्याचा अधिकार आहे. आदरणीय शिवसेनाप्रमुखांच्या बाबतीत उल्लेख करताना मी एकच विनंती केली होती. मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त सन्माननीय श्री. सिताराम कुंटे आहेत. महापौर बंगल्यावर आमची बैठक झाली होती. त्या बैठकीला मी उपस्थित होतो. त्या ठिकाणी आम्ही फक्त मातीच्या चौथऱ्याबाबत सांगितले. त्यावेळी त्यांनी कबूल केले. आम्ही बांधकाम करणार नाही. मी मघाशी मंत्री महोदय श्री. भास्कर जाधव यांना असे म्हणालो की, त्याच्याच पुढच्या बाजूला समुद्रामध्ये भरणी टाकून रस्ता केला जात आहे मग त्याला सीआरझेडची अडचण नाही का ? ते केले तर चालते. आज मुंबईमध्ये आणि महाराष्ट्रामध्ये आदरणीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्यामुळे मराठी माणूस ताठ मानेने जगत आहे. त्यांच्या बाबतीत जर एखाद्या आयुक्तांचे असे विचार असतील तर ते बरोबर नाही. अगदी लहानसहान गोष्टींसाठी माननीय मुख्यमंत्र्यांचा आदेश आला नाही असे सांगितले जाते. पण तुम्हाला अधिकार आहेत.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम....

मुंबई महानगरपालिकेला तो अधिकार असल्यामुळे मी उल्लेख केला होता. शिवसेनाप्रमुखांचे स्मारक उभे करण्यासाठी आम्ही सक्षम आहोत. मंत्री महोदय, आज आपण सत्तेत आहात, उद्या कदाचित आम्ही सत्तेमध्ये असू. सत्तेत राहण्याचा कोणी पट्टा घेऊन जन्माला आलेले नाही. म्हणून एखाद्या आयुक्तांनी अशा प्रकारची वागणूक देणे हे योग्य नाही. कोण कोठे राहील हे भविष्यात जनताच ठरविल.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावामध्ये मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवलीतील समस्यांचा उल्लेख केला होता. मी सुरुवातीलाच माननीय नगरविकास राज्यमंत्री श्री.भास्करराव जाधव यांचे मनापासून अभिनंदन करतो आणि त्यांचे आभारही मानतो. या चर्चेत भाग घेणाऱ्या सर्व सन्माननीय सदस्यांच्या मुद्यांना त्यांनी सविस्तर व विस्तृतपणे चांगली उत्तरे दिलेली आहेत.

सभापती महोदय, ठाणे शहरामध्ये वर्तकनगर येथे म्हाडातर्फे 25 वर्षापूर्वी लोकांना परवडणारी घरे बांधण्यात आली होती. राज्यात शहरीकरण वाढत आहे असे मघाशी मंत्री महोदयांनी सांगितले आहे. मुंबईवरील लोकसंख्येचा बोजा वाढत आहे. पण ठाण्यासारख्या शहरामध्ये 25 वर्षापूर्वी वर्तकनगर सारखी दुसरी वसाहत निर्माण झालेली नाही. भविष्यामध्ये म्हाडाने अशी वसाहत बांधली तर त्याचा जास्तीत जास्त फायदा जनतेला होईल. महानगरपालिके विषयी रागापोटी किंवा तेथे काय चालले आहे या भावनेतून मी बोललो नाही. परंतु त्या महानगरपालिकेसंबंधी वर्तमानपत्रातून ज्या बातम्या येत आहेत त्यामध्ये काही कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकल्याचे नमूद केलेले आहे. 800 कोटी रुपये गाळ काढण्यासाठी, 1100 कोटी रुपये खड्डे बुजविण्यासाठी खर्च केल्याचेही छापून येत आहे. हे मी बोलावयाचे आहे म्हणून बोलत नाही. परंतु त्या कंत्राटदारांना महापालिकेने काळ्या यादीत टाकलेले असताना त्यांनाच पुन्हा कंत्राटे मिळत असतील तर शासनाने त्यांच्याविरुध्द कारवाई करणे गरजेचे आहे आणि ती कारवाई शासनाने करावी असे मी म्हटले होते. इतर सर्व सन्माननीय सदस्यांना आपण चांगली उत्तरे दिली आहेत. या मुंबईत हे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु आहे. मुंबईकरांसंबंधी या अधिवेशनात काही तरी चर्चा झाली व चर्चेतून भविष्यात चांगले घडू शकेल असा मी आशावाद व्यक्त करतो. धन्यवाद.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, विक्रोळी येथील कन्नमवार नगर येथील ट्रॅन्झिट कॅम्पमध्ये नॉन ट्रॅन्झिटमधील लोक गेलेले आहेत हे खरे आहे. परंतु जाताना त्यांनी त्या त्या अधिकाऱ्यांना साईजेबल पैसे देऊन गेले आहेत ही चूकच आहे. नंतर गेली 5-10 वर्षे ते लोक अधिकृतपणे भाडे पावती घेत आहेत. अशा लोकांना हुसकावण्याची कारवाई केली जात आहे. हायकोर्टाच्या आदेशामुळे त्यांच्याकडून अधिकृतपणे कित्येक वर्षे भाडे घेऊन भाडे पावती दिली जात आहे. त्यांना एकदा मालाड येथे शिफ्ट केले होते. एका वेगळ्या केसच्या प्रकरणात झालेले आहे. तोच नियम या लोकांनाही लावला पाहिजे. उद्यापासून त्यांना तेथून काढले जाणार आहे. त्या कारवाईला महिन्याभराची स्थगिती द्यावी. यासंबंधी बैठक होऊन, सुनावणी होऊन पुढील कारवाई करता येईल. एवढीच मला विनंती करावयाची आहे.

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी कन्नमवार नगरमधील घटना सांगितली आहे. 1991 सालापासून त्या लोकांना पावत्या दिल्या जात आहेत. त्या लोकांना उद्यापासून बाहेर काढले जाणार आहे. त्या लोकांची पात्रता तपासण्यासाठी उद्याच्या उद्या तशी कारवाई होणार नाही. हे मी सांगतो. सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी महापालिकेतील कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकल्याचा मुद्दा मांडला होता. त्या कंत्राटदारांची यादी त्यांनी आपल्यामार्फत माझ्याकडे द्यावी. त्या ठिकाणी त्याच लोकांनी वेगळी फर्म काढून कंत्राट घेतले असेल किंवा दुसरीकडे काळ्या यादीत असतील पण येथे त्या यादीत नसतील अशा प्रकारचे रॅकेट तयार करुन काम करीत असतील त्यांच्या बाबतीत जरुर विचार केला जाईल.

दुसरा एक महत्वाचा मुद्दा आहे की, राज्यातील सर्व शहरातील 'अ', 'ब', 'क' वर्ग नगरपालिकांचे डी.सी.रुल आहेत त्यांच्यात समानता कशी आणता येईल यादृष्टीने कार्यवाही केली जात आहे. ज्या महानगरपालिका आहेत त्यापैकी मुंबई महानगरपालिकाच 'अ' वर्ग आहे. ठाणे शहराची लोकसंख्या अधिक वाढलेली आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव..

तेवढयांचा विचार करुन त्या महानगरपालिकेला एफएसआय द्यावा लागेल, उद्या मुंबईची वस्ती वाढली तर मुंबई महानगरपालिकेला एफएसआय द्यावा लागेल. म्हणून भविष्यामध्ये सर्व शहराकरिता एकच एफएसआय असावा असा विचार आम्ही करीत आहोत. 200 धार्मिकस्थळे ही ए कॅटेगरीमध्ये आणि 538 धार्मिक स्थळे बी कॅटेगरीमध्ये घेण्यात आल्यामुळे मोठा उद्रेक होण्याची शक्यता आहे असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. त्या बाबतीत काही रिलिफ देणे शक्य असेल तर तो दिला जाईल. तसेच दिव्यातील अनधिकृत बांधकामांच्या संदर्भात चौकशी करुन योग्य ती कारवाई केली जाईल.

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी )** : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. बुधवार, दिनांक 17 एप्रिल 2013 रोजी सकाळी 11.00 ते दुपारी 12.15 वाजेपर्यंत सभागृहाची विशेष बैठक भरेल. सदर बैठकीत लक्षवेधी सूचना व नियम 93 अन्वयेची निवेदने घेण्यात येतील. दुपारी 12.30 वाजता सभागृहाची नियमित बैठक पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक रात्री 9 वाजून 51 मिनिटांनी, बुधवार, दिनांक 17.4.2013 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही